00044328

NOT TO BE ISSUED
OUT OF THE LIBRARY.

THE
ASIATIC SOCIETY OF BOMBAY
TOWN HALL, BOMBAY-400 001.

Digitized with financial assistance from the
Government of Maharashtra
on 18 July, 2018

THE

SHADDARSHANA-CHINTANIKÂ

OR

STUDIES IN INDIAN PHILOSOPY.

A MONTHLY PUBLICATION
STATING AND EXPLAINING
THE APHORISMS OF THE SIX SCHOOLS
OF
INDIAN PHILOSOPHY
WITH THEIR TRANSLATION INTO MARATHI AND ENGLISH.

(Registered under Act XXV of 1867.)

Poona.

PRINTED AT THE "DNYAN PRAKASH" PRESS.

January, 1877.

44328

ORI
181.4
sha/sha
44328

Man, speak the truth in form attractive sweet;
Whate'er repels though true, do not repeat.
Whate'er attracts but false do not recite;
The ancient sages fix this holy rite.

CORRIGENDUM.

Read Kârlekar for Râjvâde on page IV.

00044328

षड्दर्शनचिंतनिका.

मीमांसादर्शन.

वृत्तिसहित

आणि

त्याचें मराठी आणि इंग्रजी

भाषांतर.

सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदली आहे.

पुणें.

"ज्ञानप्रकाश" छापखान्यांत छापिलें.

जानेवारी १८७७.

॥ सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात् ॥
॥ न ब्रूयात् सत्यमप्रियं ॥
॥ प्रियं च नानृतं ब्रूयात् ॥
॥ एष धर्म सनातनः ॥

शुद्ध.

पांचव्या पानांत राजवाडे याबदलां कालेंकर असावे.

INTRODUCTION.

Chronological order of philosophical teachers.

We intend to interpret to our readers the systems of the well-known *six schools of philosophy* in India. We will first indicate the chronological order of the founders of schools of thought in India. The *Risi* had enthusiastically sung his hymns, had fervidly prayed to God, had contemplated nature, and had enjoyed the exhilarating Soma-juice; the pleasant sensations which it caused filled his imagination and produced poetical sentiments which even at this distance of time do not fail to move those who can appreciate him. The Brahma-Vâdinas explained the utterances of the *Risi*, always from a sacrificial point of view, and gave an impulse to the thought of the age. The Âchâryas whose activities were many-sided, systematized the sacrificial dicta of the Brahma-Vâdinas, and proposed new interpretations of the original hymns of the *Risi*, cultivated etymology, developed grammar and psychology, and fixed and classified the advanced notions of the age by betaking themselves to the recesses of forests, and there contemplating the essence of matter and spirit. Then teachers like Patanjali, almost the greatest exegetist in the world, taught their schools. The Yoga-system of philosophy followed as a matter of course. Buddhism sprang up, which sapped the foundation of the superstructure raised with great assiduity during generations by the

*Ri*sis, Brahma-Vâdinas and Âchâryas, and established its ascendancy. Opposition headed by teachers in whom the spirit of the Âchâryas had not become extinct, brought on a reaction. The latter Âchâryas like Kanâda, Kapila and Bâdarâyana attacked the Bouddhas, formulated the ideas and thoughts of the age, and developed psychology and theology which are *the spirit* and *motive power* of all nationalities in India. There is ample evidence for the chronological order here indicated. It will be discussed else-where at length.

We intend to interpret the speculations of these latter Âchâryas, whose classifications of qualities, notions of matter and spirit, of transmigration, and of salvation are now invariably adopte in India. Whether we examine the writings of Guru Nânaka in the Panjab, of Kabir on the banks of the Ganges, of Chaitanya in Bengal, or of Tukârâm and Jnânobâ in Mahârâstra, of Svâmî Nârâyana in Gujerâtha, or of Râmânuja in the Tâmil and Telagu nationalities in the Madras Presidency, we find the same devotional fervour, tinged partly with positive notions of God, such as Kanâda taught, partly with the metaphysics, which Kapila systematized and developed, and partly with that pantheism which has sprung from the philosophy of Bâdarâyana. The modern Hindu is the embodiment of the influences which we have succinctly enumerated. Yet the six schools of philosophy are decidedly in advance of him, and inculcate principles which have all the freshness of modern European thought and possess truths of which no nation ought to be ashamed.

uence of the
s of philoso-
he modern
ad.

As we begin our *serial* called *Sad'arshana-Chintanikâ* with Jaimini's Mîmânsâ, a philosophical treatise on exegetics and its logic, we cannot better introduce our monthly magazine than by discussing the general principles of the theory of interpretation itself. The principles of interpretation are known in Europe as *exegetics* or *Hermeneutics*. In the extension as well as improvement of human knowledge, it plays a very important part. It springs from the conservative propensities of human nature. A genius alone can originate a thought. But its acceptance or rejection depends on the condescension of conservatism first to consider it, and then to see its power or necessity. But even when the power or necessity of a thought is clearly discerned, it is not easily adopted by a whole nation. It must undergo the ordeal of interpretation: its analogy to some already accepted thought must be pointed out: and its forms must be apprehended. We will give an illustration. Auguste Comte, a modern French thinker laid down a theory of the three stages of the development of history—theological, metaphysical, and positive. As a first great step towards a historical generalization, it is a hypothesis of considerable importance; but the orthodoxy of Europe at first rejected it, and condemned it. Yet in one form or other as interpreted by the thinkers of Europe, it is adopted. Thus the importance of the study of exegetics is great.

Importance of exegetics.

Again, as it is never the lot of all thinkers or students of philosophy to originate large ideas, it is at least their duty to know them, and seek to devolop them. Hence every student of philosophy cannot but be an interpreter of what is placed before him by his

ancestors. Mr. Mill's Logic or his system of Political Economy is the fruit of the great exegetical powers the author possessed. Whenever he sees a thought, he studiously and critically attempts to interpret it, by looking at it from as many points of view as possible, and by discussing it in its different bearings.

Interpretation is also a necessity with those who simply seek knowledge, for no elaborate book can be easily understood. The questions it discusses, require to be properly and systematically interpreted: the canons of exegetics require to be applied: the statements made by the same author in the course of a discussion require to be collated: the conclusions drawn by him at different stages of the discussion require to be sifted: and the forms in which his thoughts appear require to be distinctly discerned.

Interpretation is a necessity with ordinary men of business. For example, a document conveying a valuable estate may be carefully drawn up. But whenever it is used for substantiating a claim founded upon it, its interpretation is of special importance. Important issues in law-courts are raised as to the interpretation of a passage, and important decisions are affected in proportion as the one or the other interpretation is adopted by a court of justice. We, therefore, attach great importance to the exegetical philosophy of Jaimini, and believe that as an instrument of reform, as a means of philosophical study or of the acquisition of knowledge, as a necessity of active public life, as a system of education, as a fact in the history of Indian philosophy, as an encyclopædia of sacrificial lore, as the logic of such discussions as were conducted by Raghunâtha Shâstrî Parvate of Puna or Râjârâm Shâstrî Râjvâde of

Banâras, as a key to writings called Kalpa-Sutras, Âranyakas, Patanjali's Mahâbhâsya or Mâdhava's voluminous commentaries on Vaidika authors, and as the source of all the dicta of logic and religion which obtain at present among the Hindus, the system of Jaimini's Mîmânsâ is of special importance.

Recognized scriptures—the subject of exegetics.

Before we enter upon our proper task of translating and annotating upon Jaimini's Mîmânsâ, we will present to our readers a short historical sketch of Indian exegetics. Before exegetical logic can come into existence, there must be some recognized scriptures to which exegetics can be applied. The utterances of the *Risis* called Sanhitâs of the Vedas constitute these original scriptures. The *Risi* is the first original promulgator of thought in India—the eternal thought as it exists in the Divine Mind. The *Risi* saw it and revealed it. Now, the *Risi* was an energetic thinker. Absorbed in meditation, he prayed and sang; and his prayers and songs embody the highest religious aspirations of man. Full of faith, he sought the help of God on all occasions of life. He was conscious of the struggle between the good and evil influences in the mind of man. He fervidly prayed that the good influence which he called the *good mind* might prevail, and might be enabled to triumph over the evil influence called by him the *evil mind*. He believed in one God who always inspired his mind. He believed in the immortality of the soul, and spoke with raptures of the path of righteousness which his ancestors had followed. His description of heaven is pure and spiritual. Such a *Risi* in one sense originated the religious ideas of India, for every orthodox school of philoso-

phy refers to him as the fountain-head of all its doctrines and reveres him. This reverence for the *Ri*si is so thoroughly established in India that ideas even antagonistic to the *Ri*si but popularly recognized are attributed to him. Often a stray-utterance of the *Ri*si is quoted to support a system of thought that has nothing in common with the teachings of the *Ri*si. The theory of exegetics is, therefore, specially developed in India.

Objective exegetics.

The authors of the Brâhma*n*as who followed the *Ri*sis were the first to develop and apply a method of interpretation. They generally called themselves Brahma-Vâdinas. By Brahma, they meant accumulated knowledge or learning. But Brahma was the name given by the *Ri*sis to a prayer they utteredor a hymn they chanted. When the power of the Brahma which moved the heart and inspired the intellect of the ancient Âryasfor generations was established, the Brahma-Vâdinas were compelled by the circumstances in which they found themselves placed, to advance their sacrificial doctrines by interpreting the hymns of the *Ri*sis into their own dicta. Their method is called *objective*, for they always try to support their interpretation of the mantrâs into something sacrificial by referring to a natural phenomenon, such as the revolution of the sun, to an established social custom or to canons and rules of recognized literature. Illustrations based on the facts of the external world constitute their special *forte*. The whole Brâhma*n*a literature consists of sacrificial interpretations of the hymns of the *Ri*sis. Look into any chapter of the Aitareya, Taittirîya or Shatapatha Brâhma*n*a, and the general principles of this method

of interpretation will be at once seen. But three facts deserve special attention. I. They based their speculations on etymology. II. They saw the phenomenon of *generation* illustrated in their sacrifices as originally fire was produced by friction. III. They seriously narrated stories of battles between demons and gods. Etymology represents the psychical phase of objective exegetics; and natural phenomena, their physical phase; the stories supplied the traditional basis. It need not be remarked that every system of philosophy discovers these three phases. Engaged in applying the system of objective exegetics, generations of thinkers propounded their sacrificial dicta and passed away.

Subjective exegetics.

The system of objective exegetics necessarily ceased to interest the Brahma-Vâdinas. The sacrificial dicta were too material to continue to be powerful. The Brahma-Vâdinas gave way to another school of thinkers—the Âchâryas of the Âra*n*yaka-period. The system of exegetics was alterd. The utterances of the *Ri*sis were now interpreted in a psychical way. Phenomena which have always inspired thinkers attracted attention. The soul, the spirit and the faculties of the mind, became the subjects of discussion and excogitation. The concrete had paved the way for abstract thought. The qualities of substances were examined. The characteristic feature of this school of exegetics was:—earnest and irrepressible search after the essence of whatever exists. Brahma now no longer meant either a prayer or learning. Its signification under went a great change: it meant the essence sought. Among the ancient Greeks, a craving for the essence of all existence over-ruled their philosophical

speculations. The Greek sought the essence, but his method was different. He named a substance such as air or fire, and attempted to resolve all existing matter into it. His logic consisted in investigation, and he desired explanation of what he conceived to be different forms of one substance. The ancient Ârya in India studied the utterances of the *Ri*sis, and interpreted the forms mentioned by them into the essence of matter or mind. The first examined concrete natural substances. The last named abstract qualities, powers or generalities. The one was obliged by his position to investigate the actual properties of a material substance, and by combination or analysis, to establish his conclusion. The other simply philosophized about an abstract entity, and gave reasons. The former paved the way for the study of physics, and the latter rose to a sublimity of thought, and impelled by aspirations which rose superior to every thing worldly, and which presented a picture of eternal quietude and happiness, sought an ideal life. The Greek gradually became anxious to know the properties of matter and mind, and though often repulsed and often discomfited, was determined to know the cause and explanation of what he saw in nature either material or spiritual. The ancient Ârya in India, bent on securing the essence which resulted in quiet beatitude, developed the means and ends of contemplation. While some Âchâryas were absorbed in contemplation, others cultivated grammar and cognate sciences. This was partly attended and partly followed by great philosophical activities. A school of thinkers who styled themselves Aitihâsikas (historians in one sense) attempted the interpretation of the original mantras in their own way, and ad-

vanced some doctrines of their own. Another school—that of linguists attempted the analysis of lingual forms, and insisted on some mantras being interpreted in a particular way. This school was represented by two classes of thinkers—grammarians (Vaiyâkaraṇas) and etymologists (Nairuktas). A school of Âchâryas cultivated what may be called the philosophy of a sacrifice, and constituted themselves Yâjnikas who interpreted the original mantras in their own way. Suffice it to remark that in the limited space at our disposal, full justice cannot be done to the many-sided activities of the Âchâryas who adopted the system of subjective exegetics, and developed it. These Âchâryas worked with an energy which systematized the exegetical logic about to be noticed.

Illustration of the schools of exegetics.

We will quote only one mantra of the *Ṛisi* Dîrghatamâ Ouchathyas and present to our readers the different interpretations as offered by different schools of thought. The following is the literal translation of (I. 164, 45.) of the *Ṛik*-Sanhitâ.

> Denifte four, the feet of speech;
> The Brâhmaṇs who high wisdom reach
> Know them. Put in the heart are three
> Which common mortals do not see;
> But these, the fourth of speech do speak.

The Vaidika exegetes give the following version of this mantra. The *four feet* are the three Vyâhṛitis (Bhûr, Bhuvas, and Svar,) and Om—the well-known praṇava. The objective school of exegetics—closely allied to, or almost identical with, the first—insists on the sacrificial sense of the *four feet*. The following occurs in a Brâhmaṇa-work—"Four-fold speech

was created : in these worlds (lokas), three kinds are found, and the fourth is to be found in beasts. That which exists on the earth is seen in fire and in the musical mode called the Rathantara-Sâma : that which exists in the firmament is to be seen in the air, and in the musical mode called the Vâmadevya-Sâma : that which exists in the heavens is to be seen in the sun, in the musical mode called Brihat-Sâma, and that in the lightning and in beasts. In Brâhmanas they placed that which exceeds all these. Therefore, Brahmanas speak the speech, both of gods and men." This interpretation is based on a sacrificial arrangement. The Aitihâsikas interpret the mantra in the following way: "the *four feet* are the sounds of serpents, the sounds of beasts, those of insignificant animalcules, the fourth foot of speech is the language of common life". This interpretation deserves special attention, as it throws light on the method, which the Aitihâsikas followed. The grammarians considered the *four feet* to be nouns, verbs, prepositions (verbal prefixes), and particles. The Nairuktas or etymologists consider the *four feet* of speech to be the *Rik*, the Yajus, the Sâma, and the ordinary language. The Yâjnikas consider the *four feet* to be the mantra, kalpa, Brâhmana , and the language of common life. The most important interpretation is that of psychologists, who pre-eminently employed the method of subjective exegetics—"Speech is either *parâ* (highest), *pashyantî* [seeing] *madhyamâ*, (intermediate), or *Vaisvarî* (pre-eminently that of a sound). It is *Parâ* when in the form of a sound, it originates ; when conceived in the mind, it is *pashyantî* : when it reaches the determining faculty (buddhi) and seeks to be expressed, it is *madhyamâ* : and when it is

expressed through the organs of speech, such as the palate or lips, it is *Vaisvarî*. The real interpretation of the *Ṛik* already translated literally, ought to be determined by the rules of exegetical logic, that is, by the application of the principles of context (Sâhachar-ya) in its different bearings, of the particular subject (Prakaraṇa,) of the particular collocation (sthâna) as developed in Jaimini's Mîmânsâ, and of exegetical inference. The principles of exegetical logic developed in the course of centuries and systematized by Jaimini, when carefully applied, necessitate or ought to necessitate only one interpretation of the poetical lines.

Exegetical logic.

This logic was gradually developed. While some thinkers were employed in actual interpretation, others sought to sift the rules of exegetics itself. Patanjali's Mahâbhâṣya develops, discusses, and sums up the principles of exegetical logic. Certain philosophical treatises had established their claim to attention, and their reputation commanded respect. The Pâṇinîyam may be mentioned as an example. A number of teachers of celebrity were busied in its interpretation. The fundamental principle of their logic is the establishment of a rule by an inference based on the utterances of the author to be interpreted, and the rejection of his statements by the same method. A number of maxims, springing partly from close exegetical reasoning, and partly founded on the recognized procedure of the people, were laid down. This method is important as it was fraught with great consequences to India. Patanjali's Mahâbhâṣya embodies all its principles. It is at once bold and submissive—at once for reform and for conservatism. In as much as it rejects a statement of

a recognized author, it is bold; but it attempts to accomplish this object by such exegetical principles as are inferred from the author attacked, and it is, therefore, submissive. It aids reform by depriving a celebrated author of any respect arising from his distinction, or of his pretensions to infallibility, and conciliates the orthodoxy by its exegetical method, which cannot but be sanctioned by the author himself. All this is expressed by the principles of what are known among us as Jnâpaka and Pratyâkhyâna. What followed the mental training such a system fostered can be easily guessed: the Buddhists came with weapons of their own, and attacked antiquity.

A revolution in method and thought.

In the mean-time, the intellectual training which the former Âchâryas had given, communicated a new inpulse to thought, and produced a fearless independence, which set at defiance the *Risis*, their utterances and the Brahma-Vâdinas. Influenced by the logic of subjective exegetics and its method, the Buddhists steadily advanced and asserted with a boldness and power, which astonished their contemporaries, that man and his powers explained all phenomena. Their logic was at once practical and philosophical:—practical in as much as they took special care of the morality and prosperity of the laity, who were considered to be mere disciples, and whose simple duties consisted in purity of life and attention and obedience to their instructors, and philosophical because the ascetics who spent their whole life in a convent, were subjected to a rigid course of spiritual discipline, and were trained to employ philosophy in their disquisitions and discussions. Revelation and its

pretensions were rejected; the sacrifices which occupied the whole life of a Brâhmaṇa, and excited in some cases national interest, were condemned, and practical rational duties were inculcated in the place of sacrifices. In philosophy, the authority of testimony was overthrown—such testimony as had advanced pretensions to infallibility. All arguments were built on ocular direct observation, inference, and analogy as based on the first two, for this logical analogy is to be distinguished from that which objective exegetics employed. The latter consisted in narrating traditional stories or tracing a connection between the conclusion to be established and recognized customs or dicta.

Revival of the orthodox method and thought.

The latter Âchâryas opposed, attacked, and paved the way for the final extinction of, Buddhism in India. Their action caused a great revival among the latter Âchâryas. As we seek to interpret these Âchâryas, we shall have to state much about them, as occasion arises.

The present prevailing method of interpretation.

The first maxim of the prevailing exegetics is to support customs and social institutions as they exist at present, without any attention to their origin, that is, without enquiring whether they are Buddhistic or Vaidika, by confounding all the dicta of the different schools of exegetics, of formal logic or of Bouddhas. This method, originated by Shankarâchârya and his disciples, showed for some time a great power. The two systems of logic—formal logic for the investigation and ascertainment of truth, and exegetical logic for the interpretation of documents of recognized authority—

are generally confounded. The spirit of adjustment [Vyavasthâ] which can harmonize all the texts scattered throughout the voluminous literature developed by the ancient Âryas of India, characterizes this school. At the present time, however, when the spirit of thorough investigation exists or ought to exist, and when aspirations for the advancement of the nationalities in India require the investigation of the philosophy and logic of our ancestors, we have thought it proper to present the reader with a translation of the the systems of philosophy in India.

The authors of the six schools of philosophy.

We have begun with Jaimini's Mîmânsâ for it embodies all the principles of exegetics with their application. All the philosophical writers in India follow the method of enunciating their principles and demonstrating their practical application at the same time. The Yoga-system treats of the means, method and the end of contemplation. Goutama exhaustively explains the system of dialectics of discussion, as it once took place in an organised assembly. Kanâda develops formal logic, and a system of physics and metaphysics. Kapila devotes his work to the elucidation of the evolution-theory of the creation of the world and resembles the school which Darwin leads in England. Bâdarâyana attempts to prove that the spirit (chaitanya) alone exists, and that the phenomena of nature are its forms, its modifications, its developments, and its manifestations. As these systems are orthodox at least in form, they recognize the authority of the Vedas; and because they recognize the authority of the Vedas, they are as a matter of course obliged to have recourse to exegetics. Hence we have discussed

the subject of exegetics at length in this introduction for which we beg our readers will kindly execuse us.

Editor.

Shaddarshana-Chintanikâ-Office, Puna,
1*st January*, 1877.

N. B. It is our intention to indicate the modern philosophical ideas of Europe in foot-notes as occasion arises either by way of comparison or contrast so that they may be popularized in this country, and that our country-men may adopt them. We need not state that modern philosophy and the material prosperity of Europe are inseparably connected.

प्रस्तावना.

जगद्विख्यात षड्दर्शनांचें अर्थविवेचन करण्याचा आमचा उद्देश आहे. महान् ग्रन्थकार व शास्त्रव्यवस्थापक केव्हां झाले, या गोष्टीचें दिग्दर्शन प्रथम केलें असतां बरें पडेल. ऋषिजन आल्हादकारक सामें गात; मोठया उत्साहानें ईश्वराचें स्तवन करीत, व त्याची प्रार्थना करीत, सृष्टिस्वरूपाचें अवलोकन करून मनन करीत, आणि आनंदलहरी उत्पन्न करणाऱ्या सोमरसाचें पान करून, आनंदांत दिवस घालवीत; तेणेंकरून त्यांच्या मनामध्यें कल्पनेचे तरंग उठत, आणि त्यांच्या मुखांतून असे विचार बाहेर पडत कीं, जरी आज हजारों वर्षें होऊन गेलीं आहेत, तरी ज्यांना त्यांच्या लेखांचें रहस्य समजतें त्यांच्या चित्तास त्या विचारांनीं स्फुरण होतेंच होतें. पुढें ब्रम्हवादिजनानीं ऋषींच्या लेखांचा अर्थविचार केला. या ब्रम्हवाद्यांचा विशेष आशय श्रौतक्रियेचें प्रतिपादन करण्याचा होता. यांनीं सर्व देशभर लोकांच्या मनाला एक तऱ्हेचें वळण लावून दिलें. नानाप्रकारचे विचार करण्याला जे प्रवृत्त झाले अशा आचार्यांनीं ब्रम्हवादिप्रतिपादित श्रौतकर्मांची व्यवस्था केली, व ऋषिप्रणीत सूक्तांचा अर्थविचार केला; निरूक्त शास्त्राची रचना केली, व्याकरण आणि अध्यात्म विद्येचे वृक्ष प्रफुल्लित दशेस आणिले, आणि अरण्यामध्यें जाऊन आत्मिक व जड सृष्टींच्या तत्वाचें मनन आणि निदिध्यासन करून आपल्या वेळच्या प्रगल्भ शास्त्रविचाराची व्यवस्था केली. नंतर बहुधा सर्व जगतामध्यें अतिश्रेष्ठ वाक्यार्थमीमांसक जो पतंजलि, अशा सारख्या गुरूंनीं विद्यार्थ्यांचें अध्यापन केलें. नंतर योगशास्त्राची सहजच प्रवृत्ति झाली. पिढ्याच्या पिढ्या मोळ्या श्रमांनीं ब्रम्हवादि व आचार्य यांणीं जें विचारमंदिर रचलें होतें त्याचा पाया खणून टाकणारे बौद्ध लोक उत्पन्न झालें, आणि त्यांनीं आपलें वर्चस्व स्थापिलें. मग मोळ्या विद्वान् गुरूंमध्यें व बौद्धाचार्यांमध्यें विरोध पडला. तेणेंकरून उलट परिणाम घडून आले. कणाद, कपिल, आणि बादरायणासारख्या

अध्यात्म ग्रंथकारांचा कालक्रम.

आचार्यांनीं, बौद्धाचार्यांशीं वाद करण्यासाठीं कंबर बांधली. त्यानींहि आपल्या वेळच्या शास्त्रविचाराची व्यवस्था केली. हिंदुस्थानांतील सर्व लोकांचें प्रवर्तन करण्याविषयीं जणों चालक आत्माच असें जें धर्मशास्त्र व अध्यात्म विद्या, त्यावरील आच्छादन काढून त्यांची योग्यता प्रकट केली. अशी कालव्यवस्था करण्यास सबळ प्रमाणें आहेत, परंतु या गोष्टीचा विचार दुसऱ्या एकाद्या स्थलीं पूर्णपणें करूं.

अर्वाचीन हिंदुलोकांवर षड्दर्शनांचा संस्कार.

ह्या उत्तर आचार्यांच्या लेखाचें तात्पर्यवर्णन करण्याचें आमच्या मनांत आहे. ह्यांनीं गुणविभाग करून व जड द्रव्याविषयीं विचार करून, चैतन्य, जन्मान्तर, आणि मुक्ति, यांविषयीं प्रतिपादन केलें; आणि त्यांनीं जें प्रतिपादन केलें त्याच प्रतिपादनाच्या अनुरोधानें सर्व भरतखंडभर लोकांची आज प्रवृत्ति आहे. पंजाबदेशांत गुरूनानकशाह, किंवा गंगातीरीं कबीर, किंवा बंगालदेशीं चैतन्य, किंवा महाराष्ट्रदेशीं तुकाराम, आणि ज्ञानोबा, अथवा गुजराथदेशीं स्वामिनारायण, अथवा मद्रास इलाख्यांत रामानुज, अशा लोकांचे लेख नीट पाहिले असतां असें दिसून येतें कीं, या सर्वांमध्यें उत्कंठित भक्तिरस एकच प्रकारचा; आणि कणादासारख्यानीं ईश्वरसंबंधी ज्या ज्या प्रबुद्ध विचाराचें प्रतिपादन केलें, ते विचार या भक्तिरसामध्यें अंशतः उतरले आहेत. कपिलासारख्यांनीं ज्या अध्यात्मविद्येची व्यवस्था केली आणि प्रगल्भता साधली, ती अध्यात्मविद्याहि या भक्तिरसांत उतरली आहे, आणि बादरायणाच्या दर्शनापासून जो वेदांत उत्पन्न झाला तो वेदांतहि अंशतः या भक्तिरसामध्यें उतरला आहे. म्हणजे संक्षेपानें आम्हीं ज्या ज्या गोष्टींचें वर्णन केलें आहे, त्या सर्व हल्लींच्या हिंदूंत अढळतात; तथापि षड्दर्शनांचा पोंच मोठा, आणि तेथपर्यंत हल्लींचा हिंदु पोहंचला नाहीं; व अर्वाचीन युरोपी लोकांच्या शास्त्राला जो तजेला चढला आहे तितका तजेला असणारे सिद्धांत षड्दर्शनांमध्यें अढळतात, व जगतांतील कोणत्याहि लोकांना कमीपणा येणार नाहीं, असें प्रतिपादनहि ह्या षड्दर्शनांत आहे.

वाक्यार्थमीमांसा व तत्संबंधीं न्याय यांविषयीं जैमिनिकृत मीमांसे-

वाक्यार्थमीमांसेचें माहात्म्य.

मध्यें प्रतिपादन आहे. त्याचेंच भाषांतर आम्ही या षड्दर्शनचिंतनिकेंत प्रथम करणार म्हणून षड्दर्शनचिंतानिके सारख्या मासिक पुस्तकांत वाक्यार्थमीमांसेचे मुख्य सिद्धांत कोणते आहेत, त्यांचा या प्रस्तावनेंत विचार करणें योग्य आहे.

ज्ञानाची वृद्धि करण्याकरतां व संशोधन करण्याकरितां वाक्यार्थमीमांसा मोठी उपयोगी पडते. मनुष्याचा स्वभाव असा आहे कीं, ज्या ज्या गोष्टीची त्यास सवय झाली असते त्या गोष्टी त्याला आवडतात. व या स्वभावामुळेंच वाक्यार्थमीमांसेची प्रवृत्ति होते. एखादा मोठा नवीन विचार शोधून काढणारा कल्पक बुद्धिवान् पुरुष फार विरळा; परंतु दुसऱ्यांचे सिद्धांत सर्वांस ध्यावे लागतात. आणि हा विचार टाकावा किंवा ध्यावा असा सिद्धांत प्रथम करण्याकरतां प्रतिष्ठित व संभावित लोकांनीं आरंभीं आग्रह टाकावा लागतो; मग त्या विचाराची योग्यता किंवा अवश्यकता स्पष्ट दिसून येते. परंतु योग्यता किंवा अवश्यकता नीट जरी दिसून आली तरी अशा नवीन विचाराची प्रवृत्ति सर्व लोकांत सहज होत नाहीं. वाक्यार्थमीमांसेच्या कसोटीस हा विचार उतरला पाहिजे. पूर्वीच गृहीत अशा एकाद्या सिद्धांताचें आणि या कल्पनेचें साम्य दाखविलें पाहिजे. या कल्पनेचे सारे आकार मनांत भरले पाहिजेत. पुढील दृष्टांताच्या योगानें हें सर्व विवेचन वाचकांच्या लक्षांत येईल. आगस्तकोम नांवें फ्रेंच पंडित होऊन गेला. त्यानें ऐतिहासिक उत्पत्तीवर कल्पना काढली. ती अशी कीं, प्रत्येक देशाचे किंवा प्रत्येक मनुष्याचे इतिहासांत तीन कल्प असतात, म्हणजे धार्मिक, आध्यात्मिक, आणि प्रबुद्ध व्यावहारिक. ऐतिहासिक अनुगमाच्या संबंधानें ही कल्पना बरीच उपयोगी आहे; व हिची योग्यताही बरीच आहे. परंतु युरोपखंडांतील स्थापितमतानुयायी लोकांनीं ह्या कल्पनेचा प्रथम त्याग केला, व एक प्रकारें ती खोटी, असेंही म्हटलें. तथापि युरोपांतील शास्त्री-लोकांनीं जो जो तिचा अर्थ बसविला त्या त्या अर्थीं ती गृहीत झाली. यावरून वाक्यार्थमीमांसेच्या रचनेची योग्यता किती मोठी आहे हें दिसेल.

आणखी सर्व पंडितांच्या किंवा शास्त्रजिज्ञासूंच्या हातून मोठ्या मोठ्या कल्पना शोधून काढणें कधींहि होत नाहीं; परंतु ह्या कल्पना काय आहेत हें समजून घेणें व त्यांस प्रगल्भ दशेस नेण्यास झटणें असा सर्व शास्त्रजिज्ञासूंचा धर्म आहे, म्हणून जी जी गोष्ट शास्त्रजिज्ञासूंस अढळेल तिचें तिचें अर्थपरिस्फोटन त्यांनीं केलेंच पाहिजे. मिल्टुनामें कोणी नैय्यायिक इंग्लंड देशांत होऊन गेला, व त्यानें "धनविषयक व्यवस्था" या विषयावर ग्रंथ केला. वाक्यार्थमीमांसेची शक्ति ह्या ग्रंथकाराचे अंगीं होती म्हणून येवढें काम त्याच्या हातून झालें. जेव्हां जेव्हां त्याला एखादा मोठा सिद्धांत अढळे तेव्हां तेव्हां मोठ्या श्रमानें व बारीक नजरेनें तो त्याची वाक्यार्थमीमांसा करण्यास श्रम करी व जितक्या निरानिराळ्या तऱ्हेनें त्याच्या हातून होईल तितक्या निरानिराळ्या तऱ्हेनें सिद्धांताचें तो आलोचन करी व सिद्धांताच्या निरानिराळ्या संबंधांकडे लक्ष देऊन त्या सिद्धांताचें परीक्षण करी.

ज्या लोकांस ज्ञान प्राप्त करून घेण्याची इच्छा मात्र आहे त्यांनींहि वाक्यार्थमीमांसा अवश्य पाहिली पाहिजे. विशेष अध्ययनयोग्य कोणतें ही पुस्तक सहज समजत नाहीं. त्यांत ज्या ज्या कोटींची परीक्षा केली असते, त्या त्या कोटींचा जपून व व्यवस्थेनें वाक्यार्थ झाला पाहिजे. वाक्यार्थमीमांसेचे नियम योजले पाहिजेत. एकाच ग्रंथकारानें जीं निरानिराळीं वर्णनें केलीं आहेत, तीं एका ठिकाणीं जुळलीं पाहिजेत. व विषयपरीक्षणाच्या निरानिराळ्या प्रसंगीं जीं अनुमानें त्यानें काढलीं आहेत तीं नीट पडताळून पाहिलीं पाहिजेत. व त्याच्या सिद्धांताच्या सर्व आकाराची स्पष्ट दृढ परीक्षा झाली पाहिजे.

वाक्यार्थमीमांसा काय हें प्रापंचिक जनानींहि समजून घेणें अवश्य आहे. यास दृष्टांत. पहा, एखादा दस्तऐवज फार जपून तयार झाला, परंतु त्या दस्तऐवजावरून आपला कोणताही हक्क शाबित करते वेळीं त्या कागदाचा अर्थ करावा लागतो. त्या अर्थाची योग्यता मोठी आहे. न्यायाधीशापुढें त्या कागदांतील वाक्यार्थाविषयीं मोठे मुद्दे निघतात, व ज्या ज्या प्रकारचा अर्थ शाबित होईल, त्या त्या प्रकारें कोडताचे मोठमोठे ठराव फिरतात. यावरून जैमिनीच्या मीमांसादर्शनाची

योग्यता मोठी आहे असें आम्हास वाटतें. कारण, विद्याध्ययनाचें ती एक साधनच आहे, व हिंदुस्थानच्या इतिहाससंबंधानें तिचें माहात्म्य मोठें आहे. ही मीमांसा सर्व श्रौतधर्माचें भांडारच आहे व पुणेकर रघुनाथ शास्त्री पर्वते आणि काशीकर राजाराम शास्त्री राजवाडे ह्या सारखे गुरू ज्या रीतीनें वादविवाद करीत, त्या रीतीचें मुख्य साधन मीमांसाच आहे. वेद, आरण्यकें, कल्पसूत्रें, पतंजलीचें महाभाष्य, किंवा माधवाचें वेदभाष्य, अशा विद्यामंदिराचें कुलूप काढण्याची ती जणों किल्लीच आहे. तार्किकांचे आणि धार्मिकांचे जे सिद्धांत आहेत, व हल्लीं हिंदु लोकांमध्यें ज्या सिद्धांताची प्रवृत्ति आहे त्यांचें ती उत्पत्तिस्थान आहे, म्हणून जैमिनीची मीमांसा सर्व प्रकारें विशेष अवलोकनीय आहे. षड्दर्शनाचिंतनिकेच्या प्रारंभीं आमचें मुख्य काम जैमिनिकृत मीमांसेचें भाषांतर करण्याचें व त्याचें तात्पर्य निरूपण करण्याचें आहे. त्याचा आरंभ करण्या पूर्वी भरतखंडांतील वाक्यार्थमीमांसेचा संक्षेपतः इतिहासवर्णन करतों.

वाक्यार्थमीमांसेचा विषय–सर्वमान्य मूलग्रंथ.

वाक्यार्थमीमांसेची योजना करण्यापूर्वी कांहीं सर्वमान्य ग्रंथ गृहीत केले पाहिजेत. हे गृहीत मूलग्रंथ ऋषिप्रणीत वेदसंहिता होत. आतां, ऋषिजन हे मोठे प्रबळ विचारी होते. ध्याननिमग्न होऊन ते ईश्वराची प्रार्थना करीत, आणि सामगान करीत. त्यांच्या प्रार्थनेमध्यें आणि गानामध्यें गहन धार्मिक विचार असत. त्यांचें मन भक्तिभावानें सद्गदित होत असे, आणि संसारामध्यें सर्व प्रसंगीं ते ईश्वराचें साहाय्य मागीत. मनुष्याच्या मनांतील पाप आणि पुण्य बुद्धींमध्यें जो सतत झगडा चालला आहे त्याविषयींचें ज्ञान त्यांस उत्तम असे. व सद्गदित हृदयानें ते ईश्वराचा धावा करीत, कीं "हे ईश्वरा! आमची पुण्य बुद्धि प्रबळ कर, आणि पापबुद्धीचा पराजय करून पुण्य बुद्धीला जय दे." ईश्वर एकच होता असें ते मानीत. तेणेंकरून त्यांच्या मनास स्फुरण चढत असे. आत्मा अनश्वर आहे असें त्यांचें मत असे. व पूर्वज ज्या सुकृतपथानें गेले त्या सुकृतपथाचें मोळ्या आल्हादानें ते वर्णन करीत. त्यांचें स्वर्गवर्णन मोठें शुद्ध असून अंतःकरणास सद्गदित करणारें आहे.

हे ऋषिजन या भरतखंडांतील शुद्ध सिद्धांताचें मूलप्रतिपादक होत. तो शुद्ध सिद्धांत कसा म्हणाल, तर परमेश्वराच्या ठायीं निरंतर वास करणारा. हा शुद्ध सिद्धांत ऋषींच्या दृष्टीस पडला आणि त्यापासून जगतांत प्रकट झाला. अशा प्रकारचे ऋषिजन भरतखंडांतील लोकांच्या मनाचें प्रवर्तन अजून करतात. कारण कीं, आपल्या मतांचें उत्पत्तिस्थान ऋषिजनच असें षड्दर्शनकार मानतात, व त्याप्रमाणें त्यांची योग्यता आहे असें समजतात. ही गोष्ट भरतखंडांत इतकी गृहीत झाली आहे, कीं लोकमान्य पण ऋषिविरुद्ध अशाहि गोष्टी ऋषिप्रणीत आहेत असें लोक मानतात; आणि आपली सिद्धांतसरणि स्थापित करण्याकरितां ऋषींनें उच्चारिलेलें भलतीकडील एखाद्या वचनाचें प्रतिपादन करतात. या कारणामुळें भरतखंडामध्यें वाक्यार्थमीमांसा विशेष प्रगल्भ दशेस पोंचली आहे.

आधिभौतिक वाक्यार्थमीमांसा.

ब्राह्मणनामें ग्रंथकार ऋषिजनांच्या मागून झाले. त्यानीं प्रथमच वाक्यार्थमीमांसेची योजना केली. आपणास ते ब्रह्मवादी असें बहुधा म्हणवीत असत. ब्रह्म शब्दाचा अर्थ संचितविद्या असें ते समजत. ऋषिजनांचा ब्रह्म शब्दाचा अर्थ ईश्वराची प्रार्थना अथवा ईश्वरपर गान असा असे. पुष्कळ दिवसपर्यंत प्राचीन जनांची बुद्धि सद्गदित होत असे आणि त्यांच्या चित्तवृत्तींस स्फुरण चढत असे, येवढी ब्रह्म शब्दाची शक्ति असे म्हणून प्रसंगानुरोधानें श्रौतकर्म संबंधी सिद्धांताचें प्रतिपादन करण्याकरतां ऋषिप्रणीत मंत्रांचे अर्थ करून ब्रह्मवाद्यांनीं आपलें मत स्थापन केलें. त्यांच्या वाक्यार्थसरणीस आधिभौतिक वाक्यार्थमीमांसा असें नांव दिलें आहे; कारण मंत्रांचा अर्थ करतांना त्यांत कांहीं तरी श्रौतकर्म आहे असें त्यास वाटे, आणि सूर्यभ्रमणासारख्या एखाद्या स्वाभाविक सृष्टिस्वरूपाचें कथन करून अथवा लोकांच्या एखाद्या चालीचें वर्णन करून अथवा सर्वमान्य विद्येतील कांहीं गोष्टींचें अवलंबन करून ते वाक्यार्थ करीत. बाह्य जगताच्या आकारावरून त्यांचे सर्व दृष्टांत बसविलेले असत, व असे दृष्टांत देण्यांतच काय तो त्यांचा मुख्य बाणा. ब्राह्मणनामें कोणताहि ग्रंथ घेतला असतां श्रौतकर्माच्या अनुरोधानें ऋषिप्रणीत मंत्रांचा अर्थ त्यांत अढळतो. ऐतरेय, तैत्तिरीय, किंवा शतपथ ब्राह्मण

यांतील कोणताहि अध्याय पाहिला असतां त्यांची वाक्यार्थमीमांसासरणि लक्षांत येईल. परंतु तीन गोष्टी विशेष लक्षांत बाळगल्या पाहिजेत. प्रथम, ते निरुक्त विचार फार करीत. दुसरें, पूर्वी काष्ठमंथनानें अग्नि ब्रम्हवादी उत्पन्न करीत म्हणून यज्ञकर्मी प्राणोत्पत्तीचे प्रकार आहेत असें त्यांस वाटे. तिसरें, देव आणि दैत्य यांतील युद्धकथांचें ते विशेष वर्णन करीत. आधिभौतिक वाक्यार्थमीमांसेच्या संबंधानें, निरुक्त हा त्या मीमांसेचा अध्यात्म आकार आहे. सृष्टिस्वरूप हा तिचा भौतिक आकार आहे आणि कथा हा तिचा ऐतिहासिक आकार आहे. प्रत्येक शास्त्राचे हे तीन आकार असतात हें सांगणें नको. या आधिभौतिक वाक्यार्थ मीमांसेमध्यें पंडितजन पिढ्यांच्या पिढ्या निमग्न झाले होते. आपल्या श्रौतासिद्धांतांचें प्रतिपादन करून ते लयास गेले.

आध्यात्मिक वाक्यार्थमीमांसा.

या आधिभौतिक वाक्यार्थमीमांसेचा ब्रम्हवादिजनांना सहजच कंटाळा आला. श्रौतसिद्धांत इतके ऐहिक वाटत कीं, त्यांचें प्राबल्य चालेना म्हणून ब्रम्हवादिजन जाऊन त्यांच्या ठिकाणीं दुसरे पंडित झाले. ते आरण्यकें ज्या वेळीं झालीं त्या वेळेचे आचार्य होत. आतां वाक्यार्थमीमांसेची पद्धति बदलली. आध्यात्मिक रीतीनें मूळमंत्राचा अर्थ होऊं लागला. जेणेंकरून पंडितांस नेहमी स्फुरण येतें अशा आत्मिक स्वरूपाकडे लक्ष जाऊं लागलें. आत्मा, मनाच्या शक्ति, आणि चैतन्य, यांविषयीं वादविवाद व विचार होऊं लागले. जडसृष्टिस्वरूपाच्या विचारांनीं आत्मिक विचाराकरितां मार्ग तयार करून ठेवला होताच. पदार्थांच्या गुणांचें विवेचन होऊं लागलें. या वाक्यार्थमीमांसेचें मुख्य स्वरूप हें असे कीं, जें जें कांहीं आहे त्याचें तत्व कोणास न जुमानतां उत्कंठेनें शोधून काढायाचें. आतां ब्रम्ह म्हणजे प्रार्थना किंवा संचितज्ञान हा अर्थ नष्ट झाला. त्या शब्दाचें अर्थांतर झालें व मूलतत्व असा त्याचा अर्थ झाला. ग्रीक लोकांमध्यें सर्व पदार्थांचें तत्व शोधण्याची आवड एक वेळीं माजली होती; आणि सर्व अध्यात्मविचारांमध्यें तिची प्रवृत्ति झाली. मग ग्रीकाहि तत्व काय असा शोध फार करीत. परंतु त्यांची पद्धति भिन्न असे. ते अग्नि किंवा वायु असा एखादा

पदार्थ घेत, आणि सर्व जडसृष्टि त्याचा आकार आहे असें सिद्ध करीत. त्यांचे तार्किक सिद्धांतहि स्वतांचेच असत. आणि जें जें त्यांना दिसे ते एकाच वस्तूचे निरानिराळे आकार आहेत असें समजून, ते त्या आकारांची उपपत्ति शोधण्यास लागत. भरतखंडांतील प्राचीन आर्य कांहीं ऋषिप्रणीत वचनें घेत आणि जड आणि चैतन्याचें तत्व काय हें त्या वचनांच्या अर्थावरून बसवीत. ग्रीक लोक हे सृष्ट जड पदार्थांचें विवेचन करीत. परंतु गुण अथवा शक्ति अथवा अनुगत तत्वें ह्यांचा विचार भरतखंडांतील प्राचीन आर्य करीत. ग्रीक ज्या स्थितींत होते तिच्यामुळें सहजच त्यांना पदार्थांच्या दृश्य गुणांचा विचार करावा लागे; आणि साधर्म्यवैधर्म्यांवरून आपलें अनुमान सिद्ध करावें लागे. भारतखंडीय प्राचीन आर्य लोक फक्त सोपपत्तिक तत्वविचार करीत. ग्रीक लोकांच्या विचारांपासून सृष्टपदार्थविज्ञान उत्पन्न झालें; आणि प्राचीन आर्यांचे विचार अति सूक्ष्म व गहन असत. तेणेंकरून त्यांच्या मनांची धांव मोठी असे. ही धांव तरी कशी म्हणाल तर सर्व संसाराचा ते त्याग करीत आणि पारमार्थिक चिरंतन शांति आणि सुख ह्यांचा आकार जणों त्यानां मूर्तिमंत दिसे आणि आत्मिक संसारांत गढून जात. हळू हळू ग्रीक लोक जड सृष्टि आणि चैतन्य, यांच्या धर्मांचा विचार करूं लागले आणि जरी वारंवार त्यांचे श्रम व्यर्थ जात व त्यांची मति गुंग होई तथापि त्यांनीं पदार्थांचें सोपपत्तिक कार्यकारणभाव जाणण्याचा क्रम चालू ठेवला. ज्या तत्वज्ञानाचे योगेंकरून शांति आणि सुख प्राप्त होतें तें तत्व जाणण्याविषयीं भरतखंडांतील प्राचीन आर्य झटत. त्यापासून ध्यानमार्ग म्हणजे त्याचा उद्देश व त्याचीं साधनें दाखविणारें योगशास्त्र उत्पन्न झालें. इकडे कांहीं आचार्य ध्यानमार्गांत निमग्न झाले असतां दुसऱ्या कांहीं आचार्यांनीं व्याकरणादि शास्त्रावर श्रम केले. या श्रमांच्या योगानें त्याच वेळीं व त्यामागून अध्यात्म विचाराच्या निरानिराळ्या प्रकारची मोठी गर्दी उडाली. ज्यांचें नांव ऐतिहासिक असे कांहीं पंडित उत्पन्न झाले, व ते ऋषिप्रणीत वचनांचा अर्थ आपल्याच रीतीनें लावून आपलेच कांहीं सिद्धांत प्रतिपादन करूं लागले. दुसरे कांहीं पंडित निघाले त्यांनीं भाषेच्या परिस्फोटनाविषयीं

विचार करून मूळमंत्राचे अर्थ करण्याची आपलीच प्रवृत्ति चालविली. त्या पंडितजनांत दोन प्रकार असत. एक वैयाकरण. दुसरे नैरुक्त. कांहीं आचार्यांनीं श्रौतकर्माच्या मीमांसेकडे लक्ष दिलें. हें स्वतांस याज्ञिक म्हणवीत. हेहि मूळमंत्राचा अर्थ आपल्या तऱ्हेनें करीत. स्थलसंकोचामुळें आचार्यांनीं केलेल्या निरनिराळ्या उद्योगाचें निरूपण येथें करवत नाहीं. परंतु त्यांनीं वाक्यार्थमीमांसेची योजना करून ती प्रगल्भ दशेस आणिली, इतकें म्हणणें पुरें आहे. या आचार्यांनीं असा झटून उद्योग केला कीं, तेणेंकरून वाक्यार्थमीमांसा हें शास्त्र रूपास आलें.

वाक्यार्थमीमांसकाविषयीं उदाहरण.

आधिभौतिक वाक्यार्थमीमांसादिप्रकरणांचें जें आम्हीं विवेचन केलें आहे त्याचें दृष्टांतानें थोडें निरूपण करणें अवश्य आहे. ऋग्वेदसंहितेतील प्रथम मंडळाचे १६४वे सूक्तांतील ४५वे मंत्राचा विचार करूं या.

चत्वारि वाक्परिमिता पदानि तानि विदुर्ब्राह्मणा ये मनीषिणः ॥
गुहा त्रीणि निहिता नेङ्गयन्ति तुरीयं वाचो मनुष्या वदन्ति ॥

या ऋचेचें भाषांतर मराठींत केलें आहे तें असें—

॥ पदें वाचेचीं नियमित चार ॥ जाणती तीं थोर ब्राम्हण ज्ञाते ॥
॥ हृदयीं ठेविलीं तीन न जाणती, ॥ मनुष्यें बोलती चवथें मात्र ॥

"नेङ्गयंति" या पदाचे अर्थाविषयीं माधवाचें व आमचें मत भिन्न पडतें. या भेदाचीं कारणें अशीं आहेत कीं, "नेंगयंति" याचा चेष्टा असा अर्थ केला असतां वाक्यभेदरूप दोष येतो. दुसरें या ऋचेंतील स्वारस्यहानि होते. तिसरें अन्वय बिकट होतो; चवथें मनुष्यें आणि मनीषण ब्राम्हण यांमध्यें विरुद्धोपन्यास आहे तो दुर्बल होतो.

आतां या ऋचेचा अर्थ निरनिराळे आचार्य निरनिराळ्या रीतींनें करितात. वेदवादी म्हणतात कीं, चार पदें म्हणजे "भूः, भुवः, स्वः," या तीन व्याहृति आणि "ओं" हा प्रणव. ब्रम्हवादी आधिभौतिक वाक्यार्थमीमांसेच्या साह्याय्यानें असें म्हणतात कीं, "चार प्रकारची वाणी उत्पन्न झाली.

तिचे तीन प्रकार या तीन लोकीं अढळतात, व चवथा प्रकार पशूंत आहे. भूलोकांवर प्रथम प्रकार अग्नि आणि रथंतरसाम ह्यांमध्यें अढळतो. दुसरा प्रकार अंतरिक्षामध्यें आणि वामदेव्यसामामध्यें अढळतो. तिसरा प्रकार द्युलोकीं असून सविता आणि बृहत्साम यांमध्यें अढळतो. चवथा प्रकार विद्युतेमध्यें आणि पशूंमध्यें आहे, आणि याशिवाय जी वाणी राहिली ती ब्राम्हणांमध्यें आली, म्हणून मनुष्यांची आणि देवांची वाणी ब्राम्हण बोलतात." प्रकृत ऋचेचा हा अर्थ ब्राम्हणग्रंथांत दिला आहे. तो श्रौतकर्म व्यवस्थेच्या अनुरोधानें बसविला आहे. ऐतिहासिकपंडित ह्याच ऋचेचा अर्थ असा करितात कीं, "सापांची वाणी, पक्ष्यांची वाणी, क्षुद्र जीवजंतूची वाणी, आणि नित्य मनुष्यें बोलतात ती चवथी व्यावहारिकी वाणी, हीं चार वाणीचीं पदें होत." ऐतिहासिकपंडित कोणत्या पद्धतीवर शास्त्रविचार चालवीत हें त्यांच्या ह्या ऋचेच्या अर्थावरून कळतें म्हणून विशेष लक्ष देण्याजोगा हा अर्थ आहे. वैयाकरणांस वाणीचे चार पाद कोणते म्हणून विचारलें तर ते म्हणतात कीं, "नामें, क्रियापदें, उपसर्ग, आणि निपात, हे आहेत." वाणीचे चार पाद नैरुक्तांच्या मताप्रमाणें म्हटलें तर असे आहेत कीं, "ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि मनुष्याची व्यावहारिकी भाषा." याज्ञिकजनांच्या मताप्रमाणें वाणीचे चार पाद हे आहेत कीं, "मंत्र, कल्प, ब्राम्हण आणि मनुष्यांची व्यावहारिकी भाषा." ज्या आचार्यांनीं अध्यात्म वाक्यार्थमीमांसेची विशेष योजना केली त्या आत्मवादी आचार्यांनीं या ऋचेचा अर्थ असा केला आहे कीं, "परा, (म्हणजे अत्युच्च) पश्यन्ती, (म्हणजे पाहणारी) मध्यमा (म्हणजे मध्यें असणारी) आणि वैस्वरी (म्हणजे विशेष स्वरघटित झालेली) अशी चार प्रकारची वाणी आहे. त्यांत जेव्हां वाणीचा आकार अंतर्यामीं उत्पन्न होतो तेव्हां ती परा; पुढें तो आकार जेव्हां स्पष्ट बनतो तेव्हां तिचें पश्यंती हें रूप होतें. जेव्हां तो आकार बुद्धीमध्यें म्हणजे निश्चय करणाऱ्या मनःशक्तीमध्यें उठतो, आणि उच्चारघटित होतो, तेव्हां तिचें रूप मध्यमा; आणि तालूवादिस्थानांतून तो उच्चार बाहेर पडला म्हणजे जो वाणीचा आकार होतो त्याचें रूप वैस्वरी."

आतां ज्या ऋचेचें पूर्वी आम्हीं शब्दशः भाषांतर केलें आहे

त्या ऋचेच्या खऱ्या अर्थाचा निश्चय वाक्यार्थमीमांसेच्या साह्याने केला पाहिजे. म्हणजे निरनिराळ्या संबंधानें साहचर्यन्यायाची योजना केली पाहिजे. प्रकरणाचे निरनिराळे भेद आहेत त्यांची योजना केली पाहिजे. जैमिनीच्या मीमांसेंत स्थानविषयाचें निरूपण केलें आहे. त्याची योजना केली पाहिजे. आणि लैंगिकन्यायप्रयोगाचा योजना केली पाहिजे. आचार्यांनीं मीमांसेचीं तत्वें शेंकडो वर्षे श्रम करून प्रगल्भ दशेस आणलीं व जैमिनीनें त्यांची व्यवस्था केली, या तत्वांची जपून योजना केली असतां आम्हीं वर्णन केलेल्या मंत्राचा एकच अर्थ होणें अवश्य आहे.

वाक्यार्थमीमांसेची न्याय.

वाक्यार्थमीमांसेची अनुमानपद्धति प्रगल्भदशेस हळू हळू आली. कांहीं पंडित वाक्यार्थ करण्याचे कामीं गुंतले असतां, दुसरे कांहीं पंडित वाक्यार्थमीमांसेच्या सिद्धांताचा शोध लावण्यास प्रवृत्त झाले. पतंजलिकृतमहाभाष्यामध्ये वाक्यार्थमीमांसेचीं प्रधान तत्वें प्रकट केलीं आहेत, व त्यांवर वाद केला आहे, आणि जपून त्यांचें वर्णन केलें आहे. कांहीं शास्त्रीय ग्रंथांची योग्यता सर्वमान्य होऊन त्यांकडे लोकांचें लक्ष लागूं लागलें होतें आणि त्यांच्या लौकिकावरून त्यांच्याविषयीं पूज्य बुद्धि उत्पन्न झाली होती. दृष्टांताकरतां पाणिनिकृत अष्टाध्यायी घ्या. गुरु नामक पंडितजन तिचा वाक्यार्थ करण्याविषयीं उद्युक्त झाले. त्यांच्या न्यायपद्धतीचें मुख्य तत्व हें होतें कीं, ज्या ग्रंथकाराच्या वचनांचा अर्थ करावयाचा त्या वचनांवरूनच अनुमान काढून सिद्धांत बनवीत आणि याच प्रकारें त्याच्या वचनांचा त्यागहि करीत. अंशतः मोठ्या सूक्ष्म रीतीच्या अनुमानांनीं आणि अंशतः लोकरूढीवरून ते कांहीं परिभाषा बसवीत. या न्यायपद्धतीचें माहात्म्य मोठें आहे. पतंजलीचे महाभाष्यांत या न्यायपद्धतीचे मुख्य सिद्धांत अढळतात. या न्यायपद्धतीमध्यें स्वातंत्र्य आणि पारतंत्र्य हे दोन्हीहि गुण एकदम अढळतात, म्हणजे ही न्यायपद्धति सुधारणुकेस व रूढीस एकदम अनुसरे. सर्वमान्य ग्रन्थाच्या वचनाचा त्याग करून ती स्वातंत्र्य दाखवी. परंतु ज्या ग्रंथकाराच्या वचनाचा त्याग करायाचा त्याच ग्रंथकाराच्या लेखावरून

अनुमान काढून ती त्याग करण्यास प्रवृत्त होई. म्हणून ह्या न्यायपद्धतीचे अंगीं पारतंत्र्य असे. परीक्षितग्रंथकार चुक्या करतो, असें दाखविल्यानें सुधारणुकेस साहाय्य होत असे, परंतु त्या ग्रंथकाराच्या अनुरोधानें ही न्यायपद्धति स्थापित झाली आहे, असें दाखवून ती रूढीला अनुसरणाऱ्या लोकांचें मन आपल्याकडे ओढून घेत असे. ज्ञापन आणि प्रत्याख्यान हे दोन शब्द आम्हां सर्व जनांस माहित आहेत. त्यावरून ह्या पद्धतीच्या तत्वाचें निरूपण होतें. अशा प्रकारचा विचार करण्याचा लोकांस अभ्यास झाल्यापासून काय परिणाम झाला हें सहजच लक्षांत येईल. बौद्धलोक उत्पन्न झाले. त्यांनीं तर्कसाधनें आणि युद्धसामग्री स्वतांचीच काढिली आणि प्राचीन शास्त्रांचा पराजय मांडला.

विचार आणि पद्धति—यांचें मन्वंतर.

इतक्यांत आचार्यांनीं जें अध्यापन केलें, तेणेंकरून बुद्धींत वैशद्य उत्पन्न होऊन विचारशक्तीस नवेच अंकूर फुटूं लागले. ज्या स्वातंत्र्यानें ऋषिजनांचीं आणि ब्रह्मवादिजनांचीं वचनें आणि त्यांचे इतिहास ह्या दोहोंसही गुंडाळून ठेविलें असें निर्भय स्वातंत्र्य उत्पन्न झालें. आध्यात्मिक वाक्यार्थमीमांसेच्या साहाय्यानें बौद्धाचार्य पुढें सरकले, आणि आपले सिद्धांत प्रतिपादन करण्यामध्यें जी त्यांनीं धैर्यशक्ति दाखविली तेणेंकरून त्यांच्या वेळच्या पंडितांस चमत्कार वाटला. ते असें म्हणत कीं, मनुष्य आणि त्याच्या शक्ति ह्यांच्या योगानें सृष्टिस्वरूप संबंधी सर्व दर्शनांची उपपत्ति होते. त्यांची वादविवाद करण्याची पद्धति व्यवहार व अध्यात्मशास्त्र ह्यांस अनुसरून असे. ते गृहस्थलोकांच्या आचरणाकडे आणि उत्कर्षाकडे विशेष लक्ष देत. हे गृहस्थ केवळ उपासक आहेत असें ते समजत. आणि बौद्ध उपदेशकांच्या आज्ञा पाळणें, त्यांस मान देणें, आणि शुद्धाचरण करणें इतके गृहस्थांचे धर्म आहेत असें ते मानीत. हा त्यांच्या उपदेशांतील व्यवहारांश होय. बौद्धाचार्य स्वतः सर्व जन्मभर विहारांत रहात. व त्या ठिकाणीं आत्मिक व मोठें तीव्र असें त्यांस आचरण करावें लागत असे; म्हणून आपल्या वादविवादांत आणि व्याख्यानांत अध्यात्म विद्येची योजना करण्याचा त्यांस अभ्यास झाला. ईश्वरप्रणित श्रुति व तिचें माहात्म्य

ते एकीकडे गुंडाळून ठेवीत. ब्राम्हण सर्व जन्मभर जे यज्ञ करीत आणि ज्या यज्ञांचे योगें सर्व देशभर केव्हां केव्हां उत्साह उत्पन्न होई त्या यज्ञांची ते निर्भर्त्सना करीत; कारण श्रौतकर्मांच्या बदलां सोत्पत्तिक व्यावहारिक धर्म ते सांगत. ते शाब्दप्रमाण मानीत नसत. ते फक्त प्रत्यक्ष, अनुमान, आणि उपमान, हीं प्रमाणें मानीत. आणि उपमान देखील प्रत्यक्षांत किंवा अनुमानांत ते मोडीत. कारण लैंगिक उपमानामध्यें आणि आधिभौतिक वाक्यार्थमीमांसकांचे उपमानामध्यें भेद आहे. हे मीमांसक अभियज्ञगाथांचा उपयोग करीत. आणि स्थाप्य अनुमान, जनरूढि, आणि श्रौतसिद्धांत, यांमध्यें संबंध काढून त्यावरून उपमानें योजीत.

प्राचीन पद्धति व विचार याचें उज्जीवन.

उत्तर आचार्यांनीं बौद्धलोकाशीं विरोध केला, नंतर त्यांवर चाल केली आणि भरतखण्डांतून त्यांना समूळ काढून टाकण्याविषयीं सामग्री सिद्ध केली. येणेंकरून उत्तर आचार्यांमध्यें अध्यात्म विद्येचें मोठें उज्जीवन झालें. या उत्तर आचार्यांच्या ग्रंथांचें विवेचन आम्ही करणार म्हणून प्रसंगवशात् त्यांच्याविषयीं आम्हास पुष्कळ वर्णन करावें लागेल.

अर्वाचीन चालू वाक्यार्थमीमांसापद्धति.

आलीकडे जिची योजना आमचे शास्त्री करितात त्या अर्वाचीन वाक्यार्थमीमांसेचें निरूपण केल्यावांचून ही प्रस्तावना पुरी करितां येत नाहीं. ह्या अर्वाचीन वाक्यार्थमीमांसेचा मुख्य सिद्धांत असा आहे कीं, ज्या ज्या सध्यां लोकांमध्यें रीति भाती चालू आहेत त्या सर्व योग्य आहेत, आणि त्यांचें प्रतिपादन करण्याकरितां निरनिराळ्या वाक्यार्थमीमांसकांचे सिद्धांत ते गोंधळून टाकतात. ही पद्धति शंकाराचार्याचे वेळीं उत्पन्न झाली आणि त्यांच्या शिष्यवर्गांनीं कांहीं कालपर्यंत मोठें सामर्थ्य प्रकट केलें. लैंगिक अनुमानाचे दोन भेद आहेत. एक प्रकार असा कीं, प्रमाण म्हणजे काय याचा शोध करून सत्याचा निश्चय करणें आहे. आणि दुसरा गृहीत व मान्य ग्रंथांचा वाक्यार्थ करणें आहे. या दोन्ही भेदांचा बहुधा गोंधळ होतो. या पंडितांचा मुख्य व्यावर्तक गुण काय आहे? हजारों वर्षें पर्यंत भरतखंडांतील प्राचीन आर्यांनीं जी

विद्या प्रगल्भ दशेस आणली त्या विद्येभर विस्तृत झालेलीं जीं जीं वचनें अढळतात त्या सर्व वचनांची एकवाक्यता करण्याकरितां व्यवस्था करणें हा होय. परंतु आतां विशेष संशोधन करण्याचा आग्रह लोकांमध्यें आहे किंवा निदान असावा तरी आणि सार्वजनिक उन्नति व्हावी म्हणून लोकांच्या मनाची धांवहि मोठी आहे. याकरितां आमच्या पूर्वजांची जी लैंगिकप्रयोगपद्धति व अध्यात्मविद्या त्यांचा शोध करणें विशेष अवश्य आहे. म्हणून आम्ही ह्या षड्दर्शनचिंतनिकेच्या द्वारा भरतखंडांतील षड्दर्शनांचें भाषांतर आणि तत्वें हीं वाचकांस सादर करितों. त्यांनीं कृपा करावी अशी आमची विनंती आहे.

षड्दर्शनकार.

जैमिनीच्या मीमांसेमध्यें वाक्यार्थमीमांसेचीं सर्व तत्वें असून त्यांची लापिकाहि आहे म्हणून आम्ही प्रथम जैमिनीची मीमांसा घेतली आहे. भरतखंडांतील सर्व अध्यात्मशास्त्रकारांची पद्धति अशी आहे कीं, ते आपल्या सिद्धांताचें विवेचन करून तत्काळींच आपल्या सिद्धांताची प्रायोगिक लापिका करून दाखवितात. योगशास्त्रामध्यें ध्यानाचें साधन, सिद्धि, व हेतु, ह्यांचें वर्णन केलें आहे. एखाद्या पंडितसभेंत ज्या रीतीनें वादविवाद व्हावयाचा ती वादविवादाची रीति तार्किकप्रबंधासह गौतमाचार्यांनीं पूर्ण वर्णिली आहे. अध्यात्म विद्या, आणि आधिभौतिक विद्या यांचें निरूपण करतांना न्यायप्रयोगाची पद्धति कणादाचार्यांनीं प्रगल्भ दशेस आणिली आहे. आणि जसा डार्विन इंग्लंडदेशीं प्रधान आचार्य होऊन बसला आहे आणि त्याचे अनुयायी लोक आहेत, त्याप्रमाणेंच कापिलाचार्यांनीं आपल्या ग्रंथांत जगदुत्पतीचें विवेचन केलें आहे. चैतन्यच काय तें मुख्य आहे आणि सृष्टीमध्यें जीं जीं दर्शनें घडतात तीं तीं त्या चैतन्याचे आकार, विकार, प्रकार आणि प्रकटन आहे असें सिद्ध करण्यास बादरायणाचार्य प्रवृत्त झाले. आतां बाह्य दृष्ट्या तरी हीं सर्व दर्शनें स्थापित आचारास अनुसरून आहेत म्हणून या दर्शनांमध्यें वेदाचा अधिकार पूर्ण मानला आहे. आणि त्यांनीं वेदाचा अधिकार मानला आहे म्हणून त्यांना वाक्यार्थमीमांसेचें अवलंबन करावें लागलेंच लागलें. याच कारणास्तव या प्रस्तावनेंतच आम्हीं वाक्यार्थमीमांसेच्या इतिहासाचा

बराच विचार केला आहे. इतकी लांब प्रस्तावना लिहिल्याबद्दल आमचे वाचकांनीं आम्हास क्षमा करावी अशी विनंती आहे.

विशेष सूचना. युरोपी लोकांमध्यें पदार्थविज्ञान म्हणजे आधिभौतिक विचार फार झाला आहे, आणि हा विचारच त्यांच्या उत्कर्षाचें बीज आहे. आधिभौतिक आणि अध्यात्म ज्ञानाचा निकट संबंध आहे; आणि या दोन्हीविषयीं षड्दर्शनांत विशेष सिद्धांत आहेत. या सिद्धांतांचें विवेचन करतांना प्रसंगवशात् युरोपी लोकांच्या आधिभौतिक आणि आध्यात्मिक सिद्धांतांचा उपन्यास यथाशक्ति करूं; आणि हा उपन्यास युरोपी लोकांचें ज्ञान आपल्या देशांत येण्यास साधनीभूत व्हावा अशी निदान आमची इच्छा तरी आहे.

ग्रंथकर्ता.

षड्दर्शनचिंतनिका—आफिस, पुणें,
१ जानेवारी, १८७७.

॥ मीमांसादर्शनम् ॥

(मूलपदानुवृत्तिसहितम्.)

सूत्राणि.

॥ अथातोधर्मजिज्ञासा ॥ १ ॥

(पदानि)–अथ, अतः, धर्म–जिज्ञासा.

(पदार्थः)–अथ=अनन्तरं। अतः=एतस्मात् कारणात्। धर्मजिज्ञासा= धर्माय जिज्ञासा। जिज्ञासा=ज्ञातुमिच्छा ॥

(वाक्यार्थः)–अनन्तरं एतस्मात्कारणात् धर्मस्य ज्ञातुमिच्छा ॥

(भावः)–पूर्वं वेदानधीत्य धर्माय वेदवाक्यानि विचारयितुं धर्मस्य ज्ञातुमिच्छा कर्त्तव्या ॥

प्रथमं ग्रन्थपद्धतिं दर्शयामः ॥ अत्र मूलसूत्रे स्फीटैरक्षरैर्लिखिते पदानि विभज्य पदार्थान् वाक्यार्थं भावार्थं च वर्णयामः। तत्र द्वयोर्द्वयोः कुण्डलिकया स्पष्टाक्षरैश्च पद्धतिमिमामदीदृशाम ॥ पुनरपि यत्र यत्रानुवृत्तिःक्रियते ॥ तत्र तत्र कुण्डलिकया तां दर्शयिष्यामः ॥

षड्दर्शनचिंतनिका.

मीमांसादर्शन.

१. आतां येथून धर्मविवेचन.

षड्दर्शनादिग्रंथांची प्रारंभ करण्याची सरणि एकच आहे. त्यांत प्रारंभीं "अथ" शब्द येतो, व टीकाकारांनीं "अथ' शब्दाच्या अर्थसामर्थ्याचें पुष्कळच विवेचन केलें आहे. कोणी "अथ" शब्द मंगलवाचक आहे असें म्हणतात, व मंगल केल्यावांचून ग्रंथास आरंभ करूं नये असा सिद्धांत करून मंगलकथन व ग्रंथपरिसमाप्ति यांचा कारणकार्यसंबंध बसविण्यास व्यवस्था करितात. अशा भानगडींत न पडतां आम्ही 'अथ' शब्दाचा *अर्थ* 'आतां' असा केला आहे, व 'अथ' शब्दाचें सामर्थ्य फक्त आरंभसूचक आहे असें आम्हास वाटतें. "येथून" याहि पदाचें सामर्थ्य अशाच प्रकारचें आहे. या दोन पदांपासून अधिकारी कसा असावा याविषयीं ग्रंथकार अनुमानें काढतात. तशीं अनुमानें काढण्याची गरज आम्हांस वाटत नाहीं. ही गोष्ट स्पष्टच आहे कीं, अधिकारावांचून कोणत्याहि विषयाचें अध्ययन कोणाचेंहि हातून होणार नाहीं. पुनः वृत्तिकार जिज्ञासा पदाचा यौगिक अर्थ घेतात. असें केल्यानें "जाणण्याची इच्छा" अशीं पदें उत्पन्न होऊन कोणाची इच्छा कशा-

MÎMÂNSÂ-PHILOSOPHY.

1. Now then the investigation of duty.

All the schools of philosophy begin their investigation in the same manner. The first word is *atha*. The commentators always enlarge on the power of the word *atha*. Some maintain that the word *atha* signifies *auspiciousness;* that it is a rule not to begin a literary or philosophical work without propitiation; that propitiation at the beginning and the completion of the work are connected as cause and effect. We cannot sanction this interpretation of the word. We cannot approve of a disquisition on this sense of the word. We believe it means only *now*. The power of the word *atha* simply consists in showing a beginning. The signification of *atas* is *then* for the same reasons. The commentators infer from the use of these two words what sort of a person is qualified to learn a particular system of philosophy. We do not believe any inference is warranted by these words. It is plain enough that no person can learn anything without some previous preparation and some qualifica-

सूत्राणि.

॥ चोदनालक्षणोऽर्थोधर्मः ॥ २ ॥

(पदानि)–चोदना–लक्षणः, अर्थः, धर्मः ।

(पदार्थः)–चोदना=यत् प्रवर्तयति तत् ।
लक्षणं=लक्ष्यते नाम साहचर्य्यं दर्श्यते येन तत् ।
अर्थ.=इतिकर्तव्यता. धर्मः=(लक्षणेननिरूपितः)

(वाक्यार्थः)–धर्मो नाम प्रवर्तकलक्षितेतिकर्तव्यता.

(भावः)–यत्र यत्र वेदप्रणीतं प्रवर्तकं वचनमस्ति तत्र
तत्र सहचरितेतिकर्तव्यता प्राप्नोति । तस्याः
नाम धर्मः–पुनः चोदनानिमित्तंधर्मस्यज्ञानं ।

ची इच्छा, कशा करितां इच्छा, अशी आकांक्षा उत्पन्न होते. मग या आकांक्षेचे साधनानें पुष्कळ विवेचन करावें लागतें. तसें न करितां जिज्ञासा या पदाचा आम्ही रूढ्यर्थ घेतला आहे.

tions. The word *jijnâsâ* is etymologically interpreted. It then signifies a desire of knowledge, and affords the means of asking these questions :—whose desire, the desire of what—the desire for what purpose. To answer these questions apparently so natural, much is written. Instead of this, we have used the word *jijnâsâ* in its established acceptation.

२ (विधिजन्य) भावना नित्य जी इतिकर्तव्यता दाखविते तिचें नांव धर्म.

2. Duty is a purpose which invariably follows (a conception produced by) a scriptural injunction.

या सूत्रांत आचार्य धर्म शब्दाचें लक्षण बांधतात. या लक्षणांत संस्कृतांत त्यांनीं तीन पदें घातलीं आहेत, तद्वाचक यथार्थ मराठी शब्द नाहींत म्हणून त्याचें विशेष निरूपण करितों. तीं तीन पदें हीं आहेत कीं चोदना, लक्षण, आणि अर्थ. लक्षण म्हणजे साहचर्य, जसें ज्या ज्या ठिकाणीं धूम आहे त्या त्या ठिकाणीं अग्नि आहेच. अर्थ म्हणजे प्रयोजन, प्रयोजन म्हणजे जें करावयाचें तें. आतां चोदना पदाचा अर्थ विशेष विचारयोग्य आहे. चोदना शब्द आश्वलायन श्रौत सूत्रांत अढळतो, श्रौतसूत्र (१. १३, १७.) त्या ठिकाणीं देवता-आवाहन म्हणजे देवतांस बोलावणें असा अर्थ आहे. मूळ महागायत्रीमंत्रामध्यें "चुद्" धातूचा प्रयोग आहे, आणि त्याचा अर्थ "प्रेरणें" असा आहे. प्रेरणें म्हणजे बुद्धि, आणि वृत्ति यांस प्रेरणें. जडाची प्रेरणा होत नाहीं. पुनः या मीमांसेंत वाक्यार्थ करते वेळीं भावना म्हणजे विचार याच्यावर वाक्यांतील सर्व पदांचा अन्वय करावा लागतो. जसें, "तो दान करतो" यास्थळीं "तो" हा कर्ता, "दान" हें कर्म. हीं दोन्ही करणें धातूनें जी भावना उत्पन्न होते तींत आकारीभूत होतात. पुनः भावना उत्पन्न होण्यास कांहीं प्रयोजक पाहिजे हें स्पष्टच आहे. विधिवाक्याचे योगानें भावना उत्पन्न होते. जेव्हां जेव्हां भावना उत्पन्न होते तेव्हां तेव्हां कांहीं तरी इतिकर्तव्यता असते. अशा इतिकर्तव्यतेचें नांव धर्म. आतां या ठिकाणीं थोडासा अध्यात्म विचार आहे. तो वैशेषिक शास्त्राचे अनुरोधानें करावयाचा. हल्ली

By this aphorism, Jaimini defines *Dharma* or duty. There are three terms in this definition. There are, we believe, no words in English which exactly correspond to them. We will explain the original words. The terms are Chodanâ, laksana, and artha. Laksana means invariable sequence, as wherever there is smoke, there is always fire. Artha means a purpose, that is, a motive or that which is sought. The word Chodanâ is very important. It occurs in the Ashvalâyana Shrouta Sûtra, Vide (I. 13, 17.) It means invocation. In the celebrated Gâyatrî-verse repeated every day by every Baâhmana, the verbal root *chud* is used. It means to move, that is, to move the feelings and the faculties of the mind. A material substance is incapable of being moved in the sense of *chud*. Again the Mîmânsâ-method of interpreting a proposition consists in connecting every part of the proposition with conception (bhâvanâ). For example, "He makes a gift" is a proposition of which *he* is the subject and *makes a gift* is the predicate. Of the proposition under examination, the verb *makes* according to this Mîmânsâ is the most important part, which when resolved, consists of a conception and action. The action, its agent, its object, its purpose, and its instruments are connected with the conception which forms a part of the predicate. Now the conception *must* have a cause. A

सूत्राणि.

॥ तस्यनिमित्तपरीष्टिः ॥ ३ ॥

(पदानि)–तस्य, निमित्त–परीष्टिः ।

(पदार्थः)–तस्य (धर्मस्य), निमित्तं=बीजं, परीष्टिः= परीक्षा. निमित्तस्य परीक्षा=निमित्तपरीष्टिः

(वाक्यार्थः)–धर्मस्य किं बीजमितिपरीक्षा कर्तव्या.

(भावः)–एषा सूत्रकारस्य विषयकथनरूपप्रतिज्ञा.

मायास येतो असें पाहिलें. यापासून हत्तीच्या येण्याचें ज्ञान झालें. त्यापासून चित्तांत दुःख उत्पन्न झालें. दुःखापासून द्वेष उत्पन्न झाला. मग पळून जाण्याविषयीं अंतरयामीं प्रयत्न होऊन पळून जाण्याची क्रिया घडली. असेंच पुनः अंब्याचें झाड पाहिलें. त्यापासून अंब्याचें ज्ञान झालें, त्यापासून सुख प्राप्त होईल अशी बुद्धि उत्पन्न झाली, मग इच्छा उत्पन्न झाली, मग अंतर्यामीं अंबा मिळविण्याविषयीं प्रयत्न, मग क्रिया, म्हणजे ज्ञान, सुखदुःख, इच्छाद्वेष, आणि प्रयत्न, इतकें आकार एकादी क्रिया करते वेळीं चित्तांत होतात. हे सारे आकार एका भावना पदानें समजतात. पुनः पुढें या गोष्टीचा विचार करावा लागेल. इतकें सांगितलें पाहिजे कीं अर्वाचीन हामिल्टनासारखे अध्यात्म शास्त्रकर्ते भावनेचें असेंच वर्णन करितात.

declaratory injunction is stated to be the cause. The conception, no matter, what the subject may be, is invariably accompanied by a purpose. *Such a purpose* is *a duty*. We must explain the psychology of this definition, and base it on the principles of Vaishesika philosophy. Any object presented produces knowledge. Knowledge produces the feeling either of pleasure or pain, followed either by desire or aversion. Then follows the internal effort or volition which results in an action. Hence an action involves knowledge, the feeling of pleasure or pain, desire or aversion, and volition. All these are the elements of conception called Bhâvanâ. We will return to this subject. It may be mentioned by the way that great European thinkers like Sir William Hamilton recognize these elements and their connection as we have stated.

३ त्याच्या (धर्माच्या) निमित्ताची परीक्षा.

३. धर्माचें ज्ञान चोदनानिमित्त आहे असा मागील सूत्रांतून अर्थ निघाला. आतां ती चोदना काय, याचा विचार पुढें होणार. सूत्रपद्धत्ति येथें संक्षेपतः वर्णिली पाहिजे. सहा प्रकारचीं सूत्रें असतात–१. संज्ञा, २. परिभाषा, ३. विधि, ४. नियम, ५. अधिकार, आणि ६. अतिदेश. यांचीं निरनिराळ्या प्रसंगीं लक्षणें करूं. वरील अधिकारसूत्र आहे. अधिकारसूत्रामध्यें पुढें कोणता विषय प्रतिपादन होणार याची सूचना असते, व पुढील सूत्रांशीं मिळून त्याचा अर्थ होतो.

3. The examination of its cause.

"Its" in the sûtra, stands for duty. The examination of the cause of duty is now to begin. The former aphorism declares that the cause of the conception of duty is chodanâ. What is this chodanâ is the subject of the examination to come. In this place, it is necessary to state what the method of aphorisms is. An aphorism or sûtra is of six kinds:- Sanjnâ or a definition, Paribhâsâ or key to interpretation, Vidhi or the statement of a general rule, Niyama or a restrictive rule, Adhikâra or the heading to which a number of rules belong, Atidesha or general application of a rule. These will be defined as occasion arises. The aphorism under examination is an adhikâra. It states the general subject to be investigated. It requires to be read and understood along with the statements which submit to it.

सूत्राणि.

॥ सत्संप्रयोगे पुरुषस्येंद्रियाणां बुद्धिजन्म तत् प्रत्यक्षं अनिमित्तं विद्यमानोपलंभनत्वात् ॥ ४ ॥

पदानि–सत्–संप्रयोगे, पुरुषस्य, इंद्रियाणां, बुद्धि–जन्म, तत्, प्रत्यक्षं, अनिमित्तं, विद्यमान–उपलंभनत्वात् ॥

पदार्थः- सत्=सति। संप्रयोगे=संबंधे। पुरुषस्य=आत्मनः। इंद्रियाणां=चक्षुःकर्णादीनां। बुद्धेर्जन्म=बुद्धिजन्म=या बुद्धिर्जायते सा। तत्-प्रत्यक्षं=तत् प्रत्यक्षज्ञानं। अनिमित्तं=न कारणं भवति। विद्यमानस्य उपलंभनत्वात्=सतोऽवधारणायाः=प्रकृतस्य प्राप्तेः ॥

वाक्यार्थः–सतींद्रियार्थसंबंधे या आत्मनि बुद्धिर्जायते तत्प्रत्यक्षं तेन यत् प्रकृतं तज्ज्ञायते तस्मात् प्रत्यक्षं धर्मस्य कारणं नास्ति ॥

भावार्थः–प्रत्यक्षप्रमाणेन धर्मो न निश्चीयते ॥

प्रत्यक्षपूर्वकत्वाच्चानुमानोपमानार्थापत्तीनामप्यकारणत्वमितिशबरः ॥

४ आत्मा आणि इंद्रियें यांचा संयोग झाल्यानें जें ज्ञान उत्पन्न होतें तें ज्ञान प्रत्यक्ष. हें प्रत्यक्ष प्रमाण धर्माचें कारण होत नाहीं; कारण जें जें आहे त्याच्याविषयीं मात्र प्रत्यक्षानें ज्ञान होतें.

4. Sensuous perception is the knowledge produced by the senses coming in contact with the soul; such perception is not the cause of duty, for (perception causes) knowledge of that which (already) actually exists.

---

४. या सूत्रानें प्रमाण काय व कोणतें या विषयाची परीक्षा आचार्य करतात. त्यांत प्रत्यक्ष प्रमाणाचें स्वरूपकथन केलें आहे. त्याची परंपराः—आत्मा हें ज्ञानाधिकरण म्हणजे ज्याचे ठायीं ज्ञान रहातें तो, इंद्रियें म्हणजे ज्ञानेंद्रियें पांच आहेत—नेत्र, कर्ण, घ्राण, इत्या०. या दोहींमध्यें संबंध ठेवणारें ह्रस्वक्यांतल्या कणा येवढें आणि जड असें मन हें इंद्रिय आहे. आतां ज्ञानेंद्रियांचा आणि बाह्य जड विषयांचा संयोग होऊन प्रथम इंद्रियांवर संस्कार घडतो. मग इंद्रियांचा आणि मनाचा संयोग होतो. मग मनाचा आणि आत्म्याचा संयोग होतो. अशी ही वैशेषिक शास्त्राची मांडणी आहे. वरील सूत्रांत जैमिनि आत्म्याचा आणि इंद्रियांचा संयोग होतो इतकेंच सांगतात. असें ज्ञान होण्याचे निरनिराळे शास्त्राचे निरनिराळे प्रकार आहेत. त्याचें जगींच येथें थोडें दिग्दर्शन केलें आहे. पुनः एकादे वेळीं ज्ञान कसें होतें या गोष्टीचा विचार केला पाहिजे. आतां शबरस्वामी धर्म हा अवर्तमान विषय आहे म्हणून त्याविषयीं प्रत्यक्षज्ञान कारण होत नाहीं अशा आशयानें सूत्र लावतात,

Jaimini examines the nature of proof in this sûtra. It explains sensuous perception (indriya-janya-pratyaksa) which is distinguished in our philosophy from mental perception (Mânasa-pratyaksa). The order of this perception. Soul or Âtmâ is the seat of knowledge. The senses (of knowledge) to be distinguished from their means are hearing, sight, taste, smell and touch. The senses which cause perception of an object and their organs that is, the eye and sight, the ear and hearing, are distinguished in Indian philosophy as Indriya and its instrument(Karana). This is a real distinction as the eye is the means of sight. The *mind* is an internal sense. It is as fine as an atom that dances in a ray of light. It conveys an impression caused by the senses to the soul. The objects first affect the senses which can directly come in contact with them. The mind comes in contact with the senses on the one hand and with the soul on the other. This is the way in which Vaishesika philosophy explains *perception*. In the sûtra under examination, Jaimini simply states that there is contact between the senses and the soul.

व प्रत्यक्षावरूनच उपमान, अनुमान, आणि अर्थापत्ति हीं प्रमाणें साधतात, म्हणून तींहि प्रमाणें अकारण होतात असा सूत्राशय वर्णन करतात. परंतु मीमांसक निरनिराळीं प्रमाणें मानतात असें प्रसिद्ध आहे. तेव्हां ही गोष्ट येथें आलोचनीय आहे. माधवाचार्य आपल्या जैमिनीय *न्यायमालाविस्तारांत* प्रत्यक्ष, व अनुमान हीं धर्मविचारांत प्रमाणें नाहींत, असें म्हणतात. पण प्राभाकरभाट्टादि मीमांसक मीमांसेंत सहा प्रमाणें आहेत असें प्रतिपादन करतात. तीं प्रमाणें प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, शाब्द, अर्थापत्ति आणि अभाव. मीमांसकांमध्यें प्रमाणांविषयीं अशा विरुद्ध प्रतिपादनाचा अर्थ काय ? असा प्रश्न उद्भवतो. याचें समाधान असें आहे कीं, कोणतें तरी एकादें पुस्तक सत्यवक्त्याचें आहे असें गृहीत केल्यावर त्या पुस्तकाच्या अर्थमीमांसेमध्यें हीं सहा प्रमाणें योजावयाचीं. त्या पुस्तकांत जें जें दिसतें तें तें प्रत्यक्षप्रमाणाचा विषय होतें. तसेंच त्याच पुस्तकांतलीं वाक्यें घेऊन तीं परस्परांचे संबंधानें जुळून त्यांतून जें अनुमान निघतें तें अनुमान ध्यायाचें. वाक्यार्थ करते वेळीं त्या पुस्तकांतील निरनिराळे वाक्यांच्या पदांच्या सादृश्याविषयीं विचार करून उपमान प्रमाणाची योजना करावयाची. दुर्घट व दुर्बोध अशा जुन्या लिपींत लिहिलेले शिलालेख किंवा ताम्रपत्रें आपल्या देशांत अढळतात. त्यांचा अर्थ लावते वेळीं व वर्णोद्धार करते वेळीं फ्रिन्सेप्स् नामें इंग्रज पंडितानें या प्रमाणाची योजना मो-

Thus different schools explain the phenomenon of perception in their own ways. We have only indicated their theories. We will return to the subject of perception again. Now the commentator thus interprets this sûtra:—"duty is not the subject of that which exists at present, and is not affected by sensuous perception which is limited in its scope and cannot afford proof of duty. And inference or analogy as they spring from sensuous perception cannot 'prove duty.'" But this interpretation raises a difficulty as other Mîmânsakas than Shabara recognize the different kinds of proof in the examination of duty. Hence this interpretation of Shabara requires to be considered. Mâdhava also states in his work called the Nyâyamâlâ-Vistâra that sensuous perception or inference cannot be recognized as proving duty. But the Prâbhâkaras and Bhâttas recognize six kinds of proof in the examination of the doctrines of Mîmânsâ. These are sensuous perception, inference, analogy, testimony, presumption, and absence. Now the question is natural : what is the explanation of these contradictory statements of the Mîmânsakas ? This contradiction we believe can be explained. When some writing or statement is recognized as that of a truthful person, the application of these proofs comes into play in the interpretation of the writing or the statement. Then that which actually occurs in the statement or writing is the subject of sensuous perception : the inference which is based on the different parts of the statement

ट्यां चातुर्यानें केली आहे, व त्यापासून फलसिद्धि हि तशीच मोठी झाली आहे. शाब्दप्रमाणाविषयीं मीमांसकांमध्यें व नैयायिकामध्यें भेद नाहीं, याच प्रमाणाचे योगानें न्यायाधीशापुढें सर्व कामें चालतात. साक्षीपुराव्याचें मुख्य साधन हें प्रमाण आहे. अर्थापत्ति हें एक कायद्याचें विवेचन करतांना प्रमाण लावतात. सर्व वादविवादांत या प्रमाणावांचून निर्वाह लागावयाचा नाहीं. अभाव प्रमाणाचा उपयोग हि अर्थाचें दार्ढ्य साधण्याकडे होतो. असे निरनिराळे प्रमाणांचे उपयोग वाक्यार्थमीमांसंत होतात. वाक्यार्थमीमांसेच्या व नैयायिकांच्या प्रमाणयोजनेंत भेद आहे. या भेदाचें विशेष निरूपण व प्रमाणांचीं लक्षणें व स्वरूपकथन प्रसंगवशात् पुढें करूं. इतकें सांगणें पुरें आहे कीं, गृहीतोपदेश प्रथम अंगीकारून वाक्यार्थाविषयीं मीमांसक प्रवृत्त होतात, व नैयायिक स्वातंत्र्यानें आपले प्रमाणाची योजना करतात. सूत्रांत 'तत्प्रत्यक्षम्' अशीं पदें आहेत, त्यांच्या आधारावरून जगत् सत्य आहे हा मीमांसकांचा प्रसिद्ध सिद्धांत भाष्यकार स्थापितात. आणि या सिद्धांताचें प्रतिपादन करतांना जगत् मिथ्या असें म्हणणाऱ्या वेदांताचें खंडन करतात. ह्या खंडनसमर्थी ज्या न्यायसरणीचा प्रयोग करतात, तिचें प्रथम निरूपण करतों. या न्यायसरणीचें नांव उपलक्षण असें आहे. आतां उपलक्षण म्हणजे काय? एका व्यक्तीवरून दुसऱ्या व्यक्तीविषयीं सामान्य अनुमान होय. सर्व अनुगत सामान्य ज्ञान याच न्याय-

or writing is to be recognized: the analogy is based on the comparison of the different parts of the original writing: Princeps has applied these kinds of proof in this way with great ingenuity in deciphering and interpreting inscriptions or copper-plates to be met with in our country and has acheived great results. So far as testimony is concerned, there is no difference between the Mîmânsakas and Naiyâyikas or exegetes and dialecticians. All the proceedings before a magistrate are based on testimony. It is the means by which the statements of witnesses are sifted and accepted or rejected. Presumptions are recognized when laws are explained. All discussions indispensably require this kind of proof. *Absence* is connected with opposition of statements and confirms interpretation. All these kinds of proof are used in exegetics. Exegetical proof differs from logical proof which seeks the investigation of truth in general. We will explain the nature and give definitions of the different kinds of proof as occasion arises. It is sufficient to state once more that exegetes can work only when some writing or statement is accepted generally as true and that Naiyâyikas apply their system independently as they do not base their speculations or theories on some scriptures.

In the sûtra, the words "such perception" are used. The commentators base on them the well-known proposition of the Mîmânsakas that the world is real. In stating this proposition, an attempt is made to refute the doctrine of Vedanta that the

सरणीवरून निघतें असें मिल्ल नामें प्रख्यात इंग्रज नैयायिकाचें मत आहे. पुढील वादावरून उपलक्षण न्यायसरणीचें स्वरूप नीट समजेल. स्वप्नांत जें ज्ञान होतें तें निराधार आहे, म्हणून सर्व ज्ञान निराधार आहे. याकरितां जाग्रत्समयीं जें ज्ञान होतें तें सहजच निराधार ठरलें, असा वेदांताचा पूर्व पक्ष आहे. यावर समाधानः—पण जाग्रत्समयीं ज्ञान निश्चयात्मक असतें, म्हणजे त्यांत विपर्यय होत नाहीं. यावर पूर्वपक्षः—जागे होण्यापूर्वी स्वप्नांतील ज्ञानहि निश्चयात्मकच असतें, यावरून जाग्रदवस्था आणि स्वप्नावस्था ह्या दोहींमध्यें भेद नाहीं. यावर समाधानः—असें नव्हे. स्वप्नांतील ज्ञानांत विपर्यय होतो. जाग्रत् स्थितींतील ज्ञानांत विपर्यय होत नाहीं. यावर पूर्वपक्षः—जाग्रदवस्था असो, कीं स्वप्नावस्था असो, उपलक्षणाच्या साहाय्यानें स्वप्नानुभवावरून सर्व ज्ञान मिथ्या असें म्हणणें आहे. या न्यायप्रयोगांत ज्ञान हा हेतु आहे. न्यायप्रयोगाची मांडणी हीः—जेथें जेथें ज्ञानत्व आहे, तेथें तेथें मिथ्यात्व आहेच, जसें स्वप्नांत. म्हणून जाग्रत्समयींचें ज्ञानहि मिथ्या आहे. यावर समाधानः—स्वप्नज्ञानाचा विपर्यय दिसून येतो, व त्या विपर्ययाची उपपत्तिहि करतां येते. निद्राग्रस्त मन झालें म्हणजे तें दुर्बल होतें. आणि या दौर्बल्यामुळें स्वप्नांतील ज्ञान विपर्यय पावतें. या कारणास्तव वरल्या न्यायप्रयोगांत स्वप्नज्ञानाचा दृष्टांत सदोष आहे. तसेंच सुषुप्तिकालीं कोणत्याहि प्रकारचें मुळींच ज्ञान नसतें. यास्तव जाग्रत्समयींचें ज्ञान मि-

world is a delusion. In this refutation, a logical method is employed. We will explain and illustrate the method which is called Upalaksana. Now, what is Upalaksana? It is to generalize from particulars to particulars. Mr. Mill, a celebrated logician maintains that all universal propositions are based on this method. The chain of arguments which follows, will explain its nature. The Vedanta-system asserts that because the knowledge in a dream is unreal, therefore, all knowledge is unreal. Hence the knowledge in a waking state is unreal. The reply to this is as follows :—But the knowledge in a waking state is certain, that is, incapable of contradiction. Vedanta replies that before being awakened, the knowledge in a dream is real, therefore, there is no distinction between a dream and a waking-state. The Mîmânsaka observes:—While the knowledge in a dream can be contradicted, the knowledge in a waking state cannot be contradicted. Vedanta replies that all knowledge is unreal, and that this proposition as based on upalaksana is true whether the knowledge in a dream or a waking state is considered. The middle term in this syllogism is knowledge. This syllogism can be stated fully as follows. Wherever there is knowledge, there is unreality as in a dream; therefore the knowledge in a waking state is unreal. The Mîmânsaka observes upon this:—the unreality of the knowledge in a dream is discernible and it can be explained. The mind as affected by sleep is feeble. And the knowledge in a dream is unreal on account of this feebleness.

थ्या नाहीं. यावर पूर्वपक्षकाराचें म्हणणें:—कांहीं कारणामुळें ज्ञानाच्या करणरूपी साधनांत दोष होतो. जसें, डोळ्यांनीं नीट दिसत नाहीं. करणदोष जर झाला तर समजेल. स्वप्नसमयीं दोष समजत नाहीं, याकरितां स्वप्नसमयींच्या ज्ञानीं दोष नाहीं. यावरून स्वप्नसमयींचें ज्ञान मिथ्या नाहीं. यावर समाधान:—जागें झाल्यावर माझें मन निद्रायुक्त होऊन सदोष झालें होतें, असें ज्ञान होतें, म्हणून दृष्टांतावरचा दोष कायम राहिला. याकरितां जाग्रदवस्थेतील ज्ञान निश्चयात्मक आहे म्हणजे जग मिथ्या नाहीं असें अनुमान सिद्ध होतें. हा वादविवाद आम्ही मासल्याकरितां घेतला आहे, आणि जगत् मिथ्या नाहीं पण सत्य आहे हा मीमांसकांचा सिद्धांतहि लक्षांत ठेवण्याजोगा आहे. एक संबंध ठाऊक आहे, तो कोठें तरी एक ठिकाणीं दिसला असतां, तेणेंकरून दुसऱ्या ठिकाणीं समीप नसणाऱ्या अर्थाचें जें ज्ञान तें अनुमान. हें दोन प्रकारचें आहे. एक "प्रत्यक्षतोदृष्ट," आणि दुसरें "सामान्यतोदृष्ट." यामध्यें पर्वतावर अग्नि आहे कारण तेथें धूर आहे. हें पहिल्या प्रकाराचें उदाहरण. सूर्य फिरतो, कारण स्थलांतर गतीवांचून होत नाहीं. हें दुसऱ्या प्रकाराचें उदाहरण आहे. शाब्द म्हणजे खऱ्या वक्त्याचे भाषणावरून दूर व अज्ञात अर्थाविषयीं ज्ञान. उपमान—सादृश्यावरून अज्ञात अर्थाविषयीं ज्ञान. ज्या स्थळीं पाहिलेल्या किंवा ऐकलेल्या गोष्टीची एक उपपत्ति संभवते त्या स्थळीं त्या उपपत्तीस अर्थापत्ति असें म्हणतात. अ-

Therefore, the instance (Upalaksana) based on the knowledge in a dream in the above syllogism is faulty. Again, in perfect sleep, there is no knowledge whatever. Therefore, the knowledge in a waking state is not unreal. Vadanta replies to this:—Some cause affects the instruments of knowledge, as eyes can not see. If an instrument of knowledge be affected, it can be known. In a dream, there is no knowledge of an iustrument of knowledge being affected, therefore, the knowledge in a dream is not affected. Hence such knowledge is not unreal. The Mîmânsaka observes:—After being awakened, one knows that his mind was affected by sleep. Therefore, the example still remains to be faulty. Therefore, the inference that the knowledge in a waking state is real, that is, that the world is real is established. We have reproduced this style of argumentation as a specimen. The proposition of the Mîmânsakas that the world is real deserves special attention.

When a relation already known in one way is observed else-where, then the knowledge which it produces about an unknown fact is called inference. It is two-fold: as based on sensuous perception and as based on generality. That the mountain is fiery because it smokes is an example of the first kind. That the sun moves because whatever is known to change its place, moves, is an example of the second kind. Testimony is knowledge based on the statement of a truthful person. Analogy is based on resemblance. When only one explanation of a fact is possible, the explana-

सूत्राणि.

औत्पत्तिकस्तु शब्दस्यार्थेन संबंधस्तस्यज्ञानमुपदेशोऽव्यतिरेकश्चार्थेनुपलब्धे तत् प्रमाणं बादरायणस्यानपेक्षत्वात् ॥५॥

पदानि—औत्पत्तिकः, तु, शब्दस्य, अर्थेन, संबंधः, तस्य, ज्ञानं, उपदेशः, अव्यतिरेकः, च, अर्थे, अनुपलब्धे, तत्, प्रमाणं, बादरायणस्य, अनपेक्षत्वात् ॥

पदार्थः—औत्पत्तिकः=नित्यः। तु=यस्मात् कारणात्। शब्दस्य=उच्चारितस्य। तद्बोधितेनार्थेन सह यः संबंधः तस्यसंबंधस्य ज्ञानं=उपदेशः=विशिष्टस्य शब्दस्योच्चारणं। अव्यतिरेकः=अविपर्ययः। अर्थे अनुपलब्धे=अर्थे अप्राप्ते। तत्=तस्मात्। प्रमाणं=प्रमाणत्वेनस्वीकरणीयं। बादरायणस्य=तस्यमते। अनपेक्षत्वात्=प्रत्ययांतरं नेष्यते ॥

वाक्यार्थः—यस्मात् कारणात् शब्दस्यार्थेन सह यःसंबंधः सनित्यः। एतस्य संबंधस्य यज् ज्ञानं तदुपदेशः। उपदेशो न विपर्ययं प्राप्नोति। अर्थे अज्ञाते विपर्ययः। एतेन कारणेन उपदेशः प्रमाणं बादरायणस्यमते। प्रत्ययांतरं नापेक्षितं ॥

भावार्थः—चतुर्थे सूत्रे यत् प्रतिपादितं तस्यैतेन सूत्रेण प्रमाणं ददाति सूत्रकारः। सूत्रस्यास्य षड्दलानि। तैः उपपादितमेतत्। उच्चारितस्य शब्दस्य स्वार्थेन नित्यसंबंधः। उपदेशस्य लक्षणं दत्तं। उपदेशः सत्यः। यो विपर्ययो दृश्यते सोऽज्ञानात्। अतएव उपदेशस्य प्रामाण्यं। अवशिष्टं स्पष्टं। यदत्र वृत्तिकाराणां मतांतरं वर्तते तच्चिन्तनीयं ॥

भाव म्हणजे अमुकएक अर्थ नाहीं असें म्हटल्यानें जें ज्ञान होतें तें. हे सर्व ज्ञानप्राप्तीचे प्रकार सर्वांस विदित आहेत म्हणून धर्माच्या कारणाची परीक्षा नको असें वृत्तिकार म्हणतात. या प्रमाणाविषयीं फक्त दिग्दर्शन केलें आहे. प्रसंगवशात् पूर्ण व्याख्या करूं.

tion constitutes a presumption. Absence is knowledge that a thing does not exist. All these varieties of proof are known. Therefore, the Vrittikâras state that the cause of duty is not to be examined. The nature of proofs is only indicated here. It will be fully illustrated as occasion arises.

५. या कारणास्तव शब्दाचा आणि अर्थाचा परस्पर संबंध नित्य आहे. या नित्य संबंधाचें जें ज्ञान तो उपदेश. या उपदेशाला कधीं विपर्यय नाहीं, (परंतु) अर्थाचें ज्ञान नसलें म्हणजे विपर्यय होतो. या कारणास्तव बादरायणाचे मतानें उपदेश प्रमाण आहे. प्रत्ययांतराची म्हणजे दुसऱ्या ज्ञानाची गरज नाहीं.

5. Therefore, the connection between a word and its sense is eternal. The knowledge of this eternal connection is a precept. Such a precept is never erroneous. (But) when the sense is unknown, then there is an error. Therefore, according to Bâdarâyaṇa a precept is authoritative, (as) other knowledge is not needed.

---

५. या सूत्रांत शब्द नित्य आहे हें सिद्ध करण्याचा आचार्यांनीं उपक्रम केला आहे. या सूत्राचीं सहा दलें आहेत त्यांत प्रथम दलीं नित्यार्थी औत्पत्तिक पदाची योजना केली आहे. औत्पत्तिक पदाचा अर्थ उत्पत्तिकालीन, स्वाभाविक, उत्पत्ति झाली कीं बरोबर असणारा असा होतो. नित्यपद न योजतां औत्पत्तिक पदाचा उपयोग आचार्यांनीं कां केला अशी शंका उत्पन्न होते. त्यांत इतकेंच विशेष आहे कीं शब्दोच्चार होतांच अर्थ उत्पन्न होतोच होतो म्हणजे शब्दोच्चाराला अर्थावांचून गति नाहीं. दुसऱ्या दलांत उपदेशाचें लक्षण केलें आहे. आणि तिसऱ्या दलामध्यें उपदेशाला कधीं विपर्यय नसतो असें वर्णन केलें आहे हें वचन व याचें कारण हें विशेष लक्ष देण्या जोगें आहे. कारण तेणेंकरून मीमांसाशास्त्राचा कटाक्ष काय हें दिसून येतें. जेथें शब्दोच्चार तेथें अर्थ, व जो भ्रम उत्पन्न होतो तो अर्थ न जाणल्यापासून होतो. या भ्रमनिरासास अर्थज्ञान हें कारण आहे. परंतु नैयायिकमतें शिंप म्हणजे रुपें असा जो भ्रम उत्पन्न होतो त्या भ्रमनिरासास पुनरपि शिंपीचें अवलोकन क-

Jaimini seeks to maintain by this sûtra the eternity of a word. There are six parts of this sûtra. In the first part, the term Outpattika meaning eternal is used. The term signifies that which exists at the time of production (utpatti), that is, natural, that is that which co-exists with production. The question why Jaimini uses such a term instead of words signifying eternity arises:—The answer is—Jaimini seeks to show that the sense of a word is seen as soon as the word is pronounced, that is, a word cannot exist without its sense. In the second part, a precept is defined. In the third part, the nature of a precept is stated, that is, a precept can be never erroneous. This statement as well as its reason deserves special attention, because it explains the drift of Mîmânsâ philosophy. Wherever there is a word, there its sense exists. All delusion arises from the ignorance of the sense of a word. For removing this delusion, the knowledge of the sense of a word is indispensable. But

सूत्राणि.

॥ कर्मैकेतत्रदर्शनात् ॥ ६ ॥ (पूर्वपक्ष १)

पदानि–(शब्दैः) कर्म, एके, तत्र, दर्शनात् ॥

पदार्थः–शब्दः (पूर्वसूत्रेणोक्तः) कर्म=कृतिः । एके=पंडिताः । तत्र= तस्मिन्कर्मणि । दर्शनात्=प्रकटनात् ॥

वाक्यार्थः–शब्दः कृतिरित्येके वदन्ति । कृतौ सत्यां शब्दस्य प्रकटनम् ॥

भावार्थः–पूर्वोक्तशब्दो नौत्पत्तिकः नाम न नित्यः । किं तर्हि । कर्मजन्यो नामानित्यः । कुतः । स शब्दोऽभिव्यज्यः सत्युच्चारे नाम सति प्रयत्ने । उच्चारकर्मजन्यत्वात् सोऽनित्यः ॥ एषा पूर्वपक्षोक्तिरिति ज्ञेयम् ॥

॥ अस्थानात् ॥ ७ ॥ (पूर्व० २).

पदानि–(शब्दः) (कर्म) अस्थानात् ॥

पदार्थः–(शब्द उक्तपूर्वः) कर्म=अनित्यं । अस्थानात्=अस्थितेः ॥

वाक्यार्थः–शब्दोऽनित्योऽवर्त्तते स्थित्यभावात् ॥

भावार्थः–उच्चारिते शब्दे शब्दो विनश्यति । अतएवानित्यः सः ॥ (पूर्वपक्षेणशंकैषा).

---

* ( ) ईदृशया कुंडलिकयानुवृत्तिर्दर्श्यते ॥

रणें व तिच्या गुणाचें परीक्षण करणें हें कारण आहे. म्हणजे एकीकडे शिंप ह्या वस्तूचें व तिच्या धर्माचें विवेचन आहे आणि दुसरीकडे शब्दार्थावर सर्व तात्पर्य आहे. हें कोठपर्यंत म्हणाल तर प्रत्ययांतराची गरज नाहीं असें आचार्यांनीं सूत्रांत वर्णिलें आहे. वृत्तिकार म्हणून कोणी मीमांसाभाष्यकार आहेत, ते तिसऱ्या, चवथ्या, पांचव्या आणि साहाव्या सूत्रांचा निराळे रीतीनें अर्थ लावतात. इतकें सांगणें पुरें.

according to Naiyâyikas, the delusion that the mother of pearl is silver can be removed only by careful observation, and by the examination of its qualities. Now the latter seeks to obtain the knowledge of the real properties of the mother of pearl while the former philosophers are concerned with the sense as such of a word. How far is this carried? Jaimini distinctly states in the sûtra under consideration that other knowledge than the knowledge of the sense of a word is not necessary. It is enough to state that commentators on Mîmânsâ called Vrittikâras do not interpret the third, fourth, fifth, and sixth sûtras as Shabara does.

६. कोणी (असें म्हणात कीं) शब्द कर्म आहे. उच्चारण केलें म्हणजे तो प्रकट होतो. (पूर्वपक्ष १.)

७. उच्चारतांच शब्दध्वनीचा नाश होतो; म्हणून शब्द अनित्य आहे. (पूर्वपक्ष २.)

6. Some (state) that a word is an action. It appears when pronounced. (This is a statement in opposition).

7. The sound of a word vanishes, the moment it is pronounced, therefore, it is transitory. (II. Statement of an opponent.)

---

६. शब्द अनित्य आहे असे आशयाचें हें सूत्र आहे, म्हणजे या सूत्रांत पूर्वपक्षाचें प्रतिपादन केलें आहे. जैमिन्याचार्याचे सरणीचें माधवानें वर्णन करतांना एका प्रकरणाचें नांव अधिकरण असें ठेविले आहे, आणि या अधिकरणाचे पांच अवयव असतात.–१ विषय, २ संशय, ३ संगति, ४ पूर्वपक्ष, आणि ५ सिद्धांत. पूर्वपक्ष म्हणजे विरुद्ध पक्षाचें प्रतिपादन असें समजावें. शब्द कर्म आहे म्हणजे क्रतीनें उत्पन्न होतो म्हणजे अनित्य आहे. आणि "तो प्रकट होतो" या पूर्वपक्षाचे पदांवर लक्ष ठेवावें, कारण उत्तरपक्षी यावर कोटी आहे.

७. हें सूत्र समजण्यास सोपेंच आहे परंतु थोडा विचार केला पाहिजे. पहा आपण चन्द्र या शब्दाचा उच्चार केला म्हणजे 'चंद्र' हीं दोन्हीहि अक्षरें मुखांतून निघून जातात. चंद्र या दोन अक्षरांचा अर्थमात्र मनुष्याच्या मनांत बिंबतो, व त्या अर्थाचें अनुरोधानें सर्व व्यापार होतात. तर हा असा शब्दांतील वर्णोच्चार नष्ट झाला, परंतु शब्दाचा अर्थ मात्र राहिला. पुनः यांत असा आणखी सूक्ष्म विचार आहे कीं चार अक्षरांचे शब्दाचा उच्चार केला असतां चारी वर्णांचा उच्चार एकदम तर होत नाहींच आणि अर्थ एकदम मनांत येतो. हें कसें? चंद्रकांत

6. This sûtra sums up an objection, and seeks to prove the transitoriness of a word. Mâdhava in describing the method of Jaimini says that a chapter called adhikarana consists of five parts. 1. subject, 2. doubt, 3. connection, 4. an objection, and 5. the final established proposition. An objection is called the first side (Pûrva-paksa) and is raised by a real or an imaginary opponent. The sense of a word being called an action is that it is an effect. The phrase that it appears deserves attention, because the author refers to it when he enters on its refutation.

7. The sûtra is easy; it requires a little examination. When the word *purpose* is pronounced, the two syllables *pur* and *pose* come out of the mouth, after one another; but they at once impress the sense of *purpose* on the human mind, and this sense directs the conduct of man. Then the sounds of letters vanish but their sense alone remains. Again, when a word consisting of five syllables is used, the five syllables cannot be at once pronounced; but the sense of the word is impressed at once. How is this? There are five syllables in the

सूत्राणि.

॥ करोतिशब्दात् ॥ ८ ॥ (पू० ३).

पदानि–(शब्दः), (कर्म), करोतिशब्दात् ॥

पदार्थः–(शब्दः कर्म उक्तपूर्वं) करोतिशब्दात्=करोतिपदस्य प्रयोगात् ॥

वाक्यार्थः–शब्दोऽनित्यः करोतिक्रियापदयोगात् ।

भावार्थः–शब्दंकुरु । इत्यादिव्यवहारेप्रयोगाः सन्ति । अतः शब्दः क्रियते । याक्रियते । तद्नश्यति । अतःशब्दोनश्वरोनामानित्यः (पूर्वपक्षेणशंकैषा)

॥ सत्वान्तरे यौगपद्यात् ॥ ९ ॥ (पू० ४).

पदानि–(शब्दः) सत्व–अन्तरे यौगपद्यात् ॥

पदार्थः–(पूर्वोक्तशब्दः) (कर्मच) सत्वं=प्राणी । अन्तरे=अन्यस्मिन् । यौगपद्यात्=एककाले ॥

वाक्यार्थः–सशब्दोऽन्यस्मिन् प्राणिनि एककालेवर्त्तते । अतएवानित्यः ॥

भावार्थः–यत्किंचिन्नानादेशेषु नानासत्वेषुयुगपद्वर्त्तते तत् एकंनास्ति यदनेकं तदनित्यं अतउपदेशरूपशब्दोऽनित्यः ॥

या शब्दांत चार अक्षरें आहेत. "चं" या अक्षराचा उच्चार झाल्यानंतर 'द्र'या अक्षराचा, मग 'कां' याअक्षराचा,मग 'त'या अक्षराचा, असे उच्चार होतात. वर्ण नष्ट होत जातात आणि मग शब्दाचा अर्थ एकदम मनांत भासतो. हें कसें ? या प्रश्नाचें उत्तर देतांना वैशेषिक सूत्रांत श्रवणोत्पत्तीचा प्रकार वर्णिला आहे तो आलोचनीय आहे व त्यामध्यें व युरोपी श्रवणशास्त्रामध्यें भेद नाहीं. शब्दश्रवण कसें होतें हा विचार शास्त्रदृष्ट्या मोठा उपयोगी आहे येवढेंच नाहीं, तर व्यवहारांत देखील याचा मोठा उपयोग आहे. गानवाद्यें तयार करणें इत्यादिकांमध्यें श्रवणशास्त्राचा मोठा उपयोग आहे इतकें सांगून ज्या सूक्ष्म विचारांचें या टिपेंत वर्णन केलें आहे, ते विचार श्रवणशास्त्रांत मुख्य आहेत येवढेंच सांगणें सध्यां पुरे.

word *justification*. First the sound of *jus*, then of *ti*, then of *fi*, then of *ca*, and last of *tion* vanishes away. The sense follows the pronunciation of all the syllables? How is this? In answering this question, the theory of accoustics as expounded in Vaishesika philosophy deserves attention. There is no difference between this theory and the theory of accoustics accepted in Europe at the present day. The theory of accoustics is important not only from a philosophical point of view, but in practical life. All musical instruments are prepared by the aid of the science of accoustics. Now suffice to notice that the questions already raised are prominently discussed in accoustics as their solution constitutes its basis.

८. शब्दसंबंधानें "करणें" या धातूचा प्रयोग होतो म्हणून शब्द अनित्य आहे. (पूर्वपक्ष ३).

९. निरनिराळ्या प्राण्यांस एकच शब्द एकदम ऐकूं येतो, म्हणून शब्द अनित्य आहे. (पूर्वपक्ष ४).

8. The verb *to make* is used in relation to a sound; therefore, it is transitory. (III. Statement of an opponent).

9. Different animals simultaneously hear the same sound, therefore it is transitory. (IV. Statement of an opponent.)

८. उदाहरणाशिवाय या सूत्राचा अर्थ स्पष्ट होणार नाहीं. शब्द करा असें वाक्य आपण बोलतों. शब्द करा असें म्हटल्यावर शब्द पूर्वी नव्हता हें स्पष्टच आहे, असें पूर्वपक्षवादी अनुमान काढून शब्द कृत्रिम आहे असें प्रतिपादन करतो. हें प्रतिपादन सूत्रांत वर्णिलें आहे.

९. यास उदाहरण 'चंद्र' असा शब्द म्हटला असतां पांच जणांस एकदम ऐकूं येतो, म्हणून चंद्र हा शब्द पांच ठिकाणीं उत्पन्न होऊन त्या ठिकाणीं टिकला. जें जें कांहीं निरनिराळ्या देशांमध्यें एकदम दिसून येतें तें एकच आहे असें म्हणतां येत नाहीं, आणि जें एक नाहीं तें अनेक आहे, आणि जें अनेक तें अनित्य आहे, अशी परंपरा पूर्वपक्षकार लावून शब्द अनित्य असें प्रतिपादन करतो. "सत्त्वान्तरे" येवढ्या सूत्रस्थ संस्कृतपदाचा शबरानें मुळींच पदशः अर्थ केला नाहीं. "नानादेशेषु" असें त्यावर लिहून ठेविलें आहे. त्यावरून अर्थ नीट बसत नाहीं. आम्ही सत्त्व शब्दाचा अर्थ प्राणी केला आहे त्याचा वाचकांनीं विचार करावा.

8. An example is necessary to explain this sûtra, "Make a sound" is a sentence used. When one says "Make a sound," it is plain that the sound to be made is not in existence. Therefore, the opponent infers that a sound is an effect. This is what is advanced by the sûtra.

9. An example is necessary. When the word "Moon" is pronounced, it is heard (say) by five persons. Therefore, the word is produced at the same time in five places where its sense is understood. Whatever appears in different places at the same time is not *one*. And whatever is not *one* is *many*. And whatever is *many* is transitory. The opponent insists on these propositions in this order, and on the transitoriness of a sound. Shabara has not literally and closely interpreted the phrase "sattvântare" in the sûtra. He simply puts in "Nânâdeshesu." The last phrase does not materially aid the interpretation. We have interpreted the word "sattva" into "an animal." Our readers can determine what "sattva" means.

सूत्राणि.

॥ प्रकृतिविकृत्योश्च ॥ १० ॥ (पू० ५).

पदानि–(शब्दः) (कर्म) प्रकृति–विकृत्योः, च ॥

पदार्थः–(उक्तपूर्वशब्दः कर्मच) प्रकृतिः=मूलस्थितिः । विकृतिः=स्थित्यंन्तरं । चकारेण=समुच्चयः ॥

वाक्यार्थः–स शब्दोऽनित्यो यतः प्रकृतिर्विकृतिश्चवर्त्तेते ॥

भावार्थः–यथा । दधि । अत्र । एतयोर्द्वयोःशब्दयोः संधिसमये । दध्यत्र । इतिरूपंभवति । तथा इकाररूपप्रकृति र्विक्रियते ॥ तत्र इकारस्य यकारोभवति ॥ अतः शब्दोऽनित्यः ॥

॥ वृद्धिश्चकर्तृभूम्नास्य ॥ ११ ॥ (पू० ६).

पदानि–(शब्दः) (कर्म) वृद्धिः, च, कर्तृ–भूम्ना, अस्य ॥

पदार्थः–(उक्तपूर्व) वृद्धिः=वर्धनं । च=पूर्वोक्तकारणानांसमुच्चयः । कर्तृ=यः करोति सः । भूम्ना=बाहुल्येन । अस्य=शब्दस्य ॥

वाक्यार्थः–अस्य शब्दस्य वर्धनंच भवति कर्तृबाहुल्येन । अतःशब्दोऽनित्यः ॥

भावार्थः–यतोबहुभिरुच्चारयद्भिर्महान् शब्दः श्रूयते ततः शब्दस्य वृद्धिर्भवति। यद् वर्द्धते क्षिणोति वा तदनित्यं ॥

(षट्पूर्वपक्षाणांनिरूपणंसंवृत्तं । इत उत्तरपक्षाणामुपक्रमः)

१०. शब्दाची मूलप्रकृति असून पुनः विकृति होती म्हणून शब्द अनित्य आहे. (पू० ५)

10. A word has an original form and a modified form, therefore, it is transitory. (v. Statement of an opponent).

११. शब्द करणारे पुष्कळ असले म्हणजे त्याची वृद्धि होते. (पू० ६)

11. By many making a sound, its increase(is seen.) (vi. Statement of an opponent).

---

१०. उदाहरणानें अर्थ स्पष्ट होतो. "प्रीति उत्तर" या दोन शब्दांचा संधि होऊन "प्रीत्युत्तर" असा नवा शब्द होतो. प्रीति या शब्दांतील इकार ही प्रकृति आहे म्हणजे "इ" शब्दाच्या मूलाकारांत आहे, तिच्या ठिकाणीं यकार झाला म्हणजे यकार हा नवा आकार उत्पन्न झाला. ज्याचा आकार बदलतो तें अनित्य म्हणून शब्द अनित्य आहे.

११. उदाहरण दहा माणसांनीं एक शब्द उच्चारिला असतां एकानें केल्याच्या दसपट त्याचा उच्चार मोठा होतो, म्हणून शब्दाला वृद्धि आहे. ज्याची ज्याची वृद्धि होती किंवा क्षय होतो तें तें अनित्य आहे. सूत्रामध्यें "त्याची वृद्धि होती" अशीं पदें आहेत. "त्याची" म्हणजे शब्दाची असा अर्थ समजावयाचा. साहा पासून अकरा सूत्र पर्यंत पूर्वपक्षवादीनें आपल्या कोट्या केल्या. त्या कोट्या क्रमानें जमा धरून जैमिन्याचार्य उत्तरें देतात. तीं उत्तरेंहि क्रमानें साहा आहेत. तीं पाहतांना त्या त्या पूर्वपक्षाशीं तें तें उत्तर लावून विचार केला असतां उत्तराची योग्यता नीट लक्षांत येईल.

10. An example will elucidate the sûtra. Take the two Sanskrita words *Prîti* and *uttara* and combine them into *Prîtyuttara* by rules of grammar. In *Prîtyuttara*, the original *i* is changed into *y*. That is, a word has had two forms—original and modified. That which is capable of modification is transitory. Therefore, a word is transitory.

11. An example: when ten men make the same sound, it is ten times louder than the sound made by one man. Therefore, a word grows. Whatever waxes or wanes is transitory. Therefore, a word or sound is transitory. In the sûtra "its increase" are the words used, "By its increase," the increase of the sound or word is meant. Beginning from the 6th sûtra, the opponent advances his arguments against the doctrine of the eternity of a word. Jaimini takes stock of these arguments in the order in which they are advanced and gives replies which are as many as the arguments of the opponent. In examining the replies, it would be advisable to read along with each reply the corresponding argument of the opponent so that the cogency of the reply may be thoroughly seen.

सूत्राणि.

॥ समंतुतत्रदर्शनम् ॥ १२ ॥ (उत्तरपक्ष १).

पदानि–(शब्दः) (कर्म) समं, तु, तत्र, दर्शनं ॥

पदार्थः–(उक्तपूर्वम्) समं=तुल्यं । तु=न । तत्र=तस्मिन् । दर्शनं=विचारः ॥

वाक्यार्थः–शब्दोनानित्यः । तस्मिन् विषये विचारस्तुल्यः ॥

भावार्थः–यो विषयः प्रकृतः तस्मिन्विषये नाम प्रथमपूर्वपक्षस्यास्योत्तरपक्षविषये विचारसाम्यं निष्पन्नं । यदुच्चारणेनाभिव्यज्यते तदुच्चारणात् प्राग् वर्त्तते ॥ अतो विचारसाम्यम् ॥

॥ सतःपरम् अदर्शनं विषयानागमात् ॥ १३ ॥ (उ० २).

(द्वितीयपूर्वपक्षस्यसमाधानमत्र)

पदानि–सतः, परं, अदर्शनं, विषय-अनागमात् ॥

पदार्थः–सतः=यदस्ति तस्मात् । परं=पाश्चात्यं । अदर्शनं=लोपः । विषय-अनागमात्=विषयस्य=(इंद्रियगोचरस्य) अप्राप्तेः ॥

वाक्यार्थः–यदा विषयो न प्राप्नोति तदा विद्यमानस्याप्यदर्शनं भाति ॥

भावार्थः–शब्दस्तुनित्यः । तस्य आकाशविषयत्वं–श्रोत्राकाशे यथा संयोगविभागौ भवतः तथा तस्यभानं–संयोगविभागाभावे लोपोभासतेमात्रं ॥

१२. त्याविषयीं विचार साम्य आहे, म्हणून शब्द अनित्य नाहीं.

१३. विषय नसला म्हणजे विद्यमानवस्तूंचेंहि दर्शन होत नाहीं.

१२. "त्या विषयीं" म्हणजे पूर्वपक्षांत जो विषय झाला त्या विषयीं विचार साम्य म्हणजे वादी प्रतिवादीच्या कोट्या सारख्याच लागू पडतात. ही एक वाद करण्याची विशेष शैलि आहे; तिकडे वाचकांनीं कृपा करून लक्ष द्यावें. विचारसाम्यामध्यें जी कोटि वादीनें काढली, तिचा अंगीकार केलासें दाखवून उत्तर असें द्यावयाचें कीं तेणेंकरून वादीची आणि आपली बरोबरी झाली, इतकेंच निष्पन्न व्हावें. उदाहरणावरून स्पष्ट होईल. "कांहो पूर्वपक्षकारी, असें म्हणतांना ? कीं उच्चार केल्यानंतर शब्द प्रकट होतो. बरें ठीक आहे; परंतु प्रकट होतो असें आपण म्हणतां त्यावरून तो गुप्त होता असें निष्पन्न होतें. आणि गुप्त होता असें म्हटल्यानें आम्हास कांहीं बाधक होत नाहीं. आपल्यासहि कांहीं बाधक होत नाहीं, असें आपलें म्हणणें आहेच. या स्थळीं विचारसाम्य उत्पन्न झालें. पुनः शब्द उच्चारणाचे पूर्वी गुप्त होता असें अंगीकारल्यानें शब्द नित्य आहे या प्रतिपादनास कांहीं बाध येत नाहीं. म्हणजे मुख्य विषय प्रतिपादन जसेंच्या तसेंच आहे.

१३. शब्द हा गुण आकाशाचा आहे. कर्णाच्या ठायींहि आकाश आहे. या आकाशावर जसजसे वायूचे संयोगविभाग घडतात, तसतसें शब्दज्ञान होतें; आणि संयोगविभाग न घडले, म्हणजे शब्द नाहीं, असें वाटतें मात्र. यावर विशेष विचार

12. On this subject, there is parity of reasoning, therefore, a word is not transitory.

13. When not an *object* (of sensuous preception), (even) an existing substance is not cognized.

12. "On this subject" refers to the first argument of the opponent in the sixth sútra. Parity of reasoning" is a logical contrivance often adopted in our discussions. It is called Vichâra sâmya. Our readers will kindly give heed to it. The special argument on which an opponent insists is granted, but a reply is given by which the contrary of the special argument comes to be established. This is the essential nature of the argument called parity of reasoning. An example will illustrate this logical contrivance. "Well" says Jaimini to his opponent—"you say:—a word appears when pronounced. Your statement implies that a word exists latent before its appearance. Well, its latent existence is not against me. Your statement shows that it is not against you." This is a case of "parity of reasoning." Again, It does not affect the proposition that a word is eternal, to take for granted that a word exists latent before its appearance when pronounced. That is to say, the original proposition is not rebutted at all.

13. A sound is a quality of æther (akâsha.) There is æther in the ears. As air affects this æther, a sound is cognized, and when air

सूत्राणि.

॥ प्रयोगस्यपरम् ॥ १४ ॥ (उ० ३).

पदानि–(दर्शनं) प्रयोगस्य परं ॥

पदार्थः–पदार्थः स्पष्टः ॥

वाक्यार्थः–यदस्तितस्यकृते प्रयोगे दर्शनं भवति ॥

भावार्थः–शब्देनित्यः (समाधानमिदंसुलभंज्ञायते)

केला पाहिजे, आणि हा विचार करतांना वैशेषिक शास्त्रांतील श्रवणोत्पत्तीच्या प्रकाराचें अनुसंधान केलें पाहिजे. त्यात प्रथम आकाश म्हणजे काय याचा विचार. वैशेषिक शास्त्रांत साहा पदार्थांचें विवेचन केलें आहे. ते पदार्थ हे. १ द्रव्य, २ गुण, ३ कर्म, ४ सामान्य, ५ विशेष, आणि ६ समवाय. त्या साहा पदार्थांमध्यें द्रव्याचें वर्णन करतांना त्याचे नऊ विभाग केले आहेत, ते असे. १ पृथ्वी, २ जल, ३ तेज, ४ वायु, ५ आकाश, ६ काल, ७ दिशा, ८ आत्मा, आणि ९ मन. या ठिकाणीं वायु आणि आकाश या दोहोंचाच आम्हास विचार करणें आहे. त्यांत वायु काय हें सर्वांस ठाऊक आहे. तेव्हां आकाशाचा विचार केला म्हणजे झालें. आकाश हें एक द्रव्य, विभु म्हणजे सर्वव्यापि, नित्य म्हणजे अविनाशि, आणि शब्दाचें रहाण्याचें स्थान आहे. आतां श्रवणोत्पत्ति होते कशी? कांहीं निमित्तकारणानें वायूमध्यें लहरी उत्पन्न होतात. या लहरींस वीचीतरंग असें संस्कृतांत म्हणतात. जसें पाण्यांत दगड टाकला म्हणजे वीचीतरंग उठतात, व स्पष्ट दिसतात, त्याप्रमाणें वायूमध्यें आघात केला म्हणजे आकाशाचा नित्यगुण जो शब्द तो स्पष्ट होतो. आकाशामध्यें शब्द नेहमीं आहेच आहे. त्याचे दोन आकार असतात– एक व्यक्त आणि दुसरा अव्यक्त. आघा-

does not come in contact with it, it is *felt only* that there is no sound. This deserves some special enquiry. In this enquiry, Vaishesika philosophy requires to be considered. Now, the first subject of inquiry is:—What is æther? Six substances are investigated in Vaishesika philosophy. These substances are:—entity; quality, action, generality, particularity, and inherent relationship. The substance (entity) is divided into nine classes:—earth, water, light, air, æther, time, direction, soul, and mana. (The word *dravya* is translated here by entity,) Dravya is that which is neither quality or any of the remaing five substances(such as action and the rest). In this enquiry, we have to consider air and æther. The substance *air* is generally known. Æther remains therefore, to be considered- Æther is an entity which is everlasting, universal, and is the *seat* of sound. Now the question is, how is the knowledge of a sound produced? Some cause produces ripples in the air. These ripples are called Vichitaranga in Sanskrita. As concentric ripples are produced in water, and are well seen, so there are ripples in æther. Sound exists per-

१४. प्रयोग केल्यानंतर जें आहे त्याचें ज्ञान होतें. (उ०३)

ता सारख्या निमित्तकारणानें शब्द व्यक्त होतो. मग वायूंत वीचीतरंग उठतात. यांच्या योगानें कानांत जाऊन शब्द पोहंचतो. मग कर्णेंद्रियाचा आणि शब्दाचा संयोग होतो. मग कर्णेंद्रियापासून हा शब्द मनांत जातो. आणि मनापासून आत्म्यास शब्दाचें ज्ञान होतें. युरोपी श्रवणशास्त्रांत शब्दोत्पत्तीची जी परंपरा योजिली आहे, त्या परंपरेस ही परंपरा सोडून नाहीं. इतकेंच कीं युरोपी श्रवणशास्त्रांत वायूचें गुणनिरूपण खोल आणि मोठें सूक्ष्म आहे. आतां, सूत्रांतील पदांचा अर्थ स्पष्ट होईल. "सतः" म्हणजे अधीं असून, "परं" म्हणजे पुढें, "अदर्शनं" म्हणजे लोप भासतो, "विषयानागमात्" म्हणजे विषय न प्राप्त झाल्यामुळें. या ठिकाणीं 'विषय' शब्दाचा विशेष अर्थ आहे. विषय म्हणजे ज्याचें ज्ञान होतें तो. शब्द आघातासारखा निमित्तकारणानें उघड होऊन कानांतील आकाशांत प्राप्त होतो. असा प्राप्त न झाला म्हणजे असूनहि नाहीं असा भासतो असा सूत्रार्थ आहे.

१४. आतां प्रयोग म्हणजे कोणता? या प्रश्नाचें उत्तर देतांना या तिसऱ्या उत्तरपक्षाशीं तिसरा पूर्वपक्ष जोडून वाचावा. या तिसऱ्या उत्तरपक्षांत 'जा, ये,' असे जे, शब्दाचे प्रयोग बोलतांना आम्ही करतों, त्या अर्थी 'प्रयोग' शब्द योजिला आहे. व मागील सूत्राचें अनुसंधान केलें म्हणजे शब्द आहेच आ-

14. That which exists, is cognized (only)after(its) application. (Reply, 3.)

manently in æther. It has two forms—distinct and indistinct or sensible and latent. Sound becomes sensible by the air being moved. Then ripples in the air arise. These convey a sound to the ears. The sense of hearing comes in contact with the mind which causes knowledge of the sound in the soul. This theory of the perception of sound is identical with that which is propounded by thinkers of Europe with this difference that the latter possess deep and critical knowledge of the properties of air. Now the meaning of the terms of the sûtra will be distinctly understood. The term "satah" means "already existing;" "param," "after;" "adarshanam" means "disappearance." "Visayânâgamât" on account of the non-appearance of an *object*." Here the term "Visaya, an *object*, has a special meaning. It is the correlate of the senses of knowledge, and is that which is cognized by means of the senses, because when a sound appears by a beat in the air, it reaches the æther in the ears. When it does not reach the ears in any way, though existing, it is yet considered not to exist. This is the sense of the sûtra.

14. In the original sûtra, the term *prayoga* is used. There is no corresponding term, we are afraid, in English. We have translated it by application. Its primary sense is *conjunction*, or *junction preeminently*, that is, combination as made. Its secondary sense is practical employment or applica-

28. The word *darshana* requires to be explained. Whatever is seen or cognized is a *darshana*. The English word phenomenon expresses it. This word, if used in this sense, will be a great accession to the vocabulary of the Marâthi language. Again, the word *artha* deserves attention. It is often used in philosophy. It means a fact or a thing. A philosopher was called by the ancient Âryas an Âchârya, because they believed that he culled the knowledge of objects or the senses of words (artha). Visaya is an object of sense. Transitory things are found in the Vedas. For instance, the Vaidika text:—"Ouddâlaki desired;" but Ouddâlaki is a son of Uddâlaka. Therefore, the Vaidika text expressing the desire of Ouddâlaki is impossible before his birth. Therefore, the Vaidika text is of human origin.

29. The explanation of the expression Shabdapûrvatva, will make the sûtra plain. In the fifth sûtra as well as in the following, the doctrine of the eternity of a word is insisted on, and arguments to support it are advanced. This sûtra is introduced to connect the chain of arguments. It is called a Sangati-sûtra. Vide note on sutra (I. 1, 7.) The priority of a word is not relative as laid down in the sûtra. It is absolute. That is, a word is without a beginning : it is eternal.

सूत्राणि.

॥ आख्याप्रवचनात् ॥ ३० ॥ (उ० १)

पदानि । स्पष्टानि ॥

पदार्थः । आख्या=नाम, प्रवचनात्=अर्थकथनात् ॥

वाक्यार्थः । स्पष्टः ॥

भावार्थः । यैरर्थकथनं कृतं । तेषां नामभिर्वेदानामाख्याः संवृत्ताः ॥ न तु यैर्वेदाः कृताः । तेषां नामतो वेदानामाख्याः ।

॥ परन्तु श्रुतिसामान्यमात्रम् ॥ ३१ ॥ (उ० २)

पदानि । परम्, तु, श्रुति-सामान्य-मात्रं ॥

पदार्थः । परम्=श्रेष्ठम् । तु=न । श्रुतिसामान्यमात्रम्=श्रुतेः सामान्यं । सामान्यं=जातिः । श्रुतिसामान्यम्=श्रुतिजातिः । मात्रम्=केवलम् ॥

वाक्यार्थः । न । केवला श्रुतिजातिःश्रेष्ठा ॥

नकारेण द्वितीयपूर्वपक्षो विपरिवर्त्तते । केवला श्रुतिजातिः श्रेष्ठा ॥

भावार्थः । विशेषश्रुतिनामधेयानि यथा काठकं कालापकं नादरणीयानि । कुतः प्रवचनादितिपूर्वेण सूत्रेणोक्तम् । योनित्योऽर्थस्तमेवश्रुतिः प्रब्रवीतीतिभावः ॥

स्मर्यतेच वैशंपायनः सर्वशाखाध्यायी । कठः पुनरिमांकेवलां शाखामध्यापयांबभूवेति शाबरः ॥

३०. वेदाख्या भाष्यकारावरून पडल्या. (उ० १.)

३१. नाहीं; केवल श्रुतिजाति श्रेष्ठ. (उ० २.)

३०. २७सूत्रांतील पूर्वपक्षाचें ह्या सूत्रांत उत्तर आहे. त्यांत 'आख्या' आणि 'प्रवचन' असे दोन शब्द आहेत. आख्या म्हणजे प्रसिद्ध नाम, आणि प्रवचन म्हणजे मूल ग्रंथाची व्याख्या. सूत्रार्थ इतकाच कीं ज्यांनीं ज्यांनीं व्याख्या केल्या त्यांच्या त्यांच्या नांवानें वेदशाखा प्रसिद्ध आहेत म्हणून त्यांनीं वेदशाखा केल्या हें म्हणणें नीट नाहीं.

३१. या सूत्रांत २८ सूत्रांतील पूर्वपक्षाचें उत्तर आहे. या उत्तरांत श्रुति म्हणजे वेद केवळ जातिसंबंधानें घेण्याचे हीच गोष्ट श्रेष्ठ आहे. व्यक्तिशः वेदविचार नाहीं, केवळ सामान्य वेदविचार करण्याचा, पूर्वपक्षकार व्यक्तिशः वेदावर दोष देतो; आचार्य जाल्यभिप्रायानें समाधान करतात. या ठिकाणीं पूर्वपक्षाचें समाधान झालें नाहीं असें म्हणणें अवश्य पडतें. पूर्वपक्ष जशाच्या तसाच राहिला. शबरांनीं उद्दालक नांवाचा पुरुष नाहीं म्हणून औद्दालिकि त्याचा मुलगा म्हणणें संभवत नाहीं अशा प्रकारानें सूत्राशय वर्णिला आहे. "श्रुतिजाति श्रेष्ठ" या वाक्याचा अर्थ, जें जें श्रुतींत वर्णिले आहे, तें तें नित्य, तात्त्विक, आणि उपाधिरहित असा केला तर बरें. म्हणून सामान्य वर्णनांत तात्पर्य आहे. पूर्वपक्षांत ज्या नामरूपावरून शंका काढल्या, त्या सहज उपाधिग्रस्त आणि अतात्त्विक झाल्या.

30. A name (is given to a Veda) on account of a commentator. (I. Reply.)

31. No; the Veda, as a mere generality, is supreme. (II. Reply.)

30. A reply to the objection raised in the 27th sûtra is given here. There are two important terms in the original Sanskrita sûtra: Âkhyâ and Pravachana. Âkhyâ is a name well-known. Pravachana is a commentary as well as commenting. The gist of the sûtra is that the Shâkhâs of the Vedas are known by the names of those who commented upon them. Therefore, it is unfair to say that they composed the shâkhâs of the Vedas.

31. A reply to the objection in the 28th sûtra is given in this sûtra. In this sûtra, the argument that the Veda ought to be considered as a genus, is advanced. That is, particular parts of the Veda are not to be considered individually. The opponent objects to particular parts of the Veda. Jaimini bases his argument on a generality. It is absolutely necessary to admit that the objecton of the opponent is not rebutted: it is not removed. Shabara thus interprets the sûtra. There was no Uddâlaka; therefore, there could be no Ouddâlaki –his son. The expression that "the Veda as a mere generality, is supreme," may be thus interpreted: —Whatever is explained in the Veda, is immutable, based on first principles, and essential. Stress is to be laid upon such a general explanation. All the objections of the opponent, founded

सूत्राणि.

॥ कृतेवाविनियोगःस्यात्कर्मणः सम्बंधात् ॥ ३२ ॥

पदानि । स्पष्टानि ॥

पदार्थः । कृते=रचिते=कृत्रिमे । वा=न । विनियोगः=अनुष्ठानक्रमविधानम् । स्पष्टमवशिष्टम् ॥

वाक्यार्थः । कृत्रिमे वेदे सति नाम यदि कृत्रिमो वेदस्तर्हि कर्मणः सम्बन्धाद् विनियोगो न स्यात् ॥

भावार्थः । वेदे कर्मणो विनियोगः सम्बन्धेन विहितः । अतः कृत्रिमत्वं तत्र नास्ति । नायमुन्मत्तबालवाक्यसदृशः । कुतः । कर्मणः सम्बन्धेनात्र कर्तव्यतोच्यते नाम कयं केन किमर्थं विनियोगः कर्तव्यः ॥

अपिच वनस्पतयः सत्रमासतेत्येवमादयोऽपिनानुपपन्नाः स्तुतयोह्येताः सत्रस्य वनस्पतयोनामाचेतना इदंसत्रमुपासितवन्तः किंपुनर्विद्वांसो ब्राह्मणा इतिकैमुतिकन्यायेन शबरेण सूत्राशयो वर्णितः । तच्चिन्त्यम् ॥

---

on such accidents as names and forms, are necessarily non-essential and formal.

३२. जर वेद कृत्रिम झाले तर कर्मसंबंधानें वेदवाक्याचा विनियोग होणार नाहीं.

३२. या सूत्रांतील "कर्मसंबंध" आणि "विनियोग" या दोन शब्दांचा अर्थविचार केला पाहिजे. कर्मसंबंध म्हणजे कर्मद्योतक जे शब्द त्यांचा परस्पराशीं संबंध; म्हणजे कर्म कसें करावयाचें, कोणी करावयाचें, कशाकरतां करायाचें, अशी जी आकांक्षा उत्पन्न होते, तिचें वेदवाक्यांत उत्कृष्ट समाधान असतें. अमक्याच तऱ्हेनें आणि अमक्याच परंपरेनें वाक्यांत शब्द असले म्हणजेच वाक्यार्थ होतो अशी जी अवश्यकता तीस आकांक्षा म्हणतात. म्हणून "वनस्पतीनीं सत्र केलें, सर्पांनीं सत्र केलें" हीं वाक्यें वेड्या मुलाच्या बडबडी सारखीं नाहींत. आणि या वाक्यांतून कैमुतिकन्यायानें विशेष अर्थ उत्पन्न होतो. अरे, वनस्पतींसारखे जड पदार्थ सत्र करते झाले. मग मनुष्यासारख्या सचैतन्यानें सत्र करावेंच करावें हें सांगणें नको. या ठिकाणीं कैमुतिकन्यायाचा कसा उपयोग झाला आहे, हें वाचकांस ह्या उदाहरणावरून समजेल.

प्रथमाध्यायांतील प्रथमपाद समाप्त.

32. (If Vaidika texts be) artificial, (their) application cannot be made (in a sacrificial work) in proper order and sequence.

32. In the original Sanskrita sûtra, there are two terms deserving of notice: Karma-Sambandha, and Viniyoga. Karma-Sambhandha means the mutual relation of words which prescribes sacrificial works and explains these points:--who is entitled to perform a sacrificial rite, for what end, and how is it to be performed? The necessity of words following a special order and of forming a significant sentence is called *desirability* (Sâkânksatva). The conditions of such a necessity of logical sequence of thought as arises from the words used is thoroughly satisfied in the Vedas. Therefore, such Vaidika texts as "the Vegetables sacrificed for a session," and "the serpents sacrificed for a session," are not like the babbling of mad boys. Again, these texts enforce the sacrifices *a-fortiori* in this way:—"Oh, the irrational things like vegetables sacrificed, then there is no need of prescribing to a rational being like man that he ought to sacrifice." Here the *Kaimutikanyâya* is employed. The phrase is derived from *kim*, what, and *uta*, again, *ka*, an affix, *Nyâya*, a maxim. It literally means the maxim formed by "what" and "again." We have translated it by the phrase *a-fortiori*. The reply of Jaimini is neither intelligible nor satisfactory. The first pâda of the first adhyâya is finished.

उपसंहार.

या पादांत असें वर्णिलें आहे कीं, प्रत्यक्षादि प्रमाण मीमांसक मानित नाहींत, केवळ शाब्दप्रमाण मानतात. शब्द नित्य आहे. शब्दामध्येंच अर्थशक्ति आहे, आणि ही वाक्यार्थशक्तीचें कारण आहे, वाक्याला स्वतंत्र अर्थशक्ति नाहीं, आणि वेद अपौरुषेय आहेत, इतक्या गोष्टींचा विचार झाला. नैयायिकांचीं मतें या गोष्टींविषयीं अगदीं विरुद्ध आहेत. हे प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, आणि शाब्द हीं चार प्रमाणें मानतात. शब्द अनित्य, शब्दाच्या अर्थशक्तीपासून वाक्यार्थ शक्ति भिन्न असून स्वतंत्र आहे, आणि वेद पौरुषेय आहेत, हीं नैयायिकांचीं मतें आहेत. नैयायिकांच्या मतांला पूर्वपक्षकोटींत घालून पूर्वमीमांसक जैमिन्याचार्यांनीं आपलें मत स्थापिलें आहे. अशा भानगडींत पूर्वमीमांसक कां पडतात, याचें निरूपण या ठिकाणीं करणें अवश्य आहे. या विचाराच्या दोन कक्षा आहेत. एक व्यावहारिक, दुसरी शास्त्रीय. त्यांत व्यावहारिक कक्षेविषयीं अधी विचार करूं. एखादा दस्तऐवज दोन्हीहि पक्षकारांस मान्य होऊन न्यायाधिशापुढें ठेवला, मग त्याचा अर्थ काय हा विचार सुरू झाला, अशा प्रसंगीं तो दस्तऐवज कोणीं केला, व केव्हां केला या दोन्हीहि विचारांस अवकाश रहात नाहीं. या दस्तऐवजाचा अर्थ काय हा मुख्य विचार असल्यामुळें त्या दस्तऐवजाच्या कर्त्यासंबंधीं आणि कालसंबंधीं विचार इतकाच कीं तो दस्तऐवज कालपरंपरेनें कसा आला कोण जाणे. आतां, त्याचा वाक्यार्थ करतेवेळीं शब्दशब्दाची छळून परीक्षा झाली पाहिजे. नुसता एकंदर वाक्यार्थ समजल्यानें अर्थविचार सबल व निर्बाध होत नाहीं, म्हणून प्रत्येक श-

SUMMARY.

In this chapter (pâda), it is explained that the Karma-Mîmânsakas do not recognize the methods of proof, such as direct sensuous perception (pratyaksa), inference and analogy, except the proof called testimony, but hold that a word is eternal; that it has exclusively the power of conveying a sense; that this sense is the cause of a sentence having a sense; that a sentence has no independent significant power; and that the Vedas are not of human origin. All these propositions are discussed and established. The Naiyâyikas advance doctrines, in every respect, opposed to these. They recognize the four methods of proof, such as direct sensuous perception, (pratyaksa), inference (anumâna), analogy, (upamâna) and testimony, (shâbda), and hold that a word is transitory, that the significant power of a sentence is different from, and independent of, the significant power of a word, and that the Vedas are of human origin. The Karma-Mîmânsâ places the doctrines of the Nyâya-system in the category of objections, and establishes its tenets by refuting them. It is necessary to explain why the Karma-Mîmânsâ adopts such a procedure. This question has two sides :—The one practical, and the other, speculative. We will consider the practical side first. A document is recognized to be generally genuine and authentic by both parties to a lawsuit, and is produced in court. Now, the main point at issue is how is it to be interpreted ? On such an occasion, the questions as to the time when, and the person

ह्यांत अर्थशक्ति असून ती वाक्यार्थशक्तीचें कारण आहे, असा सिद्धांत अवश्य प्रसक्त झाला. दुसरें धर्मशास्त्रीय कक्षेचा विचार करतेवेळीं धर्मोपदेश अनादि आणि त्यांचा कर्ता म्हणजे परमेश्वर अनादि असें मानल्यानें उगींच गौरव होतो तर, धर्मोपदेशच अनादि मानण्याचें प्रयोजन काय ? जेव्हां परमेश्वरानें मनुष्यास धर्मोपदेश केला, तेव्हांच तो उत्पन्न झाला, म्हणून तो सादि आहे असें नाहीं. परमेश्वर सर्वज्ञ आहे म्हणून त्याच्या ठायीं धर्मोपदेशच अनादि मानावा म्हणजे गौरवदोषाचें निराकरण झालें. आणि धर्मोपदेश अनादि मानला म्हणजे त्याची अपौरुषेयता पुनः सहजच प्रसक्त झाली. आतां नैयायिकांच्या रीतीनें वेदकर्त्ता कोण हा विचार सयुक्तिक आहे, कारण कीं वेद हे भ्रामक आहेत कीं प्रमाकारक आहेत, ह्याच पूर्वपक्षापासून त्यांच्या विचारास प्रारंभ होतो. आणि प्रमाणपरीक्षेवर नैयायिक विशेष कटाक्ष ठेवतात. म्हणून कार्य कारणांवांचून होत नाहींत, हा सिद्धांत त्यांच्या विचारांत प्रधान होतो आणि यामुळें त्यांचे शब्दविषयक आणि पौरुषेयत्वविषयक सिद्धांत बदलतात. मीमांसक शाब्दप्रमाण मात्र मानतात. मीमांसकमतें जगत् सत्य आहे, आणि नैयायिकमतें प्रमाणपरीक्षितज्ञान म्हणजे प्रमात्मक ज्ञानमात्र सत्य आहे; आणि कारणसंबंधानें परमाणु नित्य असल्यामुळें परमाणुकालीन जगत् सत्य आहे. अशा प्रकारें या दोन मतांचा जितका उपन्यास झाला तितक्या पुरती त्याच्या भेदाची आम्ही उपपत्ति केली.

by whom, it is written, are immaterial, for the main point at issue, as we have stated, is—how is the document to be interpreted? That the document is handed down from generation to generation is tacitly admitted. First in interpreting it, every word is to be closely and *crucially* examined. The interpretation is not valid and perfect if the general drift only of the passages in the document is understood. Therefore, the proposition that every word is significant and contributes to the sense of a sentence in the document is essential and rational. Secondly, in considering the speculative side of the question, it is to be seen that there is the necessity of recognizing two eternal entities, if the author of a revelation and the revelation itself be accepted as eternal; but this is considered to be unnecessarily cumbrous (artha-gourava). The Mimânsakas do not discover the rational logical necessity of the eternal authorship of a revelation being accepted. When God first revealed truth, it then came into existence, it had, therefore, a beginning. This conclusion is rejected; because as God is omniscient, religious truth always abides in Him. Therefore, religious knowledge or truth is eternal. Such a conclusion removes unnecessary cumbrousness of thought. When religious truth is admitted to be eternal, its not being of human origin is a logical necessity. The Naiyâyikas, on the contrary, think it rational to enquire into the authorship of the Vedas, because they investigate the authenticity of the Vedas themselves, that is, whether they

लीं आहे. " प्रारंभीं शब्द होता आणि तो शब्द ईश्वरापाशीं होता आणि तो शब्द ईश्वर होता. प्रारंभीं तोच ईश्वरापाशीं होता." हीं वचनें सेंट्जोहानकृत ख्रिस्ती धर्मशास्त्रांत आहेत. शास्त्रीय संबंधाकडे लक्ष देऊन आणि आध्यात्मिक संबंधाकडे लक्ष देऊन ज्या पंडितांनीं जन्मभर धर्मशास्त्राचा विचार केला आहे त्यांनीं हिंदुस्थानांतील प्राचीन वाक्यार्थमीमांसकांचे मतांचा विचार करावा हें योग्य आहे. या वचनाचा एकच अर्थ नेहेमी होतो असें म्हणता येत नाहीं कारण निरनिराळे मीमांसकांनीं त्याचा निरनिराळा अर्थ केला आहे. या स्थळीं युरोपांतील प्रसिद्ध प्रसिद्ध मीमांसक संप्रदायाचीं नांवें सांगितलीं म्हणजे फार झालें. आधिधार्मिक किंवा क्यांटपंडितप्रणीत--- आध्यात्मिकैतिहासिक--- दृष्टांतदृष्ट्या वाक्यार्थव्यवस्था—पौराणिककथानकदृष्ट्या वाक्यार्थमीमांसा—प्रमाणपरीक्षामूलक वाक्यार्थव्यवस्था—उपासनादृष्ट्या वाक्यार्थव्यवस्था—या सर्व युरोपी वाक्यार्थमीमांसकांच्या संप्रदायांची परीक्षा योग्य स्थळीं करूं. आणि हिंदुस्थानांतील प्राचीन आर्य मीमांसकांचा आणि त्यांचा योग्य स्थळीं भेदाभेद दाखवूं. परंतु येथें नैयायिकाच्या वाक्यार्थमीमांसेचें दिग्दर्शन केलें पाहिजे. मनुष्याच्या आत्म्याचे धर्माधर्म हे गुण आहेत. त्यांचा आणि आत्म्याचा समवाय म्हणजे नित्य संबंध आहे. या स्थळीं कणादाच्या दोन सूत्रांचा विचार केला म्हणजे पुरे. कणाद हा मूळ नैयायिक. (१.१,३.) सूत्रां-

inculcate error or truth. They start their discussion from this enquiry, and direct attention to the examination of proof and its validity. They, therefore, believe that there can be no effect without a cause. Their doctrines on the subject of the Vedas as proceeding from a *person* and of the significant power of a word as contradistinguished from that of a sentence are opposed to the doctrines of the Mimânsakas who recognize only one method of proof—testimony, and hold that the material word as a whole is real. The Naiyâyikas distinguish truth from error as established by their examination of its nature and properties. They hold that the world as consisting of atoms is real. We have thus sought to point out the *rationale* of the two systems so far as they are examined in this chapter. The verses—"In the beginning was the Word, and the Word was with God, and the Word was God. The same was in the beginning with God," occur in the Gospel according to St. John. As the eternity of the Word is here spoken of, the doctrines of the ancient Indian Mimânsakas, deserve attention from those who devote their lives to the study of theology in its philosophical bearings, and scientific aspects. It can not be said that these verses have always been interpreted in the same way, for different schools of exegetes have interpreted them in different ways. We can only mention here the different schools of exegetics as they are known in Europe :— The moral or Kantian—The Psychologico—Historical—The Accomodation—System—The My-

त त्यानें वेदाचें स्वरूप कथन केलें आहे:- वेद प्रमाण आहे, कारण त्यांत धर्माचें प्रतिपादन आहे. (६.२,१.) सूत्रांत असें वर्णिलें आहे कीं जेव्हां दोन प्रयोजनें अढळतात तेव्हां प्रथम दृष्ट प्रयोजन स्वीकारावें. तें नसतां धर्माधर्माचें अवलंबन करावें. आणि धर्म प्रतिपादनानुरूप वेद प्रमाण आहे. याप्रमाणें कणाद आणि क्यांट यांचे मतामध्यें साद्दश्य आहे, " नीतिसुसंस्था हाच काय तो सर्व प्रमाणपरीक्षित धर्माचा मुख्य उद्देश आहे. म्हणून सर्व विधीच्या अर्थविचाराचें मुख बीज प्रमाणपरीक्षेमध्यें आहे. " कर्माच्या योगानें मोक्ष होतो असें एक मत आहे. आणि त्यावर दुसरें असें मत आहे कीं श्रद्धेच्या योगानें मोक्ष होतो. ह्या युरोपी मताचा विचार केला म्हणजे जैमिनीचें काय म्हणणें आहे तें लक्षांत येईल, कारण वेदार्थ करण्यांत जैमिनीचा मुख्य कटाक्ष कर्म मार्गावर आहे; कणादाचा मुख्य कटाक्ष ज्ञानावर आहे. एकंदर युरोपांत पुष्कळ लोकांचा कटाक्ष कर्ममार्गावर आहे. क्यांटाचा कटाक्ष ज्ञानावर आहे.

thic—The Ritualistic—The Pietist. These will be examined and compared with the Indian schools of exegetics as occasion arises. But in this place, we must indicate the exegetical methods of the Naiyâyikas who start from the notions of right and wrong naturally and permanently implanted in the soul of man. The notions of *right* and *wrong* are called Dharma and Adharma. At present, reference to two sûtras of Kanâda is sufficient. The sûtra (I. 1, 3.) explains the nature of the Veda. Because it enjoins what is right, therefore, it is acceptible. The sûtra (VI, 2, 1.) lays down that " when two explanations are offered:—the one based on human experience(d*rista*) and the other, on the notions of right and wrong (ad*rista*), then when the first is wanting, the last is to be had recourse to." And the acceptibility of the Veda depends on its inculcating what is right (Dharma). The school of Kanâda, therefore, starts from the same premises as that of Emmauel Kant who lays down that "the moral amendment of man-kind is the proper object of the entire religion of reason ; and therefore, the *religion* of *reason* contains the supreme principle of all scriptural exegesis." When the doctrine of justification by *works* as distinguished from justification by *faith* or *ritualism* as distinguished from *Kantism* is considered, the teachings of Jaimini will be apprehended, because in interpreting the Vedas, Jaimini attaches special importance to *works*. Kanâda, on the contrary, has specially in view the doctrine of right reason.

सूत्राणि.

(अर्थवादाधिकरणारंभः)

आम्नायस्यक्रियार्थत्वादानर्थक्यमतदर्थानांतस्मादनित्य मुच्यते ॥ १ ॥ (पू० १)

पदानि । आम्नायस्य । क्रिया-अर्थत्वात् । आनर्थक्यम् । अ-तत्-अर्थानाम् । तस्मात् । अ-नित्यम् । उच्यते ॥

पदार्थः । आम्नायस्य=वेदस्य । क्रिया अर्थो यस्य स क्रियार्थः तस्य भावः तत्त्वं तस्मात्=क्रियार्थत्वात्=क्रियाप्रयोजनत्वात् । अनर्थकस्य भावः=आनर्थक्यम्=निष्प्रयोजनत्वम् । अतदर्थानाम्=तद्=सा=क्रिया अर्थो येषां ते तदर्थाः । न तदर्थाः=अतदर्थाः=तेषां अतदर्थानां आम्नायानाम् ॥ तस्मात्=तेनहेतुना । अनित्यम्=(स्पष्टम्) उच्यते=(पूर्वपक्षकारेणेति स्पष्टम्)

वाक्यार्थः । । वेदानां क्रियाप्रयोजनत्वम् ॥ तस्माद् येषां क्रियाप्रयोजनत्वं नास्ति तेषां निष्प्रयोजनत्वम् ॥ तस्माद् वेदार्थो न नित्यः । इति पूर्वपक्षकारोक्तिः ॥

भावार्थः । वेदप्रवृत्तेः किं बीजम् । यज्ञादिक्रियाद्योतनान् नान्यत् । अतो यदा क्रिया न द्योत्यते तदा वेदैः किंचित्कारणं नास्ति । इति पूर्वपक्षकारेणोच्यते ॥

॥ अनुसंधेयानि वेदवाक्यानि ॥

सोऽरोदीद्यदरोदीत्तद्रुद्रस्यरुद्रत्वम् । तै. सं. (१.५,१.) ॥ स (प्रजापतिः) आत्मनोवपामुदखिदत् । तै. सं. (२.१,१.) ॥ देवावैदेवयजनमध्य वसायदिशोनप्रजानन् । तै. सं. (६.१.५.) ॥

अर्थवादविषयविचार.

१. कर्माकरितां वेद (आहेत.) ज्यामध्यें कर्मप्रतिपादन नाहीं, तो (वेदभाग) निरर्थक; म्हणून (त्याला) आनित्य म्हणतात. (पू० १.)

१. "आम्नाय, क्रियार्थत्व, आनर्थक्य, आणि अतदर्थ" इतकीं पदें मूळ संस्कृत सूत्रांत आहेत. या द्वितीय पादांत जो वादविवाद केला आहे, त्यांत या पदांचा उपयोग वारंवार होतो. आम्नायशब्दाचा आतां अर्थ वेद असा आहे, परंतु ब्रम्हवाद्यांच्या लेखांत म्हणजे ब्राम्हणादि ग्रंथांत ऋक्संहिता, यजुःसंहिता, सामसंहिता, व अथर्वसंहिता यांसच वेद अशी संज्ञा दिलेली अढळते. आचार्यांच्या लेखांत क्वचित् आम्नाय ही संज्ञा अढळते. गुरुपरम्परेनें ज्याचा अभ्यास करतात तें-असा आम्नाय पदाचा अर्थ आहे. असा गुरुपरम्परेनें वेदाचा अभ्यास पाणिनीचे वेळीं फार होत असे, व पतञ्जलीनें सर्व अध्ययनाचें कारण नीट यज्ञकर्मे करतां यावींत, असें वर्णिलें आहे. तोच आशय येथें सूत्रांत असून आम्नायाला क्रियार्थत्व आहे म्हणजे कर्मप्रतिपादनाकरितां वेद आहेत असें वर्णन केलें आहे. आनर्थक्य हा धर्म अनर्थक जे विषय त्यांवर राहतो, आनर्थक्य म्हणजे निष्प्रयोजनत्व, अतदर्थ म्हणजे नाहीं आहे तो अर्थ ज्यांचा. तो अर्थ म्हणजे क्रियार्थ. हें पूर्वपक्षसूत्र आहे. यामध्यें असें प्रतिपादन केलें आहे कीं, ज्यांत कर्मप्रतिपादन नाहीं असे वेदाचे पुष्कळ भाग आहेत. आणि वेदाचा मुख्य वि-

THE SUBJECT OF SUBORDINATE SENTENCES.

1. The Vedas (exist) for explaining (sacrificial) works. That (part of the Veda) which does not explain works is useless. Therefore, (the Veda) is called transitory. (1. Opponent's statement.)

1. In the original Sanskṛita sûtra, the terms :—*Âmnâya, Kriyârthatva, Ânarthakya*, and *Atadartha* are used. In this second chapter (pâda), these terms are frequently used in all discussions. It is now that the term *Âmnâya* means the Veda; but in the works called Brâhmaṇas—the writings of Brahma-vâdinas,—the Sanhitâs called *Ṛik*, Yajus, Sâma, and Atharva are sometimes called the Veda. In the writings of the Âchâryas, the term *Âmnâya* is met with though rarely. The term *Âmnâya* means that which is regularly studied from generation to generation from teachers. The Veda was learnt in this way at the time of Pâṇini; and Patanjali insists on the proper performance of sacrificial works as the object of the study of the Veda. The text of the sûtra states the same view and lays down that the *Âmnâya* is for the purpose of sacrificial works. *Kriyârthatva* literally means the general quality of the purpose of a work. *Ânarthakya* is a quality of that which is *Anarthaka*, which means that which is to no purpose. *Atadartha* is that which has not *that purpose* (tadartha). That purpose is the purpose of works.

सूत्राणि.

शास्त्रदृष्टविरोधाच्च ॥ २ ॥ (पू० २)

पदानि । (आनर्थक्यं) शास्त्र-दृष्ट-विरोधात् । च ।

पदार्थः । शास्त्रस्य-दृष्टस्य च= शास्त्रदृष्टयोः विरोधात् ॥ शास्त्रम्=चोदनात्मको विधिः । दृष्टम्=प्रत्यक्षम् । विरोधात्=बाधात् । चकारेण पूर्वसूत्रस्थहेतोः समुच्चयः ॥

वाक्यार्थः । वेदेषु शास्त्रस्य प्रत्यक्षस्य च बाधो वर्त्तते । अतो वेदानामानर्थक्यम् ॥

भावार्थः । कानिचिद् वाक्यानि वेदेषु दृश्यन्ते । तेषां कल्पविधिविरोधः स्पष्टः । पुनः । अन्यानि कानिचिद् वाक्यानि विद्यन्ते । तेषां प्रत्यक्षविरोधः स्पष्टः । अतो वेदा अनर्थका इति पूर्वपक्षः ॥

अनुसन्धेयानि वेदवाक्यानि ॥

स्तेनं मनः ॥ अनृतवादिनी वाक् ॥ तस्माद् धूम एवाग्नेर्दिवा दृश्यो (नार्चिः) तस्मादग्निर्दूरान्नक्तं दृश्यो (न धूमः) । (२।५।२) तै० ब्रा० ॥ अस्माल्लोकादुत्क्रम्याग्निरादित्यं गतः । रात्रावादित्यः++तं ॥ नचैतद् विद्मो वयं ब्राह्मणा वास्मः अब्राह्मणा*वा ॥ को हि तदवेद यद्यमुष्मिन् लोकेऽस्ति वा न वेति । ६.१,१. तै. सं. ॥

*॥ एतेषु वेदवाक्येषु यान्यस्वरितानि तानि कुत्र वर्तन्त इति प्रेक्षावद्भिर्द्रष्टव्यं । वयं तुनेदं जानीमः ॥

षय तर कर्मप्रतिपादन करणें. म्हणून ज्यांत कर्मप्रतिपादन नाहीं तो वेदभाग निरुपयोगी आहे. यावरूनच कोणी म्हणतात कीं, वेद अनित्य आहेत, असा पूर्वपक्षाचा आशय आहे. या आशयाचें दृढ प्रतिपादन करण्याकरितां पूर्वपक्षकार पुढील सूत्रांत कारणें देतो.

वेदवाक्याचें अनुसन्धान करावें म्हणून

This is a statement of an opponent. To sum up, it asserts that different parts of the Vedas do not explain any sacrificial work, and as the essential function of the Vedas is to explain and establish sacrificial works, that part of the Veda which fails to do this is useless and to no purpose. The statement that some assert that

२. आणि धर्मानुशासन आणि प्रत्यक्ष ह्यांचा विरोध आहे म्हणून (वेद निरर्थक.) (पू० २)

2. (The Vedas are to no purpose) because of the contradiction of religious rules and of sensuous perception. (II. Statement of an opponent.)

संस्कृतांत सांगितलें आहे, व तेथें वेदवाक्यें दिलीं आहेत. त्यांचें भाषान्तर आम्ही येथें देतोः—१ "तो रडला, जें रडला तें रुद्राचें रुद्रपण." या स्थळीं रुद्र या शब्दांत रुद् म्हणजे रडणें हा धातु आहे. २. "प्रजापतीनें आपली वपा काढली." ३. "देव यज्ञकालाचा निश्चय करून दिशा न जाणते झाले." या ठिकाणीं पूर्वपक्षकार असें म्हणतात कीं या वेदवाक्यांत कांहीं तरी कर्मप्रतिपादन असलें पाहिजे, रुद्र रडला म्हणून दुसऱ्यानें रडावें. प्रजापतीनें वपा काढली, म्हणून दुसऱ्यानें वपा काढावी. देवांना यज्ञसमयीं दिशा समजल्या नाहींत, म्हणून दुसऱ्यालाहि दिशा समजूं नयेत. हीं असलीं कर्में घडणें अशक्य आहे. कां मनास येईल तेव्हां कोणाला रडतां येतें? आपलीच वपा काढून यज्ञ कसा करायाचा? यज्ञसमयीं कोणीहि दिशा चुकणार नाहीं. यावरून वेदवाक्यांत कांहीं अर्थ नाहीं. म्हणून त्यांच्या अंगीं नित्यताहि नाहीं. आतां कोणीं असें म्हणेल कीं, अशीं कांहीं वाक्यें घेऊन होणार काय? हा एकदेशी विचार होईल. परन्तु असें नाहीं. कारण एकदेशी एकदेशी मिळून पूर्ण विचार होतो, आणि निरनिराळ्या वाक्यांचा सम्बन्ध असून समग्र वाक्यार्थ ठरतो. त्याकरितां वेदवाक्यांत अर्थ नाहीं हेंच खरें आहे. आतां कोणीं असें म्हणेल कीं, अध्याहार, विपरिणाम, व्यवहितकल्पना, व्यवधारणकल्पना, गुणकल्पना, अशा वाक्यार्थ करण्याच्या युक्तींची योजना

---

the Vedas are transitory is added by way of producing an argument from testimony. This is the drift of this sûtra. To establish the statement made in this sûtra, the opponent adduces additional proof in the following sûtras. In the Sanskrita portion of our work, we have asked our readers to apply some Vaidika texts we have quoted. The Vaidika texts are translated here. "He wept, what he wept, that is the quality of Rudra (Rudratva)." The word Rudra is derived in this place from the root *Rud* to weep. "The god Prajâpati took out his own omentum." The third Vaidika text is:—"The gods, having settled the time of a sacrifice, could not know the directions." These texts occur in the Taittirîya Sanhitâ (I. 5, 1.), (II. 1, 1.)and (VI. 1, 5.) respectively. In this place, the opponent observes that as these Vaidika texts must explain some sacrificial works, sacrificers should weep because the god Rudra wept. They should take out their omentum because the god Prajâpati did so: They should fail to know the directions because the gods failed. It is impossible to perform such works. One can not weep at will: none can sacrifice with his own omentum: none can fail to know the directions at the time of a sacrifice. The opponent sums up these statements with

करून वाक्यार्थ बसवूं. कसा पाहिजे तसा बसवावा, पर्यवसान आमच्या म्हणण्यावर येतें. मराठी वाचकांस वरील वादविवादांत जीं संस्कृत पदें योजिलीं आहेत त्यांचा अर्थ नीट समजावा म्हणून थोडें त्यांचे अर्थांचें विवेचन करतों. अध्याहार म्हणजे विवक्षित शब्द घालून वाक्यार्थ पुरा करणें; विपरिणाम म्हणजे मूळ विभक्त्यादिकांत अर्थसंगत्यनुरोधानें कांहीं फिरवाफिरव; व्यवहितकल्पना म्हणजे व्यवधानविशिष्टकल्पना, म्हणजे दूरान्वय आहे अशी कल्पना करणें, आणि गूढ भासणाऱ्या अर्थाचा उल्लेख करणें, व्यवधारणकल्पना म्हणजे मूळ अर्थाच्या संकोचाविषयीं कल्पना, गुणकल्पना म्हणजे ज्या अर्थाची व्यवस्था करावयाची तो मुख्य न समजतां गौण समजावयाचा.

२. पूर्वपक्षकार वेदवाक्यांत अर्थ नाहीं असें स्थापन करण्या करितां दुसरा हेतु देतो. "धर्मानुशासनाचा विरोध" अशा अर्थाचीं पदें मूळ सूत्रांत आहेत, त्यांचा अर्थ हा कीं जें कर्म वेदांत सांगितलीं आहेत त्यांचा विरोध वेदवाक्यांशीं अढळतो, म्हणजे अमुक अमुक कर्में करावीं असें वेदांत सांगितलें आहे, अशा कर्मप्रतिपादनाच्या विरुद्ध कांहीं वेदवाक्यांतून अर्थ निघतो. संस्कृत सूत्राखालीं जीं वेदवाक्यें दिलीं आहेत तीं पहावीं. त्यांच्या अर्थांचें येथें विवेचन केलें आहे, इकडे थोडें लक्ष द्यावें. "मन चोर." पुनः, "जिव्हा असत्यबोलणारी" हीं वाक्यें जमा धरून पूर्वपक्षकार विचारतो कीं ज्या अर्थी घडलेल्या अर्थाचें या वाक्यांत वर्णन केलें आहे, त्या अर्थी आतां कोणत्या कर्मांमध्यें त्यांची योजना होईल? पुनः, विपरिणामकल्पना करून आतां चोरी करावी, असत्य बोलावें, असा अर्थ बसविल्यास भलताच अर्थ निष्पन्न होतो; म्हणून अशा वेदवाक्यांत तात्पर्य नाहीं असें म्हणणें प्राप्त होतें. सूत्रांत

the remark that the Vaidika texts explain nonsense. Therefore, they are not eternal. If it be said that these isolated texts do not prove any thing, and that this is only a partial view of the texts, it is to be considered that this is not the case, for statements of parts when put together, constitute the statement of a whole. These different statements are connected with one another. Hence the statement that the Vaidika texts propound nonsense is not rebutted. If it be said that the theory of ellipsis, the theory of adaptation as based on alterations, the theory of adjustment, the theory of restriction, and the theory of subordination are the different contrivances for determining the sense of a sentence, and that the employment of these contrivances helps the interpretation of Vaidika texts; then the opponent states that the end is the same as he has maintained, whatever methods of interpretation are employed. We offer a little explanation of the terms which are employed in the statement of exegetical contrivances. *Ellipsis* supplies words in order to complete the sense of a sentence. *Adaptation* undertakes to change the original grammatical forms and cases, to secure logical sequence of thought. *The theory of adjustment* recognizes remote grammatical connection and discovers hidden relationship when it is not easily seen. *The theory of restriction* seeks to narrow the application of the original statement, and to limit its scope. *The theory of subordination* reduces the importance of a text and determines it to be subordinate to another text, consider-

"प्रत्यक्ष विरोध" अशीं पदें आहेत. त्यांचा विचार करतांना पुढील वेदवाक्यार्थाची योजना करावी:—"म्हणून अग्नीचा धूमच दिवसां दिसला, (तेज नाहीं.) म्हणून अग्निच दुरून रात्रीं दिसला" धूम नाहीं. पुनः, "अग्नि या लोकापासून निघून सूर्यलोकास गेला, रात्रीं सूर्य + + त्याला." पुनः "आम्ही ब्राम्हण आहों कीं नाहीं हेंहि आम्हास विदित नाहीं." पुनः "असें तरी कोण जाणतो कीं तें या लोकीं आहे किंवा नाहीं." अशीं संशयरूप वाक्यें, आणि ज्यांमध्यें प्रत्यक्षविरुद्ध अर्थ असतो अशीं वाक्यें वेदांत अडळतात, त्यापासून कांहीं अर्थ निष्पन्न होत नाहीं. म्हणून वेद अनर्थक आहेत असा पूर्वपक्षकाराचा आशय.

ed to be the principal and main subject of discussion.

2. The opponent adduces his second argument in this sûtra to prove that Vaidika texts are to no purpose. "The contradiction of religious rules" is the translation of *Shâstra-virodha* in the original Sanskrita sûtra. The word *Shâstra* means "that which enjoins." It is indiscriminately applied to all writings of authority from the Vedas to any that contains ordinary religious rules. *Virodha* simply means contradiction. The opponent means by his statement that the texts laying down religious rules or duties as commonly recognized conflict with certain Vaidika texts. The Vaidika texts which illustrate this statement are quoted in the Sanskrita portion on the other side; and they deserve attention. They are translated here. "The mind is a thief." "The tongue is an utterer of untruth." The opponent refers to these texts, and asks "as these texts refer to the past time, what sacrificial work do they prescribe?" If by means of the exegetical contrivance called adaptation and explained in the preceeding footnote, the texts be interpreted as referring to the present time, into sanctioning theft and untruthfulness, evil consequences would follow. The conclusion that such Vaidika texts are to no purpose is inevitable. Again, the terms—the contradiction of sensuous perception (Pratyaksa-Virodha)—occur in the sûtra. In considering them the following Vaidika texts may be referred to. "Therefore, the smoke of fire was seen by day (and not light), therefore, a distant

सूत्राणि.

तथाफलाभावात् ॥ ३ ॥ (पू० ३)

पदानि । (आम्नायस्यानर्थक्यम्) तथा-फल-अभावात् ॥

पदार्थः । तथाफलम्=तादृशफलम् (सुप्सुपसमासः यथा तथारूपिन् तथामुखः) अभावात्=(स्पष्टम्)

वाक्यार्थः । तादृशफलाभावाद् वेदस्यानर्थक्यम् ॥ यथा क्रियाफलानि वेदनिर्दिष्टानि तथा न प्राप्नुवन्ति । अतो वेदोऽनर्थकः ॥

अनुसन्धेयानि वेदवाक्यानि ॥

शोभते अस्य मुखं य एवं वेद ॥ आ अस्य प्रजायां वाजी जायते य एवं वेद ॥

---

fire was seen by night (and not smoke)." See Taittiríya Brâhmaṇa (II. 1, 2.) Again, "fire, leaving this world went to the solar region. At night, the sun + + him." Again, "we do not know whether we are Brâhmaṇas or not." Again, "who knows whether it exists in this world or not." See Taittiríya Sanhitâ (VI. 1, 1.) Such doubtful texts as well as texts which contradict the human senses are met with in the Vedas; and they can mean nothing. Therefore, the Vedas are to no purpose. This is the gist of the sûtra.

३. तसें फळ होत नाहीं म्हणून (वेद अनर्थक.) (पू०३.)

३. मूळ सूत्रांत "तथाफल" आणि "अभाव" हीं पदें आहेत. त्यांत तथाफल म्हणजे तसें फल असा अर्थ केला आहे. जसें फल वेदांत सांगितलें आहे तसें फल होत नाहीं असा सूत्रार्थ आहे. हा उदाहरणावरून स्पष्ट समजेल. "जो असें जाणतो, त्याचें मुख शोभतें." पुनः "जो असें जाणतो त्याच्या वंशजांत वाजी उत्पन्न होतो." वेदांत वाजी या शब्दाचा अर्थ बलवान्, धनवान्, असा होतो तो घ्यावा, अश्व हा अर्थ घेऊं नये असें आम्हांस वाटतें. आतां, या वाक्यांत भूतार्थाचें वर्णन केलें असा अर्थ बसविला असतां आज हीं वाक्यें निरर्थक आहेत असें निष्पन्न होतें. पुनः वेदाध्ययनाचें फल हें आहे असें म्हटल्यास हें मिथ्या प्रतिपादन आहे हें स्पष्टच आहे. पुढें फल होईल असें म्हटलें तर, यास प्रमाण काय? या वाक्यांत विधि म्हणावा तर विधान मुळींच नाहीं. अशा कारणामुळें या वाक्यांचें फल दिसत नाहीं, म्हणून वेदवाक्यें अनर्थक आहेत, असा पूर्वपक्षकराचा आशय आहे.

3. (The Vedas are to no purpose) from the absence of the result mentioned. (III. Statement of the opponent.)

3. In the original Sanskrita sûtra, the terms *Tathâphala* and *Abhâva* are used. The term *Abhâva* is easily understood: the term *Tathâphala* is rendered into *that fruit*. The meaning of the sûtra is that the result of a sacrificial work as described in the Vedas, does not follow. The sûtra will be understood easily by an example. "His face shines who knows this" is a Vaidika text. Again, "he who knows this, sees a strong man among his descendants." The term Vâjî is used in the text. In the Vedas, it means a strong, or wealthy man and not a horse. If it be said that the past time is described in the text, then it follows that these texts are to no purpose to-day. Again, if it be said that the study of the Vedas produces the fruit mentioned in the text, then it is plain that the Vaidika texts are false, for every one knows that the study of the Vedas does not produce the fruit. Again, where is the proof to state that the fruit will be secured in future? These texts do not prescribe any thing. For these reasons, the texts are simply useless. The opponent, therefore, asserts generally that Vaidika texts are to no purpose.

सूत्राणि.

अन्यानर्थक्यात् ॥ ४ ॥ (पू० ४.)

पदानि । (आम्नायस्यानर्थक्यम्) अन्य-आनर्थक्यात् ॥

पदार्थः । स्पष्टः ॥

वाक्यार्थः । अन्येषां कर्मणामानर्थक्यम् । अतो वेदस्यानर्थक्यम् ॥

भावार्थः । अन्येषां नाम प्रकृतप्रतिपादितेतरेषां कर्मणां निष्प्रयोजनत्वापत्तिः । अत्रोदाहरणम् । पूर्णाहुत्या सर्वान् कामानवाप्नोति । इत्यत्रपूर्णाहुत्या सर्वकामप्राप्तिश्चेदन्येषां कर्मणां निष्प्रयोजनत्वम् ॥

अनुसंधेयानि वेदवाक्यानि ॥

सर्वं वै पूर्णाहुतिः । सर्वमवाप्नोति ॥ तै. ब्रा. (३.८,१०.) ॥

अभागिप्रतिषेधाच्च ॥ ५ ॥ (पू० ५)

पदानि । (आम्नायस्यानर्थक्यं) अभागिनः प्रतिषेधात्=अभागिप्रतिषेधात् । च ॥

पदार्थः । अभागिनः=नास्ति भागो नाम अंशो नाम सम्बन्धो यस्य तत्=अभागि । तस्य प्रतिषेधात् ॥

वाक्यार्थः । सामान्येन यस्य प्रतिषेधःकृतःतंस्यान्तःपातिनोऽपि प्रतिषेधःप्राप्नोति । यदान्तःपाति त्वप्रतिषेधनीयं तदा तस्य प्रतिषेधेऽप्रतिषेधनीयस्य प्रतिषेधः । इत्यनिष्टसिद्धिप्रसङ्गः ॥

भावार्थः । स्पष्टः ॥

अनुसंधेयानि वेदवाक्यानि ॥

ब्रह्मवादिनोवदंति नर्तथिव्यांनांतरिक्षेनदिव्यग्निश्चेतव्यइति ॥ तै. सं. (५.२,७.) ॥

४. दुसऱ्याच्या (दुसऱ्या कर्माच्या) निष्प्रयोजनामुळें,(वेद अनर्थक आहेत.) (पू० ४.)

५. अप्रतिषेधनीय अर्थाचा प्रतिषेध आहे म्हणून (वेद अनर्थक आहेत.) (पू० ५.)

4. (The Vedas are to no purpose) because of the uselessness of other(works) (IV. Statement of the opponent.)

5. (The Vedas are to no purpose) because of the prohibition of that which can never be the subject of any prohibition. (V. Statement of the opponent.)

४. मूळ संस्कृत सूत्रांत अन्य-आनर्थक्यावरून अशा अर्थाचीं पदें आहेत. अन्य म्हणजे अन्यकर्माच्या आनर्थक्यावरून म्हणजे निष्प्रयोजनामुळें असा आम्ही मराठी सूत्रांत अर्थ केला आहे. आणि हें कारण पूर्वपक्षकार देऊन सर्व वेद निरर्थक आहेत असें सिद्ध करतो. पूर्वपक्षकाराचें म्हणणें उदाहरणावरून स्पष्ट समजेल. तै० ब्रा० (३.८,१०.) या ठिकाणीं पूर्णाहुतीचें वर्णन केलें आहे. "उत्तम पूर्णाहुतीचा होम करतो, पण सर्व (काय तें) पूर्णाहुति (च), (त्याला) सर्व प्राप्त होतें." हा मूळ ब्राह्मणमंत्राचा अर्थ आहे. तै० सं० (५.३,१२.) या ठिकाणीं "(तो) मृत्यूपासून सुटतो, ब्रह्महत्येपासून सुटतो, जो अश्वमेधरूप याग करतो, आणि अरे! जो त्याला जाणतो." असा या संहितेंतील मंत्राचा अर्थ आहे. या वरील मंत्रापासून असें निष्पन्न होतें कीं, जो पूर्णाहुतिरूप याग करतो, त्याच्या सर्व इच्छा पूर्ण होतात. तर मग एक पूर्णाहुतियाग केला म्हणजे पुरे, मग बाकीचीं कर्में करण्याची गरज नाहीं. असा कटाक्ष ठेवून पूर्वपक्षकारानें दोष दिला आहे. एक पूर्णाहुतियागानें जर वेदाचे म्हणण्याप्रमाणें सर्व कार्य होतें, तर दुसरे

4. In the original Sanskrita sûtra, the phrase *Anyânarthakyât* is used. It literally means "from the uselessness of others." *Anya* refers to other sacrificial works. *Ânarthakya* is, of course, uselessness. The opponent seeks to prove from this statement the uselessness of the Vedas. The statement of the opponent will be understood by the following illustration. In the Taittirîya Brâhmana (III. 8, 10.) a complete oblation is described. "I offer into the fire the last complete oblation; but all is the complete oblation; (he) gets all." This is the close translation of the text. In the Taittirîya Sanhitâ (V. 3, 12.) the following occurs:—(He) who sacrifices a horse-sacrifice, gets over death, gets over the murder of a Brâhmana and oh, who knows it." This is the close translation of the above text. The conclusion from these texts is that he who offers a complete oblation has all his desires gratified. Then one sacrifice called "complete oblation" is quite sufficient: There is no need of any other sacrifice. The last sentence explains

सूत्राणि.

अनित्यसंयोगात् ॥ ६ ॥ (पू० ६)

पदानि । (आम्नायस्यानर्थक्यं) अनित्य–संयोगात् ॥

(१·१,२८.) सूत्रेण पदार्थवाक्यार्थौ स्पष्टौ ॥

भावार्थः । अनित्यानां वस्तूनां सम्बन्धो वेदवाक्येषु दृश्यते । तत्सम्बन्धाद् वेदवाक्यान्यप्यनित्यान्यनर्थकानिचेति पूर्वपक्षकारस्य प्रतिपादनम् ॥

यागांची अवश्यकता काय ? ते नकोत. म्हणून वेद अनर्थक आहेत. कारण सहज एका यागानें इष्टसिद्धि होत असतां असा कोण शहाणा आहे, कीं जो जन्मभर यज्ञयागांचाच खटाटोप करीत बसेल ?

५. कर्मनिषेध करणारीं जीं वेदांत वाक्यें अढळतात, त्या वाक्यांवर कटाक्ष ठेऊन हा पूर्वपक्ष काढला आहे. उदाहरणावरून हें स्पष्ट होईल. तै. सं. (५.२,७.) याठिकाणीं असा मन्त्र आहे:– "ब्रम्हवादी म्हणतात पृथ्वीवर, अन्तरिक्षीं (म्हणजे वायुमण्डळीं,) आणि आकाशीं अग्निचयन करूं नये." आतां हें स्पष्टच आहे कीं अन्तरिक्षीं आणि आकाशीं अग्निचयन होणार नाहीं. पृथ्वीवर अग्निचयन करूंनये इतकें म्हटलें असतां पूर्णपणें अग्निचयनाचा निषेध होतो, मग अन्तरिक्षीं करूं नये, आणि आकाशीं करूं नये, अशा अशक्य, व निरर्थक प्रतिपादनांत कांहीं अर्थ नाहीं, असें दाखवून पूर्वपक्षकार पूर्वपक्ष करतो. आतां सूत्रांतील पदांचा अर्थ:–मूळसूत्रांत अभागि आणि प्रतिषेध अशीं दोन पदें आहेत अभागि म्हणजे नाहीं आहे अंश ज्याचा तें, म्हणजे निषेधाशीं सम्बन्ध नाहीं ज्याचा तें. प्रतिषेध म्हणजे निषेध. निषेधांत सांपडण्यास अशक्य अशाचा निषेध वेदांत अढळतो, म्हणून वेद अनर्थक आहे, हा पूर्वपक्षाचा आशय आहे.

the phrase—"the uselessness of other works" in the sûtra under consideration. If according to the Vedas, every desire is fulfilled, and every purpose, answered by means of one sacrifice named complete oblation, then there is no room for other sacrifices. They are simply not necessary. What sensible man is there that would be sacrificing all his life if one sacrifice be sufficient ? None is the inevitable reply. Therefore, the Vedas are to no purpose.

5. The statement of the opponent is based on the Vaidika texts which prohibit certain actions. An example will elucidate the sûtra. In the Taittiríya Sanhitâ (V. 2, 7.) the following occurs :—"The Brahma-vâdinas say that altars of bricks should not be built for certain sacrifices (called chayana) on the earth, in the firmament, nor in the heavens." It is plain that it is not possible to build altars in the firmament or in the heavens. To prohibit the construction of altars of bricks for fire (agnichayana), it is simply necessary to speak of the earth. There is no sense in speaking of such impossibilities as the construction of brick-altars in the firmament or in the heavens. The last named altars can

६. नाशवन्त अर्थ वेदांत अढळतात, (म्हणून वेद अनर्थक आहेत.) (पू० ६.)

६. पूर्वी या मीमांसेच्या (१.१,२८.) यासूत्री याच पूर्वपक्षाचा दुसऱ्या सम्बन्धानें विचार झाला आहे. त्याठिकाणी टिपेमध्यें नाशवन्त अर्थ ते कोणते, यांचें वर्णन केलें आहे. मूळ संस्कृत सूत्रांत "अनित्य" आणि "संयोग" अशीं दोन पदें आहेत. त्यांत पुष्कळ अंशीं अनित्यपदाचा अर्थ स्पष्ट आहे. अनित्याचा अर्थ आम्ही नाशवन्त असा केला आहे. "संयोग" याचा अर्थ प्राप्ति म्हणजे अढळणें असा केला आहे. परन्तु अर्वाचीन ग्रन्थांत संयोग पदाचा "सम्बन्ध विशेष" असा अर्थ होतो. उदाहरणावरून सूत्रार्थ स्पष्ट होईल. तै० सं० (७.१,१०.) या ठिकाणी "प्रावाहणि बबर (प्रवाहण याचा पुत्र बबर) इच्छा करता झाला." असा मंत्र आहे. या स्थळीं बबर प्रावाहणि याचें वर्णन आहे. पण बबर प्रावाहणि नश्वर आहे, कारण कीं तो मनुष्य आहे. कशावरून म्हणाल तर प्रावाहणि म्हणजे प्रवाहणाचा पुत्र असें त्याचें वर्णन आहे. प्रावाहणीसारखे नाशवंत अर्थ वेदांत अढळतात, म्हणून वेद अनित्य एवढेंच नव्हे, तर अनर्थक व अप्रमाण आहेत. असा पूर्वपक्षाचा आशय आहे.

6. (The Vedas are to no purpose) because transitory things occur (in the Vedas). (VI. Statement of the opponent.)

never be the subject of any prohibition. The opponent refers to such absurd rules when he takes exception to Vaidika texts. We will consider now the terms used in the original Sanskrita sûtra. They are *Abhâgi* and *Pratisedha*. *Abhâgi* means "that which does not partake" of a prohibition, and *Pratisedha* means a prohibition. Such acts as can never be prohibited, or as are incapable of being prohibited, are found to be prohibited in the Vedas. Therefore, the Vedas are to no purpose. This is the drift of the opponent's statement in this sûtra.

6 This statement of the opponent has been considered in a particular relation in the sûtra (I. 1, 28.) The question what things are transitory is fully answered in the foot-note to that sûtra. In the original Sanskrita sûtra the terms *Anitya* and *Sanyoga* are used. The sense of the first term is sufficiently plain: it means that which decays, that is, that which is transitory. The second term literally means conjunction. It is equivalent to inseparable association. We have translated *Sanyoga* by *occurring*; but in modern works on philosophy it means a particular relation. An example will explain the sûtra thoroughly. In the Taittiriya Sanhitâ (VII. 1, 10.) the following occurs:—"Babara Prâvâhani, (Babara, son of Pravâhana) wished." In this text Babara, son of Pravâhana is men-

सूत्राणि.

विधिनात्वेकवाक्यत्वात् स्तुत्यर्थेन विधीनां स्युः ॥ ७ ॥

(सिद्धान्तसूत्रम्)

पदानि । विधिना, तु, एकवाक्यत्वात्, स्तुति-अर्थेन, विधीनाम्, स्युः ॥

पदार्थः । विधिना=कर्मविधायकवाक्येन सह । तुपदम्=(पूर्वपक्षाणां निरासाय) । एकवाक्यत्वात्=(स्पष्टम्) । स्तुत्यर्थेन=स्तुत्याकारकेणार्थेन । विधीनाम्=अङ्गिनामङ्गानि । स्युः=(स्पष्टम्)॥

वाक्यार्थः । न । स्तावकवाक्यानि विधिनासहैकवाक्यत्वाद् विधिरूपाङ्गिनामङ्गानि भवेयुः ॥

भावार्थः । वेदवाक्यानामानर्थक्यसिद्धये पूर्वपक्षैर्यद् यत् प्रतिपादितं तस्य तस्य समाधानाय ब्रवीत्याचार्यः ॥ स्तुत्यर्थाभिव्यञ्जकानां वाक्यानामङ्गरूपत्वेन मुख्यविधिवाक्येन सहैकवाक्यतायां कृतायां स्तुत्यर्थप्रतिपादकानां वाक्यानां विधि-वाक्यैः सहाङ्गाङ्गिसम्बन्धः । कोऽङ्गाङ्गिसम्बन्धः । तस्य रूपं किं । तस्याकारः क इत्येतेषां विचाराणां विवेचनमागमिष्यत्सु सूत्रेषु विद्यते ॥

अनुसंधेयानि वेदवाक्यानि ॥

वायव्यं श्वेतमालभेतभूतिकामः । वायुर्वैक्षेपिष्ठादेवता । वायुमेवस्वेनभागधेयेनोपधावति । सएवैनंभूतिंगमयति ॥ तै. सं.(२.१,१.)

---

tioned. But Babara Prâvâhani is liable to decay, because he is described as a son of Pravâhana. Then such mortal persons as Prâvâhani are mentioned in the Vedas. Therefore, the Vedas, instead of being eternal, are simply transient, and are useless and false. This is the drift of the opponent's statement as made in the sûtra under examination.

७. (अर्थवादाचें) आणि विधिवाक्याचें एकवाक्यत्व झालयानें विधिवाक्य अंगी होऊन अर्थवादानीं अंगें व्हावें. (सि०.)

७. मूळ संस्कृत सूत्रांत "एकवाक्यत्व," "स्तुत्यर्थ," आणि षष्ठीचे अनेक वचनीं विधिशब्द अशीं पदें आहेत. एकवाक्यत्व म्हणजे अंगांगिसंबंधानें निरनिराळ्या वाक्यांचा प्रधान वाक्याशीं जो संबंध तें. उद्देश्य आणि विधेय हीं दोन असलीं म्हणजे वाक्य पुरें झालें. कधीं कधीं विधेय एकाच पदाबद्दल दोन चार पदें मिळून होतें. केव्हां केव्हां एकच क्रियापद पूर्ण विधेय होतें. यापमाणेंच सकर्मक क्रियापद असलें म्हणजे त्याच्या कर्माविषयीं आकांक्षा उत्पन्न होते. ती आकांक्षा पुरी होई तोंपर्यंत सकर्मक क्रियापद हें अपूर्ण विधेय होय. अकर्मक क्रियापदाला कर्मविवक्षा नसते, म्हणून तें पूर्ण विधेय होतें. उदाहरणः—रामा गाय बांधतो. या स्थळीं "रामा" उद्देश्य आहे, "बांधतो" हें प्रधान विधेय आहे, याची पूर्णता करण्या करितां "गाय" या पदावरहि विधेयत्व येतें. पदाच्या योगानें, वाक्यांशाचे योगानें, किंवा पूर्ण वाक्याचे योगानें उद्देश्य किंवा विधेय यांचें जें विशेष वर्णन होतें, त्यास स्तुत्यर्थ असें नांव सूत्रकारानें दिलें आहे. उदाहरणः—चपल रामा घाईनें सुंदर गाय बांधतो. या स्थळीं शुद्ध पदांनीं उद्देश्य आणि विधेय यांचें विशेष वर्णन झालें आहे, म्हणू-

7. (Particular explanatory statements) and the main original statement harmonize; the former then ought to be subordinate, and the latter, to be principal. (Final statement.)

7. In the original Sanskrita sûtra, the terms, *Ekavâkyatva*, *Stutyartha* and the genitive plural of the word *Vidhi* occur. *Ekavâkyatva* is harmony between the different parts of a writing based on the relation of subordinate statements to the principal statement, literally the quality of being one sentence or rather one passage. A sentence is complete when its subject (Uddeshya) and its predicate (Vidheya) are expressed. Sometimes, one or more words form the predicate. Sometimes a verb is a complete predicate. When a transitive verb is used, the mind naturally expects some word or phrase to complete its sense. This expectancy (Âkânksâ) requires to be fulfilled. An intransitive verb is a complete predicate for it conveys a complete notion. An example :—*Râmâ* ties a cow. In this sentence *Râmâ* is the subject, and *ties* is the main predicate. The word *cow* is a part of the predicate for it completes the notion expressed by the verb. The author of Mimânsâ calls the enlargement—either of the subject or predicate by means of simple words, phrases or sentences—*Stutyartha* which literally means the *purpose of praise*. An example again:—prompt *Râmâ* hastily ties a beautiful cow. In this sentence,

न "चपल, घाईनें, आणि सुंदर" हीं पदें स्तुत्यर्थ आहेत. आणि यांवर जो धर्म आहे, तो स्तुत्यर्थत्व आहे. दुसरें उदारण:—हातामध्यें काठी बाळगणारा चपल रामा घाईनें धांवत धांवत येऊन पळून जाणारी आणि वासरास पाजणारी गाय बांधतो. या स्थळीं उद्देश्य आणि विधेय यांचें पूर्ण वर्णन वाक्यांशांचे योगानें झालें आहे. या वाक्यांशांवर स्तुत्यर्थत्व हा धर्म आहे. पुन: तिसरें उदाहरण:—जो रामा हातांत काठी बाळगतो, तो घाईनें पळत पळत आला म्हणजे जी गाय पळते, आणि वासरास पाजते, तीस बांधतो. या स्थळीं पूर्ण वाक्यावर स्तुत्यर्थत्व हा धर्म आहे. पूर्णवाक्य व वाक्यांश यांत भेद काय? वाक्यांशामध्यें उद्देश्य आणि विधेय यांचें स्पष्ट वर्णन नसतें. वाक्यामध्यें उद्देश्य आणि विधेय यांचें स्पष्ट वर्णन असतें. अशा प्रकारें उद्देश्याच्या किंवा विधेयाच्या संबंधानें स्तुत्यर्थत्वधर्माचें निरूपण आहे. जीं पदें, जे वाक्यांश, किंवा जीं वाक्यें स्तुत्यर्थत्वसंबंधानें येतात, ते सर्व अर्थवाद समजावेत. हे अर्थवाद प्रधान विधिवाक्यरूप अंगीचीं अंगें होतात. षष्ठीचे अनेक वचनीं विधिशब्दाचें रूप मूळ सूत्रांत आहे, त्याचा विचार. मूळ सूत्रांत "व्हावें" या अर्थी जें अनेकवचनीं क्रियापद आहे, त्याच्या उद्देश्याचा मुळींच उल्लेख नाहीं. तर तें उद्देश्य काय, हा विचार सहजच उत्पन्न झाला. विधेयाजवळ षष्ठी आहे, तिचा अर्थ अंगांगिभाव असा केला असतां साहचर्यावरून अंगें हें उद्देश्य होईल.

the subject and the predicate are enlarged by means of simple words. Therefore, the words *prompt, hastily,* and *beautiful* are for the purpose of enlarging (Stutyartha) the subject and the predicate. Another example:—having a stick in his hand, prompt *Râmâ*, running in haste, ties a cow, apt to run away, and to suckle her calf. In this sentence, the subject and the predicate are enlarged by means of phrases (Vâkyânsha) such as—having a stick in his hand, running in haste, apt to run away and to suckle her calf. These phrases are for the purpose of *Stuti* which includes censure, as well as praise, being used in its large sense. The third example :—*Râmâ* who has a stick in his hand, ties the cow who runs away and suckles her calf as he comes running in haste. In this passage, complete sentences enlarge both the subject and the predicate. What is the distinction between phrases and complete sentences? In phrases (Vâkyânsha), the subject and the predicate are not expressed, while in a sentence, they are expressed. The enlargement of the subject or predicate (Stutyarthatva) by means of simple words, phrases or sentences has thus been fully explained. Words, phrases, or sentences introduced in a passage to enlarge the subject or predicate of the principal sentence are *Arthavâda* or explanatory statements which bear to the principal sentence the relation of parts to a whole or of limbs to the body. Now the genitive plural of the word *Vidhi* as used in the original Sanskrita sûtra is to be considered. The verb meaning *ought to be* is used.

"विधिवाक्य अंगी होऊन, अर्थवादांनीं अंगें व्हावें." असा आम्ही "विधीनाम्" या षष्ठ्यन्त पदाचा अर्थ केला आहे. संस्कृत सूत्राच्या खालीं दिलेल्या वेदवाक्याचा अर्थ देतों. "ऐश्वर्याची इच्छा करणाऱ्या यजमानानें पांढऱ्या वायव्य (वायु संबन्धी) पशूला (दर्भ आणि पिंप्रीच्या शाखा यांनीं) स्पर्श करावा; कारण वायु अतिशय चपल देवता आहे. आपल्या भागानें वायूलाच (यजमान सेवतो.) तोच त्याला ऐश्वर्याप्रत पोहंचवितों." या स्थळीं कारण जें दिलें आहे, तें स्तुत्यर्थ आहे, म्हणजे विधेयाचें उपोद्बलक आहे, किंवा प्ररोचनार्थ आहे. म्हणजे मुख्य विधेयाचीं अंगें होऊन अर्थवादवाक्यें विधेयाच्या अर्थाला दृढता आणतात. याविषयीं पुढें विचार करावा लागेल.

२०. वरील टिपेंत "हा घोडा विकत घ्यावा, कारण हा अरबी घोडा आहे, आणि अरबी घोडे मोठे हमानी असतात." असें लौकिकवाक्य आहे. त्यांत कारण जें सांगितलें आहे, त्या कारणानें घोड्याच्या [illegible] र्णन झालें आहे. आणि या वर्णनाचें इतकेंच तात्पर्य आहे कीं विकायाचा घोडा विकत घेणाऱ्याच्या मनांत भरावा, व त्यानें तो विकत घ्यावा. तसेंच वेदामध्यें ज्या ज्या कर्माचें जें जें वर्णन केलें आहे, तें तें कर्म करण्यास यजमानानें प्रवृत्त व्हावें, असें कोणी पूर्वपक्षावर म्हणेल. या सूत्रांत अशी उत्थापित शंका पूर्वपक्षकारानें केली आहे. आपल्याच बोलण्यावर आपणच शंका घेतली, आणि तिचा विचार केला, म्हणजे त्या शंकेस उत्थापित शंका म्हणतात. पूर्वपक्षकार या शंकेचें समाधान पुढील सूत्रांत करतो.

20. If it be said that As among the people (so in the Vedas), then (it will not do.) (A doubt expressed against the opponent's statement).

are had. For getting strength." This passage is met with in the Taittiriya Sanhitâ (II. 1, 6.) This passage inculcates what is original (Apûrva). Therefore, it is an original statement, and therefore, it is not a subordinate statement I do not see how you distinguish a subordinate statement from an original statement when there is no ground for any distinction." This is the drift of the statement of the opponent.

20. In the foot-note on the preceding sûtra, the profane passage that "this horse is to be purchased because he is an Arab, and because the Arabs are faithful" is introduced by way of illustration. The reasons in this passage describe fully the qualities of the horse. The only object of the description is to induce the purchaser to buy the horse by being persuaded of his superior qualities. In like manner, it may be said that a sacrificer may be moved to perform what sacrificial work is inculcated in the Vedas. An objection is raised by the opponent himself for the purpose of elucidating the subject. The opponent refutes this objection in the following sûtra.

सूत्राणि.

न पूर्वत्वात् ॥ २१ ॥ (पू० आशङ्कानिरासः)

पदानि । (लोकवत्) न, पूर्वत्वात् ॥

पदार्थः । न=(स्पष्टम्) । पूर्वत्वात्=विदितपूर्वार्थप्रतिपादनात् ॥

वाक्यार्थः । न लोकवद् वेदे । (कुतः) लोके विदितपूर्वार्थप्रतिपादनात् ॥

भावार्थः । यथा लोके विदितार्थप्रतिपादनमस्ति तथा वेदे नास्ति । वेदे त्वविदितार्थप्रतिपादनम् । अतएव गुणवादस्य विधित्वापत्तिः । अतो विधिर्वेत्यादिपूर्वपक्षः सुस्थः ॥

यच्छास्त्रदीपिकाकारो वक्ति तदत्र विचारयितुं युज्यते । शास्त्रविचारे लौकिकव्यवहाराणां माहात्म्यं प्रकाशते । तद्धि पुरुषप्रवर्त्तनाय विधिरपेक्षते । यत्तु स्वयमेव विधिः समीहितसाधनतां बोधयन्नलमेवानपेक्षः प्रवर्तयितुमित्युक्तं । तत्रोच्यते । सत्यं विधिरेव प्रवृत्तिकारणं प्रधानं । तत्रैवानुग्राहिका प्राशस्त्यावगतिः । फले हि निसर्गसुंदरे स्वयमेव लिप्सा भवति । तत्साधने तु दुःखाकारे स्वतस्तावद्द्वेष एव । अवश्यं तु साधने प्रवर्त्तमानस्य तत्रैव रुच्या भवितव्यं समीहितसाधनतावगतिरपि तत्रैव रुचिं जनयंती प्रवृत्तिहेतुः स्यात् । नान्यथा । साच पुरुषेभ्यः प्रमादालस्यादियुक्तेभ्यः कर्म दुःखात्मकं रोचयंती गुणकथनमपेक्षते । अवगतसमीहितसाधनभावमपि कर्म रुचिगोचरं । तत्सतामसतां वा गुणानां कीर्तनादेव रोचतेतरामिति सार्वजनीनमेतत् ।

२१. नाहीं, पूर्वत्वामुळें. (पू०) (वरील उत्थापित शंकेचें समाधान.)

२१. सूत्रांत मुख्य शब्द "पूर्वत्व" आहे, त्याची अपूर्वत्व या शब्दाच्या संबंधानें व्याख्या झालीच आहे. पूर्व म्हणजे जुनें, त्यावरील धर्माचें नांव पूर्वत्व. पूर्वी जें ठाऊक असतें तें सांगून व्यवहारामध्यें गुणाचें वर्णन करतात. घोडा विकत घ्यावा या उदाहरणांत जे घोड्याचे गुण वर्णिले, ते गुण विकत घेणाऱ्यास पूर्वी ठाऊक होतें. त्यांत नवेपणा म्हणून कांहीं नाहीं. परंतु वेदप्रतिपादितविषयसंबंधी उलटा प्रकार आहे. बल, पशु, उंबर, यांच्या विषयीं नव्या गुणांचें वर्णन झालें आहे, असें जर म्हणाल तर विधिवाक्यांनीं नवा विषय, अर्थवादांनींहि नवा विषय, असें अंगीकारणें मीमांसकांस प्राप्त पडतें. अर्थवादांनीं पूर्वी ठाऊक नसलेले गुणांचेंच वर्णन झालें, असें म्हटलें तर "उंबराचा यज्ञस्तंभ आहे," अशा वेदवाक्यांची व्यवस्था होत नाहीं. कारण विधिवाक्यानें अपूर्व अर्थाचें वर्णन, आणि अर्थवादानेंहि अपूर्व अर्थाचें वर्णन होतें. मग दोहींमध्यें भेद मुळींच नाहीं असें जें आम्ही पूर्वी प्रतिपादन केलें, त्यावरच पुनः पर्यवसान होतें. अर्थवादानें काय सांगितलें तें पूर्वी ठाऊक नव्हतें, विधिवाक्यानें काय सांगितलें तेंहि पूर्वी ठाऊक नव्हतें, असें म्हणण्याचा प्रसंग आला. असा कटाक्ष ठेवून पूर्वपक्षकारानें १९, २०, आणि २१, या सूत्रांचे योगानें आपल्या मताचा उपन्यास केला आहे.

21. No. On account of (there being) no originality. (This is the refutation of the objection raised in the preceding sûtra.)

21. The terms *Apûrvatva* and *Pûrvatva* have not exact equivalents in English. We have rendered them by the quality of what is not original and originality. *Pûrvatva* is the quality of what already exists and *Apûrvatva* is the absence of such a quality. The term *Pûrvatva* has already been explained in connection with the explanation of *Apûrvatva* (originality). *Pûrva* means *prior*, and its quality is *Pûrvatva* (*priority*.) The qualities of a thing offered for sale though already known are yet described in common life when purchases are to be made. In the illustration already given—the horse is to be bought—the qualities of a horse in general have already been known to the purchaser. There is nothing new about them. But this is not the case with what is inculcated in the Vedas. If it be said that new qualities of *strength*, *animals* and *a fig-tree* are mentioned, then it will be necessary for the Mîmânsakas to admint that a subordinate statement as well as an original statement inculcates what is new. If it be admitted that subordinate statements mention the qualities already unknown, then the statement that a sacrificial post is of the fig-tree is not intelligible, and cannot be properly explained; because a subordinate statement as well as an original statement inculcates what is entirely new. Thus at last the con-

सूत्राणि.

उक्तं तु वाक्यशेषत्वम् ॥ २२ ॥ (सि०)

पदानि । उक्तम्, तु, वाक्य-शेषत्वम् ॥

पदार्थः । उक्तम्=प्रतिपादितम् (आचार्येण) तु=न । वाक्यशेषत्वम्=वाक्याङ्गत्वम् ॥

वाक्यार्थः । आचार्येण वाक्याङ्गत्वं प्रतिपादितम् ॥

भावार्थः । अस्य पादस्य सप्तमसूत्रादारभ्यास्मिन् पादे यद् गुणवादनिरूपणं कृतं तेन गुणवादस्य विधित्वापत्तिप्रतिपादकपूर्वपक्षा निराकृता इति भावः ॥

(तृतीयाध्यायस्य प्रथमपादे प्रथमद्वितीयतृतीयादिसूत्राणि शेषलक्षणनिरूपकाणि द्रष्टव्यानि)

विधिश्चानर्थकः क्वचित् । तस्मात् स्तुतिः प्रतीयेत । तत्सामान्यादितरेषु तथात्वम् ॥ २३ ॥ (सिद्धान्ते युक्तिः १)

पदानि । विधिः, च, अनर्थकः, क्वचित् । तस्मात्, स्तुतिः, प्रतीयेत । तत्-सामान्यात्, इतरेषु, तथात्वम् ॥

पदार्थः । विधिः=विधायकवचनम् । च=पुनः । अनर्थकः=निष्प्रयोजनः । क्वचित्=(स्पष्टम्) तस्मात्=अतएव । स्तुतिः=अर्थवादः । प्रतीयेत=ज्ञायेत । तत्सामान्यात्=स्तुतिसामान्यात्=स्तुतेर्जातित्वेन ग्रहणात् । इतरेषु=अन्यस्थलेषु । तथात्वम्=तत्प्रकारवत्त्वम्=स्तुतिमत्त्वम् ॥

वाक्यार्थः । कस्मिंश्चित् स्थलविशेषेऽप्राप्तकर्मविधायकं विधिरूपवाक्यं निष्प्रयोजनं भवति । अत एव तत्रार्थवाद इतिज्ञेयम् । (पुनः) इतरेषु स्थलेष्वर्थवादता ज्ञायते । कुतः । स्तुतेर्जातित्वेन ग्रहणात् । (टिप्पनी द्रष्टव्या) एकस्मिनस्थले विधेर्निष्प्रयोजनत्वादर्थवादत्वापत्तिः । अत एव (उपलक्षणन्यायेन) सर्वेष्वीदृकस्थलेष्वर्थवादत्वापत्तिः ॥ विध्यसम्भवः स्तुतिसम्भवश्चेति तात्पर्यम् ।

वेदवाक्यान्यनुसन्धेयानि ॥

अप्सुयोनिर्वा अश्वो । अप्सुजोवेतसः । तैत्तिरीय संहिता (५. ३,१२.)

२२. नाहीं, अर्थवादाच्या स्वरूपाचें वर्णन केलें आहे. (सि०).

२३. पुनः क्वचित् स्थळीं विधिवाक्य निरर्थक असतें, म्हणून (अशा स्थळीं) तें स्तुतिवाक्य (आहे,) असें समजावें. (अशा) सामान्य वचनावरून दुसऱ्या सर्व स्थळीं तसेंच समजावें. (सि० युक्ति १.)

22. No, the nature of subordinate statements is explained. (Final statement.)

23. Again, in some places, an original statement is to no purpose; therefore, (in such places), it (an original statement) (is) a subordinate statement. From (such) a general statement, the same thing is to be understood in all other places. (An argument in support of the final statement made in the 22nd sûtra.)

---

२२. मागील पूर्वपक्षाचें आचार्य समाधान करतात. पूर्वपक्षकारानें जसें म्हटलें तसें नाहीं असें सांगून जो वाद पूर्वपक्षकाराशीं झाला, तेणेंकरून अर्थवादाचें स्वरूप काय तें आम्ही दाखविलें असें आचार्य म्हणतात. मूळ संस्कृत सूत्रांत "वाक्यशेषत्व" असें पद आहे, त्याचा अर्थविचार केला पाहिजे. शेष म्हणजे काय याचा विचार आचार्यांनीं स्वतः तिसऱ्या अध्यायाच्या प्रारंभीं केला आहे. एथें फक्त शेषशब्दाचा उपयोग केला आहे. त्याचें लक्षण, स्वरूपकथन, आणि संबंधविचार पुढें होणार आहे. शेषशब्दाच्या अंगीं एक गुण आहे, तो एथें दाखविला पाहिजे. अर्थवाद, गुणवाद, हेतुवाक्य, आलंकारिक वाक्य, इत्यादिकांच्या योगानें विधिवाक्याचें प्रयोजन होतें. या सर्वांचा बोध एका शेषशब्दानें होतो. म्हणून आचार्यांनीं हा व्यापक शब्द घातला आहे. आणि हें उपसंहारसूत्र योजिलें आहे. ज्यांत एकंदर

clusion is forced on us that the statement we have already made (in the 19th sûtra) is valid, that is, a subordinate statement as well as an original statement inculcates what is not already known. This is the point of the objections urged by the opponent in the 19th, 20th, and 21st sûtras.

22. Jaimini removes the objections urged by the opponent in the preceding sûtras. By *no* in the above sûtra, the statements are generally objected to. Jaimini, moreover, says that the nature of subordinate statements is fully elucidated by his discussion with the opponent. In the original Sanskrita sûtra, the term Vâkyashesatva is used. It deserves to be considered. The term *Shesa* and the nature of the ideas it conveys are examined by Jaimini at the beginning of the third book. The term *Shesa* is simply used here. Its definition, its nature,

सूत्राणि.

प्रकरणे सम्भवन्नपकर्षो नकल्प्येत विध्यानर्थक्यं हि तं प्रति ॥ २४ ॥ (सि० यु० २).

पदानि । प्रकरणे, सम्भवन्, अपकर्षः, न, कल्प्येत, विधि-आनर्थक्यं हि, तम्, प्रति ॥

पदार्थः । प्रकरणे=एकार्थप्रतिपादकग्रन्थांशे । सम्भवन्=सति सम्भवेऽपि । अपकर्षः=उत्तरत्र विद्यमानार्थस्य पूर्वं ग्रहणम् । न=(स्पष्टम्) कल्प्येत=स्वसम्बन्धेन युज्येत । विध्यानर्थक्यम्=विधेर्निष्प्रयोजनत्वम् । हि=यस्मात् । तम्=अपकर्षम् । प्रति=(व्यावृत्तौ)

वाक्यार्थः । प्रकरणे सति सम्भवेऽप्यपकर्षो न युज्येत । तथा सति विधेर्निष्प्रयोजनत्वापत्तिः ॥ यस्मादपकर्षं प्रति प्रकरणं विरुद्धम् ॥

भावार्थः । ग्रन्थस्य प्रकरणविचारे यद्यप्यपकर्षः सम्भवति तथाप्यपकर्षो न कदापि योजनीयः । कुतः । कृतेऽपकर्षे प्रकरणं बाधितं भवेत् । कुतः । विधिवाक्यं निरर्थकं भवति ॥

वेदवाक्यान्यनुसंधेयानि ॥

यो विदग्धः स नैर्ऋतो योऽशृतः स रौद्रो यः शृतः स सदेवस्तस्माद-विदहता शृतङ्कृत्यः सदेवत्वाय ॥ तैत्तिरीय संहिता (१.६,३,४.)

झालेल्या वादाचें एकदम वर्णन केलें असतें, त्यास उपसंहार म्हणावें.

२३. या सूत्रांत एक शब्द विचार करायाजोगा आहे, तो "स्तुति" होय. स्तुति या शब्दानें अर्थवाद, गुणवाद, हेतुवाक्य, आलंकारिक वाक्य, आणि कधीं कधीं निन्दा अशा निरनिराळ्या अर्थाचा बोध होतो. मग स्तुति आणि शेष यांत भेद काय ? हा विचार आला. शेषशब्दानें स्तुति शब्दाच्या अर्थाचा बोध होऊन अधिक अर्थाचा समावेश होतो. कर्म, गुण, द्रव्य, पुरुष, यांच्या संबंधानें शेषशब्दाची योजना होते. शेष या व्यापक

and its bearings will be examined in the sequel. The distinctive quality of what is called *Shesa* requires to be explained here. An original statement is fully explained and its parts, such as the subject or object, are fully described in the course of the discussion about direct subordinate statements, indirect subordinate statements, reasons, and about figures of speech. All these are expressed by the term *Shesa*. Jaimini therefore, uses this general term, and introduces this sûtra by way of summing up the discussion.

23. In this sûtra, the term

२४. प्रकरणविचार चालूं असतां संभव असतांहि अपकर्षाची योजना करूं नये. (कारण) अपकर्षास योजिलें असतां प्रकरणास बाध येतो, आणि विधिवाक्य अनर्थक होतें. (सि० यु० २.)

24. In the course of a particular topic (under discussion), a word or phrase which occurs late should not be anticipated, (because) such a procedure obstructs the course of a topic, and an original statement is (then) to no purpose. (2. Argument in support of the last final statement.)

शब्दाचा पोटभेद स्तुतिशब्द आहे. आणि स्तुतिशब्दाचे पोटभेद अर्थवाद, गुणवाद, हेतुवाक्य, आलंकारिक वाक्य, इत्यादि आहेत. पुनः मूळ सूत्रांत अनुगम करण्याची युक्ति योजिली आहे, तिचा विचार केला पाहिजे. कांहीं कांहीं स्थळीं अमुक अर्थ दिसून येतो, तोच अर्थ सर्व स्थळीं दिसून येतो. हा सामान्य अर्थ व्यापक होतो, म्हणून दुसऱ्या सर्व स्थळीं तोच अर्थ दिसून येतो. असा हा अनुगमपद्धतीचा सामान्य आकार आहे. त्याचा विशेष विचार केला पाहिजे. पहिल्या पादांतील चवथ्या सूत्रावरील टीप पहा. तेथें उपलक्षणन्यायाचें निरूपण केलें आहे. या सूत्रीं उपलक्षणाचे योगानें अनुगम केला आहे. या वाक्यास विधिवाक्य म्हणावें, कीं स्तुतिवाक्य म्हणावें, अशी पंचाईत पडते, म्हणून पूर्वपक्षकार काय करावें? असें विचारतो. ही पंचाईत मिटण्यास जैमिनीनें एक तोड काढली आहे. ज्या ज्या स्थळीं विधिवाक्यांतून सबळ आणि निर्बाध अपूर्व अर्थ निघत नाहीं, त्या स्थळीं तें विधिवाक्य

Stuti is to be considered. *Stuti* includes a direct subordinate statement, an indirect subordinate statement, a causative statement, figures of speech and sometimes even censure. Then what is the distinction between *Stuti* and *Shesa*? The term *Shesa* has a wider sense than *Stuti*, for the first applies to an action, a quality, a substance, a person; while *Stuti* is a subdivision of *Shesa*, and a direct subordinate statement, an indirect subordinate statement and the rest are subdivisions of *Stuti*. In the sûtra, a method of generalizing is laid down. Whatever is observed to exist in *some places* may exist in *all places*. Phenomena, observed to exist sometimes or in some places may be universal as to time or place. We have thus stated the general form of this method which deserves to be specially considered. See the footnote on (I. 1, 4.) where we have explained the method of generalizing from one instance called Upalaksana. In this sûtra, another method is employed. The opponent asks in the course of the discussion in the sûtras whether a particular statement is original

44328

नव्हे, पण स्तुतिवाक्य आहे, असें समजावें. सूत्राच्या या दलानें विशेष लक्षांत ठेवण्या जोगा शास्त्रार्थ सांगितला आहे. तो असा:—ग्रंथाचा अर्थ करतांना विधिवाक्य म्हणजे प्रधानवाक्य कोणतें हें अधीं ठरवावें. आणि असें ठरविण्यास कोणता उपाय योजावा, हें हि सांगितलें आहे. ज्या वाक्यांत अपूर्व वर्णन केलें असतें, तें विधिवाक्य. केव्हां केव्हां स्तुतिवाक्यांतहि अपूर्व वर्णन असतें. आतां निर्णय कसा करावा? ज्यांतून एकदम अपूर्व अर्थ निघतो, अशीं एका स्थळीं दोन वाक्यें अढळलीं असतां ज्यांत स्वातंत्र्यानें अपूर्व वर्णिलें असतें, तें विधिवाक्य, आणि या विधिवाक्याशीं दुसऱ्या वाक्याचा कांहींना कांहीं सम्बन्ध असतो. या संबंधामुळें तें दुसरें वाक्य मुख्य विधिवाक्याचर अवलंबतें, म्हणून त्याला स्तुतिवाक्य समजावें. असा या सूत्राच्या प्रथम दोन दलांचा अर्थ झाला. वरील शास्त्रार्थ सामान्य कल्पून अन्यस्थळीं अशीच योजना करावी, असें तिसऱ्या दलामध्यें वर्णिलें आहे. तैत्तिरीय संहितेंतील (५.३,१२.) एथील वेदवाक्याचा अर्थ. "आणि पाण्यामध्यें अश्व उत्पन्न होतो, अथवा पाण्यामध्यें परळ उत्पन्न होतो." या स्थळीं "पाण्यांत उत्पन्न झालेल्या घोड्याचें" विधान करणारें विधिवाक्य संभवत नाहीं. ज्या स्थळीं विधीचा असंभव, त्या स्थळीं स्तुतीचा संभव, अशी कल्पना योग्य आहे.

२४. या सूत्रांत "अपकर्ष" आणि "प्रकरण" असे दोन शब्द विचार करण्याजोगे आहेत. प्रकरण म्हणजे अमुकच

or subordinate, and what is the characteristic mark by which the one can be distinguished from the other. To answer this quesion, Jaimini explains a principle in this sûtra. Wherever a statement is not essentially original, it is only subordinate. This part of the sûtra explains what deserves special attention:—in interpreting a passage, it is first necessary to determine what the principal sentence or the original statement is. To enable an interpreter to determine this, Jaimini explains a method. The principal sentence is one which makes an original statement. The objection of the opponent is that a subordinate statement sometimes expresses originality. To remove this objection, it is laid down that what expresses originality independently and absolutely is to be considered the principal sentence in a passage to be interpreted, as it bears a relation to phrases or other sentences. On account of this relation, the other sentences or phrases depend on the principal sentence, and are, therefore, subordinate. This is the explanation of the first two parts of this sûtra. The third part lays down that these principles are to be generally applied. The mantra in the Taittiríya Sanhitâ (V. 3, 12.) is translated here. "And a horse is born in waters or a sort of rush is produced in waters." In this place, an original statement that "a horse born in waters is to be taken" is simply impossible. Therefore, wherever an original statement is impossible, a subordinate statement is possible.

24. The two terms *Apakarsa*—and *Prakarana*—used in this sû-

विषय चालूं आहे, असें निरनिराळ्या अर्थांच्या परस्परसंबंधावरून ज्ञान होतें. आणि प्रकरणांत वर्णिलेले अर्थ एकामागून एक अमक्याच संबंधानें आले पाहिजेत अशी अवश्यकता असते. संबंधानें एकामागून एक येणें ह्यास आनुपूर्वी म्हणतात. प्रकरणांत आनुपूर्वी आणि साकांक्षत्व हे धर्म असलेच पाहिजेत.

प्रकरणाच्या या विचारावरून अपकर्ष-शब्दाचा अर्थ सुबोध होईल. आनुपूर्वीकडे आणि सांकाक्षत्वाकडे लक्ष न देतां वाक्यांतील पुढचा अर्थ मागें आणला म्हणजे अपकर्ष होतो. आतां सूत्रार्थ सहज समजेल. कांहीं एक प्रकरण चाललें आहे. तेथें अपकर्ष संभवतो असें वाटलें, म्हणजे पुढच्या वाक्यांतील अर्थ मागल्या वाक्यांत योजला तरी चालेल, असें वाटलें, तथापि असें करूं नये. कां? असें केलें असतां आनुपूर्वी बिघडते, साकांक्षत्व धर्माची हानि होते, प्रकरणास बाध येतो. ज्या स्थळीं प्रकरण किंवा अप्रकरण याचा विचार रहात नाहीं त्या ठिकाणीं विधिवाक्याची योग्यता राहिलीच नाहीं. विधिवाक्य निरर्थक झालें. अशी खटपट करून स्तुतिवाक्य प्रधान आहे, असें करण्याबद्दलां तें गौण आहे हें पत्करावें हें ठीक. वेदवाक्याची योजना केली असतां हा अर्थ अधिक स्पष्ट होतो. यज्ञसमयीं कणकीचे पोपे निरनिराळ्या खापराच्या चकत्यावर भाजतात. ह्या खापराच्या चकत्यांस संस्कृतांत कपालें म्हणतात, आणि त्या पोप्यांस पुरोडाश म्हणतात. तैत्तिरीय संहिता (२.६,३.) या

tra call for special explanation. *Prakarana* or a topic is the knowledge which is produced by the relations which the different thoughts of a discourse bear to one another. The nature of a topic (*Prakarana*) necessitates a particular order and sequence of thoughts of which a discourse consists. The particular sequence whether of letters, words or thoughts is called in Sanskrita *Ânupûrvî*. Sequence and the principle of *desirability* (Sâkânsatva) are the essential elements of a topic. The principle of *desirability* is the principle of what is called grammatical government considered from a subjective point of view. Now it will be easy to explain the meaning of what is called *Apakarsa*. When the principles of sequence and *desirability* being disregarded, a word, a phrase or a thought which occurs in the latter part of a discourse is transferred to its former part, such a transference involves the principle of *Apakarsa*. The meaning of the sûtra will be now easy enough. In the course of a discourse, the principle of the *inverse transference* (Apakarsa), though thought to be reasonable, is not to be employed, because it affects the sequence of thoughts, and annuls the principle of *desirability*, and obstructs the course of a topic. Where the course of a discourse is disregarded, an original statement loses its importance. It is simply to no purpose. All these efforts on the part of the opponent to raise the importance of a subordinate statement is simply waste of time and energy. It is reasonable to acknowledge its de-

सूत्राणि.

विधौ च वाक्यभेदः स्यात् ॥२५॥ (सि० यु० ३)

पदानि। (स्तुतिः) विधौ, च, वाक्य-भेदः, स्यात् ॥

पदार्थः। वाक्यभेदः=वाक्यस्य भेदः=वाक्यद्वयम् । अवशिष्टानि पदानि स्पष्टानि ॥

वाक्यार्थः। पुनः । स्तुतेर्विधिकल्पनायां वाक्यभेदो भवेत् ॥

भावार्थः। पूर्वमीमांसाविषये वाक्यभेदो दुष्ट इति सिद्धान्तः । सिद्धान्तोऽयं द्वितीयाध्यायस्य प्रथमपादे विचारयिष्यते । वाक्यभेदरूपदोषं गृहीत्वाऽत्र दोषापत्तिः कृता। यदि स्तुतिर्विधिस्तर्हि वाक्यभेदः प्राप्नुयात् । वाक्यभेदोऽनिष्टोऽतः स्तुतिर्न विधिः ॥

वेदवाक्यान्यनुसंधेयानि ॥

औदुम्बरो यूपो भवति । इत्यादीनि ॥

ठिकाणचा मंत्र घेतला आहे. या अनुवाकाकडे विशेष लक्ष द्यावें. प्रथम असें वर्णन आहे कीं "ऋषींनीं पुरोडाश कूर्म (कांसव) झाला आहे, आणि (जमीनीवर) सरकूं लागला आहे, असें पाहिलें; आणि ते ऋषि त्याला म्हणाले." या ठिकाणीं पुरोडाश कूर्म कसा झाला, आणि तो सरकूं कसा लागला, या विषयीं वाचकांनीं विचार करावा. परंतु याच पुरोडाशाच्या निरनिराळे पोट्यांचें जें वर्णन केलें आहे, त्याचा या ठिकाणीं विचार व्हावयाचा आहे. "जो पोपा कांहीं भाजला आहे व कांहीं कच्चा आहे, तो राक्षसांना प्रिय आहे; जो न भाजला आहे तो रुद्राला प्रिय आहे; जो चांगला भाजला आहे तो देवांना प्रिय आहे. म्हणून कांहीं भाजल्या आणि कांहीं कच्चा अशा पुरो-

pendence. Much light will be thrown on this explanation by applying the principles discussed to a Vaidika passage. See the mantra quoted from the Taittirîya Sanhitâ (II. 6,3.) and translated. This part of the Sanhitâ deserves attention. It first describes that the *Ri*sis saw a cake (made of wheat and baked on cowherds) assuming the form of a tortoise, and moving (on the land); and the *Ri*sis said to it. Our readers may well enquire how a cake assumed the form of a tortoise and how it moved on the land. But the supernatural despises all reasonable enquiry. Now the different parts of the cake (Purodâsha) baked on different cowherds are to be considered. "The part half baked and half not baked is liked by the Râksasas (demons). The part not baked at all is liked by the Rudra. The part

२५. (स्तुतिवाक्य) विधिवाक्य (आहे) अशी कल्पना केली असतां वाक्यभेदरूप दोष येतो. (सि० यु० ३.)

25. If a subordinate statement be considered an original statement, (then) there is the defect of the division of a sentence. (3. Argument in support of the final statement.)

डाशास न करणाऱ्या पुरुषानें पुरोडाश पक्का भाजावा, तो देवाला प्रिय आहे." हेतुवाक्यांत "म्हणून" इत्यादि शब्दांनीं जें कारण सांगितलें आहे, त्या कारणामध्यें "अशा पुरोडाशास न करणाऱ्या" एवढ्या पदांचा "राक्षसांना प्रिय" याकडे अन्वय केला असतां वांकडा अन्वय होऊन अपकर्ष उत्पन्न होतो. दर्शपूर्णमासी या यज्ञामध्यें राक्षसांचा अंश नाहीं. मग असला विधि भलतीकडेच लागूं लागेल. आणि जें प्रकरण चाललें आहे, त्यास बाध येईळ. म्हणून अपकर्ष करून स्तुतिवाक्यांतला कांहीं अंश विधिवाक्यांत घेऊं नये; स्तुति आणि विधि हे स्वतंत्र ठेवावेत. या करितां स्तुतिवाक्यांत आणि विधिवाक्यांत भेद आहे.

२५. दुसऱ्या अध्यायाच्या पहिल्या पादाच्या ४६ आणि ४७ सूत्रांत वाक्यभेदरूप दोष तो काय याचा विचार केला आहे. याच पादाच्या एकोणिसाव्या सूत्रावरचे टिपेंत ज्या वेदमन्त्राचें भाषांतर दिलें आहे, तें पहावें. त्या मन्त्राच्या प्रारंभीं "उंबराच्या झाडाचा यज्ञस्तंभ असतो" हें विधिवाक्य आहे. आणि त्याच मन्त्राच्या अंतीं "बलाच्या प्राप्तीकरितां" अशीं पदें आहेत. हें स्तुतिवाक्य आहे.

fully baked is liked by the gods. The sacrificer who does not partly bake a cake and partly leave it unbaked, should therefore bake the cake thoroughly (as) it is liked by the gods." If in the last causative sentence, the adjectival sentence —who does not bake the cake thoroughly—were connected with the demons already mentioned, it would be a case of *inverse transference* (*Apakarsa*) for in the full-moon sacrifice, there is no offering to the demons. Then there would be an original statement enjoining what is evidently absurd. The course of the discourse in the Sanhitâ would be ignored. It is therefore, necessary not to introduce a part of a subordinate statement into an original principal statement by means of what is called *inverse transference.* An original statement is to be considered as independent and is not to be mixed up with a subordinate statement. Thus an original statement is distinct from a subordinate one.

25. The exegetical defect based on the division of a sentence is examined by Jaimini in the sûtras (II. 1, 46-47.) Our readers will kindly refer to the translation of the Vaidika text in the foot-note to the 19th sûtra. In the beginning of the text, the original statement. "A sacrificial post is

सूत्राणि.

अथ हेतुवन्निगदाधिकरणम् ॥

हेतुर्वा स्यादर्थवत्त्वोपपत्तिभ्याम् ॥ २६ ॥ (पू०)

पदानि । (स्तुतिः) हेतुः वा, स्यात्, अर्थवत्त्व–उपपत्तिभ्याम् ॥

पदार्थः । हेतुः=कारणम्, वा=पुनः, स्यात्=(स्पष्टम्) अर्थवत्त्वोपपत्तिभ्याम्=अर्थवत्त्वंच उपपत्तिश्च=अर्थवत्त्वोपपत्ती ताभ्याम् । अर्थवत्त्वम्=अर्थवतोधर्मः । अर्थवत्=यस्यार्थोस्ति तत् । तस्य धर्मो=अर्थः । अर्थवत्त्वम् तर्हि=स्वतंत्रोर्थः । उपपत्तिः=(टिप्पनी द्रष्टव्या)

वाक्यार्थः । पुनः । वाक्यसम्बन्धेनार्थविचारादुपपत्तेश्च स्तुतिस्तु हेतुर्भवेत् ॥

भावार्थः । अर्थवादस्य हेतुत्वेन ग्रहणम् । कुतः । वाक्यार्थविचारेणोपपत्त्या च स्तुतिवचनानां हेतुता प्राप्नोति । इति पूर्वपक्षः ॥

वेदवाक्यान्यनुसन्धेयानि ॥

शूर्पेण जुहोति तै० ब्रा० [१.६,५.] तेन ह्यन्नं क्रियते ॥

एक विधिवाक्य आणि दुसरें स्तुतिवाक्य अशी व्यवस्था न करतां आणि "बलाच्या प्राप्तीकरतां" या स्तुतिवाक्यास विधिवाक्य मानलें असतां वाक्यभेदरूप दोष उत्पन्न होतो, म्हणजे कारण नसतां एका वाक्याचीं दोन वाक्यें केलीं असें पक्करावें लागतें. म्हणून स्तुतिवाक्य आणि विधिवाक्य ही कल्पना चांगली आहे.

of the fig-tree," occurs; and at the end of the same text, the words—"for getting strength"—occur. The last is an abridged subordinate sentence. Now if instead of the first being the original statement and the last, a subordinate statement, the last were considered to be an original statement, then there would be the defect called the division of the same statement that is, without any special cause one statement is split up into two independent statements. It is, therefore, reasonable to distinguish an original statement from a subordinate statement.

ज्या निगदांत कारणाचें वर्णन असतें, त्यांचा विचार.

२६. नाहीं. तें हेतुवाक्य, कारण (हेतुवाक्याच्या अंगीं) अर्थवत्त्व आणि उपपत्ति हे दोन धर्म असतात. (पू०)

२६ या सूत्रांत "अर्थवत्त्व" आणि "उपपत्ति" हे दोन शब्द विचार करण्या जोगे आहेत. प्रथम अर्थवत्त्वशब्द घेऊं. ज्याला अर्थ आहे, तें अर्थ-वत्. या स्थळीं अर्थवत् हें धर्मी आहे आणि अर्थ हा त्याचा धर्म आहे. आतां, अर्थवत्त्व म्हणजे अर्थवत् या धर्मीवर राहणारा धर्म आहे. पुनः वाक्यहि अर्थवत् होईल. आणि वाक्यावरला धर्म वाक्यत्व हा आहे. वाक्यत्व म्हणजे अर्थ होईल. थोडा सूक्ष्म विचार आहे. वाचकांनीं लक्ष द्यावें. वाक्यत्व हें नानाधर्माच्या समूहाचें नांव आहे. त्यामध्यें अर्थ, विचार, रचना, अशा अनेक धर्मांचा समावेश होतो. म्हणून जैमिनीनें वाक्य हा शब्द योजला नाहीं. अर्थवत्त्व म्हणजे धर्मधर्मिसंबंधानें केवळ अर्थ असें निष्पन्न होतें. हेतुवाक्य स्वतंत्र समजावें, कारण हेतुवाक्याच्या अंगीं स्वतंत्र अर्थ असतो. उपपत्तिशब्दाचा विचार केला पाहिजे. न्यायशास्त्रांत या विचाराचें माहात्म्य मोठें आहे. काणादीय वैशेषिक दर्शनाची चिंतनिका करतांना उपपत्तीविषयीं विशेष विवेचन करूं. एथें फक्त उपपत्तीचें

The subject of the *Nigadas* (texts of the Yajurveda) which are causative.

26. No, it is a causative statement, because (a causative statement has) independent signification and (power of) explanation. (Statement of the opponent.)

26. The terms *Arthavattva* and *Upapatti* in this sûtra call for special explanation. First, *Arthavat* is that which has *Artha*. In this case, *Arthavat* has for its quality, *Artha*. In other words signification is the quality of the significant. Now a sentence may be *significant*, and a sentence has the quality of the general nature of a sentence or the quality of its belonging to the genus of sentences. A mark of the genus—a sentence,—will be signification. This is a nice distinction which deserves the attention of our readers. The genus—a sentence,—as based on its nature, is an assemblage of many marks including signification, syntactical arrangement, and the sequence of thoughts. Therefore, the genus—a sentence—does not denote only one mark—signification. The genus (a sentence) is called Vâkyatva in Sanskrita. Hence the last term is not used by Jaimini in the sûtra. Again *Arthavattva* is the quality of the significant. *Arthavattva* is, therefore, the same as *Artha* or signification. Then why is this confused phraseology employed by Jaimini? The answer is—*Artha* (signification) is essentially different from *Arthavattva*. The first may be a

सूत्राणि.

स्तुतिस्तु शब्दपूर्वत्वादचोदना च तस्य ॥ २७ ॥

पदानि । [हेतुः] स्तुतिः, तु, शब्दपूर्वत्वात्, अ-चोदना, च, तस्य ॥

पदार्थः । शब्दपूर्वत्वात्=पूर्वंगतः शब्दः=शब्दपूर्वम् । तस्य धर्मः=शब्दपूर्वत्वम् तस्मात् । अचोदना=यद्वाक्यमविधायकं तत् । [अवशिष्टानि पदानि स्पष्टानि]

वाक्यार्थः । न । हेतुः स्तुतिः पूर्वविधिवर्णनात् । पुनः । हेतोश्चोदनाशक्तिर्नास्ति । [प्रसज्यप्रतिषेधोऽयम्]

भावार्थः । हेतुप्रतिपादकं वाक्यं स्तुतिर्भवति । कुतः । यस्य विधेर्हेतुः स विधिः पूर्वमेव विद्यते । पुनः । हेतुप्रतिपादकवाक्यस्य विधायकत्वशक्तिर्नास्ति ॥

स्वरूपकथन केलें म्हणजे पुरे. दोन अर्थांचा साहचर्यसबंध असला म्हणजे त्यांतील एकास कारण व दुसऱ्यास कार्य असें म्हणतात, आणि व्याप्य कोण व व्यापक कोण यावरून कार्यकारणभाव बहुधां बसावितां येतो, परंतु आनुगमिक सिद्धांत करतांना कार्यकारणभावाचा निश्चय करावा लागतोच, परंतु तेवढ्यानेंच सिद्धांतविचार पुरा होत नाहीं. विचार करणाऱ्याच्या मनाची वृत्ति होत नाहीं. विचार समजला पण उमजला नाहीं असें वाटतें. अशा प्रसंगीं त्या विचाराची फोड करणारी आणि त्याची व्यवस्था लावणारी जी एखादी कल्पना रचण्यांत येते त्या कल्पनेचें नांव उपपत्ति. यास दृष्टांत. विजेमागून घडघडाट होतो हें सर्वांस ठाऊक आहे, आणि वळवाच्या पावसाम- ध्यें बीज होते हेंहि सर्वांस ठाऊक आहे.

mark out of the many marks which a genus denotes: the last is essentially the mark of what is significant. We have translated *Arthavattva* by independent signification. The opponent argues that a causative statement is independent, because it possesses independent signification. Now, the examination of the sense of the term *Upapatti*,—a subject of special importance in logic. In discussing the philosophy of Kanâda, *Upapatti* will be particularly examined. We will here indicate only the general nature of *Upapatti*. When two phenomena invariably follow one another or invariably co-exist, one of them is a cause and the other, an effect. This relation is fixed by the examination of the relation between the pervading and non-pervading phenonemena—called respectively *Vyâpaka* and *Vyâpya*. In establishing a general proposition,

२७. पुनः हेतुवाक्य स्तुति-वाक्य, कारण विधिवाक्याचें वर्णन पूर्वी असतें. आणि हेतु-वाक्याच्या अंगीं चोदनाशक्ति नाहीं. (सि०)

27. Again, a causative statement is a subordinate statement because it follows an original statement, and a causative statement cannot enjoin (any duty on man.) (Final statement.)

विजेचा आणि वळवाच्या पावसाचा कार्य-कारणसंबध आहे. पुनः घडघडाटाचा आणि विजेचा कार्यकारणसबंध आहे. यावरून जेव्हां होतो तेव्हां विजेमागून नेहमी घडघडाट होतो ही व्याप्ति सर्वांस मान्य आहे. आणि वळवाच्या वेळीं बीज होते हीहि व्याप्ति सर्वांस मान्य आहे. परंतु आपल्या मनाची समजूत पाडून घेण्या करतां मुलें हि कल्पना करतात, आणि शेतकरीहि कल्पना करतात. ह्या कल्पनेला वास्तविक उपपत्ति म्हणावें. दोन धर्मावरून हेतु काय हें कळतें. यांतला एक धर्म अर्थवत्त्व, आणि दुसरा उपपत्ति. अर्थवत्त्व म्हणजे स्वतंत्र अर्थ आणि स्वतंत्र अर्था-विषयीं जी कल्पना ती उपपत्ति. दृष्टांता करतां वेदवाक्य पहावें. "सुपानें याग करतो, कारण त्याच्या योगानें अन्न सिद्ध होतें." तै० ब्रा० (१.६,५.) या स्थळीं जें कारण वर्णिलें आहे, तें कारण हेतु आहे. कारण "त्याच्या योगानें अन्न सिद्ध होतें" हें वाक्य स्वतंत्र आहे. जर सुपा-नें अन्न सिद्ध होतें म्हणून त्यानें याग करावा असा संबंध बसविला, तर लांकडानें अन्न सिद्ध होतें, म्हणून त्यानें याग करा-वा असें प्राप्त होईल. म्हणून हेतुवाक्य हें स्वतंत्र वाक्य आहे, असा पूर्वपक्षाचा आशय आहे.

---

the relation of a cause to an effect requires to be determined. But this alone cannot establish a general proposition. The mind of a thinker is not satisfied. A general proposition is simply laid down, but its nature is not perceived. At this stage of the investigation, a theory which analyzes the general proposition into its elements and discovers their relation with one another is called Upapatti which corresponds to *explanation* in philosophy. An illustration. It is well-known that thundering follows the lightning which flashes during the irregular monsoons. The lightning and the irregular monsoons are connected as cause and effect. Again, thundering and the lightning are connected as cause and effect. Hence the universal propositions, that the rumbling of thunders in every case follows the lightning and that the lightning flashes only during the irregular monsoons are generally known and recognized. But every body—even children and cultivators—seeks to see how this takes place, and to propose a theory. Such a theory is called *Upapatti* or *explanation*. A causative statement is defined in the sûtra, and its elements and properties are pointed out. One of them is independent signification, and the other is *expla-*

सूत्राणि.

व्यर्थे स्तुतिरन्याय्येति चेत् ॥ २८ ॥

केचित् सूत्रमिदं न सूत्रत्वेन वर्णयंति । किन्तु भाष्यत्वेन ॥

भावार्थः । निष्प्रयोजने हेतौ तस्य स्तुतित्वेन ग्रहणमयुक्तिकं । कुत इति पृष्टं चेदुत्तरसूत्रं द्रष्टव्यम् ॥

---

२७. मूळ संस्कृत सूत्रांत "शब्दपूर्वत्व" आणि "चोदना" अशीं दोन पदें आहेत. (१.१,२.) या सूत्राच्या टिपेंत चोदनाशब्दाच्या अर्थाविषयीं विचार केला आहे. आतां शब्दपूर्वत्व याचा विचार केला पाहिजे. "शब्दपूर्व" म्हणजे ज्यांत शब्द पूर्वी गेला आहे तें. शब्दपूर्वावरील धर्म शब्दपूर्वत्व. शब्द म्हणजे विधि असा येथें अर्थ आहे. या स्थळीं शब्दपदाच्या अर्थाकडे विशेष लक्ष द्यावें, कारण मीमांसाशास्त्रामध्यें शब्द नित्य आहे अशा कटाक्षानें शब्दपदाचा उपयोग होतो. वैदिक विधीला शब्द कां म्हणावें असें विचारावेंसें वाटतें. त्याचें उत्तर इतकेंच कीं, मूळ ध्वनिरूप शब्द आहे. त्याचे पोटभेद वैदिक शब्द, लौकिकशब्द, नगाऱ्याचा शब्द, वायूचा शब्द असें मानतां येतील. परंतु वैदिक शब्द याविषयीं विशेष माहात्म्य वाटून त्यास शब्द अशी संज्ञा दिली आहे. विधि पूर्वी असतो, आणि मागून हेतु येतो, हें एक कारण आणि हेतूच्या अंगीं चोदना शक्ति नसते, हें दुसरें कारण. या दोन कारणांमुळें हेतुवाक्य स्तुतिवाक्य आहे.

nation. The Vaidika text quoted in Sanskrita by way of illustration is to be examined. "He sacrifices by a winnowing basket because food is prepared by it," occurs in the Taittiríya Brâhmana (I. 6, 5.) The reason introduced by *because* in the above text is a *Hetu,* for the sentence—"because food is prepared by it" has independent signification. Because food is prepared by a winnowing basket, therefore, it is the means of a sacrifice. Then fuel is used in preparing food, therefore, it will be proper to sacrifice by means of fuel. But this cannot be permitted. Therefore, a causative statement has independent signification and is introduced to explain another statement with which it is not connected either as cause or effect. The opponent argues that a causative statement is not connected in any way with an original statement.

27. In the Sanskrita sûtra, the terms Shabda-pûrvatva and Chodanâ are used. The sense of the last is examined in the footnote to the sûtra (I. 1, 2.) Now the term Shabda-pûrvatva has to be considered. Shabda-pûrvatva is the property of the *Shabda-pûr-*

२८. हेतुवाक्यांत (स्तुतीचें) प्रयोजन नसलें म्हणजे त्याला स्तुतिवाक्य मानावें हा अन्याय आहे, असें म्हटलें तर. (सिद्धांतावर आशंका.)

२८. कोणी या सूत्रास स्वतन्त्र सूत्र मानतात, आणि कोणी यास भाष्यामध्यें मोडतात. परंतु हें स्वतन्त्र सूत्र मानलें असतां बरें. कारण येणेंकरून पुढील सूत्रास अवतरण होतें. सूत्राचा अर्थ स्पष्ट आहे. त्याचा एकंदर सारांश इतकाच कीं स्तुतीचें जें कार्य तें हेतुवाक्य करीत नाहीं. मग हेतुवाक्यास स्तुतिवाक्य कां म्हणावें? अशी उत्थापित आशंका काढली आहे. इचें समाधान पुढले सूत्रांत आहे.

28. If it be said that it is unjust to consider a causative statement to be a subordinate statement as it does not describe an original statement, then—(An objection against the final statement in the 27th sûtra.)

va which means that which is preceded by a word (Shabda) which means in this discussion an original statement (Vidhi). The term *Shabda* deserves special attention, for it is used in the Pûrva-Mîmânsâ in the sense of the *eternal word*. We are inclined to enquire why a Vidhi(a scriptural injunction) should be called *a word*. Originally a word is a sound which is divided into Vaidika or sacred, profane, that of a drum, and that of wind. The general term—word(Shabda)—is used in the sense of a scriptural injunction by way of pre-eminence, as it were to proclaim its importance. The reason why a causative statement is to be considered subordinate is that it follows an original statement. The second reason is that it cannot enjoin any duty. On account of these two reasons, a causative statement is a subordinate statement.

28. This is considered by some to be an independent sûtra. Others think that this is a part of a commentary interpolated into the body of the Mîmânsâ. But it would be well if this were considered an independent sûtra, because it introduces and elucidates the next sûtra. The gist of this sûtra is that a causative statement does not perform the func-

सूत्राणि.

अर्थस्तु विधिशेषत्वाद् यथा लोके॥ २९ ॥

पदानि । (तस्य=हेतोः) अर्थः, तु, विधि-शेषत्वात्, यथा, लोके ॥

पदार्थः । विधिशेषत्वात्=विध्युपोद्बलकत्वात् । (अवशिष्टानि पदानि स्पष्टानि)

वाक्यार्थः । पुनः हेतोरर्थोऽस्ति । हेतोर्विध्युपोद्बलकत्वग्रहणात् । लोकेऽपि पद्धतिरेषा दृश्यते ॥ यथा लौकिकव्यवहारेषु मुख्यार्थ-प्रतिपादनात् सिद्धान्ताद् हेतुर्भिद्यते तथा वैदिकेषु वाक्येषु विधेर्हेतुर्भिद्यते तयोर्भेदे गृहीते वाक्यार्थः सम्भवति नत्वन्यथा ॥

---

tion of a subordinate statement. Then Jaimini himself asks why a causative statement should be called a subordinate statement. This question is answered in the following sûtra.

२९. नव्हे. विधिवाक्याचें शेषवाक्य होणें हेंच हेतुवाक्याचें प्रयोजन आहे. (आणि) लौकिकव्यवहारांतहि असाच प्रचार दिसून येतो. (आशंकानिरास.)

२९. मूळ संस्कृतसूत्रामध्यें "विधिशेषत्व" हें पद विचार करण्याजोगें आहे. शेषशब्दाची व्याख्या (१.२,२२-२३.) सूत्रांच्या टिपेंत केली आहे. परार्थाच्या म्हणजे दुसऱ्याच्या उपयोगीं जें जें पडतें, त्याचें नांव शेष. विधिवाक्याचे उपयोगीं हेतुवाक्य पडतें, विधिवाक्याचे अर्थास दृढता आणतें, विधिवाक्याचा अर्थ खुलवितें, आणि त्यामध्यें गोडी उत्पन्न करतें, म्हणून हेतुवाक्य परतंत्र आहे. आणि विधिवाक्य स्वतंत्र आहे. आतां, अहो पूर्वपक्षकार, हेतुवाक्याला विधिवाक्य आपण म्हणतां हें कसें? हेतुवाक्याचे धर्म निराळे, विधिवाक्याचे धर्म निराळे. विधिवाक्य प्रधान असून स्वतंत्रतेनें नवीन अर्थ वर्णन करतें, आणि हेतुवाक्य गौण असून परतंत्रतेनें सांगितलेल्याच अर्थाला दाढर्ढ्य आणतें. असा भेद असतां तुम्ही दोन्ही एकच म्हणतां हें सयुक्तिक नाहीं. पुनः तुम्ही असें म्हणतां कीं सुपानें अन्न सिद्ध होतें म्हणून सुपानें याग करावा. पण सुपानें याग करावा कां? अन्न सिद्ध होतें म्हणून ना? मग ज्यानें ज्यानें अन्न सिद्ध होतें त्यानें त्यानें याग करावा. लांकडानें अन्न सिद्ध होतें म्हणून लांक-

29. No, the purpose of a causative statement is to describe fully an original statement, (and) in common life, such a practice is observed to exist. (The objection removed.)

29. The term *Vidhi-shesatva* in the Sanskrita sûtra deserves to be considered. The term *Shesa* is explained in the foot-notes to the sûtras (I. 2, 22-23.) Whatever serves the purpose of others is called *Shesa.* A causative statement serves the purpose of an original statement : the first strengthens and enlarges the sense of the last, by rendering it acceptible. Therefore, a causative statement is dependent, while an original statement is independent. Jaimini now asks the opponent why he considers a causative statement to be the same as an original statement, as the properties of the one differ from those of the other. An original statement is both principal and independent and expresses what is entirely unkown, while a causative statement is both subordinate and dependent and only adds to the force of what is already known. Such being the distinction between the two, it is simply unreasonable to assert their identity. Again, it is said by the opponent that "one should sacrifice by means of a winnowing basket because food is prepared by it." But a winnowing basket is used in a sacrifice simply because it is the means of preparing food. Then whatever is the means of preparing food

सूत्राणि.

यदि च हेतुरवतिष्ठेत निर्देशात् सामान्यादिति चेत् अव्यवस्था विधीनां स्यात् ॥ ३० ॥ (सि० यु०)

पदानि । (स्तुतिः) यदि, च, हेतुः, अवतिष्ठेत, निर्देशात्, सामान्यात्, इति, चेत्, अ-व्यवस्था, विधीनाम्, स्यात् ॥

पदार्थः । अवतिष्ठेत=व्यवस्थाविशिष्टः स्यात् । निर्देशात्=विशेषप्रतिपादनात् । सामान्यात्=जात्यभिप्रायेण । अव्यवस्था=व्यवस्था-हानिः ॥

वाक्यार्थः । यदि स्तुतिर्हेतुस्तर्हि विशेषप्रतिपादनाद् व्यवस्थाविशिष्टो भवेत् । हेतोर्जात्यभिप्रायेण ग्रहणं चेद् विधीनां व्यवस्थाहानिः स्यात् ॥

भावार्थः । पूर्वपक्षकाराचार्ययोरस्मिन् वादे विशेषो वर्त्तते । स विशेषः कः । अर्थवादानां विधिहेतुता चेद् यस्य यस्य हेतुता प्राप्नोति तस्य तस्य ग्रहणमापतेत् । शूर्पेण जुहोतीत्याकारकस्य विधेः रूपान्तरं भवेत् । दर्व्या जुहोतीत्यापतेत् । निर्दिष्टविधेस्तर्हि व्यवस्थाहानिः स्यात् । अव्यवस्थाप्रसङ्गः प्राप्नुयात् । अव्यवस्थाप्रसङ्गोऽनिष्टः । अत एव शूर्पेण जुहोति तेन ह्यन्नं क्रियत इत्याकारकविधौ व्यक्त्यभिप्रायेण विधिनिर्दिष्टहेतोर्ग्रहणम् । न तु जात्यभिप्रायेणेति सूत्राशयः । अव्यवस्थाप्रसङ्गमुद्दिश्य ब्रवीति कुमारिलभट्टः । तस्मादलंहेतुत्वेन । स्तुतित्वमेव वरमिति ॥

डानें याग करावा, असें आपण बोललांच आहां. (१.२,२६.) सूत्रावरील टीप पहा. पण असा प्रकार नाहीं. रामा कृष्णाला आणि हरीला कुस्तींत पाडतो, असें म्हटलें म्हणजे कृष्णा आणि हरी यांच्यापेक्षां रामाचें बल अधिक आ-

should be used in a sacrifice. Hence fuel is to be the means of a sacrifice. This statement the opponent makes in the foot-note to the sûtra (I. 2, 26.) But fuel cannot be the means of a sacrifice. Take an illustration from common life. Râmâ beats Krishnâ as well as Hari in a wrestling

३०, आणि जर स्तुतिवाक्य हेतुवाक्य आहे असें म्हटलें तर (एवज्याच)वर्णनानें विधिवाक्याची व्यवस्था होईल. पर्याप्तिसंबंध आहे म्हटलें तर सर्व विधींची अव्यवस्था होईल. (सि० यु०)

30. If a causative statement be considered a subordinate statement in a particular relation, then an original statement can be (properly) adjusted. If the relation of adequateness be asserted, all original statements will be unsettled. (An argument in support of the final statement.)

है, इतकेंच सिद्ध झालें. तर हें सोडून सर्व ब्रम्हांडावर रामाचें बल अधिक झालें असें म्हणणें साजेल काय ? कधीं साजणार नाहीं. तसेंच सुपानें अन्न सिद्ध होतें म्हणून सुपानें याग करावा हें वर्णन केवळ सुपाचें आहे. यास फांटे फोडून ज्यानें ज्यानें अन्न सिद्ध होतें त्यानें त्यानें याग करावा असें व्यापक वचन असयुक्तिक आहे, आणि लौकिकव्यवहाराविरुद्ध आहे. हेतुवाक्याचा कटाक्ष केवळ विधिवाक्याचें प्रशोचन करण्यावर असतो. विधिवाक्यामध्यें आणि हेतुवाक्यामध्यें पर्याप्तिसंबंध नसतो. पर्याप्तिसंबंध म्हणजे सर्व प्रकारें आणि सर्व स्थळीं त्या कारणानें तेंच कार्य उत्पन्न व्हावें. जसें रामा लंगडतो, कारण तो काल पडला. परंतु वायूची बाधा झाल्यानें रामा लंगडेल, करट झाल्यानें रामा लंगडेल, पाय बधिर पडल्यानें रामा लंगडेल, आणि पडल्यानेंहि रामा लंगडेल. पुनः पडल्यानें लंगडा न होतां हात मोडून घेईल. यामुळें जो जो पडतो तो तो लंगडतो असा पर्याप्तिसंबंध सिद्ध होत नाहीं. इतकेंच

---

match. Hence it is only to be inferred that Râmâ excels *Krisnâ* and Hari in strength. But it cannot be said that Râmâ excels the whole world in strength. To say so is simply absurd. It is simply the description of a winnowing basket to state that food is prepared by means of it. This statement can not be developed into the universal proposition that whatever prepares food is the means of a sacrifice, and is opposed to all experience in life. A causative statement simply enlarges the signification of the principal statement. The relation between an original statement and a causative statement is not that of *adequateness* of cause and effect called *Paryâpti*. *Adequateness* insists on the same cause invariably producing the same effect. Take an illustration. Râmâ limps because he fell yesterday; but he may limp if affected by rheumatism. Again Râmâ may limp if a boil breaks out on his leg or if his leg be benumbed. He limps because he fell yesterday. But instead of getting his leg hurt, he may get his arm injured. Therefore, there is no invariable sequence between limping and falling as

कीं "रामा लंगडतो" आणि "कारण तो पडला" अशीं दोन वाक्यें आहेत. त्यांपैकीं पहिलें विधिवाक्य व दुसरें हेतुवाक्य.

३०. मूळ संस्कृत सूत्रांत जीं "सामान्यात्" "अव्यवस्था" आणि "निर्देश" अशीं पदें आहेत त्यांचा थोडासा विचार केला पाहिजे. सामान्य आणि विशेष हीं सापेक्ष पदें आहेत. सामान्य म्हणजे जाति, विशेष म्हणजे व्यक्ति. पण सामान्यशब्दाचा विशेष अर्थ आहे तो मागील सूत्रावरील टीप पाहिली म्हणजे लक्षांत येईल. तेथें पर्याप्तिसंबंधाचें वर्णन केलें आहे. सामान्य या पदापासून पर्याप्तिसंबंधाचा बोध होतो. हेतुवाक्यामध्यें आणि विधिवाक्यामध्यें पर्याप्तिसंबंध मानिला असतां शास्त्रांमध्यें किंवा वेदांमध्यें जितकीं म्हणून विधिवाक्यें आहेत तितक्यांची अव्यवस्था होईल. आतां "व्यवस्था" या शब्दाचा अर्थ काय हा विचार करणें आहे. प्रत्यक्ष प्रमाणाच्या आधारानें अथवा अमुकच गोष्ट अमक्याच स्थितींत असावी अशीं सर्वमान्य अनुमानें यांच्या अनुरोधानें जें जें काय आहे त्यां त्यांवर व्यवस्था हा धर्म अढळतो. व्यवस्थेच्या अभावास अनवस्था असें शास्त्रीय पद आहे. आणि अनवस्थाप्रसंग हा शास्त्रीय विचारांत मोठा दोष आहे असें मानिलें आहे. अनवस्थाप्रसंगाचें एक उदाहरण देतों, म्हणजे व्यवस्था पदाचा अर्थ लक्षांत येईल. पृथ्वीचा आधार काय ? तर शेषाहि. शेषाहीचा आधार काय असें विचारीत गेलें तर अमुकच ठिकाणीं थांबावें असें न समजतां सर्व विचारांची अव्यवस्था हो-

the cause—falling—does not invariably produce the effect—limping. There are two statements:—Râmâ limps and because he fell yesterday. The first is an original statement and the second—a subordinate statement. That is, the last explains the first.

30. The term *Sâmânyât, Avyavasthâ* and *Nirdesha* in the original Sanskrita sûtra are to be examined. The terms Sâmânya (a generality) and *Vishesa* (a particularity) are correlative. But the special sense of the term *Sâmânya* as used in this discussion is explained in the foot-note to the preceding sûtra as the phrase—*adequateness of cause and effect* is explained in it for a generality is used in these sûtras in the sense of adequate causal relation, when the same cause invariably produces the same effect. When such a relation (Paryâpti-sambandha) is recognized between causative sentences introduced by such words as *because* or *for* and the principal sentence (an original statement) the syntactical arrangement of the last will be unsettled. The next question is what is the meaning of the term—adjustment (Vyavasthâ) as used in the sûtra. Adjustment, arrangement or order is found to be a property of that, the conditions of the existence of which are determined by sensuous perception or by correct inferences drawn from correct premises, and acknowledged to be such by persons able to judge of the subject. The absence of such an adjustment is called *Anavasthâ* or *non-adjustment*. A case of *non-adjustment* (Anavasthâ-prasanga) is well-known to the language of Indian philosophy. It is consi-

ऊन जाईल. अशा प्रकारच्या अव्यवस्थेस अनवस्थाप्रसंग म्हणतात. निर्देश म्हणजे स्पष्टपणें विशेष वर्णन करून जें सांगितलें असतें तें. या ठिकाणीं निर्देश-शब्दाचा अर्थ विशेष असा घ्यावा. विशेष आणि सामान्य हे सापेक्ष धर्म आहेत असें सांगितलेंच आहे. आतां एकंदर सूत्रार्थाचें निरूपण करतां येईल. हेतुवाक्य स्तुतिवाक्य आहे असें जर म्हटलें तर हें विशेष वर्णन होतें येणेंकरून हेतुवाक्याच्या आणि विधिवाक्याच्या संबंधाची व्यवस्था लागते. हेतुवाक्य सामान्य आहे असें म्हटलें तर हेतुवाक्याच्या आणि विधिवाक्याच्या संबंधाची अव्यवस्था होते, म्हणून हेतुवाक्य स्तुतिवाक्य आहे असें म्हणावें. "सुपानें अन्न सिद्ध होतें म्हणून सुपानें याग करावा." या वेदमंत्रामध्यें सुपानें अन्न सिद्ध होतें हें केवळ सुपाचेंच विशेष वर्णन आहे. आणि सुपानें याग करावा हा विधि यजमानाच्या मनांत भरावा इतकेंच त्याचें पर्यवसान आहे. सुपानें अन्न सिद्ध होतें या हेतुवाक्याचा सामान्य अर्थ असा केला कीं ज्यानें ज्यानें अन्न सिद्ध होतें तें तें समजावें, तर विधिवाक्यांत कांहींच तात्पर्य नाहीं असें निष्पन्न होईल; म्हणजे ज्यानें ज्यानें अन्न सिद्ध होतें त्यानें त्यानें याग करावा, असें प्राप्त होईल. लांकडांनीं अन्न सिद्ध होतें म्हणून लांकडांनीं याग करावा, पाण्यानें अन्न सिद्ध होतें म्हणून पाण्यानें याग करावा, असें कल्पिलें असतां मूळ वेदविहित विधीची वाताहत झाली. या वाताहतीचेंच नांव अव्यवस्था. याकरितां अशी अव्यवस्था ऊन जाईल. अशा प्रकारच्या अव्यवस्थेस अनवस्थाप्रसंग म्हणतात. निर्देश म्हणजे स्पष्टपणें विशेष वर्णन करून जें सांगितलें असतें तें. या ठिकाणीं निर्देश-शब्दाचा अर्थ विशेष असा घ्यावा. विशेष आणि सामान्य हे सापेक्ष धर्म आहेत असें सांगितलेंच आहे. आतां एकंदर सूत्रार्थाचें निरूपण करतां येईल. हेतुवाक्य स्तुतिवाक्य आहे असें जर म्हटलें तर हें विशेष वर्णन होतें येणेंकरून हेतुवाक्याच्या आणि विधिवाक्याच्या संबंधाची व्यवस्था लागते. हेतुवाक्य सामान्य आहे असें म्हटलें तर हेतुवाक्याच्या आणि विधिवाक्याच्या संबंधाची अव्यवस्था होते, म्हणून हेतुवाक्य स्तुतिवाक्य आहे असें म्हणावें. "सुपानें अन्न सिद्ध होतें म्हणून सुपानें याग करावा." या वेदमंत्रामध्यें सुपानें अन्न सिद्ध होतें हें केवळ सुपाचेंच विशेष वर्णन आहे. आणि सुपानें याग करावा हा विधि यजमानाच्या मनांत भरावा इतकेंच त्याचें पर्यवसान आहे. सुपानें अन्न सिद्ध होतें या हेतुवाक्याचा सामान्य अर्थ असा केला कीं ज्यानें ज्यानें अन्न सिद्ध होतें तें तें समजावें, तर विधिवाक्यांत कांहींच तात्पर्य नाहीं असें निष्पन्न होईल; म्हणजे ज्यानें ज्यानें अन्न सिद्ध होतें त्यानें त्यानें याग करावा, असें प्राप्त होईल. लांकडांनीं अन्न सिद्ध होतें म्हणून लांकडांनीं याग करावा, पाण्यानें अन्न सिद्ध होतें म्हणून पाण्यानें याग करावा, असें कल्पिलें असतां मूळ वेदविहित विधीची वाताहत झाली. या वाताहतीचेंच नांव अव्यवस्था. याकरितां अशी अव्यव-

dered to be a serious defect in logical reasoning to be compelled to admit that a proposition stated is a case of *non-adjustment*. An illustration will simplify the explanation. On what does this earth rest? The reply is—on the hood of a huge serpent. On what does the serpent rest? If such questions be repeated *ad infinitum*, there can be no finality in this investigation. The want of finality under such circumstances is a case of *non-adjustment*. Now the term *Nirdesha* means a specific statement made in so many words. But in the sûtra under consideration, it appears to mean a simple particularity as opposed to a generality. We have already stated that a particularity and a generality are correlative terms. Now the ground for offering an explanation of the sûtra is prepared. When a subordinate sentence is called a causative sentence, it is a particular statement which adjusts the relation between a causative sentence and the principal sentence in a passage. When a causative sentence is considered to be a general statement expressive of the invariable relation of a cause to an effect, the adjustment of the relation of the principal sentence in a passage is disturbed. A causative sentence is, therefore, a subordinate sentence. In the Vaidika text, "he sacrifices by a winnowing basket, because food is prepared by it," the latter portion of the passage introduced by *because*, is simply a special description of a winnowing basket, and its function is to induce a sacrificer to use a winnowing basket in a sacrifice. If the sentence that "food is pre-

सूत्राणि.

अथ मन्त्रलिङ्गाधिकरणम् ॥

तदर्थशास्त्रात् ॥ ३१ ॥ (पू० १.)

पदानि । तत्, अर्थ-शास्त्रात् ॥
भावार्थः । यदा सम्प्रैषः क्रियते तदा तेन यज्ञकर्मणो गर्हादिदुष्टत्वं निराक्रियते । कथम् । कर्मसम्बन्धिद्रव्यादीनि संस्क्रियन्ते तत्संस्कारद्वारा ॥ (तृतीयपूर्वपक्षसमाधानमिदम्) पूर्वपक्षस्तूच्चारणादृष्टम् । तन् न । कर्तव्यमित्यपि विज्ञातेऽनुष्ठानकाले स्मृत्या प्रयोजनम् । उपायान्तरेणापि सा प्राप्नोति । अतोऽनेनोपायेन कर्तव्येति । नियमार्थमाम्नानम् । संस्कारत्वात् । इति शबरः॥

अनुसन्धेयानि वेदवाक्यानि ॥

प्रोक्षणीरासादय ॥ तै. ब्रा. (३.२,९.)

त्यांत "अविरुद्धम्" पदाचा अर्थ स्पष्टच आहे. "परम्" म्हणजे दुसरें. दृष्टप्रयोजन आणि अदृष्टप्रयोजन या दोहोंचें विवेचन पूर्वी (१.२,१०.) सूत्राच्या टिपेंत केलें आहे. दृष्टप्रयोजन म्हणजे प्रत्यक्षप्रयोजन. दृष्टप्रयोजन घ्यावें असाच आग्रहधरून इतका वेळ जैमिनीनें वाद केला. परंतु जैमिनी या सूत्रांत असें म्हणतो कीं "कांहीं पूर्वपक्षकार, वेदमन्त्र तोंडपाठ केल्यानें पुण्यादिक कांहीं अप्रत्यक्ष फल प्राप्त होतें असें तुमचें म्हणणें आहेना ? त्यावर वेदमन्त्राचा अर्थ समजल्यानें कांहीं अप्रत्यक्ष

and *Aviruddham*. The sense of the last term is sufficiently plain. *Param* means *other*. The explanation based on experience as well as that based on the notions of the supernatural is dwelt upon in the foot-note to (I. 2, 40.) sûtra. The Sanskrita terms for the two methods of explanation are *Drista* and *Adrista*. They may be respectively identified with the *positive* and *metaphysical explanations* as these terms are now understood in Europe. Jaimini discusses the question under consideration, insisting on the first method being preferred to the last.

४५. प्रैष दिला म्हणजे (यागसंबंधी द्रव्यांवर) संस्कार होऊन यागसंबंधी उणीव पुरी होते. (उ० ५.)

फळ होतें असें आम्हांसहि म्हणतां येईल. एतावता तुमचें आमचें विचारसाम्यच झालें." विचारसाम्याचे अर्थाविषयीं पूर्वमीमांसेंतील (१.१,१२.) सूत्र पहा. हें दुसऱ्या पूर्वपक्षाचें उत्तर.

४५. याच पादाचे ४१ सूत्राचे ठिपेंत गुणशब्दाचें वर्णन करतांना द्रव्यसंस्कार म्हणजे काय हें सांगितलें आहे. प्रैष म्हणजे "अमुक कर" म्हणून जो एक ऋत्विज् दुसऱ्या ऋत्विजास आज्ञा करतो ती. गर्हा (निंदा) या शब्दाचा अर्थ उणीव असा आम्ही केला आहे. एकंदर सूत्रार्थ इतकाच कीं जेथें जेथें वेदमन्त्रांत प्रैष दिलेले अढळतात, तेथें तेथें यज्ञसंबंधी द्रव्यांवर विशेष संस्कार घडतो. तेणेंकरून यज्ञाची उणीव पुरी होते, म्हणून जेथें प्रैष असतो तेथें पुनर्वर्णन होतें, या कारणाकरतां पुनर्वर्णनांत विशेष हेतु आहे. म्हणून पुनर्वर्णन दोषास्पद होत नाहीं. वेदमन्त्राचा अर्थ केला म्हणजे हें लक्षांत येईल. यज्ञद्रव्यावर शिंपडण्या करतां पाणी ज्या पात्रांत ठेवतात, त्या पात्रास प्रोक्षणीपात्र असें म्हणतात. "प्रोक्षणीपात्रास मांड" असा मन्त्र तैत्तिरीय ब्राह्मणांत (३.२,९.) एथें आहे. या ठिकाणीं हा प्रैषरूप मन्त्र आहे. तैत्तिरीय ब्राह्मणांत (३,६,२.) याचें नांव प्रैषा-

45. When the special sacrificial order called Praisa is given, some *effect* is produced on (sacrificial) things, and it supplies the defects (of a sacrifice.) (5. Reply.)

But Jaimini for the sake of argument admits in this sûtra that some supernatural merit (such a righteousness) occurs when Vaidika texts are got up by heart, and says to his opponent that it may be as well said on his behalf that some supernatural merit occurs when the sense of Vaidika texts is understood. Thus there is parity of reasoning. The sûtra (I. 1, 12.) explains the application of parity of reasoning as made by the Mîmânsakas. The sûtra under consideration is a reply to the second statement of the opponent.

45. In the foot-note to the 41st sûtra of this pâda, the term Dravyasanskâra is explained in connection with the term guna. Dravyasanskâra is translated in the above sûtra by *effect*. When a *Ritvij*, gives an order to another *Ritvij* for doing something connected with a sacrifice, it is called Praisa. The term Garhâ (literally censure) is translated in the above sûtra by *a defect*. The gist of the sûtra is that whenever sacrificial orders happen to be given in Vaidika texts, there some special effect is to be produced on sacrificial materials. The effect supplies the defects of a sacrifice. Hence there is the repetition of a text where such sacrificial orders occur. There is, therefore, some special object in repeat-

सूत्राणि.

अभिधानेऽर्थवादः ॥ ४६ ॥ (उ० ६.)

पदानि । अभिधाने, अर्थवादः ॥

पदार्थः । अभिधाने=शब्दैरर्थप्रतिपादने । अर्थवादः=स्तावकं वचनम् ॥

वाक्यार्थः । अभिधानविषये पुनःश्रुतिरर्थवादो भवति ॥

भावार्थः । अतोऽभिधानं नाम भाष्यकारमतेन रूपकाद्यलंकारद्वाराऽर्थवर्णनमिति भाति ॥ चतुर्थपूर्वपक्षस्य समाधानमिदम् ॥

अनुसन्धेयानि वेदवाक्यानि ॥

चत्वारि शृङ्गा त्रयो अस्य पादा द्वे शीर्षे सप्त हस्तासो अस्य । त्रिधा बद्धो वृषभो रोरवीति महो देवो मर्त्याँ आविवेश । ऋ.सं. (४.५,५८.)। ओषधे त्रायस्वैनम् तै. सं. (१.२,१.) शृणोतग्रावाणः ॥ तै. सं. (१.३,१३.)

अर्थवादः क इत्यनेन लक्षणेन वर्णयति सूत्रकारः । परन्तु लक्षणाच् चत्वारि शृङ्गेति रूपकद्वारेण यागस्तुतिः कर्मकाल उत्साहं करोतीति कुमारिलभट्टः ॥

यज्ञसमृद्धये साधनानां चेतनसादृश्यमुपपादयितुकाम आमन्त्रणशब्देन लक्षयति । इति शबरः ॥

ध्याय आहे. अध्वर्यु मैत्रावरुण नांवाच्या ऋत्विजाला प्रैष देतो, आणि मैत्रावरुण होत्याला प्रैष देतो, अशी त्या अध्यायाची मांडणी आहे. प्रोक्षणपात्र मांड हा प्रैष अध्वर्यु अग्नीध्राला देतो. तिसऱ्या पूर्वपक्षाचें या सूत्रानें समाधान केलें.

ing Vaidika texts. The repetition, therefore, is not to blame. The translation of Vaidika texts quoted in the Sanskrita portion of this work will elucidate the sûtra under examination. The vessel in which water is kept to be sprinkled on sacrificial materials is called Proksanî. The text—"Put the Proksanî" occurs in the Taittiriya Brâhmana (III. 2, 9.) The whole adhyâya (III. 6, 2.) of the Taittiriya Brâhmana is called the adhyâya of sacrificial orders (Praisâdhyâya) which consists of the orders which a priest called Adhvaryu gives to a priest called Maitrâvaruna and which the last gives

४६. अभिधान असलें म्हणजे अर्थवाद होतो. (उ० ६.)

४६. मूळ संस्कृत सूत्रांत अभिधान म्हणून शब्द आहे, त्याचा विचार केला पाहिजे. कोणत्याहि अर्थाचें वर्णन केलेलें असलें म्हणजे त्यास अभिधान म्हणावें. अमुक करा असें सांगितलें म्हणजे त्यास विधान म्हणावें. अभिधानानें विदित असलेल्या अर्थाचें वर्णन होतें, आणि विधानानें जो अर्थ विदित नाहीं त्याचें वर्णन होतें. विधान हें विधिवाक्याचें लक्षण आहे. अभिधान हें अर्थवादाचें लक्षण आहे. या सूत्रानें आचार्य चवथ्या पूर्वपक्षाचें समाधान करतात. चवथा पूर्वपक्ष करतांना पूर्वपक्षकारानें याच पादाचे ३१ व्या सूत्रांत ज्या मन्त्राचें वर्णन केलें आहे तो मन्त्र एथें घ्यावा. असंभवनीय अर्थाचें अशा मन्त्रांत वर्णन नाहीं, कारण या मन्त्रांत एखादा नवाच अर्थ वर्णिला नाहीं, परंतु विदित अर्थाचें विशेष वर्णन केलें आहे, आणि तें वर्णन करतांना रूपक अलंकार साधला आहे, असा जैमिनीचा अभिप्राय आहे. त्या मन्त्रांत वर्णिलेलीं चार शृंगें म्हणजे चार होते; तीन पाद म्हणजे तीन सवनें; दोन मस्तकें म्हणजे यजमान आणि त्याची पत्नी; सात हात म्हणजे सात छंद; तीन ठिकाणीं बांधलेला म्हणजे तीन वेद (म्हणजे ऋग्वेद, यजुर्वेद, आणि सामवेद); वृषभ म्हणजे मनुष्यांचें काम पूर्ण करणारा; ओरड ओरड ओरडतो म्हणजे शब्द क-

46. Whatever gives an explanation is a subordinate statement. (6. Reply.)

to a priest called Hotâ. The order—Put the vessel called Prok*sani*—is given by a priest called Adhvaryu to a priest called Agnîdhra. This sûtra removes the third objection raised (in the 33rd sûtra) by the opponent.

46. The term Abhidhâna is used in the original Sanskrita sûtra. It calls for a special enquiry. Whatever describes any object is *Abhidhâna* which is to be distinguished from Vidhâna, the characteristic of which is—a duty-something to be done. The first describes what is already known. The last describes what is not already known. The one is the characteristic mark of a subordinate sentence. The other is the characteristic mark of an original statement. Jaimini removes in this sûtra the objection raised in the 34th sûtra. The text of the *Rik*-Sanhitâ (IV. 58, 3.) quoted by the commentator to explain the 34th sûtra is to be considered here. "Four horns, his three feet, two heads, his seven arms, an ox tied in three places, roars and roars—the great resplendent entered the mortals." Jaimini says that what is impossible is not described in this text, because no original statement is made here; but a particular description of what is already known is given, and the description is based on a figure of speech called a simile. Jaimini explains this simile thus: —the four horns are the four *Hotâ*-priests, the three feet are

सूत्राणि.

गुणादविप्रतिषेधः स्यात् ॥ ४७ ॥ (उ० ७.)

पदानि । स्पष्टानि ॥

पदार्थः । गुणात्=गौणार्थवर्णनाद् गुणवादेन वा । अविप्रतिषेधः= (उक्तपूर्वः)

वाक्यार्थः । गौणार्थवर्णनाद् विरुद्धोपन्यासो न भवेत् ॥

अष्टपूर्वपक्षे विरुद्धोपन्यासत्वं यद् दर्शितं तन्नेत्न । कुतः । पूर्वपक्षकारस्य लक्ष्येषु गुणवर्णनाङ्गीकारः कृतश्चेत् तस्य निरासो भवति । लौकिके "यथा त्वमेव माता त्वमेव पितेति तथैकरुद्रदैवत्य एको रुद्रः शतरुद्रदैवत्ये शतं रुद्रा इत्यविरोध" इति शबरः ॥

रतो, असा त्या मन्त्राचा अर्थ होतो. विधानासारखा त्याचा अर्थ न करतां अभिधानासारखा अर्थ करावा, किंवा कैमुतिकन्यायानें अर्थ लावावा, असें पूर्वपक्षावर आचार्याचें म्हणणें आहे. जेथें अर्थ असंभवनीय वाटतो, तेथें युक्तीनें अर्थ लावला पाहिजे.

the three libations (*Savanas*), the two heads are the sacrificer and his wife, the seven arms are the seven metres, the three places in which he is tied are the three Vedas (*Rik*-veda, Yajur-veda, and Sâma-veda), *Vrisabha* means one who gratifies the desires of man. *Roars and roars* means "he makes a sound." It is not a *Vidhâna* but an Abhidhâna, that is, not an original but an explanatory statement. The text may be interpreted into an *a fortiori* argument. Jaimini thus attempts to explain away whatever the opponent condemns as impossible.

४७. गौण वर्णन आहे असें मानल्यानें विरोध नाहींसा होतो. (उ० ७.)

४७. मूळ संस्कृत सूत्रांत गुणशब्दाची योजना केली आहे. त्याचा अर्थ गौण असा केला आहे. गुण आणि गुणी यांचा सापेक्ष संबंध आहे. गुणीला नेहमी गुण असतात, म्हणून गुणी प्रधान होतो, आणि गुण त्यावर अवलंबन करणारे, म्हणून त्यांची योग्यता कमी आहे. गुणशब्दापासून गौणशब्द उत्पन्न झाला आहे, त्याचा अर्थ—जें दुसऱ्यावर अवलंबन करुन रहातें, जें दुसऱ्याच्या अंगभूत होतें, म्हणजे जें परतंत्र असतें तें, असा झाला आहे. आलंकारिकवाक्यांत परतन्त्रता असते, म्हणजे त्यांचा स्वतःचा अर्थ नसतां दुसऱ्या अर्थास ही वाक्यें शोभा आणतात. अशा रीतीनें कांहीं वेदवाक्यांच्या अर्थांची योजना केली असतां वेदवाक्यांत विरोध नाहीं असें सिद्ध होईल. याच पादाचे ३६ व्या सूत्राच्या टिपेंत ज्या मन्त्रांच्या अर्थाचें वर्णन केलें आहे त्या मन्त्रांचें एथें अनुसंधान करावें. लौकिक व्यवहारांत जसें "तूंच आई, तूंच बाप, तूंच सखा," असें म्हणतात, तशाच अभिप्रायाचें लाक्षणिक वर्णन त्या मन्त्रांत आहे.

47. (A statement) being considered subordinate, there can be no contradiction. (7. Reply.)

47. The term *Guna* is used in the original Sanskrita sûtra. It is interpreted into *gouna* or subordinate. The terms *guna* and *gunî* or a quality and the qualified are correlative. The qualified is the principal in reference to its qualities which are necessarily subordinate as the latter depend on the former. The term *gouna* (subordinate) is derived from *guna* (a quality, and it means that which depends on something else, or that which, being a part or a limb as it were of a main body, is not independent. A figurative statement is dependent or subordinate, because having no independent sense of its own, it only embellishes some other statement. The contradiction with which some Vaidika texts are charged, would be removed if they be considered figurative. The Vaidika texts quoted in the foot-note to the 36th sûtra of this chapter are to be considered here. As in common life, a benevolent person is often called a father, a mother and a friend at the same time, so in the Vaidika texts referred to similar figurative language is used. The Vaidika texts are :—"There is only one Rudra (in the universe), and there is none second." See the Taittirîya Sanhitâ (I. 8, 6.) Again, "There are thousands of Rudras on the earth." See the Taittirîya Sanhitâ (IV. 5, 11.)

सूत्राणि.

विद्यावचनमसंयोगात् ॥ ४८ ॥ (उ० ८.)

पदानि । विद्या-वचनम्, अ-संयोगात् ॥

पदार्थः । विद्यावचनम्=स्वाध्यायकालेऽर्थवचनम् । असंयोगात्=कर्मभिरसंयोगात् ॥

वाक्यार्थः । स्वाध्यायकालेऽर्थवचनमुपयुज्येत । यद्यपि कर्मभिरसंयोगः स्यात् ॥

भावार्थः । यदा यज्ञसंयोगो न स्यात् तदा पुनःश्रुतिर्न प्राप्नुयात् । केवलस्वाध्यायकाले श्रुतिग्रहणं करणीयम् ॥

सतः परमविज्ञानम् ॥ ४९ ॥ (उ० ९.)

पदानि । सतः, परम्, अविज्ञानम् ॥

पदार्थः । सतः=विद्यमानात् । परम्=अनन्तरम् । अविज्ञानम् ॥

वाक्यार्थः । विद्यमानात् (अर्थात्) अनन्तरम् (तस्य) अज्ञानम् (सम्भवति) ॥

भावार्थः । यद् यद् विद्यते तस्य तस्यैवाज्ञानम् । अविद्यमानार्थस्याज्ञानं न घटते । विद्यमानार्थस्य प्रथमं ज्ञानं पश्चादज्ञानम् ॥

विद्यमानोऽप्यर्थः प्रमादालस्यादिभिर्नोपलभ्यते । निगमनिरुक्तव्याकरणवशेन धातुतोऽर्थः कल्पयितव्यः । इति शबरः ॥

यद्यपि पूर्वपक्षेऽयमभिप्रायो नोपन्यस्तः । तथापि सम्भवादुपन्यस्यते । इति कुमारिलभट्टः ॥

४८. (कर्म) न करायाचें असतां अध्ययन करणें हें अर्थ समजण्याकरतां आहे. (उ०८.)

४९. जें अर्धी आहे, तें पुढें अज्ञात. (उ० ९.)

४८. मूळ सूत्रांत "असंयोगात्" असें पद आहे. त्याचा अर्थ करतांना साकांक्षत्वामुळें "कर्म" हें पद घातलें आहे आणि कर्मसंयोग याचा अर्थ कर्म करणें असा आहे. "विद्यावचन" असें मूळ सूत्रांत पद आहे. विद्या म्हणजे ज्ञान, आणि वचन म्हणजे समजून सांगणें. अध्ययन करणें हा अर्थ स्वाध्याय या पदाचा आहे. हें पद सातव्या पूर्वपक्षापासून अनुवृत्ति करून घेतलें आहे. पूर्वमीमांसेंत पूर्वपक्षसूत्रांतील पदाची उत्तरपक्षसूत्रांत अनुवृत्ति होते. पूर्वपक्षकार ३७ व्या सूत्रांत वेदमन्त्र मुखें तोंडपाठ करावे, असें प्रतिपादन करतांना वेद तोंडपाठ करणें ही प्राचीन चाल आहे, असें प्रमाण देतो. त्यावर उत्तर देतांना सोपें पडतें म्हणून लोक तोंडपाठ करतात, आणि संवय लागली म्हणून आग्रह धरून बसतात, म्हणून त्या प्राचीन चालींत कांहीं अर्थ नाहीं असें शबरादि भाष्यकार म्हणतात. याकडे आमच्या सुज्ञ वाचकांनीं लक्ष द्यावें, अशी आमची विनंती आहे.

४९. आठव्या पूर्वपक्षांत कित्येक वेदवाक्यांचा अर्थ समजत नाहीं, म्हणून वेद निरर्थक आहेत, असें पूर्वपक्षकाराचें

48. (Though no sacrificial work) is referred to, yet there can be no tautology when there is exposition of knowledge. (8. Reply.)

49. (Whatever is already) existing, can be unknown. (9. Reply.)

48. The term *Asanyogât* is used in the original Sanskrita sûtra. In interpreting it, the principle of *expectancy* or *desirability* necessitates the introduction of the terms —a sacrificial work. The term—*Karma-sanyoga*—signifies connection with a sacrificial work. Again, the term Vidyâ-vachana is used in the original Sanskrita sûtra. *Vidyâ* means knowledge and *Vachana* means exposition. Commentators introduce the term Svâdhyâya into the sûtra by way of completing it (anuvritti). The term svâdhyâya occurs in the seventh statement of the opponent. In the Pûrva-Mîmânsâ, some terms of a statement of the opponent can be borrowed and introduced into a reply for completing it (anuvritti.) The opponent adduces it in the 37th sûtra as a proof that it is customary to learn the Vedas by heart. In reply to this, Jaimini remarks that the Vedas are learnt by heart because students find it easy to do so, and that the people in general do not think the practice to be improper because they are accustomed to it. The ancient custom, says the commentator, is, therefore, senseless. Our critical readers will give heed to the remark of commentator Shabara.

49. It is stated in the 8th

सूत्राणि.

उक्तश्चानित्यसंयोगः ॥ ५० ॥ (उ० १०.)

पदानि । उक्तः, च, अनित्य-संयोगः ॥

सूचना । प्रथमाध्याये प्रथमपादस्याष्टाविंशसूत्रे निरूपितस्य द्वितीयपूर्वपक्षस्य तथैकात्रिंशसूत्रे निरूपितस्य द्वितीयोत्तरपक्षस्य चात्र कृतेऽनुसन्धाने सूत्रार्थः स्पष्टः ॥

लिङ्गोपदेशश्च तदर्थवत् ॥ ५१ ॥ (सि० यु० १.)

पदानि । लिङ्ग-उपदेशः, च, तत्-अर्थवत् ॥

पदार्थः । लिङ्गेनोपदेशः=लिङ्गोपदेशः । लिङ्गेन=तदभिधानसामर्थ्येन । उपदेशः=मंत्रः । च=पुनः । तदर्थवत्=तदर्थो नाम मंत्रार्थो यस्यास्ति तत् ॥

वाक्यार्थः । पुनः । अभिधानसामर्थ्येन मंत्रः स्वार्थविषयं द्योतयति ॥

भावार्थः । अभिधानसामर्थ्यात् मंत्रेषु नामधेयानि घटंते । यदि तेऽग्निप्रयोजनाः । ततस्त आग्नेय्याः । नाग्निशब्दसन्निधानात् । इति शाबरः ॥ तस्माद् विवक्षितार्था मंत्राः ॥

अनुसन्धेयानि वेदवाक्यानि ॥

आग्नेय्यर्चाऽग्नीध्रमभिमृशेत् ॥ तै. सं. (३.१,६.)

म्हणणें आहे. त्यावर आचार्य म्हणतात कीं जर अर्थ ठाऊक असला तरच अर्थ समजला किंवा न समजला हें म्हणणें संभवतें, पण अर्थ ठाऊक नसतां असें म्हणणें संभवतच नाहीं. आणि अर्थ ठाऊक असतांहि भ्रमानें किंवा अळसानें अर्थ समजत नाहीं असें वाटेल. पुनः निगम, निरुक्त, व्याकरण, किंवा धातु यांचा विचार करून वाक्यार्थ बसवावा. निगम व निरुक्त या दोन शब्दांचा अर्थ सांगि-

statement of the opponent that some Vaidika texts are to no purpose, because they can be neither interpreted nor understood. In reply to this, Jaimini observes that it can be affirmed whether the sense of a passage is known or not when its sense is already known. But it is impossible to say that its sense cannot be known, when its sense is not known. Though the sense of a passage be known, it may be imagined on account of some mental aberration or indolence that its

५० (वेदांत) नाशवंत वस्तु अढळतात, याविषयीं पूर्वी सांगितलें आहे. (उ० १०.)

५१. जसा मंत्राचा अर्थ (समजतो), तसाच लिंगावरून मंत्राचा विनियोग समजतो. (सि० यु० १.)

तला पाहिजे. निगम म्हणजे वाक्यांतरीं एखाद्या शब्दाचा अर्थ कसा केला आहे हें पाहून त्या शब्दाचा अर्थ बसविणें. निरुक्त म्हणजे शब्दाचे निरनिराळे अवयव आहेत अशी कल्पना करून, त्यांच्या व्युत्पत्तीवरून शब्दाचा अर्थ बसविणें. मूळ संस्कृत सूत्रांत "सतः परम्" अशीं पदें आहेत. त्यांचा अर्थ जें असतें त्याच्या मागून असा केला आहे. या सूत्रानें पूर्वपक्षाचें समर्पक उत्तर झालें नाहीं असें वाटतें.

५०. या मीमांसेच्या (१.१,३१.) सूत्रीं असें उत्तर झालें आहे.

५१. "तदर्थवत्" असें मूळ सूत्रांत पद आहे. त्यांत तत् म्हणजे मन्त्र असें समजायाचें. लिंग म्हणजे मन्त्राच्या अंगीं अमुकच अर्थ असावा असें सामर्थ्य असतें तें. तै. सं. (३.१,६.) या ठिकाणचा मन्त्र संस्कृत सूत्राखालीं घेतला आहे. त्याचा अर्थ केला म्हणजे सूत्रार्थ लक्षांत येईल. संहितेमध्यें (३.१,६.) एथें "अयोग्य देवता असून जो यज्ञ करतो, त्याला देवता फाडून टाकतात, आणि तो पापी होतो; आणि जो योग्य देवता

50. It is already stated that transitory things are met with (in the Vedas.) (10. Reply.)

51. As the sense of a text (is known), (so) its application (is known) by means of a mark. (1. Argument in support of the final statement.)

sense is not known. Again, the sense of a passage ought to be determined by means of collation, analysis, grammar, or etymology. The terms *nigama* and *nirukta* are used by commentators, and call for explanation. Nigama is the name given by Yâska to a method of collation. Nirukta means the determination of the sense of a word by analysing it into its elements. The terms *Satahparam* are used in the original Sanskrita sûtra. They are interpreted into *after that which exists*. We believe that the objection raised by the opponent in his eighth statement is not combated at all by this style of replying.

50. A similar reply is already given in the sûtra (I. I, 31.)

51. The terms *Tadarthavat* is used in the original Sanskrita sûtra. By *tad*, is to be understood a Vaidika text. By *Linga* is meant the power of a text to be interpreted in a particular way. A Vaidika text from the Taittirîya Sanhitâ (III. 1, 6.) is quoted in the Sanskrita portion of the work. Its interpretation will elucidate the sûtra under consideration. The Vaidika text is :—"He who sacrifices to an improper deity is

सूत्राणि.

ऊहः ॥ ५२ ॥ (सि० यु० २.)

पदादीनि । स्पष्टानि ॥

भावार्थः । पूर्वमीमांसाया नवमेऽध्याय ऊहो विचारितः । स च त्रिविधः । मंत्रसामसंस्कारविषयः । ऊहस्तु ज्ञापनेन मंत्रपदांतरादीनि । अत्र दृष्टान्तः । न पिता वर्द्धते न माता । अन्वे वर्द्धन्त इति गम्यते । प्रत्यक्षं कौमारयौवनस्थाविरैर्वर्द्धन्ते मात्रादयः । शब्दो न वर्द्धत इति ब्रूते । का पुनः शब्दस्य वृद्धिः यद् द्विवचनबहुवचनसंयोग इति शबरः । तस्माद् विवक्षितार्था मन्त्राः ॥

विधिशब्दाश्च ॥ ५३ ॥ (सि० यु० ३.)

पदानि । विधि-शब्दाः, च ॥

भावार्थः । विधिशब्दश्च विधिरेव च ब्राह्मणाभिधस्तत्र तत्र पर्यायेणावयवान्वाख्यानिर्वचनादिभिश्चार्थप्रकाशनपरत्वं दर्शयति । अर्थानाश्रवणे हि सर्वं तदनर्थकं स्यात् । तस्माद् विवक्षितार्था मन्त्राः ॥

अर्थवादपादोऽयम् ।

प्रथमाध्यायस्य द्वितीयपादः समाप्तः ॥

घेऊन यज्ञ करतो त्याला देवता फाडून टाकीत नाहींत, आणि तो पापी होत नाहीं. (म्हणून) अग्नीचें ज्या ऋचेंत वर्णन आहे, त्या ऋचेनें अग्नीध्रनामक ऋत्विजास स्पर्श करावा." असा मन्त्रार्थ आहे. वेदमन्त्राचा अर्थ न समजला तर हें कसें समजेल ? खंडोबा, जोतीबा अशा मूर्तीची पूजा करणाऱ्या लोकांनीं योग्य आणि अयोग्य देवतांविषयीं वर जें वर्णन केलें आहे, त्याकडे कृपा करून लक्ष द्यावें.

torn by gods, and he becomes sinful. And he who sacrifices to a proper deity is not torn by gods, and he does not become sinful. [Therefore] a priest called Agnîdhra is to be touched by means of a rik in which Agni is described." Now, this is the sense of the Vaidika text. If it be not understood, how can the duty of an Agnîdhra be known ? We humbly beg to draw the attention of some of our readers to the distinction between proper and improper gods, and to ask them to enquire if the worship of such gods as Khandobâ and Jotibâ is sanctioned in the Vedas.

५२. ऊह (करावा लागतो, म्हणून वेदमंत्रार्थ होतो.) (सि० यु० २.)

५३. आणि ब्राम्हणग्रंथ (आहेत म्हणून वेदमंत्रार्थ होतो.) (सि० यु० ३.)

५२. "ऊह" शब्दाचा अर्थ केला म्हणजे सूत्र तेव्हांच समजेल. जागोजागीं वेदामध्यें एकवचनान्त पदें आणि भूतकाळीं क्रियापदें अढळतात. यज्ञसमयीं ज्या मन्त्राचा विनियोग करायाचा त्या मन्त्रांत बहुवचनान्त पदें असावीं लागतात, किंवा वर्तमानकालवाचक क्रियापद असावें लागतें. अशा प्रसंगीं एकवचनान्त पदाच्या बदलां बहुवचनान्त पद योजावें लागतें, आणि भूतकालवाचक क्रियापदाच्या बदलां वर्तमानकालवाचक क्रियापद योजावें लागतें. असें एका पदाबदलां जें दुसरें पद योजणें, त्यास ऊह म्हणतात. यज्ञसमयीं असे ऊह वारंवार करावे लागतात, म्हणून वेदमन्त्रार्थ समजलाच पाहिजे. पतंजलिहि आपल्या महाभाष्यामध्यें असें म्हणतो कीं शुद्ध ऊह करतां यावेत म्हणून व्याकरण शिकावें.

५३. मूळ संस्कृतसूत्रांत "विधिशब्द" असें पद आहे, त्याचा भाष्याच्या आधारानें ब्राम्हणग्रंथ असा आम्ही अर्थ केला आहे. ब्राम्हणादि ग्रंथांमध्यें व्याख्यानाच्या योगानें,आणि निरुक्ताच्या योगानें मन्त्राचा

52. (The method of) substitution (being adopted, the sense of Vaidika texts is known.) (2. Argument in support of the final statement.)

53. (Because there are the works called) Brâhmaṇâni, Vaidika texts can be understood. (3. Argument in support of the final statement.)

52. The sense of the sûtra will be plain if the term *ûha* be explained. In different places in the Vedas, nouns of the singular number, and verbs of the past tense are used. A text to be repeated at a sacrifice may require the same nouns to be in the plural number, or the same verbs to be in the present tense. On such an occasion, the substitution such as of a plural noun for a singular one or a verb of the present tense for a past one in Vaidika texts is called *ûha*. Such substitution is often made in texts to be used at sacrifices. The sense of Vaidika texts ought to be, therefore, known. Patanjali observes in the introduction to his well-known commentary on the grammar of Pâṇini that grammar ought to be studied that such substitutions may be correctly made.

53. The term *Vidhi-shabda* is used in the original Sanskṛita sûtra. We have interpreted it into a work called a Brâhmaṇa with the aid of commentaries. In the Brâhmaṇa-works, the mantras or Vaidika texts are explained by means of stories or analysis. Jaimini holds, therefore that it is

अर्थ केला असतो, म्हणून वेदमन्त्राचा अर्थ करणें योग्य आहे, असें जैमिनीचें म्हणणें आहे. सूत्रकार जैमिनि, आणि भाष्यकार शबरकुमारिलभट्टादि ब्राह्मणग्रंथांची योग्यता किती समजतात, हें या सूत्रावरून स्पष्ट होतें.

proper to know the sense of Vaidika texts. This sûtra is important as it shows the relation of Brâhmaṇa-works to Sanhitâ-texts [mantra] as determined by such an Âchârya as Jaimini and by such distinguished commentators as Shabara and Kumârila-Bhaṭṭa. The Brâhmaṇa-works propound the sense of Sanhitâ-texts. The subject of subordinate statements is now considered.

उपसंहार.

वेदांमध्यें धर्माचें प्रतिपादन केलें आहे म्हणून वेद ग्राह्य आहेत असें बुद्धिवाद करणाऱ्या कणादादिकांसारख्यांचें मत पडलें. या मताची योग्यता, आणि माहात्म्य सहज लक्षांत यावयाचें नाहीं, म्हणून या मताचा थोडा उपन्यास केला पाहिजे. प्रमाणपरीक्षेवरती सर्व भार टाकून बुद्धिवादानें आणि युक्तिवादानें कणादादिमुनि धर्माचा विचार करूं लागले. मग वेदमन्त्रार्थाची सहजच निरनिराळी व्यवस्था होऊं लागली. यामुळें निमुटपणें चालू परिपाठीस अनुसरून वागणारे लोकांत, आणि युक्तिवाद करून धर्मव्यवस्था करणाऱ्या लोकांत विरोध पडला. बुद्धिवाद करणारे लोक म्हणूं लागले कीं अनुमानतर्कादि प्रमाणें प्रधान आहेत. परिपाठीस अनुसरणारे लोक म्हणूं लागले कीं जी चालू वहिवाट आहे, तीच योग्य आहे; म्हणजे जशा चाली चालत आल्या आहेत, तशाच पुढें चालवाव्यात. यज्ञक्रियादि प्रसंगीं मन्त्र तोंडपाठ म्हणावेत, त्यांच्या अर्थाकडे लक्षदेण्याची अवश्यकता नाहीं. आणि वेदमन्त्रांच्या अर्थाच्या भानगडींत पडल्यानें बुद्धिवादाच्या कोट्या निरुत्तर होतात असें त्यांस वाटूं लागलें. बुद्धिवाद करणाऱ्यांमध्यें मोठ्या मोठ्या आचार्यांची गणना करावी लागते. त्यांमध्यें दोन सांप्रदाय उत्पन्न झाले. कोणी असें म्हणूं लागले कीं वेदांमध्यें कांहीं हंशील नाहीं, उगीच यद्वातद्वा पोरकट बडबड मात्र आहे. दुसऱ्या सांप्रदायाचे लोक म्हणूं लागले कीं वेदांमध्यें हंशील

SUMMARY.

Rationalists like Kanâda hold that the Vedas are acceptible, because they inculcate virtue or religion (Dharma). It is not easy to perceive at once the historical bearings of Kanâda's position. It is, therefore, necessary to discuss them. Philosophers like Kanâda attach special importance to the logical investigation of virtue. Hence Vaidika texts were arranged and interpreted in different ways; and disputes arose between dogmatism and rationalism. The latter asserted that logic and its methods of investigation were important. The former asserted that custom was every way preferable, that is, that there was very little room for change or reform as based on investigation, but that every practice that had come down from time immemorial was right. The dogmatists believed that Vaidika texts ought to be repeated without any attention to or attempt at understanding their sense, for they found themselves involved in a dilemma—if the Vaidika texts were interpreted and understood, the objections of rationalists could not be removed, and if they were not interpreted and understood, the rationalists necessarily blamed them and considered them to be useless. The rationalists of the time were great philosophers (Âchâryas) who were divided into two schools— the one maintained that the Vedas were simply absurd and worthless, and that they consisted of childish pratings; and the other held that the Vedas inculcated sense and truth, but that it was necessary

आहे, परंतु बुद्धिवाद करून युक्तिप्रयुक्तींनें वेदार्थ बसविला पाहिजे. बुद्धिवाद करणारे लोकांनीं युक्तिप्रयुक्तींचा आणि अनुमानतर्कादिकांचा अंगीकार केला. परिपाठास अनुसरणाऱ्या लोकांचें असें म्हणणें पडलें कीं बुद्धिवाद कसला तो नको. वेद नुस्ते तोंडपाठ करावेत, आणि चालूं वहिवाट जी आहे, तिची उत्पत्ती कशी, तिची योग्यता काय, आणि तिचे परिणाम कोणते याविषयीं विचार कधींहि करायाचा नाहीं. या सर्व निरनिराळ्या सांप्रदायाचें वर्णन यास्काचार्यकृत निरुक्त म्हणून एक वेदांग आहे, त्यांत स्पष्ट रीतीनें केलें आहे. धर्माचें बीज मनुष्याच्या बुद्धीमध्यें आहे, असें म्हणणाऱ्या सांप्रदायाचे नायक कौत्साचार्य होते. आणि युक्तिप्रयुक्तीनें वेदमन्त्रार्थ बसवून सर्व वेदप्रणीत कर्मांची व्यवस्था लावावी, आणि प्राचीन धर्माचें आचरण करावें अशा म्हणणाऱ्या सांप्रदायाचे नायक यास्काचार्य होते. आणि या दोघांच्याहि मतानें वेद नुस्ते राघूसारखे तोंडपाठ करणारे लोक वेडगळ ठरले. जैमिन्याचार्यांनीं यास्काचार्याच्या मताचा दृढ अंगीकार केला आहे, आणि सर्वथैव वेद अप्रयोजक आहेत असें म्हणणाऱ्या कौत्साचार्यासारख्या लोकांचे–आणि राघूसारखे वेद नुस्ते तोंडपाठ करावेत असें म्हणणाऱ्या लोकांचे–या दोन्ही मतांचें जैमिनीनें या पादांत खंडन केलें आहे. एकेक मन्त्राचा अर्थ करून वेदमन्त्रार्थांत भानगड होऊं लागली, ती भानगड होऊं नये म्हणून प्रकरणास अनुलक्षून वेदमन्त्रार्थ करावा असें वर्णन करतांना निरुक्त परिशिष्टांत

to interpret them correctly and carefully. At any rate, the rationalists preferred logic and its methods to mere dogmas. The dogmatists, on the contrary, repudiated logic and its methods but asserted that it was sufficient to learn the words of the Vedas by mere rote, and that it was useless audacity to investigate the origin, the propriety, and the consequences of such established customs as were believed to have come down from time out of memory. An account of these different schools of philosophers is given in the work of Yâskâchârya. Koutsa was the leader of the school of thought that advanced the doctrine that the principles of virtue are permanently implanted in the mind of man. Yâskâchârya, on the contrary, led the school which maintained that all customs ought to be followed, but not blindly, and that they should be supported by Vaidika texts which ought to be rationally interpreted, and the sense of which ought to be logically examined. Both the schools, however, condemned the practice of learning the Vedas by mere rote—so foolish and improper. Jaimini adopts the principles of Yâska, and seeks to refute in this chapter thinkers like Koutsa who considered the Vedas to be childish and incoherent pratings, and the orthodox dogmatists who asserted that the mere words of the Vedas should be crammed by rote without any attempt at understanding them. There is a story in an appendix to Yâska's work—a story suggestive of the method of rationalism and pregnant with such thoughts as ought to be considered the glory of ancient

एक कथा आली आहे. ती एथें सांगितली पाहिजे. "ऋषिजन जेव्हां वर जाऊं लागले, तेव्हां मनुष्यांनीं देवांस विचारलें कीं आतां पुढें आमचा ऋषि कोण? त्यांस देवांनीं तर्करूप ऋषि दाखवून दिला. तो तर्कऋषि वेदमन्त्रांचा अर्थ करण्याविषयीं आणि त्यांची व्यवस्था करण्याविषयीं मोठा निपुण. म्हणून जें जें तर्क केल्यानें सयुक्तिक दिसतें, आणि जेणेंकरून वेदमन्त्रार्थाची व्यवस्था होते, तें तें सर्व ऋषिप्रणीतच आहे असें समजावें. हा तर्कऋषि आम्हा मनुष्यांत वास करीत आहे, हें आमचें देशबांधव विसरून तर्कऋषीचा अपमान करितात, त्याला अंधारांत कोंडून ठाकतात, त्याची हेळणा करतात, आणि जी अंधपरंपरा चालत आली आहे तीच योग्य आहे, असें म्हणतात, आणि राघूसारखे वेद नुस्ते तोंडपाठ करावेत असा आग्रह धरितात. अशा लोकांचें खंडन जैमिनीनें या पादांत कसें केलें आहे त्याचा विचार आमचे वाचकांनीं करावा. कर्मकांड, उपासनाकांड, आणि ज्ञानकांड असा वेदोक्तधर्माचा विभाग करण्याची चाल आहे. कर्मकांड तें काय हा विचार करणें अवश्य आहे, कारण ज्या मीमांसेचें आम्ही विवेचन करतों आहों तीस केव्हां केव्हां कर्ममीमांसा असेंहि म्हणतात. कर्ममीमांसेंत धर्माचा विचार केला आहे, धर्माचें मुख्य लक्षण चोदना आहे, असें प्रथम अध्यायाचे प्रथम पादाचे दुसरे सूत्रांत सांगितलें आहे. तेथें चोदनेचें स्वरूपकथनहि केलें आहे. कोणतीहि क्रिया क

India:—"When the *Risis* began to ascend (into Heaven), men asked gods as to who was to be their *Risi*. The gods pointed to the logical faculty(*Tarka*) as their *Risi*. This Risi was well-versed in the science of interpreting, and adjusting the Vedas. Therefore, that which is logically consistent and rational, and which while recognizing the Vedas, arranges and adjusts them, is to be considered as laid down by the *Risis*." Forgetting that this *Risi* (the logical faculty) dwells in them, our country-men disregard him, consign him to darkness, ridicule him, hold fast to blind customs and foolish dogmas, and obstinately maintain that the Vedas should be learnt by mere rote as the parrots learn to repeat some words. The arguments which Jaimini employs to refute the blind dogmatists deserve to be examined. It is usual to divide the teachings of the Vedas into three systems—that of works, (Karma-kânda), that of adoration of gods, (Upâsanâ-kânda) and spiritual knowledge consisting in realizing the soul as the supreme spirit and in holding communion with him (Jnâna-kânda). We are concerned with the subject of *works* here, for the system of philosophy which we examine at present is generally called Karma-mîmânsâ. The Karma-mîmânsâ investigates the subject of duties the characteristic mark of which is Chodanâ or a *conception produced by a scriptural injunction.* See the sûtra (I. 1, 2.) in the footnote to which the nature of Chodanâ is discussed. The principal element of Chodanâ is the internal effort or volition. The concen-

रण्यापूर्वी मनुष्यांच्या अंतर्यामीं जो प्रयत्न घडतो तो चोदनेंतील मुख्यांश आहे. सुखदुःख, इच्छाद्वेष अशा ज्या नानावृत्ति मनुष्याच्या अंतर्यामीं उत्पन्न होतात, त्या वृत्तींना एकाग्र करणें, आणि समाधिस्थ करणें, व अघमर्षणाविषयीं समर्थता संपादणें हा उपासनेचा मुख्यांश आहे. कोणी बादरायणाच्या वेदांतास ज्ञानकांड म्हणतात, परंतु ज्ञानानेंच मोक्षप्राप्ति अशी प्रतिज्ञा कणादसूत्रांची आहे. अलीकडे जो वेदांत देशामध्यें माजला आहे, त्या वेदांतामध्यें आणि कणादप्रणीत शास्त्रामध्यें मोठा विरोध आहे हें वर्णन करायास नको. बादरायणदर्शनाची आणि कणाददर्शनाची एकवाक्यता केली असतां द्वैतमार्गच प्रबळ होतो. या दोन्ही दर्शनांत विरोध मानला असतां ज्ञानमार्ग कोणाचा अशी पंचाईत पडते. कारण कणाद द्वैतमार्गाचें प्रतिपादन करतो, आणि बादरायणदर्शनांतून भाष्यकार अद्वैत अर्थ काढतात. म्हणून एकाच वेळीं दोहोंसहि ज्ञानमार्ग म्हणणें संभवत नाहीं. कांहीं नाहीं, सर्व कायतें चैतन्य आहे, असें प्रतिपादन करण्याची जी चाल पडली आहे, तीस ज्ञानमार्ग न म्हणतां कणाददर्शनांत ज्या विषयाचें प्रतिपादन केलें आहे, त्यासच ज्ञानमार्ग म्हणावें हें आम्हांस प्रशस्त दिसतें. असु. ज्या तर्ककर्षीचें पूर्वी आम्ही वर्णन केलें आहे, तो तर्कच ज्ञानमार्गाचा प्रदर्शक आहे. तिन्ही मार्गाची समर्पक एकवाक्यता होते, पण हा विचार येथें करणें नाहीं. कर्ममार्गामध्यें अंतर्यामीचा प्रयत्न, आणि

tration of the variety of feelings such as pleasure and pain, desire and aversion which spring up in the human mind, and their devotion to contemplation, and the acquisition of the power of rising superior to fleshliness—literally washing off sins (aghamarsana) are the principal elements of adoration. Some consider the system of philosophy developed by Bâdarâyana to be spiritual knowledge. But Kanâda declares the end of his system to be the salvation of the soul by means of *knowledge*. It is not necessary to mention that the system of Kanâda is every way opposed to the Vedânta that is now rampant in our country. The systems of Kanâda and Bâdarâyana, if properly examined and harmonized, would doubtless support the doctrine of duality which declares that God is the Creater of man who is to worship him and seek blessings from him (Dvaitamârga). If they were opposed to each other, it would be difficult to determine which of the two is the system of *knowledge*, for Kanâda systematizes the doctrine of *duality*, and commentators interpret the system of Bâdarâyana into *pantheism* as opposed to the doctrine of *duality*. Hence such two systems cannot, at the same time, be said to explain *spiritual* knowledge. Instead of considering, however, the doctrine of *pantheism* to be spiritual knowledge, we are inclined to believe that the system of Kanâda inculcates spiritual knowledge. Suffice it to remark that the Risi of the logical faculty whom we have already mentioned is the real teacher of spiritual knowledge. Harmony between

बाह्यक्रिया, या दोहींचा विचार आहे. जसा अंतर्यामीं प्रयत्न घडतो तशी बाह्यक्रिया घडते. परंतु जशा सुख-दुःखेच्छाद्वेषादि वृत्तींचे तरंग अंतःकरणीं उठतात, त्याप्रमाणें अंतर्यामीं प्रयत्न घडतो, आणि जसे नानाविषयांचें आत्म्यास ज्ञान होतें, तशा नानावृत्ति अंतःकरणीं उत्पन्न होतात. म्हणून ज्ञान, वृत्ति, आणि अभ्यंतरप्रयत्न, यांचा परस्पर कार्यकारण संबंध आहे, हें स्पष्टच आहे. बुद्धिवाद करणाऱ्यांनीं सतर्क युक्तिप्रयुक्तीला प्राधान्य दिलें; मग जें जें कर्म ऊहापोह करून योग्य ठरेल तें तेंच कर्म करावयाचें, असा त्यांचा सिद्धान्त ठरला. असें असतांहि बुद्धिवाद करणाऱ्या कौत्साचार्यांनींहि केवळ वेदोक्त कर्म आचरावें, असें म्हणणाऱ्या लोकांशीं वाद करतांना मोठी चाणक्ष्यता योजिली आहे. वादीच्या वादपद्धतीचा अंगीकार करून वेदावर दोष आणिले आहेत. त्यांत दुसऱ्या पूर्वपक्षामध्यें वेदामध्यें प्रत्यक्षविरुद्ध वर्णन आहे म्हणून वेद अप्रमाण आहेत अशी कोटि काढली आहे. तिचा आमचे वाचकांनीं विचार करावा. पुनः त्याच पूर्वपक्षांत अशी कोटी काढली आहे कीं शास्त्रविरुद्ध प्रतिपादन वेदांत अढळतें, म्हणून वेद अप्रमाण आहेत. या ठिकाणीं शास्त्रशब्दाचा अर्थ काय याचा प्रथमदृष्ट्या निश्चय करतां येत नाहीं. वेदादिकांस पूर्वपक्षकार शास्त्र म्हणत नाहीं कारण वेदादिकांवरच याची दोषापत्ति करण्याची प्रवृत्ति आहे. वेदादि ग्रंथ जर शास्त्र नव्हेत तर शास्त्र तें काय? पूर्वपक्षकाराच्या मतें अमुक धर्म आणि अमुक अधर्म असा निर्णय करण्याची

the three systems—of works adoration and spiritual knowledge (Karma, Upâsanâ and Jnâna),—can be established, but we cannot undertake to do so here. In this Mimânsâ, volition or internal effort and human actions are to be considered, for our actions express or embody our internal efforts or volitions. But our will or volition is more or less determined by the variety of feelings which move the mind, and the feelings in their turn are influenced by the impressions which external objects make on the mind or by the ideas on which it works. Hence it is plain that knowledge, feelings, and will, act and react on each other and often bear the relation of cause and effect. It has already been observed that rationalists attach special importance to logic and its methods so far as the discrimination of truth is concerned, and accept that as true to which the examination of a question in all its bearings leads. Yet Rationalists like Koutsa use great ingenuity in their discussions with those who believe the Vedas to be the fountain of all truth and consider their teachings to be every way final. Accepting the method of discussion which their dogmatic opponents adopt, and starting from the postulates which the dogmatists consider to be essential to their system, they seek to subvert the authority of the Vedas by taking their stand on the common ground. They state that the Vedas are not to be accepted because they contradict sensuous perception. This argument deserves attention. Again the rationalists state that the Vedas contradict *Shâstra*.

मनुष्याच्या अंगीं शक्ति आहे, आणि या शक्तीच्या योगानें जो निर्णय होतो तो निर्णयच कायतें शास्त्र. पूर्वपक्षकारानें दोन जीं उदाहरणें घेतलीं आहेत त्यांच्या योगानें या प्रतिपादनाची फोड होईल. "मन चोर आहे" असा वेदमन्त्र आहे. हा मन्त्र कोठें आहे असा शोध करीत असतां ग्रंथांत कोठेंहि प्रतिपदोक्त हा मन्त्र सांपडत नाहीं. आणि शबरस्वामीच्या भाष्य करण्याच्या शैलीवरून आपल्या भाष्यांत प्रतिपदोक्त मन्त्र घालण्याची त्यांची दक्षता नाहीं, असें दिसतें. असतु. मन चोर आहे अशीं आर्थिक वचनें उपनिषदादि ग्रंथांत अढळतात. पूर्वपक्षकार असें म्हणतो कीं सर्व धर्माचा आधार काय तें मन. आणि मनच जर चोर ठरलें तर धर्माचरण होणार कसें? वेदांत "मन चोर आहे" असें वर्णन आहे, म्हणून वेद अप्रमाण आहेत. पुनः मनुष्याची वाणी मिथ्या भाषण करणारी आहे, अशा अर्थाचेंहि वेदांत वर्णन अढळतें. ऐतरेय ब्राम्हण (४.१.) पहा. मिथ्याभाषण हा जर वाणीचा स्वभावच ठरला तर धर्माचरण होणार कसें? असा कटाक्ष ठेवून पूर्वपक्षकारानें सिद्धांत ठरविला कीं शास्त्रविरुद्ध प्रतिपादन वेदांत अढळतें, म्हणून वेद अप्रमाण आहे. जें जें आम्ही वर्णन केलें आहे तें यास्काचार्याचे निरुक्तावरून घेतलें आहे, आणि (१.२,३१-३९.) या सूत्रांतील पूर्वपक्ष, आणि निरुक्तांतिलकौत्साचार्याच्या कोट्या ह्या सर्वथैव जुळतात. पुनः पुढें वाक्याचा अर्थ लावतेवेळीं प्रधानवाक्य कोणतें, अर्थवाद

At first sight, it seems to be difficult to determine what the rationalists mean by *Shâstra*. The rationalists who are the opponents in this discussion cannot consider the Vedas to be their *Shâstra*, for they seek to find fault with them. If the Vedas be not the *Shâstra*, the question is natural:--what is the *Shâstra*? It has already been stated that the rationalistic opponents believe that man unaided by any revelation, is able to distinguish truth from error, and that the principles which the logical faculties of man accept constitute the rules of life or *Shâstra*. These statements will be elucidated by the illustrations which the opponent gives. See the foot-note on (I. 2, 2.) "The mind is a theif" is a Vaidika text. We have not been able to trace the exact place where it occurs and it may be stated that commentator Shabara is not careful in giving the exact words of a book quoted. But passages on which the statement is based are to be met with in works called Upanisads. The rationalists state that the mind alone is able to test the truth or falsehood of a proposition offered to it for its acceptance, and that if the mind be a thief, all rules of life would be at once uncertain. The Vedas state that the mind is a thief, and therefore, they are not worthy of being accepted as inculcating truth. Again, the Vedas state that "the tongue of man is an utterer of falsehood." See the Aitareya Brâhmana (IV. 1.) The rationalists ask that if it be the nature of the human tongue to utter falsehood, the rules of life would be at once uncertain. Con-

कोणता, हेतुवाक्य कोणतें, वाक्यार्थ करतांना अपकर्ष करावा कीं नाहीं, वाक्यभेदापासून काय दोष उत्पन्न होतो या विषयांचा सयुक्तिक विचार जैमिन्याचार्यांनीं केला आहे. या विचारापासूनच वाक्यार्थमीमांसेचे सिद्धांत उत्पन्न होतात, म्हणून वाचकांनीं ज्या टिपांमध्यें या विषयांचें वर्णन केलें आहे त्या टिपा पहाव्या. अर्थ न समजतां वेद तोंडपाठ करणें हें केवळ वेडगळ आहे असें ठरविण्याकरितां ज्या ज्या कोठ्या आचार्यांनीं योजिल्या आहेत, त्यांकडे वाचकांनीं लक्ष द्यावें. पुनः पुढें या पादामध्यें पर्यायिसंबंध म्हणजे काय, कार्यकारणसंबंध म्हणजे काय, उपपत्ति म्हणजे काय, व्यक्ति म्हणजे काय, सामान्य म्हणजे काय, शास्त्रीय व्यवस्था म्हणजे काय, अव्यवस्था म्हणजे काय, यांचाहि सहज विचार झाला आहे. शास्त्ररचनेचे आधारसिद्धांत कोणते हाहि विचार आचार्यांनीं केला आहे. त्यांत अनुगम बांधतांना विधिवाक्य व त्याचा संकोच करणारीं नियम आणि परिसंख्या हीं वाक्यें, आणि त्यांचा परस्परांशीं भेदाभेद, या विषयांचा विचार आहे. ब्राह्मणग्रंथांचा आणि संहिताग्रंथांचा परस्पर संबंध काय? हा विचार करतांना मूळ आणि त्यावरील भाष्य यांचा जो परस्पर संबंध, तोच संबंध संहिता आणि ब्राह्मण यांमध्यें आहे, असा त्रेपन्नाव्या सूत्रीं निर्णय केला आहे.

ducting the discussion with the spirit which these statements discover, the rationalists came to the conclusion that the Vedas should be rejected as they controverted the principles (Shâstraviruddhatva) naturally implanted in the mind of man. All these statements are based on(1. 15-16.) of the work of Yâska, and their comparison with the statements made by the opponent in(I.2,31-39.)of this chapter. Again, in the course of this chapter, Jaimini discusses with great ingenuity the general principles of the logical analysis of sentences which afford great help in applying the rules of interpretation, and answers the following questions in such a way that the readers of mere Arnold's grammar and Morell's analysis of sentences may derive much benefit, if not any new light :—What is the principal sentence? a subordinate sentence? an indirect subordinate sentence? or a reason or a causative statement? Whether subversion (Apakarsa) of the syntactical order of words is admissible or not? What are the difficulties in the way of dividing a sentence? The solution of such problems develops the system of exegetics. Hence the foot-notes in which the different subjects connected with the questions are discussed, deserve special attention. Again, the arguments by which Jaimini establishes the senselessness of cramming the Vedas by mere rote are important. In this chapter Jaimini also discusses the nature of *the adequate relationship* of cause and effect, the principles of philosophical explanation, of individuality, of

प्रथमाध्याये तृतीयः पादः ॥

सूत्राणि.

अथ स्मृतिप्रामाण्याधिकरणम् ॥

धर्मस्य शब्दमूलत्वादशब्दमनपेक्षं स्यात् ॥ १ ॥ (पू० १.)

पदानि । धर्मस्य, शब्द-मूलत्वात्, अ-शब्दम्, अन्-अपेक्षम्, स्यात् ॥

पदार्थः । शब्दः=वेदः । अशब्दम्=यन् न वेदे तदशब्दम् । अनपेक्षम्=अनादरणीयम् । स्पष्टमवशिष्टम् ॥

वाक्यार्थः । यतो धर्मो वेदादुत्पद्यते ततो यद् वेदे नास्ति तन् नादरणीयम् ॥

भावार्थः । (स्पष्टः)

---

generality, of what is called the *logical adjustment,* or the logical incongruity. The foot-notes to the different sûtras of this chapter are, therefore, important. Jaimini also examines the general principles on which a philosophical system can be built, and demonstrates the nature of the main (original) statement, as well as the nature of a restrictive statement and the principle of exclusive specification which limit the application of the main statement —explaining the points of comparison and contrast between them. Jaimini concludes this chapter with the discussion which determines the relative importance of the Vaidika works called Sanhitâs and Brâhmaṇas, and states that the last are commentaries of the first.

पहिल्या अध्यायाचा तिसरा पाद.

स्मृतींच्या प्रामाण्याविषयीं विचार.

१. धर्माचें मूळ वेदामध्यें आहे, म्हणून जें वेदांत नाहीं तें स्वीकारायास नको. (पू०.)

१. प्राचीन आर्य लोकांमध्यें जे जे ग्रंथ मुख्य आणि आचाराचे आधार, असें मानीत होते, त्या त्या ग्रंथांची योग्यता काय हा विचार आतां व्हावयाचा. ते मुख्य ग्रंथ कोणते म्हणाल तर चार वेदांच्या संहिता, म्हणजे ऋक्संहिता, यजुःसंहिता, सामसंहिता आणि अथर्वसंहिता; चार वेदांचीं ब्राह्मणें, आरण्यकें, कल्पसूत्रें आणि स्मृति. आतांशा सारा आचार स्मृति आणि पुराणें यांच्या आधारें चालतो, परंतु जैमिनीचे वेळीं पुराणांची कांहींच योग्यता नव्हती. कारण जैमिनीनें पूर्वमीमांसेमध्यें त्यांचा मुळींच विचार केला नाहीं. आणि पुराणें कोणतीं हा विचार करतांना माधवाचार्यांनीं तैत्तिरीय आरण्यकाच्या भाष्यांत असें वर्णन केलें आहे कीं, "पूर्वी असें होतें" असें जें जें संहिता, ब्राह्मणें, आणि आरण्यकें यांत वर्णन आलें आहे, तें तेंच पुराणात्मक आहे असें समजावें. या व्यवस्थेनें अठराहि पुराणास मुळींच थारा नाहीं, असें सिद्ध होतें. आतां स्मृतीची योग्यता काय, हा विचार करायाचा. वरी-

THE THIRD CHAPTER OF THE FIRST BOOK.

THE SUBJECT OF THE VALIDITY OF WORKS CALLED SMṚITIS.

All duty originates in the Vedas; therefore, what is not to be found in the Vedas is not to be accepted. (1. Statement of an opponent.)

1. It is to be now considered what is the relative importance of all the books which, the ancient Âryas believed, deserved veneration as they sanctioned the rules of conduct. The books were the sanhitâs of the four Vedas, that is Ṛik-Sanhitâ, Yajus-Sanhitâ, Sâma-Sanhitâ, and Atharva-Sanhitâ, the Brâhmaṇas, the Âraṇyakas, the Kalpa-sûtras, of the four Vedas and the Smṛitis. Now-a-days, all rules of life are based on the Smṛitis and Purâṇas. But at the time of Jaimini no importance was attached to the Purâṇas, for he does not even refer to them in his system of Mimânsâ. Again, Mâdhava, the great Vaidika commentator, observes while explaining the Taittirîya Âraṇyaka that all the descriptions in the Sanhitâs, Brâhmaṇas, and Âraṇyakas which end in "so it was before" constitute the Purâṇas. This definition of Mâdhava demolishes all the eighteen Purâṇas. Now the question is—what is the value of the works called Smṛitis. The above sûtra introduces this discussion. The general question raised by the opponent is—that whatever is not prov-

सूत्राणि.

अपि वा कर्तृसामान्यात् प्रमाणमनुमानं स्यात् ॥ २ ॥ (सि०)

पदानि । अपि, वा, कर्तृ-सामान्यात्, प्रमाणम्, अनुमानम्, स्यात् ॥

पदार्थः । अपि=तथापि । वा=न । कर्तृसामान्यात्=कर्त्रैक्यात् । स्पष्टमवशिष्टम् ॥

वाक्यार्थः । तथापि नानादरणीयं । कर्त्रैक्यादनुमानं प्रमाणं स्यात् ॥

भावार्थः । यद्यपि यद् यद् वेदे नास्ति तत् तन् न स्वीकरणीयं तथापि कर्त्रैक्यहेतुना तदपि स्वीकरणीयमित्यनुमीयते । यत् स्मृतौ दृश्यते तत् प्रतिपदोक्तं यद्यपि वेदे नास्ति तथापि कस्यांचिन् नष्टवेदशाखायां तेन भवितव्यमित्यनुमीयते । यदित्थमनुमीयते तत् प्रमाणामिति सिद्धान्तोक्तिः ॥

ल सूत्रांत त्याचा प्रारंभ झाला आहे. सामान्यतः पूर्वपक्षकारानें असा पूर्वपक्ष काढला आहे कीं जें जें शब्दांत नाहीं, तें तें स्वीकारण्यास अयोग्य आहे. शब्द म्हणजे वेद असा भाष्यकारांनीं अर्थ केला आहे, परंतु शाब्दप्रमाणानें जें सिद्ध होतें त्याचें नांव शब्द असा वास्तविक अर्थ आहे. यथार्थ वर्णन करणारा जें सांगतो त्याचें नांव शब्द. पुनः या स्थळीं विचार करतांना अडचण उत्पन्न होते, ती अशी कीं जें कांहीं वर्णन आम्हीं ऐकतों तें यथार्थ आहे किंवा नाहीं हें ठरविण्याचा अधिकार कोणाकडे ? कौत्साचार्यादि बुद्धिवाद करणारे म्हणतात कीं हें ठरविण्याचा अधिकार मनुष्याच्या तर्कशक्तीचा आहे. (दुसऱ्या पादाचा उपसंहार पहा.) यास्काचार्यादि असें म्हणतात कीं हा अधिकार शिष्टजनांचा

ed by testimony is not to be accepted, for he uses the term Shabda (word), which commentators explain to be the Veda. But Shabda or word is the name of that which can be established by the method of demonstration called testimony, which is defined to be the statement made by a truthful person. Now at this stage of the discussion, a thinker has to face a difficulty:—who is able to determine whether what is addressed to us is true or false? Rationalists like Koutsa state that it is the legitimate function of the logical faculty (Tarka) of man. See the summary of the last chapter. Yâska, on the contrary, states that this is the legitimate function of the educated (Shista) that is, authority should regulate matters of belief. At present, it is difficult to ascertain who these educated persons are whose authority is binding on all the

२. असें नव्हे. (जरी जें जें वेदांत नाहीं तें तें स्वीकारूं नये तरी) त्यांचा (वेद आणि स्मृति यांचा) कर्ता एकच असल्यामुळें जें वेदांत नाहीं त्याचा स्वीकार करावा, असें अनुमान होतें. (सि०).

2. No, (though whatever is not to be found in the Vedas is not to be accepted, yet) from their author (of the Vedas and Smritis) being common, it is to be inferred that what is not in the Vedas is to be accepted. (Final statement.)

आहे. आतां ते शिष्ट तरी कोण असें विचारिलें असतां आतांशा या गोष्टीचा मुळींच थांग लागत नाहीं. जो उठतो तो मी शिष्ट असें म्हणतो. अंगांत गर्व असला, आणि साधुपणा मिरविला, आणि गळ्यांत सांप्रदायाचें चिन्ह असलें, आणि विद्या असो किंवा नसो थोडी अक्कल लढवून लोकांत झुकविण्याची शक्ति असली, म्हणजे पुरे. ज्याला शिष्टाचा आव घालतां येतो तो शिष्ट. असे शिष्ट गांवोगांवीं माजले आहेत, आणि केवळ पोट जाळण्याकरितां ते ज्या गप्पा मारतात त्यानांच शाब्दप्रमाणाची योग्यता आली आहे. असो. एथें इतकें निर्भीडपणें सांगितलें पाहिजे कीं असे लोक मुळींच शिष्ट नाहींत. तर शिष्ट ते कोण? गृह्यसूत्रादि ग्रंथांत ज्या ऋषींचीं आणि आचार्यांचीं नांवें सांगितलीं आहेत, आणि ज्यांच्या नांवानें ब्रह्मयज्ञ करतांना नित्य तर्पण करावें लागतें, ते शिष्ट. मग या शिष्टमंडळींत कौत्साचार्य, यास्काचार्य, जैमिनि, गौतम हे सर्व येतात. म्हणून या शिष्टांची योग्यता काय हा विचार करणें अवश्य आहे. शाब्दप्रमाणाचे

---

28. An illustration will fully explain the sûtra. A Shastra *i.e.* a group of prose-passages repeated is called Prauga. Another is called Niskevalya. Thus the Shastras have their own distinctive names, therefore, their individual forms are fixed. Because they have their own individual forms, therefore, they are principal.

29. When some Vaidika texts are explained, the sûtra will be easily understood. "Thou art that which is praised." See the Taittiriya Sanhitâ (III. 2, 7, 2, 1.) "We, vigorous, wish for prosperity (in the form) of proge-

"बलवान आम्ही संततिरूप ऐश्वर्य इच्छितों, आणि तें आम्ही दूध काढल्यासारखें प्राप्त करून घेतों. तें मला देवामध्यें सत्य आशीर्वाद होवो." तै० सं० (३.२,७,२,२.) या मंत्रांत स्तोत्राची फलसिद्धि काय हें सांगितलें आहे. देवतांची कांहीं स्तुति केली नाहीं. म्हणून स्तोत्र व शास्त्र हीं मुख्य कर्मे आहेत.

स्तोत्र आणि शास्त्र प्रधान कीं गौण हा वाद येथें समाप्त झाला. मीमांसकांचा व बौद्धांचा हा वाद कां झाला याचेविषयीं आम्हीं पूर्वी एक दोन वेळां सांगितलें आहे. आतां स्तोत्रशास्त्रांवरच बौद्धाचार्यांनीं कटाक्ष कां ठेवला याचें कारण सांगितलें पाहिजे. वेदपरंपरेनें चालणारे मीमांसक यज्ञयाग करणें हेंच मनुष्याचें मुख्य कर्तव्य आहे असें मानतात. बौद्ध पंडित यज्ञाचा निषेध करतात. आतां यज्ञाचा अर्थ तरी काय? स्तोत्ररूप गाणीं गाऊन आणि शास्त्ररूप गद्यात्मक स्तुति करून देवतांचें स्वरूप कथन करणें, आणि त्या नंतर त्यांस हवि म्हणजे तूप, पुरोडाश इत्यादि अर्पण करणें. तेव्हां स्तोत्र आणि शास्त्र हाच यज्ञाचा मुख्य आकार, आणि हाच देवता. स्तोत्रशास्त्रें देवता नव्हत, तर तीं देवतांचा अनुवाद करतात. म्हणून तीं मुख्य नाहींत. असें म्हटल्यानें यज्ञाचा निषेध होतो, असें धोरण धरून बौद्ध पंडितांनीं पूर्वपक्ष केले. आणि स्तोत्रशास्त्रें मुख्य आहेत असें म्हटल्यानें यज्ञाचें मंडन होतें असें

ny and we milk it. Let it be a true blessing to me among the gods." See the Taittiriya Sanhitâ (III. 2, 7, 2, 2.) These texts explicity declare what the fruit of singing verses (Stotra) and repeating prose-passages is. They do not in any way praise gods. Hence the sacrificial verses sung and sacrificial prose-passages repeated i. e. Stotras and Shastras are principal works.

This discussion as to the Stotras and Shastras being principal or subordinate is concluded in the 29th sûtra. We have already pointed out the bearing of such a discussion between the Mîmânsakas and the Bouddhas. We will now explain the cause of the last directing their special attention to the Stotras and Shastras. The Mîmânsakas who adhere to Vaidika practices consider it the special and pre-eminent duty of man to perform sacrificies; the Buddhists, on the contrary, condemn and repudiate them. What is the signification of a sacrifice? What does it really consist in? It is throwing an offering into a sacred fire after singing prescribed verses (Stotras), and repeating prescribed prose-passages (Shastras) for invoking and praising a particular god. The Mîmânsakas hold that the Stotras and Shastras represent the god praised, nay they constitute the god. The Buddhists, on the contrary, in the course of the discussion argued that the Stotras and Shastras were not the god, but that they were simply employed to praise them, the name and form of gods being already known by other independent means. They, therefore, insisted on the Stotras

सूत्राणि.

अथ मन्त्राविधायकत्वाधिकरणम् ॥

विधिमन्त्रयोरैकार्थ्यमैकशब्द्यात् ॥ ३० ॥ (पू०)

पदानि । विधि-मन्त्रयोः, ऐकार्थ्यम्. ऐकशब्द्यात् ॥

पदार्थः । विधिः=(१.२,५३. सूत्रे निरूपितः) ब्राह्मणम् । मन्त्रः= संहिता । एकश्चासावर्थश्च=एकार्थः । तस्य भावः= ऐकार्थ्यम् । एकश्चासौ शब्दश्च=एकशब्दः. । तत्वं= ऐकशब्द्यम् । तस्मात्=ऐकशब्द्यात् ॥

वाक्यार्थः । ऐकशब्द्याद् धेतोः संहिताब्राह्मणयोरैकार्थ्यम् ॥

भावार्थः । ये शब्दा यथा संहितायामागच्छन्ति ते तथैव ब्राह्मणे आगच्छन्ति । अतः संहिताब्राह्मणयोर्भेदो नास्ति ॥

अनुसन्धेयानि वेदवाक्यानि ॥

न ता नशन्ति न दभाति तस्करः । नैनाअमित्रोव्यथिरादधर्षति ॥
देवा ४श्च याभिर्यजते ददाति च ज्योगित्ताभिः सचते गोपतिः सह॥
तै. ब्रा. (२,४,६,९.)

यजते ददातीत्युदाहरणम्—स एवायमेकः शब्दो ब्राह्मणगतो विधास्यति मन्त्रगतो न शक्नोति विधातुमित्यनुपपन्नमिति शबरः पूर्वपक्षं वर्णयति ॥

धोरण धरून जैमिनीनें पूर्वपक्षाचें खंडन केलें आहे.

and Shastras being subordinate, and believed that by proving this, they could condemn and repudiate sacrifices. The Mîmânsakas, on the contrary, insisted on the Stotras and Shastras being principal, and believed that by proving this, they could commend and establish the system of sacrifices.

***आतां मंत्रामध्यें कांहीं विधि नसतो हा विचार.**

३०. ब्राम्हण आणि मंत्र या दोन्हीचा एकच अर्थ आहे, कारण (दोन्हीमध्यें) एका प्रकारचे शब्द येतात. (पू०)

३०. हें पूर्वपक्षसूत्र आहे. यांत पूर्वपक्षकाराचें म्हणणें एवढेंच आहे कीं, संहितेंत व ब्राम्हणांत लिहिण्याची पद्धति एकाच प्रकारची आहे. आणि जे शब्द संहितेंत येतात तेच ब्राम्हणांत येतात, म्हणून संहिता व ब्राम्हण यांत भेद नाहीं. यास दृष्टांत. दानार्थी क्रियापदें किंवा यजनार्थी क्रियापदें दोहींमध्यें सारखींच येतात. सिद्धांती आचार्य संहिता आणि ब्राम्हण यांमध्यें भेद आहे, हें पुढील सूत्रीं दाखवितात.

* वेदाचे दोन भाग आहेत हें सर्वत्र प्रसिद्ध आहे:—एक मंत्र व दुसरा ब्राम्हण. त्यांत मंत्र हें नांव संहितेचेंच असें निष्पन्न होतें. आणि संहितेमध्यें अमुक करावें आणि अमुक न करावें असा विधि किंवा निषेध नाहीं, असा या अधिकरणाचा अर्थ आहे.

* NOW THE SUBJECT OF THE MANTRAS NOT LAYING DOWN A DUTY.

30. The Mantras (Sanhitâs) and Brâhmaṇas have the same purport, because the same words occur in them both. (Opponent's statement.)

30. This sûtra is a statement of an opponent who insists on the method of exposition to be identical in the Sanhitâs and Brâhmaṇas, and on the identity of words as used in the Sanhitâs and Brâhmaṇas, and comes to the conclusion that the one does not essentially differ from the other. The opponent states, to illustrate his point, that words meaning a gift or an act of a sacrifice occur equally in the Sanhitâs and Brâhmaṇa-works. We must observe that the opponent cannot include some portions of the Ṛik-Sanhitâ in his statement. In the following sûtra, Jaimini undertakes to point out a distinction between the two classes of Vedic literature.

*It is well-known that the Vedas are divided into two parts—the Mantras and the Brâhmaṇas The term Mantra is to be restricted to the compositions known as Sanhitâs which neither enjoin nor prohibit a duty. This is the bearing of this discussion.

सूत्राणि.

अपि वा प्रयोगसामर्थ्यान्मन्त्रोऽभिधानवाची स्यात् ॥ ३१ ॥ (सि०)

पदार्थः । अपि वा=न । प्रयोगः=यज्ञक्रिया । सामर्थ्यात्=योजनारूपशक्तेः । अभिधानं वक्तीति=अभिधानवाची=अर्थनिरूपकः ॥

वाक्यार्थः । न । क्रियमाणे यज्ञप्रयोगे मन्त्राः (केवलं) अर्थं वर्णयंति ॥

भावार्थः । सूत्रेणानेनाचार्यो मन्त्रं लक्षयति । मन्त्रस्य किं रूपम् ? प्रत्यायनम् । यद् रूपमिदं यज्ञप्रयोगे तज् ज्ञायते । मन्त्रस्य युगपत् पर्यवसानं केवलज्ञाने । न तु क्रियायाम् ॥

अथ मन्त्रनिर्वचनाधिकरणम् ॥

तच्चोदकेषु मन्त्राख्या ॥ ३२ ॥

पदार्थः । तत्=कर्म । तच् चोदयतीति=तच्चोदकः । चोदयति=ज्ञापयति ॥

भावार्थः । शबरस्वामिना सूत्रस्थतत्पदेनाभिधानं गृहीतम् । गृहीतेऽभिधाने पुनरुक्तिदोषः प्राप्नोति । तत्पदेन कर्मणि गृहीते पुनरुक्तिर्व्यर्थयते । खण्डदेवेन पूर्वसूत्रमुपलक्षणं पुनरिदं तु लक्षणमिति व्याख्यातम् । यः कर्मसम्बन्धिभावनामुत्पादयति स मन्त्रः । इत्यनेन सूत्रेण मन्त्रलक्षणस्य निर्वचनं कृतमिति भाति ।

प्रयोगे क्रियमाणेऽस्य (मन्त्रस्य) सामर्थ्यं विद्यते । कुतः । विहितत्वाद् गोदानस्य दक्षिणाविधाने । गोयागस्य त्वनुबन्ध्यायाम् । इति शबरः ॥

३१. नव्हे. प्रयोगाच्या सामर्थ्यावरून मंत्रामध्यें अभिधान (मात्र) असतें. (सि०)

31. No. From the power of composition, (it is plain that)a Mantra (consists of) a statement (only). (Final statement.)

आतां मंत्राच्या व्युत्पत्तीविषयीं विचार.

NOW, THE SUBJECT OF THE ANALYSIS OF THE MANTRAS.

३२. कर्माची भावना उत्पन्न करणाराचें नांव मंत्र.

32. That which produces in the human mind a conception of an action is a Mantra.

३१. आचार्य पूर्वपक्षकारास म्हणतातः—"बाबा, संहिता आणि ब्राम्हण हे एक कसे होतील? संहितेमध्यें मंत्र असतात, आणि मंत्रांमध्यें नुस्तें वर्णन असतें. अमुक करावें आणि अमुक न करावें असें सांगितलें नसतें." सूत्रांत अभिधान म्हणून शब्द आहे. त्याच्या अर्थाविषयीं (१. २, ४६.) सूत्राची टिप पहा. सूत्रांमध्यें प्रयोगसामर्थ्य असें पद आहे. त्यांत प्रयोग हें पद मोठ्या अडचणीचें आहे, कारण त्याचे निरनिराळे अर्थ होतात. त्याचा मुख्य अर्थ जुळणी असा आहे. या अर्थास अनुसरून त्याचे दुसरे अर्थ बसवितां येतात. न्यायप्रयोग म्हणजे न्यायशास्त्रांतील पांच अवयवांची जुळणी करून अनुमान काढणें. अस्त्रप्रयोग म्हणजे अस्त्र टाकणें. नाटकप्रयोग म्हणजे नाटक करणें. विषप्रयोग करणें म्हणजे विष घालणें. वाक्प्रयोग म्हणजे शिव्या देणें. या सूत्रीं शबरानीं प्रयोग याचा अर्थ कर्म असा केला आहे असें भासतें.

31. Jaimini says to the opponent :—Well! How can Sanhitâs and Brâhmaṇas be identical? A Sanhitâ consists of Mantras, and Mantras simply are descriptive. They do not enjoin any duty. The term Abhidhâna is used in the sûtra. Its sense is fully explained in the foot-note to (I. 2, 46.) sûtra. The term Prayoga-Sâmarthya is also used in the sûtra. The term Prayoga is rather indefinite, for it has different senses. Its principal sense is conjunction. All its other senses can be derived from this sense. Nyâya-Prayoga signifies a syllogism, that is, the conjunction of the premises. Astra-Prayoga signifies using a missile. Nâtaka-Prayoga is the performance of a drama. Visa-Prayoga is giving poison. Vâk-Prayoga is using the tongue badly. It appears that commentator Shabara interprets the term Prayoga in this sûtra into an action. But the term appears to us to signify an exposition. The Mantras simply expound different matters for the enlightenment of the mind. On this ground, Jaimini

सूत्राणि.

अथ ब्राह्मणनिर्वचनाधिकरणम् ॥

शेषे ब्राह्मणशब्दः ॥ ३३ ॥

भावार्थः । यो वेदभागो न मन्त्रस्तद् ब्राह्मणम् । इति परिशेषसिद्धं लक्षणमिदम् ॥

परंतु प्रयोग याचा अर्थ कथन असा नीट बसतो. मंत्रामध्यें ज्ञान होण्याकरतां निरनिराळ्या विषयांचें कथन असनें, असें कारण दाखवून मंत्र अभिधानवाचक आहेत, असा आचार्यांनीं सिद्धान्त केला आहे.

३२. मागील व या सूत्रांत मंत्राचें लक्षण केलें आहे असें भाष्यकाराचें मत दिसतें. परंतु आम्हांस तसें वाटत नाहीं. मीमांसाकौस्तुभ नामक ग्रंथांत खंडदेवानें या दोन सूत्रांची व्यवस्था केली आहे. खंडदेव असें म्हणतो कीं, ३१ व्या सूत्रीं आचार्यांनीं मंत्राचें उपलक्षण केलें आहे, आणि ३२ व्या सूत्रीं मंत्राचें लक्षण केलें आहे. आम्हांस असें वाटतें कीं, ३१व्या सूत्रांत मंत्राचें लक्षण आहे, आणि ३२ व्या सूत्रांत त्याच लक्षणाची उपपत्ति आहे. अशी या दोन सूत्रांची व्यवस्था केली असतां आचार्यांच्या ग्रंथाचें योग्य समर्थन होतें. हें आमचें म्हणणें सूत्रार्थावरून लक्षांत येईल. तच्चोदक असें जें सूत्रांत पद आहे, तें विचार करण्याजोगें आहे. चोदक म्हणजे चोदना करणारें, म्हणजे मनांत अर्थाविषयीं भावना उत्पन्न कर-

bases his statement that the Mantras are only descriptive.

32. Commentator Shabara implies that Jaimini defines a Mantra in the last two sûtras. But we do not see this. In the Mîmânsâ-Koustubha, Khaṇḍadeva examines these sûtras and adjusts their relation to one another. He states that in the 31st sûtra, Jaimini simply shows the bearing of the definition of a Mantra, and that in the 32nd sûtra the real definition of a Mantra is given. We believe that the 31st sûtra gives the definition and that the 32nd sûtra simply explains the definition. When these two sûtras are adjusted in this way, the statements of Jaimini are properly interpreted. Our statement will be understood when the sense of the two sûtras is considered. The compound term *Tat-chodaka* used in the sûtra deserves attention. The term *chodaka* signifies that which generates the *chodanâ*—that is, that which produces in the mind a conception of the sense of a term. The signification of the term *chodanâ* is explained in the foot-note to (I. 1, 2.) Now to what does the term *Tat* refer? Commentator Shabara says that *Tat* refers to the term *Abhidhâna* in the 31st sûtra. We find it rational to state that the term

३३. (मंत्रावाचून) बाकीचें ब्राह्मण.

णारें. चोदना व भावना यांचा पूर्वी विचार झालाच आहे. तत्पदानें काय समजावयाचें ? तत्पदानें भाष्यकार ३१ व्या सूत्रांतील अभिधान हें पद घेतात. तत्पदानें आम्ही त्याच सूत्रांतील प्रयोग हें पद घेतों. सूत्रार्थ इतकाच कीं, ज्यांत अमुक करावें किंवा अमुक न करावें असा निर्देश नसतां ज्याच्या योगानें कर्मांचें ज्ञान मात्र उत्पन्न होतें त्याचें नांव मंत्र. मीमांसकांनीं मंत्रांचा विभाग केला आहे. कांहीं मंत्रांत आशीर्वाद असतो. कांहीं मन्त्रांत पदार्थांचें वर्णन असतें. कांहीं मंन्त्रांत स्तुति असते. कांहीं मंत्रांत शोक असतो, कांहीं मंत्रांत आज्ञा असते. कांहीं मंत्रांत शोध असतो. कांहीं मंत्रांत प्रश्न असतो. कांहीं मंत्रांत संबंध दाखविला असतो. कांहीं मंत्रांत त्यांच्या सामर्थ्याचें वर्णन केलेलें असतें. कांहीं मंत्रांत प्रयोग दाखविला असतो. कांहीं मंत्रांत प्रश्नाचें उत्तर असतें. तैत्तिरीय ब्राम्हणांत (१.२,१,२६.) एथें मंत्र म्हणजे काय हें दाखविलें आहे. तें वाक्य हें:—" अहे बुध्नियं मन्त्रं मे गोपाय । यमृषयस्त्रयिविदा विदुः । ऋचः सामानि यजूंषि । सा हि श्रीरमृता सुताम् ॥ " या मंत्राचा अर्थ असा कीं, "हे अहे बुध्निय (आहिंसितव्य आवसथ्य अग्ने,) त्रयी जाणणारे ऋषि ऋचा सामें

33. (Those parts of the Veda) which are not Mantras are Brâhmaṇas.

Tat refers to the term *Prayoga* in the 31st sûtra. The sense of the sûtra under examination is simply this :—That which merely generates the knowledge of an action without laying down any positive injunction or prohibition is a Mantra. The Mimânsakas divide the Mantras thus:—Some Mantras consist of a benediction : others describe objects. Some Mantras consist of praises : others embody lamentation. Some Mantras give commands : others investigate a subject. Some Mantras ask questions : others point out the relationship of statements. Some Mantras elucidate their own power : others point out the use of an object, or give answers. The Taittirîya Brâhmaṇa (I. 2. 1, 26.) explains what a Mantra is. It means : " Oh ! Ahebudhnîya (oh! household fire) protect my Mantra (that) which the *risis*, well-versed in the threefold knowledge, know to be *Rik*, Sâman and Yajus, because it is the eternal glory of the good." The question why Jaimini should endeavour so much to define a Mantra is natural. The answer to this question is given in a shloka quoted by Shabara. It means:— "Even the *risis* can not exhaustively enumerate all natural objects. But learned scholars enumerate them by means of definitions (generalizations)."

33. The method of definition which may be called residual is often employed in Pâṇini's grammar and other ancient works. When two or more terms are to

आणि यजू (असें) ज्याला जाणतात (तो) माझा मन्त्र रक्ष कारण तो सज्जनाचें चिरंतन ऐश्वर्य आहे." इतकी मन्त्राच्या लक्षणाविषयीं खटपट कां केली ? असें विचारिलें असतां शबरानीं एक श्लोक लिहून ठेवला आहे त्याचें आम्ही भाषांतर करतों. "ऋषींना देखील एक एक असे पदार्थांचें परिगणन करतां येत नाहीं. परंतु पंडितजन सिद्ध पदार्थांचें लक्षणाच्या योगानें परिगणन करतात.

३३ व्याकरणादि शास्त्रांत लक्षणें करण्याची रीति अशी आहे कीं, दोन पदार्थांचें लक्षण करतांना एक पदार्थाचें लक्षण करून त्यावाचून राहिलेलें दुसरें असें सांगतात. यास शैषिक लक्षण असें म्हणतात. मीमांसक ब्राम्हणाचे निरनिराळे भेद करतात ते असेः—कांहीं ब्राम्हण ग्रंथ आख्यायिकारूप असतो. कांहीं ब्राम्हण ग्रंथांत हेतूचें वर्णन केलेलें असतें. ब्राम्हणग्रंथांत कोठें शब्दाची व्युत्पत्ति दिलेली असते, कोठें निंदा असते, कोठें प्रशंसा असते, कोठें संशय असतो, कोठें परकृतीचें म्हणजे दुसरे आपल्याकरितां जें करितात त्याचें वर्णन असतें, कोठें पुराकल्प म्हणजे पूर्वकालाचें वर्णन असतें, कोठें व्यवधारणकल्पना म्हणजे व्यवस्था करून निश्चय करण्याची कल्पना असते हे जे ब्राम्हणाचे भेद केलेले आहेत ते मन्त्रांतहि अढळतात, व मन्त्रांतलि भेद ब्राम्हणांतहि अढळतात. म्हणून मीमांसकांच्या अशा भेदांपासून मंत्र किंवा ब्राम्हण याचें लक्षण बांधतां येत

be defined, a residual definition is given of the last. This is called Shaisika Laksana (residual definition). The Mîmânsakas subdivide the subjects treated of in the Brâhmanas in the following way. Some portions narrate stories: others are argumentative, and explain the etymology of words: some condemn and others praise practices and rites. Some simply raise a doubt: others describe the acts of officiating priests; some give an account of ages gone by: others explain the adjustment of the sense of passages as based on proper interpretation. It is said by an opponent that such subjects as are mentioned in this division are to be seen in the Mantras, and the subjects treated of in the Mantras are to be seen in Brâhmanas. Hence the opponent concludes that there is no distinction between Mantras and Brâhmanas. Sâyanâchârya comes to the same conclusion in the introduction to his commentary of the Rik-Sanhitâ. We will now illustrate the subdivisions of the Mantra-portion as well as of the Brâhmana-portion of the different Vedas. "Thou art a giver of a blessing."—an example of a benediction. "Agni is the head."—an example of praise. "One mine" is an example of a number. "Oh Indra, thy eyes are yellowish like those of a frog."—an example of a conversation. "Oh Ambâ, oh Ambikâ, oh Ambâlikâ" an example of lamentation. "Oh kindler of fire—oh priest, place a fire."—an example of a sacrificial order. "What are thou?" "What is thy number?"—an example of enquiry. "I ask thee."—an example of a question. "This—a sacrificial

नाहीं. सायणाचार्यांनीं ऋग्वेदाच्या उपोद्घातांतहि असाच निर्णय केला आहे. मन्त्राच्या आणि ब्राह्मणाच्या निरनिराळ्या प्रकारांची आम्हीं उदाहरणें देतों. "अग्नि हें मस्तक आहे." ही स्तुति. "एक माझा" ही संख्या. "तूं आयुर्दान करणारा आहेस" हा आशीर्वाद. "हे इंद्रा, तुझे डोळे बेडकासारखे पिंगळे आहेत." हें संभाषण. "अंबे, अंबिके, अंबालिके" हें शोकपर आहे. "हे अग्नि पेटवणाऱ्या ऋत्विक्, अग्नि मांड." हा प्रैष आहे. "तूं कोण आहेस? कितवा आहेस"? हा शोध. "तुला विचारतों" हा प्रश्न. "ही वेदी" हें आख्यान. "न तुटलेल्या दर्भांनीं" हा अनुषंग. या पादाचे १८व्या सूत्रांत या मन्त्राचा विचार होईल. "तीन स्वरपणा आणि चार स्वरपणा" हा प्रयोग हे जसे मन्त्राचे प्रकार आहेत तसेच ब्राह्मणाचेहि अढळतात. मग ह्या प्रकारांचा उपयोग काय? आतां ब्राह्मणांतील उदाहरणें:—"मी प्रजा उत्पन्न करावी." हें आशीर्वचन. "वायु हि अतिशय चपल देवता आहे." ही स्तुति. "आम्ही ब्राह्मण आहों किंवा आम्ही ब्राह्मण नाहीं हें आम्ही जाणत नाहीं." हें संभाषण. "ज्यांनीं माझी धार काढली त्यांनीं मला सोडून दिलें." हें शोकपर आहे. "येथून सोम आण." हा प्रैष "तो येथें किंवा तो येथें" हा शोध. "दुबेळक्याची समिध जाण." हा प्रश्न. "किंवा आम्ही जाणतों." हें प्रत्युत्तर. "काळजाच्या टोंकावर तो आवदान कापून

ground"—an example of a description. "By means of unbroken grass"—an example of logical connection. This text will be specially examined in the foot-note to the 48th sûtra of this chapter. "The property of having three accents and the property of having four accents"—an example of practical application. These are the different kinds of the Mantras. The same kinds are to be met with in the Brâhmana-literature. Now examples from the Brâhmana-literature. "May I have children."—an example of a benediction. "Wind is a nimble god."—an example of praise. "We do not know whether we are Brâhmanas or not."—an example of conversation. "Those who milked me have abandoned me."—an example of lamentation. "Bring Soma from this place."—an example of a sacrificial order. "Is he here or there?"—an example of enquiry. "Know a divided twig."—an example of a question. "Or we know" is an answer. "He cuts a sacrificial oblation from the point of the heart (of a victim), then from the point of the tongue, then from the chest."—an example of an act. "He takes an oblation of a liquid in a ladle."—an example of the power of a word. Thus when the examples as quoted from the Brâhmana-literature are compared with those quoted from the Sanhitâ-literature, it will be seen that there is no distinction between the two sets of examples. Then what is the use of such divisions? Again, the style of composition as seen in the Brâhmana-liturature is analogous to that of the sanhitâ-

सूत्राणि.

अथोहाद्यमन्त्रताधिकरणम् ॥

आम्नातेष्वमन्त्रत्वमाम्नातेषु हि विभागः ॥ ३४ ॥

पदार्थः । यत् न वेदे पठितं तदनाम्नातम् । यत् पठितं तदाम्नातम् । हि=यस्मात् ॥

भावार्थः । प्रतिपदोक्तं वेदत्वेन यत् न पठितं तत् न मंत्ररूपम् । कुतः । वेदत्वेन यत् पठितं तत्र मन्त्रब्राह्मणरूपो विभागः ॥

अथ ऋग्लक्षणाधिकरणम् ॥

तेषामृग्यत्रार्थवशेन पादव्यवस्था ॥ ३५ ॥

पदानि । तेषाम्, ऋक्, यत्र, अर्थवशेन, पाद-व्यवस्था ॥

पदार्थः । अर्थवशेन=अर्थानुरोधेन । पादः=चरणः (छंदःशास्त्रप्रसिद्धः)

वाक्यार्थः । येषां मंत्राणां छंदःशास्त्रप्रसिद्धचरणव्यवस्था वर्तते त ऋङ्नामानः ॥

भावार्थः । अस्मिन् सूत्रे आचार्येण धर्मद्वयलक्षणेनर्गलक्षणं कृतम् । मन्त्रत्वं सामान्या जातिः । अर्थवत्त्वं वृत्तत्वं च व्यावर्तकौ धर्मौ । यजुष्यर्थवत्त्वं मन्त्रत्वं च वर्तेते । तत्र तु वृत्तत्वं नास्ति । अतो यजुषो व्यावृत्तिः । सामनि मन्त्रत्वं वृत्तत्वमर्थवत्त्वं च । अतस्तत्र लक्षणसमन्वयो भासते । उत्तरस्मिन् सूत्र आचार्येण सामलक्षणं कृतम् ॥

धेतो, मग जिभेच्या मग छातींत" हा प्रयोग. "स्तुवा या पळीनें तो द्रव्यांतून अवशान घेतो" हें सामर्थ्य प्रदर्शन. ब्राम्हणांतील या उदाहरणांवरून आणि वरील संहितेंतील उदाहरणांवरून असें दिसतें कीं, संहितेंतील व ब्राम्हणांतील भेद सारखेच पडतात. पण असे भेद पाहून उपयोग काय? पुनः ब्राम्हणाचे

literature. We will illustrate this statement. As the words "so, it is" (iti, ha) occur in the Brâhmanas, so they occur in the Sanhitâs Hence both narrate events. An example will explain this fully. "This or that my mind." He said—grant me wealth (*Rik*-sanhitâ VII. 41, 2.) He sacrifices with a winnowing fan because it is the

आतां ऊह मंत्र नव्हेत हा विचार.

३४. जें अवैदिक तें अमंत्र आहे. कारण वैदिकविषयांचा विभाग आहे.

ऋचेच्या लक्षणाविषयीं विचार.

३५. ज्यांमध्यें अर्थाच्या धोरणानें पादव्यवस्था असते, त्या मंत्रांचें नांव ऋक्.

निरनिराळे भेद आम्हीं वरती वर्णिले आहेत. तसेच भेद संहितेचे हि अढळतात याचाहि थोडा एथें विचार केला पाहिजे. "इति, ह" अशीं पदें ब्राम्हणामध्यें अढळतात. त्यावरून आख्यायिकेचें वर्णन आहे असें दिसतें. अशींच पदें संहितेंत अढळून तेथेंहि आख्यायिकेचें वर्णन असतें. यास उदाहरणः-"असें किंवा असें माझें मन." ऋ. सं. "(१०.११०, १.) "मला धन दे असें तो म्हणाला."ऋ०सं० (७.४१,२) "सुपानें तो याग करतो, कारण त्यानें अन्न तयार होतें." हा हेतु. हा ब्राम्हणांतील मंत्र आहे. "तुम्हांला किंवा तुम्हा दोघांला ते हें इच्छितात." हा हेतु. "म्हणून पाण्याच्या मागून व्हा." ही व्युत्पत्ति. "म्हणून दह्याला दहीपणा." हो व्युत्पत्ति. "याचे अग्नि गेले" ही निंदा. "अज्ञानाला व्यर्थ अन्न मिळतें." ऋ.

NOW THE SUBJECT OF THE ÛHAS (SUBSTITUTION) NOT BEING MANTRAS.

34. Whatever is non-Vaidika is not a Mantra, for the Vaidika (alone is capable of) adjustment, (literally, for a division in matters Vaidika).

NOW THE SUBJECT OF THE DEFINITION OF A *Rik*.

35. That Mantra in which there is a metrical arrangement of words as in a line (and) which conveys some sense, is a *Rik*.

---

means of preparing food." This is a text from a Brâhmana. "They wish this for you two or for you."—an example of a reason. "Therefore follow waters."—an example of explanation. "Therefore, curds are curds."—an example of etymology. "The fires of this (sacrificer) have gone out." "The ignorant get food for nothing." Vide the *Rik*-Sanhitâ (X. 117, 6.)—these two are examples of reproach. "The wind is a very blithe god."—an example of praise. "What was below? Oh! What was above?" Vide the *Rik*-Sanhitâ(X. 129, 6.) —an example of doubt. "Give wealth (alms) to those who ask for it." Vide the *Rik*-Sanhitâ (X. 117, 5.)—an example of an original statement or a positive injunction. "The post of Udumbara (ficus glomerata)is as tall as the sacrificer."—another example of the same. "He cooks the pulse called *phaseolus radiatus*

सं. (१०. ११७,६.) ही निंदा. "वायु ही अति चपल देवता आहे." ही प्रशंसा. (सर्व देवांत) श्रेष्ठ "अग्नि." ऋ. सं. (८.४४,१६.) ही प्रशंसा. "खालीं तरी काय होतें? कीं, वर किंवा वरती तरी काय होतें?" ऋ. सं. (१०. १२१,६.) हा संशय. "गार्हपत्य अग्नीमध्यें हवन करावें कां नाहीं?" हा संशय. "मागणाराला धन द्यावेंच." ऋ. सं. (१०,११७,५.) हा विधि. "उंबराचा खांब यजमाना इतकाच उंच असतो." हा विधि. "उडदालाच मजकरतां शिजवितो." ही परकृति. "दहा हजारापासून हजार देता झाला." ही परकृति. "आणि पूर्वीचे जळक्या लांकडांबरोबर समागम करते झाले." हा पुरा कल्प. "देवांनीं यज्ञानें यज्ञाचें यजन केलें म्हणजे घर्षणानें उत्पन्न केलेल्या अग्नीच्या योगानें गार्हपत्यकुंडांतील अग्नीचें यजन केलें." हा पुरा कल्प. अशीं ज्या प्रकारचीं उदाहरणें संहितेंत अढळतात त्याच प्रकारचीं ब्राह्मणांतहि अढळतात. म्हणून ब्राह्मणाचे अमके प्रकार व संहितेचे अमके प्रकार हें योग्य नाहीं.

३४. सूत्रामध्यें मुख्य विचार करण्याजोगा शब्द आम्नात आहे. आम्नात हा शब्द संहिता व ब्राह्मण यांत निदान आम्हांस तरी अढळला नाहीं. आचार्याच्या वेळीं वेद कशास म्हणावे असा विचार उत्पन्न झाला. कात्यायनानें "स्वाध्यायोऽध्येतव्यः" म्हणजे "निदान आपल्या शाखेचें तरी अध्य-

for me."—an example of doing something for others or beneficence. "He gave ten thousands," (literally from ten thousands.)—an example of the same. "The ancients became united with firebrands (Sanskrit Ulmuka)"—an example of an ancient institution (Purâ-kalpa). "The gods sacrificed a sacrifice by means of a sacrifice."—another case of the same. This mystic verse of the *Rik*-Sanhitâ is explained in the Aitareya-Brâhmana in the following way:—"The gods, having produced fire by friction, introduced it into the Gârhapatya-fire-place." The same examples as those in the Sanhitâ-works, are met with in the Brâhmana-works. Hence the division and characterization of the Sanhitâ or Brâhmana-works as made by the Mîmânsakas are not satisfactory.

34. The important word in the sûtra is Âmnâta. We have not met with it either in a Sanhitâ or Brâhmana-work. The question as to what deserved to be called the Veda was first raised at the time of the Âchâryas. Kâtyâyana mentions Svâdhyâya or one's own study when he lays down "the Svâdhyâya is to be studied." The modern Mîmânsakas discuss very vehemently the statement of Kâtyâyana to determine whether it is restrictive or exclusively specific in its force. We will examine this subject in its proper place. Yâskâchârya states in his Nirukta—the Collection or Veda is enumerated or stated—the original is *Samâmnâyas samâmnâtas*. Here the word *Âmnâya* simply signifies enumeration of the different branches of knowledge. Now the

यन करावेंच करावें." असा विधि केला. अर्वाचीन मीमांसक हा नियम आहे कीं परिसंख्या आहे याविषयीं पुष्कळ खटपट करीत बसतात. त्याविषयीं आम्ही यथाप्रसंगीं विचार करूं. यास्काचार्यांनीं "समाम्नायः समाम्नातः" असें निरुक्तांत म्हटलें आहे. त्या ठिकाणींहि त्या वेळच्या विद्येचें परिगणन इतकेंच पर्यवसान होतें. असें विद्येचें परिगणन करण्याचें प्रयोजन कोणतें? असें विचारल्यास त्या वेळच्या शाळेमध्यें विद्यार्थी ब्रह्मचर्यव्रत करीत असतां ष आचार्याजवळ अध्ययन करीत असतां कोणते कोणते विषय तो शिकला म्हणजे तो स्वाध्याय शिकला असें ठरविणें भाग पडे. निरनिराळ्या आचार्यांनीं स्वाध्यायाचें निरनिराळ्या रीतीनें परिगणन केलें आहे. निरनिराळ्या काळचीं स्वाध्यायाचीं निरनिराळीं लक्षणें घेऊन त्यांतील विषयाचें कोष्टक केलें आणि त्यांचा बारीक रीतीनें शोध केला असतां त्या अति प्राचीन काळीं विद्याबुद्धि कशी झाली हें समजतें, आणि कालानुक्रमाचा निर्णय करतां येतो. असो. सूत्रार्थ इतकाच कीं, ज्यांस आम्नात म्हटलें आहे त्यांतच कायते मंत्र आहेत. आम्नात म्हणजे वैदिक मंत्राची जणों यादच आहे. म्हणून वैदिकमंत्र अमका असें ओळखतां येतें. यज्ञसमयीं जे मंत्र म्हणावे लागतात, त्या मंत्रांमध्यें कधीं कधीं भूतकाळाच्या ठिकाणीं वर्तमानकाळ, आणि एकवचनाच्या ठिकाणीं अनेकवचन असे फेरफार

question is natural—where is the necessity for such an enumeration or rather a catalogue? At the time of the Âchâryas, bachelors spent years in acquiring knowledge. Regular schools where systematic instruction was imparted by teachers of reputation formed an essential part of the social and religious economy of the times. Hence as the curriculum of the schools was altered and enlarged at different times, different Âchâryas, at once teachers and philosophers, developed and stated it in different ways. Hence there were different curriculums at different periods of the history of the ancient Âryas. A tabulated statement of the different subjects as they are enumerated by different Âchâryas is likely to throw much light on the exact signification of the word Âmnâya and on the chronology of the different historical periods. The general sense of the sûtra is—that Mantras as such are always to be met with directly in a Vaidika treatise recognized as such, because the Vaidika treatises are, as it were, numbered and catalogued. Hence the words substituted (called Ûhas) for those in the original Mantras by sacrificing priests are not Mantras. The subject of the Ûhas is already considered in the foot-note to (I. 2, 53.)

35. There are two words in the sûtra deserving to be considered. The first is *Arthânurodhena*—in conformity with signification—and the second—*Pâdavyavasthâ*—a metrical arrangement. What is a metrical arrangement? The metrical feet

सूत्राणि.

अथ सामलक्षणाधिकरणम् ॥

गीतिषु सामाख्या ॥ ३६ ॥

पदार्थः । गीतिः=गानम् ॥

वाक्यार्थः । यद् गीयते तत् साम ॥

भावार्थः । अस्मिन् सूत्रे जैमिनिः साम लक्षयति । सति मन्त्रत्वे सति वृत्तत्वे सत्यर्थवत्वे च गीतित्वम् ॥

अथ यजुर्लक्षणाधिकरणम् ॥

शेषे यजुःशब्दः ॥ ३७ ॥

पदार्थः । शेषे=ऋक्सामभिन्ने ॥

वाक्यार्थः । या न ऋङ् न साम वा स मन्त्रो यजुः ॥

भावार्थः । शैषिकं लक्षणमिदम् । शास्त्रे शैषिकलक्षणपद्धतिः प्रसिद्धा । यथा पाणिनीये षष्ठी शेषे इति ॥

या न गीतिर्न च पादबद्धं तत् प्रश्लिष्टपठितं यजुः । इति शबरः ॥

याज्ञिक जन करतात. आणि या फेरफारास ऊह असें म्हणतात. ऊहाविषयीं आम्हीं पूर्वी विचार केला आहे(१.२,५३.) सूत्र पहा. या सूत्राचें इतकेंच तात्पर्य आहे कीं, ऊह कांहीं मंत्र नाहीं.

३५. सूत्रांत दोन पदें विचार करण्याजोगीं आहेत:-एक "अर्थानुरोधेन" आणि दुसरें "पादव्यवस्था." पादव्यवस्था म्हणजे काय ? म,य,र,स,त,ज,भ,न हे अक्षरगण छंदःशास्त्रीं प्रसिद्ध आहेत. अमुकच अक्षरगण एका ओळींत येतात असा छंदःशास्त्रीं नियम आहे. आणि अमुक ओळी आल्या म्हणजे छंदःशा-

ma, ya, ra, sa and others are well-known in the treatises on metres. A poetical line admits of a certain number of syllables. A certain number of such lines constitutes a verse. The lines are called pâdas in Sanskrit. Pâdavyavasthâ means then the arrangement of metrical lines. Why is the phrase—Arthânurodhena—used in the sûtra? Because otherwise the sûtra as a definition would include too much, as senseless yet metrically correct lines can be composed, for palâ palâ palâ palâ is a correct iambic line, but it makes no sense. Thus

सामाच्या लक्षणाचा विचार.

३६. गाण्याच्या मंत्राचें नांव साम.

यजुःच्या लक्षणाचा विचार.

३७. बाकी यजुःशब्द.

स्त्राप्रमाणें वृत्त होतें. अशा ओळीस पाद असें म्हणतात. पादव्यवस्था म्हणजे ऋग्वेदामध्यें अक्षराच्या अनुसंधानानें रचलेली अशीं वृत्तें आहेत. दुसरें "अर्थानुरोधेन" असें पद सूत्रांत कां ठेवलें आहे? सूत्रार्थ स्पष्ट व्हावा म्हणून. या पदानें लक्षणास कांहीं विशेष बळकटी येते असें नाहीं.

३६. साम म्हणजे काय? हा विचार आचार्य या सूत्रीं करतात. मंत्रत्व, अर्थ ज्या मन्त्रांत आहे, आणि जो गातां येतो तो साम. अमुक साम अमुक ऋक्हें ओळखण्याचें मुख्य साधन पंडितांचा व्यवहार असें भाष्यकार म्हणतात.

३७. ऋग्मंत्र, साममन्त्र, यजुर्मंत्र असे वैदिक परंपरमध्यें प्रसिद्ध आहेत. "अहे बुध्निय" असा आम्हीं मन्त्र घेऊन वर भाषांतर केलें आहे तें पहावें. (२.१,३२.) पहा. जो साम नव्हे आणि ऋक् नव्हे तो यजुर्मन्त्र इतकेंच या सूत्राचें तात्पर्य आहे.

NOW THE SUBJECT OF THE DEFINITION OF A SÂMA.

36. That Mantra which is sung is a Sâma.

NOW THE SUBJECT OF THE DEFINITION OF YAJUS.

37. The rest are Yajus.

there are three characteristic marks of a *Rik*—first, it is a Mantra; secondly, a significant line; thirdly, a metrical line. But every Mantra is necessarily significant. We fail to see why the phrase—in conformity with signification—is added. An answer can be given—the word Mantra—is not distinctly mentioned in the sûtra. It is brought in from a preceding sûtra.

36. Jaimini defines a Sâma in this sûtra. It has one additional mark. A Mantra, metrical and significant, when sung constitutes a Sâma or psalm. Commentators state that a Sâma or a *Rik* is distinguished as such in conformity with the practice of learned scholars.

37. The Mantras called *Rik*, Sâma or Yajus are known to the Vaidika polity. We have already translated a verse which begins with *Ahebudhniya*. Vide (II. 1, 32.) The gist of this sûtra is:—That which is neither a Sâma nor a *Rik* is a Yajus-Mantra.

सूत्राणि.

अथ निगदानां यजुस्त्वाधिकरणम् ॥

निगदो वा चतुर्थं स्याद् धर्मविशेषात् ॥ ३८ ॥ (पू०)

वाक्यार्थः । वा=न । धर्मभेदान् निगदो मन्त्राणां चतुर्थः प्रकारः ॥

भावार्थः । पूर्वपक्षकारो ब्रवीति निगदो यजुषो भिद्यते । कुतः । धर्मविशेषात् । को ऽसौ धर्मविशेषः । उच्चैस्त्वमिति । यथोच्चैर्ऋचा क्रियते उच्चैः साम्ना उपांशु यजुषा उच्चैर्निगदेनेति । तस्मान् निगदो मन्त्राणां चतुर्थः प्रकारः ॥

व्यपदेशाच्च ॥ ३९ ॥ (पू० यु०)

पदार्थः । व्यपदेशात्=व्यवहारात् ॥

भावार्थः । पुनः पूर्वपक्षकारो ब्रवीति । निगदा न यजूंषि । कुतः । संज्ञाभेदात् । व्यवहारे ये निगदा ते यजूंषि नोच्यन्ते । अतो निगदश्चतुर्थो मन्त्रप्रकारः ॥

यजूंषि वा तद्रूपत्वात् ॥ ४० ॥ (सि०)

पदार्थः । तद् रूपं येषां ते तद्रूपाः । तेषां भावः=तद्रूपत्वम् । तस्मात्=तद्रूपत्वात् ॥

भावार्थः । जैमिनिर्ब्रवीति । पूर्वपक्षकारवचनं नादरणीयम् । कुतः । यद् यजुषां रूपं तन् निगदानाम् । किं तद् यजुषां रूपम् । ऋक्सामाभिन्नत्वम् ॥

वचनाद्धर्मविशेषः ॥ ४१ ॥ (उ०)

पदार्थः । वचनात्=निदर्शनात् ॥

भावार्थः । उच्चैर्निगदेनेति यदुक्तं तद्वचनसामर्थ्यादुच्चैस्त्वमिति धर्मविशेषो यथा पठितपूर्वम् । धर्ममिममुत्तरस्मिन् सूत्रे व्यवस्थापयत्याचार्यः ॥

निगद यजु हा विचार.

३८. नव्हे. निगदाच्या अंगीं कांहीं विशेष धर्म आहे ह्मणून निगद चवथा प्रकार (पू०)

३९. आणि व्यवहारावरून (पू० यु०)

४०. नव्हे. त्या रूपामुळें (निगद) यजु (आहेत) (सि०)

४१. वचनामुळें धर्मविशेष आहे. (उ०)

३८. "मोठ्यानें ऋचा ह्मणाव्या, मोठ्यानें साम गावें, यजु मनांतल्या मनांत ह्मणावेत, निगद मोठ्यानें ह्मणावेत." असें वाक्य आहे. या वाक्यास जमा धरून पूर्वपक्षकार असें ह्मणतो कीं, पंडितांनी निगद मोठ्यानें ह्मणावे असें वर्णन केलें आहे; आणि यामध्यें धर्मविशेषाचें वर्णन आहे, ह्मणून यजुर्मंत्रापासून निगद भिन्न असून मंत्राचा हा चवथा प्रकार आहे. पुढील सूत्रीं पूर्वपक्षकार आपलें ह्मणणें दृढ करण्याकरतां युक्ति दाखवितो.

३९. हे यजु आहेत, हे निगद नाहींत, हे निगद, हे यजु नाहींत, हें व्यवहारावरून समजावयाचें.

NOW THE SUBJECT OF THE NIGADAS BEING YAJUS-MANTRAS.

38. No, because of a special quality, the Nigadas ought to be the fourth (Veda). (Statement of the opponent.)

39. And because of the established practice (of Âchâryas), (the Nigadas ought to be the fourth Veda.) (An argument advanced by the opponent.)

40. No, (the Nigadas are) Yajus because of that quality). (Final statement)

41. By means of a direct statement, the special quality (is described). (A reply.)

38. "The Riks are to be repeated aloud: the Sâmas are to be sung aloud: the Yajus are to be repeated as in a whisper: the Nigadas are to be repeated aloud." This is a recognized text. In conformity with this text, the opponent states: it is admitted by Âchâryas that Nigadas are to be repeated aloud. This is a special quality. Hence the Nigadas differ from the Yajus to be repeated as in a whisper and constitute the fourth kind of the Mantras. In the next sûtra, the opponent produces an argument to substantiate his statement.

39. The opponent says that

सूत्राणि.

अर्थाच्च ॥ ४२ ॥ (यु०)

वाक्यार्थः । पुनः । अर्थाद् हेतोर्निगदा यजूंषि ॥

भावार्थः । उपसर्गस्य नेः प्रकर्षोऽर्थः । गदतिः शब्दकर्मा । नितरां गद्यते येन स निगदः । यजुषां द्वौ प्रकारौ । यानि यजूंष्युच्चैरुच्चार्यन्ते ते निगदाः । यानि यजूंष्युपांशूच्चार्यन्ते तेषां संज्ञाविशेषो नास्ति ॥

गुणोत्तम स भवति यः स्वकार्यं कुर्वतामुपकारे वर्तते न च परस्मैधनार्थानां यजुषामुपांशुत्वं साहाय्ये वर्तते, इति शबरः ॥

---

४०. निगद हें पद अनुवृत्तीनें मागील सूत्रांतून आलें आहे. "त्या रूपामुळें" असें पद सूत्रांत आहे. त्याचा अर्थ जें यजूचें रूप तेंच निगदाचें रूप असल्यामुळें. आतां यजूचें रूप कोणतें ? गद्यात्मक वाक्यरचना. गद्यात्मक वाक्यरचना जशी यजूंत असते तशीच निगदांत असते, म्हणून निगद यजु आहे असा आचार्यांनीं सिद्धांत केला आहे.

४१. मोठ्या स्वरानें निगद म्हणावेत असें वचन आहे. म्हणून कांहीं यजूच्या अंगीं धर्मविशेष आहे, असें आम्हीं (२.१.३८.) सूत्रीं वर्णन केलेंच आहे. आणि सूत्रांतील "वचनामुळें" या पदाचा स्वाभाविक असाच अर्थ आहे. परंतु भाष्यकार शबर दुसऱ्यास जाणविण्याच्या सामर्थ्यामुळें असा अर्थ करतात, आणि मोठ्यानें म्हटलें असतां कांहीं यजुर्मंत्रांपासून दुसऱ्यास ज्ञान होतें, हाच त्यांचा विशेष धर्म आहे असें दाखवितात.

the distinction between the Nigadas and Yajus can be made out as the terms are used in common conversation.

40. The term Nigada is brought in from the preceding sûtra. The term—Tadrûpatvât—is used in the sûtra. It means from that quality—the quality common to the Nigadas and Yajus. Now, what is the quality of the Yajus ? Prose-construction. As the Yajus consists of prose, so the Nigadas consist of prose. Hence the latter and the former are not different. It may be mentioned that the Vâjasaneyi Sanhitâ consists of poetry and that therefore all the Yajus are not prose. The statement of commentators is, therefore, unintelligible.

41. The statement as directly made in a recognized treatise is that the Nigadas are to be repeated aloud. Hence some Yajus possess this special quality as insisted on in (II. 1, 38.) The term—"from a statement" as

४२. आणि कारणामुळें (निगदांमध्यें विशेष धर्म आहे.) (यु०.)

४२. कांहीं यजुर्मंत्र मोठ्यानें म्हटले असतां त्यांपासून लोकांस ज्ञान होतें, आणि म्हणूनच त्यास निगद असें म्हणतात. आणि कांहीं यजुमंत्र मनांतल्या मनांत म्हटल्यापासून लोकांस ज्ञान होत नाहीं. तेव्हां कांहीं यजुर्मंत्राला निगद असें नांव ठेवण्याला योग्य कारण आहे. निगदशब्दाची व्युत्पत्ति अशीच आहे. "नि" या उपसर्गाचा अर्थ स्पष्ट, आणि "गद" म्हणजे म्हणणें. गुणशब्दाचें निरूपण भाष्यकार करतात तें थोडें लक्ष देण्याजोगें आहे. ज्यानें दुसऱ्याचा उपयोग होतो तो गुण, इतकाच गुणशब्दाचा अर्थ ध्यावयाचा. म्हणून यजुर्मंत्र मनांतल्या मनांत म्हणावेत, असें जें स्पष्ट वचन आहे, तें निगदरूप यजुर्मंत्र सोडून बाकीच्यास लावावें अशी जैमिन्याचार्य (२.१,३८.) सूत्रांतील वचनाची व्यवस्था करतात. (२.१,३८) सूत्रांतील वचन पहावें. या वचनाची व्यवस्था करतांना मनांतल्या मनांत म्हणायाचे यजुर्मंत्र आणि मोठ्यानें म्हणायाचे यजुर्मंत्र असा यजुर्मंत्रांचा विभाग होतो. मोठ्यानें म्हणण्याच्या यजुर्मंत्राचें नांव निगद असें पडलें आहे. परंतु ज्या वचनाचा विचार

42. Because of a reason, (the special quality of the Nigadas is described.) (An argument in favour of the final statement.)

used in the sûtra seems to sanction our interpretation. But commentator Shabara interprets it thus—"because of the power of demonstrating something to others," and states that the special quality of the Yajus consists in conveying some sense when they are repeated aloud.

42. The main statement in the sûtra is brought in by way of Anuvritti. If some Yajus-Mantras be repeated aloud, they enlighten the hearer, and therefore, they are called Nigadas. Those which are repeated as in a whisper do not enlighten the hearer. Hence there is a valid reason for distinguishing the latter Yajus from the former. The etymology of the word Nigada supports the distinction. *Ni* signifies *distinctly*, and the verbal root *gad* signifies to repeat. The remarks on a quality as made by commentators deserve attention. A quality is that which serves the purpose of others. Hence the Nigadas are those Yajus which are repeated aloud and which serve the purpose of enlightening the hearer. Those Yajus which are not Nigadas are to be pronounced as in a whisper. Vide the quotation in the foot-note (II. 1, 38.) In adjusting the sense of the passage in the foot-note it is necessary to divide all Yajus-Mantras into two classes—those which are pronounced a-

सूत्राणि.

गुणार्थो व्यपदेशः ॥ ४३ ॥

पदार्थः । व्यपदेशः=व्यवहारः ॥

भावार्थः । आचार्यो ब्रवीति । भो पूर्वपक्षकार । गुणैः कार्यद्वयं क्रियते एकं धर्मविशेषबोधनमन्यच्च व्यावर्तनम् । उच्चैर्निगदेनेत्यस्मिन् वाक्य उच्चैस्त्वगुणेन धर्मविशेषबोधनं भवति न तु व्यावर्तनम् । अतो निगदो न मन्त्रान्तरम् ॥

सर्वेषामिति चेत् ॥ ४४ ॥ (आ०)

भावार्थः । सर्वेषां मन्त्राणामुच्चैस्त्वान् निगद इति संज्ञा कृता चेदिति पूर्वपक्षः ॥

न ऋग्व्यपदेशात् ॥ ४५ ॥ (आ० नि०)

भावार्थः । ऋचो निगदा इति वक्तुं न युज्यते । कुतः । व्यवहारबलात् । ऋच ऋङ्नाम्ना प्रसिद्धाः । न तु निगदनाम्ना ॥

चालला आहे त्या वचनाचा अर्थ सगळे यजुर्मंत्र मनांतल्या मनांत म्हणायाचे असा होतो. असा अर्थ न घेऊन व्यवस्था करावी असें आचार्य बळजोरीनें सांगतात असें आम्हांस वाटतें. असो. याचा पुढें विचार करूं.

loud, and those which are not. The former have got a special name (Nigada) and the latter have no name. The opponent does not see the argument and states that the passage admits of one interpretation only—that all Yajus are to be pronounced as in a whisper. We believe that the opponent does not twist the passage, but interprets it in a natural way. The relative validity of the two interpretations of the passage as attempted by the Mîmânsaka and his opponent will be tested in the sequel.

४३. (पदार्थाचा) गुण (समजण्या) करतां व्यवहार (असतो) (उ०.)

४४. (निगद ही संज्ञा) सर्वांचो (च) असें (ह्मटलें) तर—(आ०)

४५. ऋग्मंत्राच्या व्यवहारावरून (ऋग्मंत्र निगद) नव्हेत.

43. A statement (is made) for (describing) a quality (of an object). (A reply.)

44. If (it be said that the name) of all (Yajus-mantras is Nigada,) then —(A. doubt.)

45. From the use of the *Rik*-mantras, (they)are not (Nigadas.) (The doubt removed.)

४३. जसा आम्हीं या वचनाचा विभाग केला आहे, तशीच रीति व्यवहारांत विभाग करण्याची आहे. दृष्टांतः—"या ठिकाणीं ब्राम्हणांस जेवायाला बशीव, आणि त्या ठिकाणीं संन्याशांस जेवायाला बशीव." याचा अर्थ जे ब्राम्हण संन्यासी नाहींत त्यांस एथें बशीव, आणि जे संन्यासी आहेत त्यांस तेथें बशीव. अशाच प्रकारें निगद ह्मणजे यजुर्मंत्र आहेत असें सिद्ध होतें.

४४. पूर्वपक्षकार असें ह्मणतो कीं, जो मोठ्यानें ह्मणायाचा तो निगद असा आम्ही वरील वचनाचा अर्थ करून बसूं. मग ऋग्मंत्र मोठ्यानें ह्मणण्याचा ह्मणून ऋग्मंत्र निगद आहे असा अर्थ आम्ही करूं.

४५. आचार्य ह्मणतातः—"पूर्वपक्षकार बाबा, असा व्यवहार नाहीं. ऋग्मंत्रांस यजुर्मंत्र ह्मणून कसें चालेल? ऋग्मन्त्र ते ऋग्मन्त्र, यजुर्मन्त्र ते यजुर्मन्त्र. ऋग्मन्त्र पद्यरूप आहेत, निगद गद्यरूप

43. We have translated the word *Vyapadesha* by a statement. Its exact signification deserves examination as it is often used in Indian philosophy. By Vyapadesha, commentators take a conversation or common life. They say "in common life, such a division as we have mentioned is often made." For example, "set the Brâhmaṇas to dine here, and set the Sanyâsins there." This necessarily means that those Brâhmaṇas who are not Sanyâsins are to sit in this place and those who are Sanyâsins are to sit in that place. Thus the division of Yajus into Nigadas and the rest is made. This is the way commentators interpret the sûtra. The natural sense of the sûtra is at once apparent.

44. The opponent states that if the passage quoted and interpreted applies the name, Nigada, to those Yajus which are repeated aloud, then a *Rik* which is also to be repeated aloud as stated in the passage under examination, is a Nigada. This objection will be removed in the sequel.

आहेत आणि वेदवाक्य आहे कीं, निगदानें यजन् होत नाहीं, आणि ऋग्मन्त्रानेंच यजन होतें. म्हणून वेदव्यवहाराकडे लक्ष द्यावें लागतें. आणि त्यावरून निगद म्हणजे यजुच आहेत."

इतका निगदाविषयीं तंटा पूर्वपक्षकारानें व आचार्यांनीं कां केला याचा विचार करणें योग्य आहे. पूर्वपक्षकार शास्त्रनिपुण आहे, आणि वैदिक परंपरेच्या घरामध्यें शिरून मीमांसकांवर कोटया करणारा आहे. निगद हा वेदभाग आहे असें मीमांसक मानतात. निगद हा यजुर्मंत्र आहे असें दाखवून निगदाची योग्यता मोठी आहे असें आचार्य स्थापितात. इतकी निगदाविषयीं धडामोड होण्याचें कारण असें आहे कीं, ब्रह्मवादिजन जेव्हां झाले, तेव्हां यज्ञाविषयीं नानाप्रकारचे शास्त्रार्थ होऊं लागले. जे जे शास्त्रार्थ त्यांनीं केले व जीं जीं वचनें ते बोलले तीं तीं सर्व ब्राह्मणग्रंथामध्यें परिगणित झालीं नाहींत. म्हणून ब्राह्मणग्रंथांत तीं लिहिलीं गेलीं नाहींत. त्यांचीं पुष्कळ वचनें याज्ञिक लोकांमध्यें चालू राहिलीं व बौद्धायनादि आचार्यांनीं जेव्हां श्रौतसूत्रें रचिलीं, तेव्हां निगदरूप वचनांच्या योगानें पुष्कळ यज्ञसंबंधी शास्त्रार्थांचा निर्णय होत असे. त्या निगदरूप वचनांचा आपल्या सूत्रीं आचार्यांना संग्रह करावा लागला. असें कांहीं निगद ब्राह्मणग्रंथांत आहेत, कांहीं निगद श्रौतसूत्रांत आहेत, व कांहीं निगद परंपरेनें चालत आलेले

45. Jaimini declares:—Oh opponent, this is not the way people use the word *Rik*. How can the *Rik*-mantras be classed with Yajus-mantras? The former essentially differ from the latter. The *Rik*-mantras are verses, the Nigadas are prose-passages. Besides a Vaidika-passage states that there cannot be a sacrifice, by means of the Nigadas, but a sacrifice can be offered by means of *Rik*-mantras. Hence it is necessary to attend to the established Vaidika usage. Hence the conclusion is that a Nigada is a Yajus.

It is necessary in this place to consider the bearings of the discussion between Jaimini and his opponent or between the orthodoxy and the Buddhists. The last were well-versed in the systems of thought as developed by the Âchâryas, and advanced arguments against the orthodoxy—arguments based on the doctrines and principles recognized by the orthodoxy. The Mîmânsakas admit that the Nigadas form a part of the Vedas. They seek to establish that the Nigadas, being Yajus, are essentially important. The reason why the Nigadas were made so much of, is that at the time of the Brahmavâdi-philosophers a variety of sacrificial principles was discussed. All their discussions and statements were not embodied in the Brâhmana-literature. Yet their dicta were recognized by the sacrificers, and found an important place in such sacrificial systems as Boudhâyana-Shrouta-sûtra which bases many sacrificial acts on the authority of Nigadas, because the Âchâryas would not dispense with them.

आहेत. अशी ही निगदाची व्यवस्था आहे. वेदांमध्यें अपरिगणित असून कांहीं मन्त्र वैदिक आहेत असें प्रसिद्ध होतें. अशा या मन्त्राची व्यवस्था करायाची काय? अशी पंचाईत पडली. कांहीं आचार्य निगद वैदिक मन्त्र असें मानतात. हेंच वचन घेऊन आचार्यांवरती पूर्वपक्षकारानें कोटी केली. या कोंडीला दोन तोंडें आहेत. निगद वैदिक म्हटलें तरी पंचाईत, अवैदिक म्हटलें तरी पंचाईत. वैदिक म्हटलें असतां निगद कोणत्या वेदांत मोडायाचे! अवैदिक म्हटलें असतां निगदाप्रमाणें जीं यज्ञ कर्में चालतात तीं वेदबाह्य होतील अशी अडचण पाहून पूर्वपक्षकारानें निगदाची काय व्यवस्था करतां! म्हणून आचार्यांस विचारिलें. निगद यजुर्मन्त्रांत मोडण्याकरतां आचार्यांस पुष्कळ ओढाताण करावी लागली. निगदासारखे मन्त्र वैदिक मानावे कीं नाहीं? आणि वैदिक मानले असतां त्रयी विद्या म्हणजे तीन वेद यांत त्यांची योजना कोठें करावी? असा वाद निकरानें जैमिनीच्या वेळीं झाला. आतां तीन वेद जाऊन चार वेद झाले आहेत. पण चवथ्या अथर्ववेदाचें तर जैमिनीनें नांव देखील घेतलें नाहीं. मग अथर्वसंहितेतील मंत्राची जेथें ही दशा तेथें अथर्वब्राह्मणाचें काय करायाचें? आणि अथर्वब्राह्मणासहि सोडून गणपतिशीर्ष, नृसिंहतापिन्यादि अथर्ववेदाचीं उपनिषदें हीं कोणीकडे घालायाचीं! असतु. निदान जैमिनीच्या मताप्रमाणें हीं सर्व वेदबाह्य

Hence some Nigadas are to be found in the Brâhmana-literature and others, in the Shrouta-sûtras. Again, some Nigadas are handed down from generation to generation by oral tradition. It was well-known to the Âchâryas that though not embodied in the Vedas, some Mantras deserved attention and were Vaidika. The question was—how are such Mantras to be accomodated? Some Âchâryas admitted that the Nigadas were Vaidika Mantras. The Buddhists took up such a statement or the admission of the Âchâryas and based an argument upon it—an argument in the form of a dilemma. There is a difficulty whether the Nigadas are considered Vaidika or non-Vaidika. If the first alternative be accepted, the question is, to what Veda do they belong? If the last alternative be accepted, all the sacrifices conducted in conformity with them would be non-Vaidika. Hence the Buddhists boldly asked the Âchâryas what was the way in which their position in the recognized literature could be adjusted. It need not be stated that the Buddhists recognized no book or books as divine and inspired, at least before their degeneracy. The Âchâryas found it a hard work to establish that the Nigadas formed a part of the Yajur-Veda. The point of the discussion as conducted at the time of Jaimini was:—whether such texts as the Nigadas were Vaidika or not. If Vaidika, what was their place in the three-fold knowledge (the three Vedas)? Now-a-days, the three Vedas have been expanded into four Vedas. But Jaimini does not mention even the name

सूत्राणि.

अथैकवाक्यत्वलक्षणाधिकरणम् ॥

अर्थैकत्वादेकं वाक्यं साकांक्षं चेद् विभागे स्यात् ॥ ४६ ॥

पदानि । अर्थ-एकत्वात्, एकम्, वाक्यम्, स-आकांक्षम्, चेद्, विभागे, स्यात् ॥

पदार्थः । अर्थैकत्वात्=विषयैकत्वात् । साकांक्षम्=सापेक्षम् ॥

वाक्यार्थः । एकेनार्थेनैकं वाक्यम् । विभागे सापेक्षितं भवति ॥

भावार्थः । सूत्रस्यास्य द्वे दले स्तः । प्रथमदलेनाचार्यो वाक्यं लक्षयति । क्रियाकारकसाहाय्येनैकोऽर्थो येन ज्ञाप्यते तद् वाक्यम् । नानाभावनाश्चेतसि युगपदुत्पद्यन्ते । तासामेकैकासाम् आख्यातकारकाणि सहायभूतानि भवन्ति । यदेदृशी भावना चेतस्युत्पद्यते तदाऽर्थैकत्वम् । अर्थैकत्वाद् वाक्यमित्याचार्योऽभिप्रैति । द्वितीयदलेन तु नानाभावनानां चेतस्युत्पन्नानां यदा परस्परसम्बन्धो वर्तते तदा सापेक्षमेकार्थत्वं प्राप्नोति । आख्यातकारकविशिष्टभावनानां भेदेऽप्येकविषयपर्यवसितं सापेक्षमेकं वाक्यम् ॥

अनुसन्धेयानि वेदवाक्यानि ॥

देवस्य त्वा सवितुः प्रसवेऽश्विनोर्बाहुभ्यां पूष्णो हस्ताभ्यामग्नये जुष्टं निर्वपामि । तै. सं. १.१,४,२. आयुर्यज्ञेन कल्पतां प्राणो यज्ञेन कल्पतामपानो यज्ञेन कल्पतां व्यानो यज्ञेन कल्पतां चक्षुर्यज्ञेन कल्पतां श्रोत्रं यज्ञेन कल्पतां मनो यज्ञेन कल्पतां वाग्यज्ञेन कल्पतामात्मा यज्ञेन कल्पतां यज्ञो यज्ञेन कल्पतां ॥ तै. सं. १.७,९,१–२. ॥ स्योनं ते सदनं करोमि घृतस्य धारया सुशेवं कल्पयामि । तस्मिन् सीदामृते प्रतितिष्ठ । ब्रीहीणां मेध सुमनस्यमानः ॥ तै. ब्रा. ३.७,५,२–३. ॥

आतां एकवाक्यलक्षणविचार.

४६. अर्थ एक असला म्हणजे एक वाक्य असें समजावें. वाक्यांत विभाग असून साकांक्ष जरी असेल तरी वाक्य एक असें समजावें.

आहेत असें म्हणणें भाग पडतें. या सर्वांचा वाचकांनीं विचार करावा. निगदाविषयीं जो वाद झाला त्याचें तात्पर्य इतकेंच कीं,, वेदांमध्यें कोणकोणत्या मन्त्राचें आणि कोणकोणत्या ब्राम्हणाचें परिगणन करायाचें ? याचा निर्णय व्हावा पाणिनीच्या अष्टाध्यायींत प्रदिपदोक्त निगदशब्द अढळत नाहीं याचाहि वाचकांनीं विचार करावा.

४६. या सूत्राचीं दोन दलें आहे. प्रथम दलीं एकवाक्य म्हणजे काय ? याचें लक्षण केलें आहे. एकवाक्य कशास म्हणावें ? जेव्हां मुख्य क्रिया व त्यावर अवलंबणारीं कारकें अर्थ पूर्ण करतात तेव्हां एकवाक्य होतें. पूर्णार्थ म्हणजे काय ? चित्तामध्यें नानाप्रकारच्या भावना एकदम उत्पन्न होतात. त्या त्या प्रत्येक प्रत्येक भावनेचा पूर्ण उल्लेख करण्यास पूर्ण क्रियापद व त्यावर अवलंबणारीं कारकें सहाय होतात. अशी भावना चित्तामध्यें उत्पन्न झाली म्हणजे अर्थैक्य सिद्ध होतें. अर्थैक्याचा उल्लेख झाला म्हणजे एकवाक्य समजावें. असा आचार्यांचा अभिप्राय आहे.

NOW THE SUBJECT OF THE UNITY OF A SENTENCE.

46. A sentence is that which expresses a thought. It is complex if it consists of parts. (Literally from the unity of sense, a sentence; if there be a division, it is correlative.)

of the Atharva-Sanhitâ. But when the last is not admitted to be worth notice, it can be easily seen that the Atharva-Brâhmaṇa-literature was simply ignored. Hence such Upanisad-literature as consists of Ganapati-Shîrsa *or* Nṛisinha-Tâpinî can have no recognized place whatever. Suffice it to remark that from the point of view at least of Jaimini the Atharva-literature is non-Vaidika. All this deserves the attention of our readers. The discussion as to the Nigadas is important in as much as it was a strenuous effort made by the Buddhists to put down the pretensions of the orthodoxy which boldly stated that it possessed revealed books. It may be mentioned by the way that the word Nigada is not mentioned by Pâṇini in his system of grammar.

46. This sûtra consists of two parts. In the first part, a sentence is defined. A sentence is that in which the principal verb with all its means dependent upon it expresses a complete thought. What is the expression of a complete thought ? A variety of thoughts rises at once in the mind. Each of these thoughts can be expressed by a verb with

सूत्राणि.

समेषु वाक्यभेदः स्यात् ॥ ४७ ॥

पदार्थः । समेषु=परस्परानाकांक्षेषु ॥

वाक्यार्थः । परस्परानाकांक्षेषु विषयेषु वाक्यभेदः ॥

भावार्थः । आख्यातकारकजनितानां चेतस्युत्पन्नानां नानाभावनानां परस्परसम्बन्धाभावे वाक्यभेदः ॥

आतां, दुसऱ्या दलामध्यें साकांक्ष एकवाक्य म्हणजे काय याचें आचार्य वर्णन करतात. जेव्हां चित्तांमध्यें नाना भावना एकदम उत्पन्न होतात आणि त्यांचा परस्परांशीं संबंध असतो तेव्हां सापेक्ष एकवाक्य होतें. प्रत्येक प्रत्येक भावनेचीं क्रिया आणि कारकें जरी भिन्न असतात, तथापि त्या सर्व भावनांपासून एकच अर्थ उत्पन्न होतो. म्हणून भावनांचें परस्पर सापेक्षत्व असतें, असा दुसऱ्या दळाचा अर्थ आहे. सूत्रांत दोन पदें विचार करण्याजोगीं आहेत. एक साकांक्ष आणि दुसरें विभाग. वाक्याचा विभाग असला तरी तें साकांक्ष होतें असें आचार्यांचें म्हणणें आहे. याचा अर्थ इतकाच कीं, वाक्य तर एक आहे, परंतु त्याच्या पोटांत स्वतंत्र निरनिराळीं वाक्यें आहेत असें दिसतें. मग हीं स्वतंत्र वाक्यें समजावीं कीं सर्व मिळून एकच वाक्य समजावें ? असा विचार करतेवेळीं सारीं स्वतंत्र पोटवाक्यें मिळून एकच स्वतंत्र वाक्य होतें, कारण जरी क्रियापद, आणि कारकें यांच्या योगानें वाक्य स्वतंत्रसें दिसतें तरी तें स्वतंत्र नाहीं. वाक्यें दोन प्रकारचीं असतात. शुद्ध वाक्य आ-

its means as expressed by the different cases. When such a thought is conceived by the mind, the unity of thought is developed. When the unity of thought is expressed, a sentence is the result. This is the purport of the statement of Jaimini as made in the above sûtra. In the second part, a correlative sentence is defined. When a variety of thoughts rise in the mind, and when they are connected with one another, a correlative or complex sentence is the result. Though each thought has its verb and its appliances independently expressed for itself, yet all the thoughts connected conduce to the accomplishment of one and the same object. Hence in the case of a complex sentence the thoughts are correlated. This is the purport of the second part of the above sûtra. There are two terms in the sûtra deserving special consideration :—the one is Sâkânkṣa, and the other is Vibhâga. Jaimini states that if a sentence be divided, it is Sâkânkṣa or correlative. The sense of this statement is that though there is apparently one sentence, it really consists of many separate sentences. Now the question is—are the last to be considered independent sentences? Or do

वाक्यभेदाचा विचार.

४७. वाक्यें सम असलीं म्हणजे त्यांचा भेद मानावा.

णि संयुक्त वाक्य. शुद्ध वाक्यामध्यें मुख्य क्रियापद एक असून कारकें शुद्ध पदें असतात. संयुक्त क्रियापदाचीं कारकें वाक्यें असतात. उदाहरणावरून अर्थ स्पष्ट होईल. "हनुमानाच्या साहाय्यानें लोककल्याणाकरितां शूर रामानें रथावरून दुष्ट रावण युद्धांत सहज मारिला." या वाक्यांत विशेषणें, क्रियाविशेषणें, कर्ता, कर्म, करण, संप्रदान, अपादान, अधिकरणादि कारकें हीं शुद्ध पदें आहेत. आतां संयुक्त वाक्याचा विचार. "जेव्हां युद्ध होत होतें तेव्हां हनुमानानें साहाय्य केलें, आणि लोककल्याण व्हावें म्हणून ज्याच्या अंगीं शौर्य होतें अशा रामानें तो ज्या रथावर बसला होता तेथून ज्याचें आचरण दुष्ट होतें तो रावण मारला." या संयुक्त वाक्यामध्यें विशेषणें, क्रियाविशेषणें, कर्ता, कर्म, करण, संप्रदान, अपादान, अधिकरणादि कारकें हीं शुद्ध पदें नाहींत. तीं वाक्यें आहेत. आणखी एक वाक्याचा भेद आहे. ज्यास समवाक्य असें जैमिनीनें म्हटलें आहे, त्याचा विचार पुढल्या सूत्रीं होईल.

४७. "वाक्यभेद" असें सूत्रांत पद आहे. त्याचा अर्थ वाक्यांचा भेद. पुनरपि वाक्यें दोन प्रकारचीं असें सांगितलें पाहिजे. वरील सूत्राच्या टिपेंत

NOW THE SUBJECT OF THE DIVISION OF A SENTENCE.

47. (Sentences), being co-ordinate, their division (is to be accepted).

they all constitute one sentence? The last conclusion of this investigation is that all independent sentences, when so connected, lose their independence and constitute one sentence; because though their cases and verbs are independent so far as the interpretation of different sentences in a complex sentence goes, yet the complex sentence is one. There are two kinds of sentences: simple and complex. A simple sentence is that in which the principal action is one only and the means of the action are expressed by simple words or phrases. The means of an action as expressed in a complex sentence are sentences themselves. The purport of the remarks will be plain from an illustration:—"Brave Râma from a car easily killed wicked Râvaṇa with the aid of Hanumân for the good of the people in a battle." In this sentence all the means and appliances of the action *killed* are simple words, that is, all the adjectives, adverbs and case-relations are expressed by simple words. Now an illustration of a complex sentence:—"When a battle raged and when Hanumân gave his aid, Râma who possessed courage, who was mounted on a war-chariot killed Râvaṇa whose conduct was wicked, that the good of the people might be accomplished." In this sentence, the adjectives, and adverbs are not simple words, but are sentences themselves.

संयुक्त वाक्यांत रामानें रावण मारला एवढेंच प्रधान वाक्य आहे, बाकींचीं सगळीं गौण वाक्यें. संयुक्त वाक्यामध्यें प्रधान वाक्याचा आणि गौण वाक्यांचा परस्परांशीं संबंध असतो. सम वाक्यामध्यें गौण आणि प्रधान असा भेद नसतो. साऱ्या वाक्यांची सम योग्यता असते. यास लौकिक दृष्टांतः- "रामा आला, आणि कृष्णा गेला, आणि तात्या उठला." या वाक्यांत जरी "आणि" या उभयान्वयी अव्ययानें संबंध दाखविला आहे, तरी यामध्यें अमुक वाक्य मुख्य व अमुक गौण असें म्हणतां येत नाहीं. संहिताब्राह्मणादि ग्रंथांतून मीमांसक उदाहरणें घेतात. त्यांचा अर्थ आम्ही करून दाखवितों, म्हणजे शुद्ध वाक्य, संयुक्त वाक्य, आणि सम वाक्य यांच्या विचाराचा वाक्यार्थमीमांसेंत किती उपयोग आहे हें सहज समजेल. तै सं. (१.१,१,२.) या मन्त्राचें भाषांतर. "देदीप्यमान सूर्यदेवतेचे प्रसूतीकरतां तुला, अश्विनाच्या दोन बाहूंनीं पूषदेवतेच्या दोन हातांनीं सेवन करण्यास योग्य अशा तुला, म्हणजे द्रव्याला, एकीकडे काढतों." हा मन्त्र म्हणून दर्शपूर्णमासी इष्टीमध्यें हविर्द्रव्याचा निर्वाप करायाचा. हविर्निवाप म्हणजे देवतेच्या उद्देशानें अग्नींत अर्पण करायाचें जें द्रव्य तें अधी एकीकडे काहून ठेवणें. आतां तै. सं. (१.७,१, १-२.) याचें भाषांतर. "आयुष्य यज्ञानें प्राप्त होवो, प्राण यज्ञानें प्राप्त

There is again a third kind of sentences. It is called a Samavâkya by Jaimini. This will be considered in the next sûtra.

47. The term Vâkya-bheda is used in the sûtra. It means the division of a sentence. We have to state again that there are two kinds of sentences. In the footnote on the above sûtra, we have given an example of a complex sentence. The principal part of the complex sentence is: Râma killed Râvaṇa. The other parts are subordinate. In a complex sentence, the principal and subordinate parts are essentially connected. In co-ordinate sentences, the relation of subordination does not exist. All sentences are equal. Hence the word Sama (equal) is used in the sûtra. "Râmâ came, Kṛiṣṇâ went, and Tâtyâ stood up." Though these sentences are connected by the conjunction *and*, yet the connection of some sentences being subordinate to one principal sentence does not exist. The Mîmânsakas quote from the Sanhitâ and Brâhmaṇa-works to illustrate this sûtra. We will translate the passages quoted so that the exegetical importance of syntactical division into simple and complex sentences on the one hand, and simple and compound sentences on the other may be appreciated. See the Taittiriya-Sanhitâ (I. 1, 4, 2.) "With the two hands of Pûsan and with the two arms of Ashvins, I consecrate thee (this portion) (as) prepared to (for) Agni for the appearance (birth) of the resplendent sun." This text is used for consecrating the rice which are made into the sacrificial cake in the

होवो, अपान यज्ञानें प्राप्त होवो, व्यान यज्ञानें प्राप्त होवो, नेत्रेंद्रिय यज्ञानें प्राप्त होवो, श्रोत्रेंद्रिय यज्ञानें प्राप्त होवो, मन यज्ञानें प्राप्त होवो, वाणी यज्ञानें प्राप्त होवो, आत्मा यज्ञानें प्राप्त होवो, यज्ञ यज्ञानें प्राप्त होवो." "प्राप्त होवो" याचा अर्थ माधवाचार्य असा करतात कीं "आप आपल्या कामाविषयीं तत्पर होवो." आतां तै. ब्रा. (३.७,५, २–३.) या मन्त्राचें भाषांतर. "हे पुरोडाशा, तुझें स्थान सुखकर मी करतों. तुपाच्या धारेनें सेवनयोग्य असें (स्थान) मी प्राप्त करून घेतों." या मन्त्रानें पुरोडाशाचें स्थान तयार होतें. आतां पुढें पुरोडाश मांडायाचा. "त्या अमृतस्थानामध्यें बैस, प्रवेश कर. हे तांदुळाच्या गाभ्या, सुप्रसन्न होऊन त्या अमृतस्थानामध्यें बैस, प्रवेश कर." ह्या संहितेंतील व ब्राह्मणांतील मन्त्रांचें भाषांतर देण्याचें प्रयोजन मोठें आहे. मीमांसेंतील उदाहरणें नेहेमीं यजुर्वेदांतील असतात. कारण यजुर्वेदामध्यें अध्वर्युगणाचे कर्माचें पूर्णपणें वर्णन केलें आहे. आणि कोणत्याहि यज्ञामध्यें अध्वर्यु आणि त्याच्या हाताखालचे ऋत्विज् यांचेंच काम फार असतें. माधवाचार्यांनीं जें यजुर्वेदाचें भाष्य केलें आहे, त्यामध्यें त्यांनीं प्रत्येक मन्त्रामध्यें पूर्वमीमांसेचा विचार केला आहे. या प्राचीन ग्रंथाच्या सरणीस अनुसरून ते प्राचीन ग्रंथ नीट समजावेत व त्यांचा आकार नीट लक्षांत यावा म्हणून आम्हीं मंत्रांचें भाषांतर दिलें आहे, लौकिक

Darsha-Pûrnamâsishti. See the Taittiriya-Sanhitâ (I. 7, 9, 1-2.) "Let life be obtained by a sacrifice. Let the vital breath (Prâna) be obtained by a sacrifice. Let the vital breath (Apâna) be obtained by a sacrifice. Let the vital breath (Vyâna) be obtained by a sacrifice. Let the sense of sight be obtained by a sacrifice. Let the sense of hearing be obtained by a sacrifice. Let mind be obtained by a sacrifice. Let speech be obtained by a sacrifice. Let the soul be obtained by a sacrifice. Let a sacrifice be obtained by a sacrifice." The phrase "to be obtained" is interpreted by Mâdhava into "activity as to the performance of their respective functions." See the Tattiriya-Brâhmana (III. 7, 5, 2-3.) "Oh, Purodâsha-cake, I make thy seat comfortable. I render it fit for thee by dripping ghea." This text is used when a place is allotted to the Purodâsha-cake. Now a Purodâsha-cake is to be placed. "Sit in the immortal seat, enter. Oh thou marrow of rice, be propitiated and sit in that immortal seat, enter." The importance of giving the translation of these passages requires to be pointed out. All the passages that the Mîmânsakas quote are from the Yajur-Veda because it fully describes the functions of the Adhvaryu and his companions. In every sacrifice, the greater portion of the work falls on these priests. In commenting on the Yajur-Veda, Mâdhava takes care to point out the Mîmânsâ-bearing of every text. We have given the translation that the way for the correct knowledge of Mâdhava Sâyana's commentary may be

सूत्राणि.

अथानुषङ्गाधिकरणम् ॥

अनुषङ्गो वाक्यपरिसमाप्तिः सर्वेषु तुल्ययोगित्वात् ॥ ४८ ॥

पदानि । अनुषङ्गः, वाक्य परिसमाप्तिः, सर्वेषु, तुल्य-योगित्वात् ॥

पदार्थः । अनुषङ्गः=वाक्यार्थपरिपूरणसमर्था पदानुवृत्तिः । सर्वेषु=(वाक्येषु) । तुल्ययोगित्वात्=तुल्यसम्बन्धात् ॥

वाक्यार्थः । अनुषङ्गेन वाक्यपरिपूरणम् । कुतः । सर्वेषु वाक्येषु तुल्यसम्बन्धात् ॥

भावार्थः । आचार्योऽनुषङ्गं लक्षयति साकांक्षपदानुवृत्या वाक्यसमाप्तिरिति । तुल्ययोगित्वादिति हेतुना तल्लक्षणं समर्थयति च । वाक्यसमुदाये कानिचिद् वाक्यान्यपूर्णानि सन्ति । तत्राकांक्षासन्निधि-योग्यताबलेन याऽनुवृत्तिः कर्तुं युज्यते सोऽनुषङ्गः । अनुषङ्गस्तु बुद्धिस्थः सन् लौकिकपदाध्याहारादपकर्षादुत्कर्षाच् च भिद्यते ॥

अनुसन्धेयानि वेदवाक्यानि ॥

यातें अग्नेऽयाशया रजाशया हराशया तनूवर्षिष्ठा गह्वरेष्ठोऽग्रं वचो अपावधीं त्वेषं वचो अपावधीꣳ स्वाहा । तै. सं १.२,११,२. ॥ चित्पतिस्त्वा पुनातु वाक्पतिस्त्वा पुनातु देवस्त्वा सविता पुनात्वच्छिद्रेण पवित्रेण वसोः सूर्यस्य रश्मिभिः । तै. सं १.२,१.२. ॥

वाक्यांला जसे वाक्यार्थमीमांसेचे सिद्धांत लावावयाचे तसेच वैदिक मंत्रांसलावायाचे. जसेः—तै. सं. (१.१,४,२.) मध्यांत एक वाक्य आहे कीं निरनिराळीं वाक्यें आहेत ? असा पूर्वपक्ष होऊन हें एक वाक्य आहे असा निर्णय होतो. पुनः तै. सं. (१.७,९,१–२.) यामध्यें सारीं निरनिराळीं वाक्यें आहेत. हें सम वा-

paved, The principles of exegetics apply equally to passages from profane as well as Vaidika literature, as in the passage of the Taittirîya-Sanhitâ (1. 1, 4, 2.) the question is asked whether it is a single sentence or different sentences. The question is answered, and it is declared that it is a single sentence. Again in the case of the passage (Taittirîya-Sanhitâ

४८. अनुषंगानें वाक्यसमाप्ति होते. कारण निरनिराळ्या गौण वाक्यांचा एकसारखा संबंध असतो.

क्याचें उदाहरण आहे. तै. ब्रा. (३, ७,५,२–३.) या मंत्रांत संयुक्त वाक्य असून गौण व मुख्य वाक्याचा परस्पर साकांक्षत्वसंबंध आहे. वाक्यांतील साकांक्षत्वसंबंध म्हणजे काय हें पुढील सूत्रावरून लक्षांत येईल.

४८. या सूत्रांत दोन शब्द विचार करावयाजोगे आहेत:–एक अनुषंग, आणि दुसरा तुल्ययोगित्व. वाक्याचा अर्थ लावते वेळीं केव्हां केव्हां कांहीं पदांचा अध्याहार करावा लागतो हें सर्वांस विदितच आहे. कांहीं पदें उगीच लोकरूढीस अनुसरून वाक्यांतून सोडलीं असतात अशा पदांच्या अध्याहारास लौकिक अध्याहार असें शास्त्रिजन म्हणतात. परंतु या ठिकाणीं वाक्य रचण्याची जी लोकरूढि तिशीं कांहीं संबंध नसतां केवळ अर्थसंगतीकरतां पदांची व्यवस्था करावी लागते. आणि व्यवस्था केल्यावांचून बुद्धीचें समाधान होत नाहीं. वाक्यसमाप्ति करण्याकरतां जी पदांची अशी व्यवस्था करावी लागते तिचें नांव अनुषंग असें ठेवलें आहे. केवळ निरनिराळे शब्द एका ठिकाणीं मांडल्यानें वाक्य होत नाहीं. मनुष्याच्या बुद्धीला कांहीं तरी अर्थग्रहण करतां येईल असा अर्थ त्या शब्दांपासून निष्पन्न झाला

48. Words supplied by logical sequence complete a sentence, for in all (subordinate) sentences, (there is) equal relationship.

(I. 7, 9, 1-2.), all the sentences are separate and independent. The last is an illustration of co-ordinate sentences (Samavâkya). The Taittirîya-Brâhmana (III. 7, 5,3.) is a case of a complex sentence and points out the relation between subordinate sentences and a principal sentence. The relationship called the Sâkânksatva (correlation) will be explained in the next sûtra.

48. There are two terms in this sûtra deserving attention :— the one is Anusanga and the other —Tulyayogitva. In construing a sentence, it is often necessary to supply some words. Some words are omitted from a sentence on account of the popular usage. When there are words which the idiom or popular usage requires to be supplied, it is called a case of popular Anusanga. But when without any reference to the idiom or popular usage, it is necessary to supply words to secure logical sequence or the congruity of thought, and when the mind is not satisfied without some special logical adjustment, the words supplied for completing the sense of a sentence constitute *Anusanga*. A sentence does not consist of mere words put together. It is necessary that the words should make some sense— such sense as can satisfy the human mind. Mere disconnected words as *go, tree, one, tomorrow* can-

पाहिजे. उगीच जा, तूं, काल, नाव, घाल, असे विस्खलित शब्द बोलल्यानें किंवा लिहिल्यानें वाक्य होत नाहीं. शब्दाच्या अंगीं वाक्य उत्पन्न होण्यास तीन गुण असले पाहिजेतः— एक आकांक्षा, दुसरा संनिधि, आणि तिसरा योग्यता. आतां "पाणी" असें म्हटलें आणि एक तासानें "आण" म्हटलें तर हें वाक्य नाहीं. हें इतकें सुलभ आहे कीं, तें वाचकास सांगण्याची गरज नाहीं. परंतु "आणायाचें" असें म्हटलें असतां काय आणायाचें, कोणीं आणायाचें, केव्हां आणायाचें, कसें आणायाचें असे प्रश्न उद्भवतात. अशा प्रश्नांविषयीं जी बुद्धि उत्पन्न होते तिस आकांक्षा म्हणतात. आकांक्षेचें वाक्याचे योगानें समाधान झालें पाहिजे. हा पहिला गुण. दुसरा गुण योग्यता आहे. अग्नि अंगावर टाकल्यानें शरीर गार झालें असें म्हणणें संभवत नाहीं. कारण मनुष्याच्या बुद्धीमध्यें अमुक पदाचा अमुक अर्थ असावा, आणि अमुक अर्थापासून अमुक कार्य व्हावें असा दृढ संस्कार असतो. अशी संस्कारयुक्त जी बुद्धि तिचें समाधान करणारा जो गुण त्यास योग्यता असें म्हणतात. या योग्यता, आकांक्षादि धर्मांचें न्यायशास्त्रांत विशेष निरूपण केलें आहे. यांचा आम्ही न्यायशास्त्राची चिंतनिका करतांना पूर्ण विचार करूं. या निरूपणावरून तुल्ययोगित्व यो पदाचा अर्थ सहज होतो. निर-

not make a sentence. Words can form a sentence when they possess three properties—the first is Âkânkṣâ, the second—juxtaposition, and the third—Yogyatâ. When the words—to be brought—are pronounced, the questions are naturally asked—what is to be brought? by whom is it to be brought? The state of the mind in which such questions are asked, is called expectancy (Âkânkṣâ). A sentence must satisfy the mind in the state of expectancy. "His body was cooled when fire was sprinkled upon it." Such a statement is simply impossible. It does not fulfil the condition of compatibility (Yogyatâ), for the human mind is accustomed to associate a notion with a certain word. The property of a statement which satisfies the human mind in this condition is called compatibility (Yogyatâ). We have not explained the principle of apposition, for it is so easy. *Bring*—pronounced now, *me*—an hour after, and *water*—in two hours more, can not make any sense. The system of philosophy known as Nyâya fully discusses the properties called Âkânkṣâ, Sannidhi and Yogyatâ. We will return to this subject when we interpret Nyâya-philosophy. The information we have given explains the signification of the term Tulyayogitva as used in the sûtra. The co-ordinate relationship of different sentences to one another is Tulyayogitva. Anusanga is based on the notions of Âkânkṣâ (expectancy) and Yogyatâ (logical compatibility). The translation of the Vaidika texts will explain the way in which Anusanga is brought to

निराळ्या वाक्यांचा परस्परांशीं सारखा च संबंध म्हणजे तुल्ययोगित्व. अनुषंग म्हणजे आकांक्षा आणि योग्यता या दोहोंची मिळून एक संज्ञा असें अनुमान होतें. अनुषंग कसा ध्यावा हें वेदमन्त्राच्यां भाषांतरावरून सहज लक्षांत येईल. "हे अग्ने ! तुझी जी लोखण्डांत निजणारी, (आणि) रुप्यामध्यें निजणारी, (आणि) सोन्यामध्यें निजणारी तनु, (आणि) अतिशय दग्ध," (तापलेलें लोखण्ड, किंवा रुपें किंवा सोनें यांमध्यें—माधव गव्हरपदाचा असा अर्थ करतो) "गुहेमध्यें असणारी तनु तिच्या योगानें उग्र वाणी मीं नाहींशी केली, मनाला संताप करणारी वाणी मीं नाहींशी केली, त्या तुला माझा होम अर्पण असो." तै. सं. (१. २, ११, २.) यामध्यें "तुझी जी लोखण्डांत निजणारी, रुप्यामध्यें निजणारी, आणि सोन्यामध्यें निजणारी तनु हे तीन निरनिराळे मन्त्र आहेत असें वेदभाष्यकार मानतात. पाहिल्या मन्त्राचा अर्थ पूर्ण करण्याकरतां तनु हा तृतीय मन्त्रापासून शब्द ध्यावा लागतो. पुनः दुसऱ्या मन्त्राचा अर्थ पुरा करण्याकरतां "हे अग्ने, तुझी जी तनु" इतकीं पदें पहिल्या मन्त्रांतून ध्यावीं लागतात. आणि तिसऱ्या मन्त्राचा अर्थ पूर्ण करण्याकरतां "हे अग्ने, तुझी जी" इतकीं पदें पहिल्या मन्त्रांतून ध्यावीं लागतात. अशीं पदें वास्तविक इकडचीं तिकडे फिरवून अर्थ कोणी करीत नाहींत. सहजच मनामध्यें अर्थाचें स्फुरण होतें.

bear. "Oh Agni, I offer my sacrifice to thee. I overcame (literally killed off) (my) harsh tongue, I overcame (my) vexatious tongue, by thy body latent in iron (literally sleeping in iron), latent in silver, latent in gold—(thy body oldest and lying in a cave)." "A cave" is the translation of *Gahvara* in the original. Mâdhava interprets *Gahvara* into heated iron, silver or gold. See the Taittirîya-Sanhitâ (I. 2, 11, 2.) With regard to this text, commentators consider that the three epithets of Agni "latent in iron, latent in silver, and latent in gold" to be three different sentences. In order to complete the sense of the first sentence, the words "(thy) body" require to be supplied from the third sentence. Again, to complete the sense of the second sentence, the words "oh Agni," from the first and "which (thy) body" from the third sentence are to be supplied. Again to complete the sense of the third sentence the words "oh Agni" are to be supplied from the first sentence. It is true that the words are never transferred backwards and forwards when a passage, like the one under consideration, is read and understood, for the mind *naturally* apprehends the sense and unconsciously, as it were, arranges the words as they suit its power of seeing logical sequence. This power of the human mind is called Anusanga in the sûtra. We will re-write the text with such words as the particular logical power of the mind supplies:—"Oh Agni, (that thy body) which (is) latent in iron (and) oh Agni, (that thy body which (is) latent in silver, (and)

सूत्राणि.

व्यवायान्नानुषज्येत ॥ ४९ ॥

पदानि । (सर्वेषु) व्यवायात्, न, अनुषज्येत ॥

पदार्थः । व्यवायात्=व्यवधानात् ॥

वाक्यार्थः । यत्र वाक्येषु व्यवधानं तत्राऽनुषङ्गः कर्तुं न शक्यते ॥

भावार्थः । व्यवधानमनुषङ्गस्य प्रतिबन्धकम् । पुनः । एकस्मिन् वाक्ये यानि प्रतिपदोक्तानि पदानि तेषामेवानुषङ्गः । अन्यत्रानुषङ्गस्याने लौकिकवाक्यशेषो भवति ॥

अनुसंधेयानि वेदवाक्यानि ॥

सं ते प्रागो वायुना गच्छता ४सं यज्ञैरङ्गानि सं यज्ञपतिराशिषा । तै. सं. १.३,८,१ ॥

यास अनुषंग म्हणतात. अनुषंगाचे योगानें घेतलेलीं पदें कौंसामध्यें घालून आम्हीं पुनः एकदां मन्त्र लिहून दाखवितों. "हे अग्ने ! तुझी जी लोखण्डांत निजणारी (तनु), (आणि) (हे अग्ने! तुझी जी) रुप्यामध्यें निजणारी (तनु) (आणि) (हे अग्ने ! तुझी जी) सोन्यामध्यें निजणारी तनु, (आणि) अतिशय दग्ध, (तापलेले लोखण्ड, किंवा रुपें किंवा सोनें यामध्यें) असणारी तनु, (तिच्या योगानें) उग्र वाणी मीं नाहींशी केली, मनाला संताप करणारी वाणी मीं नाहींशी केली, त्या तुला माझा होम अर्पण असो." आतां तै. सं. (१. २, १, २.) या मन्त्राचा अर्थ करायाचा. "ज्ञानाचा पति (मन) तुला पवित्र करो, वाणीचा पति (सरस्वती) oh Agni (that thy) body (which is) latent in gold (and) thy body oldest and lying in a cave,-(by its power) I overcame (my) harsh tongue, (by its power) I overcame (my) vexatious tongue. Into thee I offer my sacrifice." We will translate the text (I. 2, 1, 2.) "Let the lord of knowledge (mind) purify thee. Let the resplendent sun purify thee, by the bundle of unbroken grass, by the rays of the sun establishing the world." This is the original text literally translated. It consists of three sentences, each repeating the verb—purify. The means of this action is mentioned by the instrumental case at the end of the third sentence. The human mind is *naturally* led to connect the instrumental case with the verb as it is thrice repeated. This power of the mind is called Anusanga.

आतां व्यवधानामुळें संबंध तुटतो हा विचार.

४९. व्यवधान असलें कीं, अनुषंग होत नाहीं.

तुला पवित्र करो, देदीप्यमान सूर्य तुला पवित्र करो; न तुटलेल्या दर्भाच्या जुडीनें जगताला स्थापन करणाऱ्या सूर्याच्या किरणांनीं." असा मूळ मन्त्र आहे. यांत तीन वाक्यें आहेत. प्रत्येक वाक्यामध्यें "पवित्र करो," "पवित्र करो," असें क्रियापद आलें आहे, आणि या क्रियांचें साधन तिसऱ्या वाक्याच्या शेवटीं तृतीया-विभक्तीनें दाखविलें आहे. तरी हें क्रियेचें साधन तिन्ही क्रियांकडे लावण्याची मनुष्याची बुद्धि सहजच होते.

४९. मागील सूत्रांत अनुषंगांचा अंकुर बुद्धीमध्यें उत्पन्न होतो असें दाखविलें आहे. आतां ज्या वाक्यामध्यें असा बुद्धीमध्यें सहज अंकुर उत्पन्न होऊन वाक्याची परिसमाप्ति करण्याकरतां बुद्धीमध्यें अर्थाचें स्फुरण होत नाहीं, त्या ठिकाणीं अपूर्ण वाक्याची परिपूर्ति कशी करावी असा विचार चालला आहे. वाक्य तर अपूर्ण आहे, त्याची परिपूर्ति करण्याकरितां कोणतें पद घालावें हें सहज समजत नाहीं, आणि तें पद वाक्यांतहि अढळत नाहीं. मग सहजच असें पद बाहेरचें घालावें लागतें आणि वाक्य पुरें करावें लागतें. अशा बाहेरच्या पदाचा अध्या-

NOW THE SUBJECT OF THERE BEING NO ANUSANGA WHEN WORDS OR PHRASES INTERVENE.

49. There cannot be Anusanga in case of intervention.

49. In the last sûtra, we have stated that the Anusanga as defined by Jaimini is a logical or rather exegetical power of the human mind. Jaimini in this sûtra discusses the way in which a sentence is to be completed, a sentence on which such a power of the mind cannot bear, and the sense of which the mind naturally does not complete. The question is the completion of an incomplete sentence by supplying words. But what words are to be supplied is not easily seen. The words are not to be found in a sentence. Hence words necessary for completing the sense of a sentence are to be introduced into it. The introduction of words, by the reader, not in the text under consideration and the completion of the sense of the sentence by supplying words of his own constitutes a case of popular ellipsis. See the sûtra (I. 4, 29.) on the subject of popular ellipsis or Loukika Vâkyashesa. The question, again, is raised—what is the distinction between a case of Anusanga or exegetical power of the human mind and popular ellipsis. In the former case the connection of words with one another as based on expectancy (Âkânksâ) is essential :—juxtaposition of words as based on

हार केला कीं, त्यास लौकिक वाक्यशेष असें म्हणतात. लौकिक वाक्यामध्यें आणि अनुषंगामध्यें असा भेद आहे. लौकिक वाक्यशेषाकरितां (१.४,२९.) सूत्र पहावें. आतां अनुषंग कोठें करावा, आणि लौकिक वाक्यशेष कोठें करावा याविषयीं विचार केला पाहिजे. अनुषंगामध्यें परस्पर पदांची आकांक्षा असली पाहिजे. तीं पदें परस्पर संबंधानें जवळ असलीं पाहिजेत म्हणजे त्यांच्यांमध्यें व्यवधान उपयोग नाहीं. आकांक्षा म्हणजे काय याचा आम्हीं पूर्वी विचार केलाच आहे. पदें परस्पर जवळ असलीं म्हणजे त्यांमध्यें आनंतर्य हा धर्म उत्पन्न होतो. संबंधानें तीं परस्पर जवळ असलीं पाहिजेत म्हणजे वास्तविक तीं जवळ नसलीं तरी चालेल. संबंधानें मात्र पदें जवळ कशीं असतात हें उदाहरणावरून लक्षांत येईल. "ज्यानें फार अध्ययन केलें आणि लोकहितार्थ पुस्तकसंग्रह केला त्यानें विद्वज्जनावर उपकार केला असें कोण म्हणणार नाहीं ?" या वाक्यांत "ज्यानें" हें पद "केला आहे" या क्रियापदाचा कर्ता असल्यामुळें तें "पुस्तकसंग्रह" या पदाच्या जवळच आहे. अनुषंगाच्या योगानें "ज्यानें" हें पद "केला आहे" या पदाच्या जवळ आहे असें भासतें. पण वास्तविक तें जवळ नाहीं. मध्यें "फार, अध्ययन, केलें" इत्यादि पदें आलीं आहेत. तथापि तीं मध्यें आलेलीं पदें मध्यें नाहींत असाच मनामध्यें संस्कार उत्पन्न होतो.

their relation to one another is also essential—such juxtaposition as does not admit of any parenthetical words or phrases intervening. We have explained what Âkânksâ or the power of the mind called expectancy is. The property—juxtaposition of words or phrases—is called Ânantarya. Juxtaposition need not be real : one word need not be actually near another ; but it is essential that one word should be near another so far as their relationship and dependence are concerned. The adjuncts of a word—the words or phrases which enlarge its sense—are never considered to intervene. An illustration will simplify the observations we have made. Let us take the following sentence :—"Who will not say that he who has studied much and made a collection of books for the good of the people has obliged the learned ?" In this sentence, the word *who* is the nominative to *has made* and is near the phrase—"a collection of books." On account of Anusanga or exegetical relationship, the word *who* is seen to be near *has made*, but it is not really near it. The sentence "who has studied much" intervenes. But yet the intervening sentence is not recognized by the mind to intervene. We will proceed to the examination of Loukika Vâkyashesa or popular ellipsis. We will translate the Vaidika texts which are used in anointing the animals with clarified butter in an animal-sacrifice. "Let thy breath unite with the air. Let thy limbs unite with the gods. Let the the lord of the sacrifice unite with the blessing." In interpreting

आतां लौकिक वाक्यशेषाचा विचार करूं या. आम्ही संस्कृत सूत्राखालीं दिलेल्या मन्त्राचें भाषांतर करून दाखवितों. ह्या मन्त्राचा विनियोग पशुयज्ञामध्यें पशूला तूप लावून संस्कार करते वेळीं होतो. "तुझा प्राण वायूशीं जाऊन मिळो. तुझीं अंगें यजत्राशीं जाऊन मिळूं दे. आणि यज्ञपति आशीर्वादाशीं जाऊन मिळूं दे." या मन्त्राचा अर्थ करतांना माधवाचार्यांनीं यजत्र म्हणजे यागविशेष असा अर्थ केला आहे. आम्हांस असें वाटतें कीं, त्याचा अर्थ "देव" असावा, कारण ऋग्वेदांत सायणाचार्यच "यजनीय" म्हणजे "पूजायोग्य" असा अर्थ करतात आणि हें विशेषण देवास लावतात. या मन्त्राचे तीन भाग आहेत. त्यांत तृतीय भागामध्यें यजमानाला आशीर्वाद मिळावा याचें वर्णन असून पहिल्या आणि दुसऱ्या भागीं मारलेल्या पशूचीं अंगें कोठें जातात याचें वर्णन आहे. म्हणून पहिल्या भागांतील क्रियापद अनुषंगाचे योगानें तृतीय भागांत येत नाहीं. तिसऱ्या भागाचा अर्थ पुरा करण्याकरतां वाक्यशेष करावा लागतो. पुनः मन्त्राच्या दुसऱ्या भागामध्यें अनेकवचनी क्रियापद घालावें लागतें, आणि तिसऱ्या भागामध्यें पुनः एकवचनी क्रियापद घालावें लागतें अशा अनेक अडचणी उत्पन्न होतात, असें भाष्यकार वर्णन करतात.

this passage Mâdhava gives the meaning of Yajatra as the name of a sacrifice. We believe it means a god, for Sâyaṇa himself in his commentary of the *Rig-Veda* says that Yajatra is Yajanîya or fit to be worshipped and is applied to a god. The text we have translated consists of three parts—the first two parts show where the parts of the sacrificial animal go after its being killed, and the third mentions the blessing given to the sacrificer. The verb in the first sentence cannot be transferred to the third, because a plural verb is required in the second sentence, and in the third sentence, a singular verb is required. This is not a case, therefore, of Anuṣaṅga on account of these difficulties. Hence it is a case of ellipsis. To complete the sense of the third part the ellipsis requires to be supplied: a plural verb requires to be inserted in the second part. A singular verb is to be supplied in the third part. Commentators point out these difficulties of interpretation and maintain that the principles of what is called Anuṣaṅga are essential.

उपसंहार.

या पादांत मीमांसकदृष्ट्या कर्म म्हणजे काय याचा विचार झाला आहे. त्यांत कर्मांचा विभाग प्रधान व गौण असा केला आहे. असा जो मीमांसकांनीं विभाग केला त्यावर पूर्वपक्षकारांनीं कोट्या काढल्या. कारण बुद्धिवाद करणाऱ्या बौद्ध लोकांस अमुक कर्म लौकिक व अमुक कर्म वैदिक, किंवा अमुक कर्म प्रधान व अमुक कर्म गौण असा विभाग मुळींच इष्ट नव्हता. बौद्ध लोक यज्ञयागादि कर्म स्वर्गाचें साधन नाहीं असें उघड प्रतिपादन करीत. या बौद्ध लोकांचें खण्डन करतांना कर्म प्रधान व गौण असें म्हणणें मीमांसकांस बरें पडे. कारण प्रधान कर्मच काय तें वैदिक कर्म आहे आणि स्वर्गादिकांचें साधन आहे इतक्यावर कटाक्ष ठेऊन वादविवाद चालविला म्हणजे सहजच वादविवादाचा संकोच होईल. या विषयाचा पूर्ण विचार आम्हीं ६, ७, ८, सूत्रांच्या टिपांत केला आहे. मुद्दाम पूर्वपक्षकारानें प्रयाज म्हणून इष्टीचें अंग आहे त्याचें उदाहरण घेतलें आहे. उदाहरणार्थ दर्शपूर्णमासी ही इष्टि सर्व यज्ञांचीं प्रकृति आहे. ह्या इष्टीचा आकार सर्व यज्ञांचें मूळ आहे. तिजमध्यें प्रयाजहोमाची काय योग्यता ती दाखविली म्हणजे या पादांत जो वादविवाद केला त्याचें स्वरूप नीट लक्षांत येईल. तुपाच्या पांच आहुति दर्शपूर्णमासीमध्यें अग्नीस देतात. दर्शपूर्णमासींत मुख्य आहुति ज्या द्यायाच्या

SUMMARY.

In this chapter, the nature of an action as recognized by the Mîmânsakas is considered. An action (Karma) is divided into two classes—principal and subordinate. The Buddhists opposed this division, because they could not recognise actions sacred as distinguished from secular or actions principal as distinguished from subordinate. The Buddhists openly declared that a sacrifice is not the means of obtaining Heaven. In refuting these Buddhists, the Mîmânsakas found the division of actions into principal and subordinate to afford some advantage, for they could narrow the discussion by confining it to what are called principal actions which alone are Vaidika and the means of obtaining Heaven. We have examined this part of the discussion in the foot-notes to 6, 7 and 8 sûtras of this chapter. The Buddhistic opponent purposely mentions Prayâja—a part of a sacrifice. We must illustrate this point of the discussion. The sacrifice called Darsha-pûrṇamâsî is the model, the *form* of all sacrifices. The bearings of the discussion in this chapter would be easily understood if the place and importance of the oblation called Prayâja be pointed out. Five times ghea or clarified butter is thrown into a sacred fire. The principal oblations in the Darshapûrṇamâsî-sacrifice are those of the rice-cake called Purodâsha. We will describe what Purodâsha or sacrificial rice-cake is in the sequel. This oblation is a principal action. Prayâja-oblations

त्या पुरोडाशाच्या म्हणजे तांदुळाच्या भाकरीच्या असतात. पुरोडाश कसा करतात याचें वर्णन आम्हीं पुढें करूं. पुरोडाशाची आहुति देणें तें प्रधान कर्म. प्रयाज ह्या आहुती या मुख्य कर्माचें अंग आहेत. असें प्रत्येक इष्टीमध्यें कांहीं एक आहुति प्रधान कर्म होतात आणि बाकी सर्व यांचीं अंगें होतात. पूर्वपक्षकार असा हट्ट धरून बसला कीं, देवतांची जी स्तुति होते तें यज्ञाचें अंग आहे. आणि वास्तविक पाहतां मीमांसकदृष्ट्या देवतांची स्तुति हीं प्रधान आहे. हीं स्तुतशस्त्रें प्रधान कीं गौण हा वाद या पादांत मोठ्या निकरानें झाला आहे. (२.१,१३–२१.) पहा. बौद्धाचार्य आणि वैदिकाचार्य यांनीं परस्परांवर ज्या कोट्या केल्या त्या लक्ष देण्याजोग्या आहेत. देवतांचें केवळ गुणवर्णन होतें म्हणून स्तोत्रें किंवा शस्त्रें हीं गौण आहेत. देवता ह्या गुणी आणि स्वरूपादि हे त्यांचे गुण. जो गुणी त्याची योग्यता गुणापेक्षां मोठी आहे. म्हणून ज्या स्तोत्रशस्त्रादिकेंकरून देवतांचें गुणवर्णन होतें, तीं गौण, व देवता ह्याच मुख्य, असें बौद्धाचार्यांचें म्हणणें पडलें. परंतु वैदिक परंपरेप्रमाणें मन्त्र ह्याच काय त्या देवता. मग सहजच स्तोत्रशस्त्रादि मन्त्र मुख्य असें वैदिक आचार्यांचें म्हणणें पडलें. या वादविवादावरून बौद्धाचार्य मूर्तिपूजा करीत आणि वैदिक आचार्य तिचा निषेध करून यज्ञयागादिच मुख्य ब्रह्मकर्म हें स्थापन करीत असें दिसतें. हा वाद होतां होतां पदांचा

are a part of this principal oblation. Thus in every sacrifice, some-oblation is principal and the rest are subordinate. On this illustration, the Buddhistic opponent builds an argument and insists that the praises of gods are only a subordinate part of a sacrifice. But the Mîmânsakas consider the praises of gods to be principal. Thus the discussion whether the praises of gods as sung or recited were principal or subordinate was originated. See (II. 1, 13-29.) sûtras. The arguments of the Buddhists and the Mîmânsakas—the adherents of the Vaidika polity—are historically important. As the prose-passages repeated or verses sung simply describe qualities of gods, they are subordinate. The gods are principal, as they are qualified. The qualified or the substratum of qualities is more important than mere qualities. Hence the gods are more important than their praises. But the Mîmânsakas consider the praise to be their god himself. Hence they insist on the praises being principal. This discussion warrants the inference that the Buddhists worshipped idols, and that the Mîmânsakas or the adherents of the Vaidika polity condemned idolatry and insisted upon the performance of sacrifices in their stead. The discussion naturally introduces the examination of certain exegetical principles such as the transference of words backwards and forwards. When in the course of the discussion, it was stated that the Mantras were principal,it was necessarily asked, —what are these Mantras ? and what is their nature ? In answering these questions, the Mîmân-

अपकर्ष उत्कर्ष म्हणजे काय याचाहि विचार झाला. मग वाद होतां होतां मन्त्रच मुख्य अशी जेव्हां कोटी निघाली, तेव्हां मन्त्र म्हणावेत तरी कशाला असा विचार उत्पन्न झाला. या विचारसंबंधानें आचार्यांनीं वेदाचा मन्त्र आणि ब्राह्मण असा विभाग केला. मन्त्राचें लक्षण केलें. मग ब्राह्मणाचें लक्षण केलें. ऋग्वेद तो कोणता, यजुर्वेद तो कोणता, सामवेद तो कोणता, यांचीं लक्षणें केलीं. अथर्ववेदाचें मुळींच नांव घेतलें नाहीं. हें तर काय? परंतु आश्वलायन बौद्धायनादि आचार्यांच्या वेळीं यज्ञयागादि फार होत असत. त्या वेळीं निगद म्हणून कांहीं मन्त्र प्रसिद्धीस आले, व ते यजुर्वेदांत मोडूं लागले. जैमिनीच्या वेळीं यजुर्मंत्रामध्यें आणि निगदामध्यें भेद मुळींच मानीत नव्हते. असें असतांहि पूर्वपक्षकारास निगदमन्त्रांना यजुर्मंत्र म्हणणें पत्करेना. असो. आतांचे श्रद्धाजड लोक कोणताहि संस्कृत ग्रंथ असला म्हणजे तो पूज्य असें मानतात. परंतु जैमिनीच्या वेळीं निगदांसारखे गृहीत मन्त्राहि पूज्य मानावेत कीं न मानावेत याविषयीं वादविवाद होत असे. अस्तु. मन्त्र अमुक, पूज्य मन्त्र अमुक असें ठरलें. नंतर मन्त्राचा अर्थ तरी कसा करावा हा विचार चालू झाला. अर्थ करतांना एका वाक्याचे तुकडे पाडूं नयेत, म्हणजे वाक्यभेद करूं नये, असा सिद्धांत मीमांसकांनीं केला. हा सिद्धांत जरी प्रथमदर्शनीं अतिशय सुलभ वाटतो, तरी याची योग्यता फार मोठी

sakas divided the Veda into Mantras and Brâhmaṇas, and defined the former and the latter as well as the Ṛig-Veda, Sâma-Veda and Yajur-Veda. But the Atharva-Veda is not mentioned. This is nothing. At the time of the Âchâryas like Boudhâyana and Âshvalâyana, when sacrificial activity predominated, Mantras called Nigadas attracted attention, and began to be included in the Yajur-Veda. At the time of Jaimini, the *Nigadas* were not distinguished from the Mantras of the Yajur-Veda. Yet the Buddhistic opponents did not admit that the *Nigadas* were to be included in the Yajur-Veda. The discussion between the Buddhists and the Vaidika orthodoxy on the subject of the Nigadas is interesting, for it shows how the sacred scriptures were scrupulously watched and how no addition could be made to them. Now-a-days any Sanskṛita verse is easily recognised as a part of the sacred scriptures. The discussion determined the extent of the sacred scriptures, and only particular Mantras were to be recognised as sacred. The next question was —how were these Mantras to be interpreted? The Mîmânsakas did not recognize the division of a sentence as proper. The statement of the individuality of a sentence as an exegetical principle does not appear to be [illegible]ly important at first sight, but in applying it it develops [illegible] of important rules. It is necessary to examine what is called Anuṣaṅga which is used in three senses which are [illegible], therefore, to be confounded. An Anuṣaṅga is a case of con-

आहे. कारण याची योजना करतांना याचे नाना आकार होतात. एथें अनुषंगाचा थोडा विचार केला पाहिजे. अनुषंगाचे तीन अर्थ आहेत, म्हणून त्यांविषयीं घोंटाळा पडण्याचा संभव आहे. अनुषंग म्हणजे काय? ज्यांत मन सहजच आपल्या आपणच शब्द पुरवून वाक्यार्थ पुरा करतें तो वाक्यार्थाचा प्रकार. हा अनुषंगाचा एक अर्थ. मनाची जी शक्ति अशा रीतीनें अर्थ पुरा करते, त्या शक्तीचें नांव अनुषंग. ज्या शास्त्राप्रमाणें वाक्यार्थाचा विचार होऊन वाक्यार्थ पूर्ण करण्याकरतां शब्द वाक्यांत पुरवितां येतात, त्या शास्त्राचें हि नांव अनुषंग आहे. हा अनुषंगाचा तिसरा अर्थ. अनुषंग म्हणजे मनाची शक्ति काय! वाक्यार्थ करते वेळींच या शक्तीचा उपयोग होतो काय! अध्यात्मविद्येमध्यें मनाच्या ज्या शक्ति किंवा क्रिया धरल्या आहेत, त्यांतील कोणत्या क्रियेशीं किंवा शक्तीशीं इचा संबंध मानायाचा? अध्यात्मविद्येच्या संबंधानें या प्रश्नांची योग्यता मोठी आहे. अनुषंगरूप मानसिक शक्तीचें कोणीं अर्वाचीन पंडितांनीं कोठें वर्णन केलेलें अढळत नाहींसें वाटतें. तथापि सूत्रांत अनुषंगाचें जसें वर्णन केलें आहे, तशी मनुष्याच्या मनाची नेहेमीं प्रवृत्ति असते. मनुष्याचें मन हवं ते विचार किंवा तद्बोधक शब्द वाक्यांत घालून वाक्यार्थ पुरा करून घेतें. ही अशी विशेष शक्ति न मानली तर मनुष्याला भाषेचा उपयोग करतां येstruction in which words are naturally and inevitably supplied by the human mind. It is, secondly, the exegetical power of the mind which thus supplies the words. It is, thirdly, the exegetical principle which examines the syntactical conditions on which the syntactical supply of words for completing the sense of a sentence is based. Is it a faculty of the mind? Does it come into play only when a sentence is to be interpreted? With what known psychological operations or faculties is it to be connected? These are important questions in psychology. We do not believe that modern philosophers have ever mentioned such an operation of the mind. Yet the human mind constantly works in the way explained in the sûtras. Human speech would be impossible if the power with which the human mind supplies words or rather the ideas of which the words are exponents, were not recognized. We have examined all the processes of elaboration, or ratiocination mentioned by psychologists. Anusanga, though an intellectual operation, is distinct from any of them. This is a peculiar function of the mind and is to be observed in exegetics only. It is an exegetical operation or faculty. Its logical bearings are important, for before a complex sentence is analysed into separate propositions, before the last are distinctly stated, before the sense is categorically stated, before the deficient words or phrases are supplied, the mind has acted, and has developed a signification, the logical consistency of which it is able to examine and

ण्याचाच असंभव. अध्यात्मशास्त्रकारांनीं अनुमानादि ऊहादि ज्या प्रकाराचें वर्णन केलें आहे, त्या कोणत्या हि प्रकारांत अनुषंग हा बुद्धीचा प्रकार गणतां येत नाहीं. अनुषंग हा जरी मानसिक व्यापार आहे तरी तो त्या सर्वांपासून भिन्न आहे ही विशेष मानसिक शक्ति आहे, आणि वाक्यार्थ करतांना मात्र हिची प्रवृत्ति अढळते. हिला वाक्यार्थ करणारी मानसिक शक्ति असें म्हटलें असतां हि चालेल. या शक्तीचे न्यायशास्त्रदृष्ट्या जे संबंध आहेत त्यांची योग्यता मोठी आहे; कारण एखाद्या संयुक्त वाक्याची फोड करून त्यामध्यें किती निरनिराळीं वाक्यें आहेत हें पाहाण्यापूर्वी, हीं निरनिराळीं वाक्यें स्पष्ट मांडून यांचा अमुकच अर्थ आहे असें म्हणण्यापूर्वी, किंवा जे शब्द किंवा वाक्यांश वाक्यांत नाहींत ते पुरे करण्यापूर्वी, ही अनुषंगरूप मानसिक शक्ति प्रवृत्त होऊन चुकली, व अमुकच वाक्यार्थ आहे असें मनांत येऊन चुकलें, आणि वाक्यार्थ योग्य आहे असें ठरवून तो पत्करावा असाहि सिद्धांत होऊन चुकला. अनुषंगाचा जो तिसरा अर्थ आम्हीं केला आहे त्याचें इतकें पर्यवसान आहे हे सर्व प्रकार समजावेत म्हणून एकवाक्य म्हणजे काय, सिद्धवाक्य म्हणजे काय, संयुक्त किंवा साकांक्ष वाक्य म्हणजे काय, सम वाक्य म्हणजे काय, अनुषंग कोठें करावा कोठें न करावा, अनुषंगाचें लक्षण काय व्यवधान म्हणजे काय, वाक्यांतील पदांमध्यें परस्पर संबंध कोणता असतो, अशा गोष्टींचा विचार या पादामध्यें झाला आहे.

---

accept. From such a mental power, the third sense of the word Anusanga is inseparable. To facilitate the application of these exegetical principles, the nature of an individual sentence, a simple sentence, a complex sentence, a single sentence and a compound sentence is examined. The exegetical principle of the application of the exegetical faculty of the human mind is next explained. Its positive and negative sides being discussed, it is defined. The nature of exegetical intervention (Vyavadhyâna) and the syntactical correlation is explained. All these important exegetical principles are discussed in this chapter.

00044328

Digitized with financial assistance from the
Government of Maharashtra
on 18 July, 2018